म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र.

# मानवेंद्रनाथ रॉय

द्वा. भ. कर्णिक

REFBK-0015994

पॉप्युलर प्रकाशन



# मानवेंद्रनाथ रॉय

द्वा. भ. कर्णिक

४२०२२ चरित्र
१३८८ २०।८८०

REFBK-0015994

मराठी ग्रंथ संग्रहालय
द्वा. क्र. १५९९४

पॉप्युलर प्रकाशन

© द्वा. भ. कर्णिक

पहिली आवृत्ती १९६७
मुद्रक
वि. ग. माटे
विश्वकर्मा मुद्रणालय (प्रा.) लि. ४०५ नारायण पेठ पुणे २
प्रकाशक
ग. रा. भटकळ
पॉप्युलर प्रकाशन ३५ सी ताडदेव रोड मबई ३४ डब्ल्यू बी

अनिकेत अवस्थेतील रॉय यांना व रॉयवाद्यांना आश्रय देणाऱ्या
आणि त्यांच्यावर प्रेमाचा व सौहार्दाचा अखंड वर्षाव करणाऱ्या

श्री. जमशेद वाडिया

आणि

सौ. हिल्ला वाडिया

यांना

कृतज्ञतापूर्वक अर्पण

# प्रस्तावना

मानवेंद्रनाथ रॉय यांचे हे चरित्र नव्हे. त्यांच्या तत्त्वज्ञानाचे, विचारसरणीचे, दृष्टिकोणाचे, ध्येयधोरणाचे अधिकृत स्वरूपही या पुस्तकात व्यक्त झालेले दिसणार नाही. तो माझा अधिकार नव्हे. माझी ती पात्रताही नाही. मी रॉय यांना पाहिले, त्यांचे जवळून दर्शन घेतले, त्यांच्या सहवासात दिवस काढले, त्यांच्या पक्षाचा व पंथाचा एक स्वयंसेवक म्हणून मी वावरलो, त्यांची शिकवण आत्मसात करण्याचा मी आपल्या परीने प्रयत्न केला आणि त्यांची बरीवाईट सेवाही केली. त्या काळात त्यांच्या जीवनाचा व जीवनातील अनेकविध पैलूंचा माझ्या मनावर जो संस्कार घडला, त्यांच्या तोंडून मी जे काही ऐकले, त्यांनी उघडलेल्या ज्ञानभंडारातून जे काही अल्पसे ज्ञान उचलले आणि त्यांचे अनुयायित्व पत्करून हाती घेतलेल्या राजकीय व सामाजिक कार्यांत जे काही अनुभव मला मिळाले त्यांचा परामर्श मी या लेखनात घेतला आहे. त्यात सुसंगती नाही, सुसूत्रपणाही नाही. मनाच्या कप्प्यात ज्या आठवणी साठून राहिल्या होत्या त्या मी स्वच्छंदीपणाने, मोकळेपणाने खुल्या दिलाने प्रगट केल्या आहेत. मला समाधान आहे ते एवढेच की या अव्यवस्थित, उत्स्फूर्त लेखनातूनसुद्धा रॉय यांचे जे दर्शन घडते ते निःसंशय विलोभनीय आहे.

एका प्रतिभाशाली तत्त्वज्ञाचे, विचारवंताचे, राजकारणी पुरुषाचे हे दर्शन आहे. उत्कटपणाने, जीवनाबद्दलच्या आसक्तीने, सौंदर्याबद्दलच्या अभिलाषेने आणि

मानवतेवरील श्रद्धेने जीवन जगणाऱ्या एका थोर व्यक्तीचा जीवनपटही अल्प प्रमाणात येथे उलगडला जात आहे. बस्स, यातून रॉय यांच्या तेजस्वी जीवनाविषयी कुतूहल निर्माण झाले, त्यांच्या विचारसरणीचा अभ्यास करण्याची स्फूर्ती निर्माण झाली तरी माझा कार्यभाग झाला. रॉय यांनी बुद्धिवंतांचे, विचारवंताचे एक मोहोळ तयार केले. भारतातील जवळ जवळ तीन पिढ्यांतील अनेक लोकांवर त्यांनी आपली छाप टाकली व त्यांच्या विचारांची घडण करण्याचे श्रेय संपादन केले. रॉय यांचे हे ऋण कोणालाही नाकारता येणार नाही. ते ऋण अल्पांशाने तरी फेडण्यासाठी जर निरनिराळ्या पक्षोपपक्षांत विखुरले गेलेले विचारवंत कार्यकर्ते बोलके झाले तरी रॉय यांच्या कामगिरीवर कितीतरी नवा प्रकाश पडू शकेल आणि भारताच्या स्वातंत्र्यपर्व काळातील एक कालखंडही उजळून निघेल. एम्. एन्. रॉय यांच्याबद्दल जे वाढते कुतूहल समाजात दृग्गोचर होऊ लागले आहे ते पुरे करण्याच्या दृष्टीने रॉय यांचे एक विस्तृत चरित्र त्यांच्या विचारसरणीवर श्रद्धा असलेल्या एखाद्या अधिकारी व्यक्तीकडून लिहिले जावयाला पाहिजे. माझे हे पुस्तक ही एका अनुयायाने विनम्रपणे वाहिलेली श्रद्धांजली तेवढी आहे.

मुंबई ६–२–१९६७ द्वा. भ. कर्णिक

# अनुक्रम

एकला चलो रे १
क्रान्तिपर्व ५
लोकशाही क्रान्तीचे प्रणेते ९
घटना परिषदेच्या कल्पनेचे जनक १३
उदारमतवादाचा वारसा १७
परिपूर्ण मानवी जीवनाचे भोक्ते २१
मूर्तिभंजक आणि विज्ञाननिष्ठ २५
वैचारिक बंडखोरीचे प्रवर्तक २९
रॉय आणि सुभाष-गांधी संघर्ष ३३
रॉय आणि आझाद हिंद फौज ३७
रॉय आणि जवाहरलाल नेहरू ४२
गुप्तपणे भारतप्रवेश ४७
अज्ञातवासातील कार्य व अटक ५२
रॉय आणि लाल नेपोलियन ५७
स्तालिनचे हत्याकांड आणि रॉय ६२
दहशतवादाकडून मार्क्सवादाकडे ६६
मार्क्सवादाच्या पलिकडे ७१
माणूसकीचा शोध ७६
रॉय आणि एलन ८०
बावनकशी मानवतावाद ८५
परिपूर्ण जीवनाची सांगता ९०
सौंदर्यदृष्टी तशीच संसारदक्षता ९४
तत्त्वज्ञ तसेच अभिजात रसिक ९८
पंडितजींशी अखेरचा सुखसंवाद १०३
अखेरचे क्षण १०७
चैतन्य लुप्त झाले ११२
समारोप ११६

# शुद्धीपत्र

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १ | ८ | अलौकिक | लौकिक |
| २१ | २२ | लाचार | लाचार, |
| २३ | ५ | डे ड्रेस | दे ड्रेस |
| २९ | १३ | वोरोटिन | वोरोदिन |
| ३४ | १९ | तयार | तयारी |
| ३८ | २३ | शत्रूशीने | शत्रूशी |
| ४५ | ६ | दोशांतील | देशांतील |
| ६६ | ४ | नावाशी | वादाशी |
| ६७ | २२ | वागा | वागा |
| ६७ | २६ | वागा | वागा |
| ७७ | ३२ | गांधीवादी | गांधीवाद |
| ९० | १२ | जेथे | तेथे |
| १६ | ६ | जमनादार | जमनादास. |

क्र. १५९९४

# एकला चलो रे

२५ जानेवारीच्या एका मध्यरात्री एम्. एन्. रॉय यांचे देहावसान झाले. त्याला आता थोडीथोडकी नाही, तब्बल [illegible] वर्षे लोटून गेली आहेत. काळ किती झपाट्याने निघून जातो त्याची कल्पना सुद्धा करवत नाही. काळ सुखदु:खाचे विस्मरण पाडतो तशीच व्यक्तिजीवने सुद्धा पुसून टाकतो. पण काही व्यक्ती काळाशी सुद्धा टक्कर देत राहतात आणि त्यांनी उठविलेले ठसे काळाला सुद्धा पुसून टाकता येत नाहीत. एम्. एन्. रॉय ही अशीच एक व्यक्ती होती. अनेक दृष्टींनी अलौकिक. त्यांचे अलौकिकत्व आज प्रतीत होत आहे ते असे की जीवनाच्या अखेरच्या काळात अलौकिक दृष्टीने विस्मृतीच्या पडद्याआड जात असल्याचा जो भास त्यांच्या बाबतीत होत होता तो त्यांनी मृत्यूनंतर खोटा ठरविला आणि जसजसे दिवस जात आहेत तसतशी त्यांची स्मृती अधिकच तीव्रतेने जाणवू लागली आहे, त्यांच्या जीवनकार्याबद्दलचे, त्यांच्या तात्त्विक भूमिकेबद्दलचे कुतूहल अधिकच वाढत चालले आहे, त्यांना गुरुस्थानी मानणाऱ्या विचारवंतांची व राजकारणी पुरुषांची संख्या झपाट्याने वाढू लागली आहे. एम्. एन्. रॉय यांची स्मृती उजळून निघण्याचे, त्यांच्याबद्दलचे कुतूहल वाढण्याचे, त्यांची प्रेरणा अधिक प्रभावी होण्याचे कारण काय असा प्रश्न त्यांच्याशी अपरिचित, त्यांच्या बाबतीत अनभिज्ञ असा तरुणवर्ग विचारणे साहजिक आहे. मला स्वत:ला तो प्रश्न अप्रस्तुत तर वाटत नाहीच, पण अज्ञानाचा द्योतकही वाटत नाही. कारण नव्याने समाजात पाऊल टाकणाऱ्या पिढीला त्यांची ओळख असणे शक्यच नाही.

पण त्या प्रश्नाचे उत्तर देताना प्रथमच मला स्पष्ट केले पाहिजे की राजकीय वा सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या लोकांना एम्. एन्. रॉय यांच्या जीवनाची व विचारसरणीची ओळख करून घेणे क्रमप्राप्त नव्हे अपरिहार्य आहे. ती ओळख त्यांनी करून घेतली नाही तर भारतीय राजकारणातील विचारप्रवाहांचे त्यांना आकलन करता येणार नाही, जगातील घडामोडींचा भारताच्या राजकारणावर जो परिणाम झाला त्याचे विश्लेषण करता येणार नाही आणि राष्ट्रवाद, समाजवाद, साम्यवाद, फॅसिझम, गांधीवाद, लोकशाही समाजवाद, प्रतिगामी पुनरुज्जीवनवाद वगैरे वादांचा जो गोंधळ सबंध जगात निर्माण झाला व अजूनही जो मिटलेला नाही, त्या वादाच्या बाबतीत निश्चित भूमिका घेणेही त्यांना शक्य

होणार नाही. रॉय यांचे वैशिष्टय असे आहे की ते नुसते तत्त्वचिंतक राहिले नाहीत, तत्त्वांच्या रणधुमाळीत भाग घेताना त्यांनी राजकारणाला आपल्या परीने वळण लावण्याचा प्रयत्न केला व नव्या, विज्ञाननिष्ठ सामाजिक तत्त्वज्ञानाचा पाया घालण्यातच आपले सारे जीवन त्यांनी व्यतीत केले.

रॉय यांचे जीवन व तत्त्वज्ञान हे एकसारखे विकसित होत गेलेले आहे हे त्यांच्या बाबतीत विशेषत्वाने लक्षात ठेवण्यासारखे आहे. एका गतिशील मनाचा सारा आविष्कार त्यांच्या जीवनात प्रगट झालेला दिसून येतो. त्या गतीला वेग तरी किती, त्या मनाची झेप केवढी मोठी ! एका लहानशा, उण्यापुऱ्या साठ वर्षाच्या जीवनात जी क्षितिजे त्या मनाने उजळून काढली त्यांची कल्पना करू लागले तर अक्षरशः मन दिपून जाते, मती कुंठित होते. कल्पना करा, एक चौदा वर्षाचा तरुण दहशतवादी क्रांतीचे सतीचे वाण हाती घेऊन, ब्रिटिश साम्राज्यशाहीचे आसन उखडून काढण्यासाठी जर्मनांची मदत मिळविण्याकरिता परदेशांशी संधान बांधतो आणि नाना नावे बदलून सारी अतिपूर्व पालथी घालतो यापेक्षा अधिक रोमांचकारी घटना कोणती असू शकेल काय? नरेंद्र भट्टाचार्य ऊर्फ जॉन मार्टिन ऊर्फ मानवेंद्रनाथ रॉय यांनी ते कर्तृत्व केले आहे. तो पराक्रम गाजविला आहे. दहशतवादी क्रांतीचे जे काही उपासक भारतात होऊन गेले त्यांत एम्. एन्. रॉय यांचा समावेश करणे क्रमप्राप्त आहे. ब्रिटिश सरकारने जो सेडिशन कमिटीचा रिपोर्ट प्रसिद्ध केला आहे त्यात या रोमांचकारी जीवनाचा वृत्तांत प्रसिद्ध झाला आहे.

भारताच्या सुदैवाने रॉय हे वैचारिक दृष्टीने त्या कालखंडातच रमत राहिले नाहीत. त्यांनी अनुभवाने त्याचप्रमाणे वाचनाच्या योगाने दहशतवादी आंदोलनाचे वैय्यर्थ्य फारच थोडक्या काळात जाणले आणि आपल्या क्रांतिकारक जीवनाची दिशा विचारपूर्वक बदलली. मात्र त्यांनी पाऊल टाकले ते एका क्रांतीकडून दुसऱ्या क्रांतीकडे. ही क्रांती म्हणजे मार्क्सवादाने दिग्दर्शित केलेली सामुदायिक क्रांती. व्यक्तिगत दहशतवादाकडून सामुदायिक आंदोलनाकडे रॉय यांनी टाकलेले हे पाऊल होते. पुन्हा एकदा रॉय यांनी केवढी तरी मोठी झेप घेतली होती. तीही सतीचेच वाण हाती घेऊन.

पण आता एका विश्वव्यापी आंदोलनाच्या कक्षेत ते आले होते. मार्क्स आणि एंगल्स यांच्या विचारांचा वारसा आत्मसात करून लेनिनसारख्या एका विख्यात क्रांतिकारकाच्या प्रेरणेने ते अभूतपूर्व अशा रशियन क्रांतीच्या उभारणीला हातभार लावू लागले होते. पुन्हा एकदा कल्पना करा ऐन विशीतील एक तरुण अतिपूर्वे-कडून अमेरिकेचा किनारा गाठल्यानंतर मेक्सिकोसारख्या देशातील राष्ट्रीय क्रांतीचा पाईक काय बनतो आणि त्याच्या पराक्रमाची कीर्ती लेनिनच्या कानी जाऊन

प्रत्यक्ष लेनिनच्या आमंत्रणावरून तो रशियन क्रांतीच्या आगरात काय जाऊन पोचतो. याला योगायोग म्हणावे की रॉय यांचा हा भाग्ययोग फळाला आला म्हणावे ? मती कुंठित करणारीच ही सारी घटना आहे.

रॉय यांच्या क्रांतिजीवनातील हा एक कालखंड या वेळी सुरू झाला खरा; —अत्यंत उज्ज्वल, रॉय यांनाच नव्हे तर भारताला भूषणभूत ठरणारा. एम्. एन्. रॉय हे कधीही विस्मृतीच्या पडद्याआड जाऊ शकणार नाहीत ते या कालखंडातील त्यांच्या कामगिरीमुळे सुद्धा. त्या कामगिरीचा विपर्यास जरूर केला जात आहे. पण स्तालिनने रशियन राज्यक्रांतीच्या इतिहासातील पाने पुसून टाकण्याचा जो विफल प्रयत्न केला तशीच या विपर्यासाची गती होणार आहे. कारण कानपूर कटाच्या आणि मीरत कटाच्या खटल्यातील साक्षीपुराव्यात प्रत्येक पानावर एम्. एन्. रॉय यांचे नाव आढळून येत आहे. आणि कम्युनिस्ट आंदोलनाचा जो इतिहास लिहिला जाईल त्यात एम्. एन्. रॉय यांची प्रेरणा व मार्गदर्शन यांचे ऋण प्रामाणिक इतिहासकाराला मान्यच करावे लागणार आहे. खरे सांगावयाचे तर कम्युनिस्ट क्रांतीचे लोण भारतापर्यंत पोचविले ते रॉय यांनी; मार्क्स व मार्क्सवाद यांची ओळख भारताला करून दिली ती त्यांनीच; आणि लेनिन, स्तालिन यांच्या नेतृत्वाखाली कम्युनिस्ट इंटरनॅशनलचा एक घटक विभाग भारतात प्रस्थापित करावयाला त्यांचीच प्रेरणा व साहाय्य कारणीभूत झाले.

ते इष्ट की अनिष्ट हा वाद आता दुसऱ्या महायुद्धानंतरच्या बदलत्या परिस्थित निवांतपणे करता येईल. कारण आता रशियन कम्युनिझमचे स्वरूप बदलले आहे. भारत आता साम्राज्यशाहीच्या जोखडाखाली राहिलेला नाही, आणि साम्राज्यशाही ज्या भांडवलदारी अर्थव्यवस्थेत दृढमूल झाली त्या भांडवलशाही-मध्येही अभूतपूर्व बदल झाले आहेत. पण इतिहासाच्या क्रमात रशियन राज्य-क्रांतीला, मार्क्सवादी तत्त्वज्ञानाला जे स्थान आहे ते विचारात घेता एम्. एन्. रॉय यांनी मार्क्सवादाची कास धरून भारताच्या क्रांतीला जे वळण लावण्याचा प्रयत्न केला त्याला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त होणे अपरिहार्य आहे. त्यांनी या कालखंडात जे जे मार्गदर्शन केले, भारतातील परिस्थितीचे जे विश्लेषण केले, भावी काळातील परिस्थितीबद्दल जी भाकिते केली ती सर्वच अचूक आहेत असे मानण्याचे कारण नाही. पण स्थूलमानाने विचार करता रॉय यांच्या प्रज्ञावंत दूरदृष्टीला जे दिसले व जे कालांतराने प्रत्यक्षात घडून आले ते भारताच्या राजकारणावर प्रभाव टाकणाऱ्या फारच थोड्या राजकारणी पुरुषांना दिसले असेल असे निःसंकोचपणे म्हणता येईल. एकच उदाहरण घ्यावयाचे झाले तर भारताच्या स्वातंत्र्यप्राप्ती-बद्दलचे भाकित एम्. एन्. रॉय यांच्या 'डीकॉलनायझेशन'च्या प्रबंधातसुद्धा कित्येक वर्षापूर्वी सूचित केलेले आढळून येईल. या प्रबंधात रॉय यांनी सहाव्या

आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट कॉंग्रेसमध्ये असा सिद्धान्त मांडला होता की ब्रिटिश साम्राज्यशाहीपाशी पुरेसे शिलकी भांडवल न राहिल्यामुळे भारतातील भांडवल-दारवर्गाला ब्रिटिश साम्राज्यशाही ही दुय्यम दर्जाची का होईना पण भागीदारी देईल व त्यामुळे साम्राज्यशाहीचे या देशातील आसन आपोआप खिळखिळे होईल व या भागीदारीचा वाटा जसजसा वाढत जाईल तसतशी सत्तान्तराच्या रोखाने ब्रिटनला वाटचाल करावी लागेल. रॉय यांच्या या प्रबंधाला कुसेनीन यांनी कडाडून विरोध केला व भारतातील भांडवलदारांसहित आघाडी उभारून राष्ट्रीय क्रांतीचा पुरस्कार करण्याचे आपले धोरण पुढे चालू ठेवण्याचे आवाहन केले.

रॉय यांच्या प्रबंधातील महत्त्वाचा भाग भारतातील राष्ट्रीय क्रांतीचे स्वरूप व तिच्या नेतृत्वाची घडण कोणत्या प्रकारची असावी हा नव्हे. त्या प्रबंधातून व त्यानंतरच्या लेखनातून रॉय यांना सूचित करावयाचे होते ते हे की भारतात सत्तांतर व्हावयाची वेळ जवळ येत चालली आहे व राष्ट्रीय आंदोलनाने याची पूर्वसूचना घेऊन स्वतंत्र भारताच्या घडणीची आपली कल्पना निश्चित करावयाला पाहिजे.

सत्तांतराबद्दलचे आपले भाकित खरे होईल याबद्दल दुसऱ्या महायुद्धाच्या काळात रॉय यांना शंकाही राहिली नव्हती. फॅसिझमचे भयानक संकट दूर करण्यात लोकशाही राष्ट्रांना यश आले तर त्या युद्धातून जी नवी समाजरचना विकसित होईल, ज्या नव्या शक्ती उदयास येतील त्यांच्यामुळे भारत हा स्वतंत्र झाल्याशिवाय राहणार नाही ही रॉय यांची मनोमन श्रद्धा होती. त्या श्रद्धेमुळे आणि फॅसिझमबद्दलच्या आत्यंतिक घृणेमुळे, त्याचप्रमाणे त्याचा पराभव होणे हे लोकशाहीच्या अस्तित्वाच्या दृष्टीने किती आवश्यक आहे याची पुरेपूर कल्पना असल्यामुळे रॉय यांनी दुसऱ्या महायुद्धाच्या काळात ब्रिटनसहित सर्व दोस्त राष्ट्रांना इतकेच नव्हे तर भारतातील ब्रिटिश सत्तेलाही बिनशर्तपणे आणि निःसंकोचपणे साहाय्य दिले. लोकशाहीच्या खऱ्याखुऱ्या उपासकाने जनमनाची, जन-प्रक्षोभाचीही पर्वा न करता उचललेले हे धैर्यशाली पाऊल होते. रॉय यांनी धीराने उचललेले हे पाऊल किती सार्थ होते हे आज इतिहासात रुजू झालेले आहे. त्याची जाण भारतातील नेत्यांनी व पक्षांनी ठेवली नसली तरी आंतरराष्ट्रीय क्षेत्रात तरी रॉय यांच्या या वेळच्या 'एकला चलो रे' या पंथाबद्दल निर्व्याज कौतुकाचेच शब्द बाहेर पडत आहेत. एम्. एन्. रॉय यांनी या वेळी प्रगट केलेले असामान्य धैर्य आणि त्यांनी दाखविलेली दूरदृष्टी ही आज ना उद्या, भावी काळात तरी आदर्शभूत मानली गेल्याशिवाय राहणार नाही.

# क्रांतिपर्व

फॅसिझमचे स्वरूप एम्. एन्. रॉय यांना कळले तसे भारतीय पुढाऱ्यांना कळले नाही आणि कम्युनिस्टांपैकीही अनेक लोकांना कळले नाही. खुद्द स्तालिनची आणि कम्युनिस्ट इंटरनॅशनलची सुद्धा या बाबतीत गफलत झाली हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. रॉय यांच्या दूरदृष्टीला मात्र हिटलरचा उदय व कम्युनिस्टांचा, त्याचा प्रतिकार करण्याच्या बाबतीत नाकर्तेपणा हा दिसला होता व त्यांनी आपल्या परीने या महाभयंकर संकटाबद्दल जगाला इषाराही दिला होता. दुर्दैवाने फॅसिझमचा उदय इटलीत व जर्मनीत होत असताना रॉय हे कम्युनिस्ट इंटरनॅशनलमधे राहिले नव्हते. ते त्या संघटनेतून बाहेर पडले होते. व त्यांना नेहमीच्या कम्युनिस्ट पद्धती-प्रमाणें वाळीतही टाकण्यात आले होते. वस्तुत: रॉय व स्तालिन आणि कम्युनिस्ट इंटरनॅशनल यांच्यामधे मतभेद झाले त्याचे मुख्य कारण म्हणजे रॉय यांची स्वतंत्र प्रज्ञा हीच होय. ही स्वतंत्र प्रज्ञा भारताबद्दलचा व एकंदर वसाहतवादाबद्दलचा कम्युनिस्टांचा दृष्टिकोण ठरवितानाही दिसून आली होती. १९२२ सालच्या सुमारास खुद्द लेनिनशी या बाबतीत मतभेद व्यक्त करण्याचे धाडस रॉय यांनी दाखविले होते. लेनिनचा सिद्धांत असा होता की साम्राज्यशाहीच्या जोखडाखाली असलेल्या वसाहतीत स्वातंत्र्यासाठी जे आंदोलन होईल ते राष्ट्रीय क्रांतीचे आंदोलन असे मानून कम्युनिस्टांनी त्या आंदोलनाला संपूर्ण पाठिंबा द्यावा. म्हणजे या आंदोलनात त्या त्या वसाहतीतील जमीनदार म्हणा, भांडवलदार म्हणा असे जे प्रतिगामी वर्ग सामील होतील तेही क्रांतीचे पाईक व सहकारी मानण्यात यावे असा लेनिनच्या म्हणण्याचा इत्यर्थ होता.

रॉय यांनी लेनिनच्या सिद्धांताला एक पुस्ती जोडली म्हणा किंवा वसाहतीतील स्वातंत्र्य–आंदोलनातील धोक्याची स्थळे दाखविली म्हणा, पण त्यांनी असा सिद्धांत मांडला की भारतासारख्या वसाहतीत जे क्रांतीकारक स्वातंत्र्य–आंदोलन होईल त्यात त्या देशातील सारेच वर्ग सामील होतील असे समजण्याचे कारण नाही; काही वर्ग त्या आंदोलनाला विरोधी असे राहतील आणि काही क्रांतिकार्यात सामील होण्याचा फक्त आभास मात्र निर्माण करतील. तेव्हा त्या वर्गाचे स्वरूप, त्यांच्या आशाआकांक्षा लक्षात घेऊनच कम्युनिस्टांनी राष्ट्रीय आंदोलनाची चिकित्सा केली पाहिजे, साम्राज्यशाहीविरोधी आंदोलनातून या वर्गांना बाजूला करण्याचीही

तयारी कम्युनिस्टांनी ठेवली पाहिजे व खऱ्याखुऱ्या स्वातंत्र्यवादी शक्तीचे प्रतिस्पर्धी नेतृत्व उभ करण्याचाही कम्युनिस्टांनी प्रयत्न केला पाहिजे. लेनिन आणि रॉय यांच्या भूमिकेत तसा मूलभूत फरक नाही. म्हणजे राष्ट्रीय क्रांतीचे कोणत्याही परिस्थितीत अवमूल्यन करण्याची कल्पनासुद्धा रॉय यांच्या मनात नव्हती––फक्त त्यांनी भारतातील व इतर वसाहतीतील सामाजिक परिस्थितीची चिकित्सा करून असे निदान काढले होते की साम्राज्यशाही आपली राजवट बळकट करण्यासाठी त्या त्या देशात एक प्रकारचा सामाजिक पाया निर्माण करीत असते व तो पाया घालून देणारे लोक आपल्या स्वतःच्या वा वर्गाच्या हितासाठी क्रांतिविन्मुख होण्याचा वराच संभव आहे. एम्. एन्. रॉय यांनी प्रथम अज्ञातवासातून काँग्रेसला मार्गदर्शन करताना आणि त्यानंतर तुरुंगवासातून बाहेर पडल्यानंतर प्रत्यक्षपणे काँग्रेसमधे कार्य करताना आपल्या या सिद्धांताला अनुसरून काँग्रेसच्या राष्ट्रीय आंदोलनाला हार्दिक पाठिंबा दिला. पण काँग्रेसमध्ये प्रतिस्पर्धी––खरेखुरे जहाल, प्रगतिशील, विवेकनिष्ठ—असे नतृत्व निर्माण करण्यावरही भर दिला. रॉय हे आपल्या सिद्धांतापासून कधीही ढळले नाहीत. स्वतःला लेनिन-स्तालिनचे अनुयायी म्हणविणाऱ्या कम्युनिस्टांनी मात्र प्रत्यक्ष आंदोलनाच्या वेळी सुद्धा असा सिद्धांत मांडला की भांडवलदार वर्ग काँग्रेसच्यातर्फे क्रांतीच्या अग्रभागी राहून क्रांतीचा शिरच्छेद मात्र करू पहात आहे. (Heading the movement to behead it.)

एम्. एन्. रॉय यांना स्तालिनवादी कम्युनिस्टांच्या धरसोडीच्या धोरणाविरुद्ध नेहमीच लढा द्यावा लागला आहे. स्तालिन म्हणा किंवा कम्युनिस्ट इंटरनॅशनल म्हणा प्रत्येक वेळी आत्यंतिक भूमिका घेत आले आहेत. ही भूमिका विफल झाली की ते दुसरे टोक गाठीत. फॅसिझमचा उदय होत असताना रॉय यांनी परोपरीने इशारा देताना म्हटले होते की फॅसिझम हा समाजवादी व लोकशाही या दोन्हीही तत्त्वप्रणालींचा कट्टर शत्रू आहे; म्हणून फॅसिझमविरुद्ध सर्व लोकशाहीवादी शक्तींची एकजूट उभारली पाहिजे. रॉय यांनी दूरदृष्टीने दिलेला हा इषारा व केलेले मार्गदर्शन स्तालिनवाद्यांनी मानले नाही. उलट त्यांनी युरोपमधील सोशल डेमोक्रॅटिक पक्षांना फॅसिझमपेक्षा अधिक धोकादयक मानून प्रथम त्यांना नेस्तनाबूद करण्याच्या ईर्षेने कित्येक वेळा फॅसिस्ट शक्तीशी संगनमत केले किंवा "हिटलर नंतर आम्ही" (After Hitler We) अशी घोषणा करून फॅसिझमने सोशल डेमोक्रॅटिक पक्षावर चालविलेल्या प्रहारांची उपेक्षा केली. सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचे लोक हे 'सोशल फॅसिस्ट' आहेत असा एक अभिनव सिद्धांत स्तालिनवादाच्या उत्कर्षाच्या काळात रूढ झाला होता. या सिद्धांतानुसारच साम्राज्यशाहीच्या हस्तकांपेक्षा गांधी हे अधिक धोक्याचे, गांधींच्या पेक्षा नेहरू हे क्रांतीचे

अधिक मोठे दुष्मन असे चढत्या श्रेणीत लोकशाहीवादी व समाजवादी पुढाऱ्यांचे पृथक्करण कम्युनिस्टांकडून केले जात होते. ही चिकित्सा स्वातंत्र्योत्तर काळातही रूढ होती आणि त्या चिकित्सेनुसार स्तालिनवाद्यांच्या मक्केत अगदी स्तालिनचा मृत्यू समीप येईपर्यंत भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाले आहे हेही गृहीत धरले जात नव्हते. गांधी आणि नेहरू हे साम्राज्यशाहीचे बगलबच्चे व तिच्या हितसंबंधाचे रक्षक म्हणून भारत सरकारचे राज्य चालवीत आहेत ही श्रद्धा मनोमनी बाणली असल्यामुळेच स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लगेच कम्युनिस्टांनी 'तेलंगणी' क्रांतीचा उठाव केला होता हे लक्षात ठेवले पाहिजे.

तेलंगण हे भारतीय कम्युनिस्टांचे 'येनान' मानले जात होते. माव त्से तुंग यांनी पराभव खाल्ल्यानंतर येनानचा आश्रय घेतला व चांग कै शेक यांच्या राजवटी-विरुद्ध लढण्यासाठी शेतकऱ्यांचे सोव्हियट प्रस्थापित केले. चीनच्या क्रांतीच्या बाबतीतही स्तालिन व कम्युनिस्ट इंटरनॅशनल यांनी परस्परविरोधी असे जे पवित्रे घेतले ते रॉय यांचा सल्ला धुडकावूनच होय हेही लक्षात ठेवण्यासारखे आहे. चीनमध्ये जे क्रांतिकारक उठाव झाले त्यांचे नेतृत्व स्तालिन यांनी रॉय यांच्याकडे सोपविले होते. पण स्तालिन यांच्या विरोधविकासवादी धोरणानुसार हे नेतृत्वही एकट्या रॉय यांच्याकडेच न सोपविता त्यापूर्वी चीनच्या क्रांतीचे सूत्रधार म्हणून तेथे जाऊन स्थायिक झालेले बोरोदिन यांच्या हातीही मार्गदर्शनाची सूत्रे ठेवण्यात आली होती. दुहेरी नेतृत्व व बदलतो धोरणे यांमुळेच खरोखर १९२७ सालच्या सुमारास चिनी कम्युनिस्ट क्रांतीचा विध्वंस झाला. या धोरणांची आत्यंतिकता अशी की चिनी क्रांतीचे एकमेव साधन म्हणजे कुओमिंटांग ही संस्था (आपल्याकडील काँग्रेस-सारखीच एक चळवळ) व त्या क्रांतीचे एकमेव सूत्रधार म्हणजे चांग कै शेक अशी कम्युनिस्टांची सुरुवातीची भूमिका होती. परकीय साम्राज्यशाही व तिचे हस्तक असलेले लष्करी सुभेदार यांच्याविरुद्ध चांग कै शेक यांनी बंडाचे निशाण उभारले होते यात शंका नाही. त्या दृष्टीने तो क्रांतिकारक उठाव होता. पण रॉय यांना वसाहतीतील प्रत्येक लढ्याबद्दल जी भीती वाटत होती ती ही की न जाणो क्रांतीचे हे पुढारी ऐनवेळी लढा सोडून साम्राज्यशाहीशी संगनमतही करतील. म्हणून त्यांचा असा इषारा असे की कम्युनिस्टांनी जागरूकतेने या लढ्याकडे पाहिले पाहिजे. आणि या क्रांतीच्या नेत्यांशी सहकार्य करताना त्यांच्यावरच सर्वस्वी विश्वास टाकून जनतेचे आंदोलन त्यांच्याकडे ओलीस ठेवता कामा नये. स्तालिन-वादी कम्युनिस्ट नेतृत्वाने हा इषारा ध्यानी घेतला नाही व चांग कै शेक यांची चलबिचल होत असल्याचा पुरावा हाती आल्यानंतरही त्यांच्याशी असलेले सहकार्य संपूर्णपणे तसेच चालू ठेवले.

रॉय यांनी या वेळी परिस्थितीचे स्वतंत्रपणे निदान करून अशी भूमिका

सुचविली होती की चीनमधील क्रांतीचे क्षेत्र व्यापक करण्याऐवजी तिची पाळेमुळे जनतेत खोलवर कशी रुजतील याकडे अधिक लक्ष देण्यात यावे ( Deepen the revolution instead of broadening it. ). रॉय यांची ही सूचना किती मूलगामी होती हे चांग कै शेक यांच्या त्या वेळच्या डावपेचांचा विचार केला तर कळून आल्याशिवाय राहणार नाही. चांग कै शेक हे त्या वेळी हळूहळू क्रांतीचे स्वरूपच बदलू पहात होते. म्हणजे या क्रांतीमध्ये लष्करी सुभेदारांनाही ओढून ही क्रांती अधिक व्यापक करण्याचा त्यांचा विचार होता. हा पवित्रा प्रथम समन्वयवादी व अंतिम परिणामांच्या दृष्टीने समेटवादी ठरला असता यात तिळमात्रहि संशय नाही. तो पवित्रा हाणून पाडण्यासाठीच रॉय यांनी अशी घोषणा केली की चिनी क्रांतीमध्ये आता जहाल, लढाऊ असा कार्यक्रम आणून क्रांतिकारी जनतेच्या खऱ्याखुऱ्या प्रतिनिधींना तीत वाव देण्यात यावा. क्रांतीची पाळेमुळे जनतेत रुजविण्याच्या दृष्टीनेच ही हाक देण्यात आली होती. त्या हेतूनेंच कुओमिंटांगमधील जहाल गटाला अधिक पाठिंबा देण्यात यावा असा ते आग्रह करू लागले होते. चांग कै शेक यांच्या कारवायांना पायबंद घालण्याच्या दृष्टीने हा जहाल गटच कम्युनिस्टांना अधिक जवळचा व अधिक उपयुक्त ठरला असता. त्या गटाचे पुढारीपण त्या वेळी वांग चिंग वे या एका प्रबळ नेत्याच्या हाती होते. चांग कै शेक यांनी साम्राज्यशाहीशी समेट करण्याचा व लष्करी सुभेदारांशी लगट करण्याचा जो प्रयत्न चालविला होता त्या प्रयत्नात वांग चिंग वे हेच त्या काळी मोडता घालू शकले असते. पण चांग कै शेक यांच्यावरच भिस्त ठेवण्याचा आदेश मॉस्कोमधून आल्याकारणाने रॉय यांना आपली भूमिका प्रत्यक्षात उतरविणे शक्य झाले नाही. त्याचा परिणाम असा झाला की कम्युनिस्टांच्या सहकार्याने प्रबळ झालेल्या चांग कै शेक यांनी आपल्या ताकदीची पुरेपूर कल्पना होताच आकस्मिकपणे बाजू बदलली व साम्राज्यशाही व लष्करी सुभेदार यांच्याशी समेट करून आपली सारी शक्ती कम्युनिस्टांचा नि:पात करण्यासाठीच उपयोगात आणली. स्तालिनवादी कम्युनिस्टांच्या तडजोडवादी एकांतिक धोरणाचे हे भीषण पर्यवसान होते. रॉय यांचे दुर्दैव असे की कम्युनिस्ट इंटरनॅशनलचे प्रतिनिधी म्हणून त्यांना ही शोकांतिका उघड्या डोळ्यांनी पहावी लागली. त्यांच्या मनाला त्या प्रसंगी समाधान एवढेच लाभले असेल की या एकांतिक भूमिकेविरुद्ध आपण इषारा दिला होता, आपल्या परीने चिनी क्रांतीचे रक्षण करण्याचा आपण प्रामाणिकपणे प्रयत्न केला होता.

# लोकशाही क्रान्तीचे प्रणेते

चीनमधील क्रांती फसली आणि स्तालिनवादी कम्युनिस्टांनी एका टोकापासून दुसऱ्या टोकाकडे धाव घेतली. या क्रांतीत उजवीकडे झुकणाऱ्या संधिसाधुपणाचा कम्युनिस्टांनी कळस गाठला होता. आता डावीकडे झुकणाऱ्या साहसवादाचा कम्युनिस्टांनी आश्रय घ्यावयाचे ठरविले. ही सर्व धोरणे स्तालिनच्या काळात फक्त एकाच उद्दिष्टाने आखली जात होती आणि ते उद्दिष्ट म्हणजे सोव्हिएट युनियनचे हित. सोव्हियट युनियनच्या हितासाठी देशोदेशीच्या कम्युनिस्ट वा राष्ट्रीय आंदोलनांचा विध्वंस झाला तरी स्तालिनवादी नेतृत्वाला त्याची पर्वा नव्हती. रॉय हे विचाराने व प्रेरणेने मार्क्सवादी कम्युनिस्ट असले तरी कम्युनिस्टांच्या पितृभूमीसाठी सुद्धा आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट आंदोलनाचे वा संघटनेचे नुकसान करावयाला ते तयार नव्हते. पण स्तालिन यांना जगत्क्रांती फसली असे वाटल्यानंतर त्यांनी ‘ एका देशात समाजवाद ’ प्रस्थापित करण्याची उमेद बांधून आपले सर्व लक्ष त्या उद्दिष्टावर केन्द्रित केले. त्याचा परिणाम अपरिहार्यपणे असा झाला की सोव्हिएट पितृभूमीला पोषक अशा घडामोडींनाच फक्त सोव्हिएटचा पाठिंबा मिळू लागला—मग त्या घडामोडी क्रांतिकारक असोत की प्रतिक्रांतिकारक असोत. स्तालीनच्या काळात साध्य असे एकच होते—सोव्हिएट पितृभूमीचे संरक्षण व संवर्धन. ते कोणत्या साधनांनी करावे या बाबतीत विधिनिषेध असा नव्हताच. उदाहरणार्थं, स्पेनमधील क्रांतीच्या बाबतीत स्तालिनला फ्रँकोपेक्षाही, त्याच्याविरुद्ध तेथे लढणारी ट्रॉट्स्कीवादी दले ही अधिक धोक्याची वाटली. आणि कम्युनिस्ट विचारसरणीच्या या दोन्ही दलांनी एकमेकांविरुद्ध डावपेच टाकण्याच्या ईर्षेत स्पॅनिश क्रांतीचा मात्र विध्वंस घडवून आणला. सोव्हिएट युनियनच्या परराष्ट्रधोरणात जे जे काही बदल होत त्या त्या धोरणानुसार देशोदेशीच्या कम्युनिस्ट पक्षांचे आचारविचारही बदलून जात. सोव्हिएट युनियनचा दोस्त हा मग लगेच जगातील साऱ्या कम्युनिस्ट पक्षांचा दोस्त बनत असे आणि सोव्हिएटचा शत्रु हा शत्रूस्थानी मानला जात असे. या धोरणाला नाव द्यावयाचे असेल तर फक्त संधिसाधुपणा हेच द्यावे लागले. पण कम्युनिस्टांच्या शब्दावलीत याला क्रांतिकारक संधिसाधुपणा असे म्हटले जात असे व क्रांतीच्या नावाखाली त्याचा उदोउदो झाला तर काय नवल ?

याच वेळी प्रत्येक बदलत्या धोरणागणीक एक वा अनेक बळी देण्याची प्रथाही स्तालिनवादी विश्वात पडली होती. त्या प्रथेप्रमाणे चीनची क्रांती फसली तेव्हा त्याचा सारा ठपका रॉय यांच्यावर ठेवण्यात आला. आरोपांची अशा वेळी लयलूट होत असे. म्हणे रॉय यांनी परिस्थितीचे योग्य मूल्यमापन केले नाही, त्यांनी जे परिस्थितीचे निदान केले ते चुकले, त्यांनी चांग कै शेक यांच्या विश्वासघातकी धोरणाबद्दल योग्य वेळी इषारा दिला नाही. हे आरोप शिष्टाचाराच्या मर्यादेत बसणारे तरी म्हणता येतील. म्हणजे त्यावर पूर्व-उत्तर पक्ष करता येण्यासारखा आहे. पण कम्युनिस्टांच्या प्रचारकी भात्यात जे काही विषारी बाण साठवून ठेवलेले असतात त्यांचा उपयोग सुरू झाला तेव्हा शिव्याशापांच्या वरसातीबरोबर एक आरोप असा निघाला की स्तालिनच्या एका गुप्त खलित्याचा रॉय यांनी परिस्फोट केल्यामुळेच चांग कै शेक यांना कम्युनिस्टांच्या बदलत्या धोरणाचा इषारा मिळाला आणि त्यांनी लगेच कम्युनिस्टांचे पारिपत्य करण्याचा निर्णय घेतला. त्या आरोपाच्या पाठोपाठ एकच आक्रोश दशदिशांतून उठला की चीनमध्ये कम्युनिस्टांची कत्तल झाली तिला रॉयच जबाबदार आहेत. बस्स. कम्युनिस्टांच्या मक्केतून आवई उठली. मग आणखी काय पाहिजे ? शतमुखांतून उद्‌गार निघू लागले की रॉय हे क्रांतिकारक कसले, ते क्रांतीचे शत्रूच आहेत. साम्राज्यशाहीचे ते हस्तकच आहेत. आरोप, आरोप आणि आरोप. त्याबरोबर धोरणात आमूलाग्र बदल. बस्स. आता उजव्यांशी संबंध नाही. सुधारणावादी नेतृत्वाला साथ द्यावयाची नाही. सहयोगाचे राजकारण नाही. आता क्रांतिकारक कामकरी वर्गाच्या नेतृत्वाखाली, कम्युनिस्ट पक्षाच्या वर्गीय झेंड्याखाली, लाल क्रांतीचा तेवढा उठाव करावयाचा. माव त्से तुंग यांनी त्या आदेशानुसार 'येनान'च्या जंगलात सोव्हिएटची उभारणी केली. भारतामध्ये 'काँग्रेस ऑफ सोव्हियट' भरविणे हे उद्दिष्ट जाहीर करण्यात आले.

लेनिनने 'बालिश विकृती' असे डावीकडे झुकणाऱ्या ज्या साहसवादाचे वर्णन केले आहे त्या साहसवादाचा विक्रम चिनी क्रांती फसल्यानंतर सबंध कम्युनिस्ट विश्वात सुरू झाला. रशियात जी क्रांती झाली तिची प्रतिकृती उभी करणे हेच मग कम्युनिस्टांचे उद्दिष्ट झाले. तेथे सोव्हिएटस् स्थापन झाली ना? मग चीनमध्ये का नको, भारतात का नको ? सोव्हिएटस् ही कामगारांची तशीच शेतकऱ्यांची, मध्यमवर्गीयांची सुद्धा. माव त्से तुंग यांनी येनानमध्ये या सोव्हिएटचा पाया घातला. भारतात किशनगंज, मुंबई, कलकत्ता, सोलापूर वगैरे शहरांतून ही सोव्हिएटस् उगवली. म्हणजें कम्युनिस्टांचे हे स्वप्नरंजन होते. प्रत्येक लढ्यातून, प्रत्येक कामकरी संघटनेतून त्यांना हा कामकरी क्रांतीच्या उद्रेकाचा आविष्कार दिसून येत होता. त्यांचे उद्दिष्ट एकच. कामकरी क्रांती. ( PROLETARIAN REVOLUTION ).

त्या क्रांतीच्या उठावाचे साधन कोणते? सोव्हिएटस. त्या सोव्हिएटसचा आविष्कार कशातून प्रकट व्हावयाचा? वर्गलढ्यातून. हे वर्गलढे कोणत्या निशाणाखाली लढले जावयाचे ? हातोडा व कोयता यांची चिन्हे धारण करणाऱ्या लाल झेंड्याखाली. नुसत्या लाल झेंड्याखाली नव्हे. लाल झेंडा व हातोडा कोयता ही चिन्हे धारण करणारा लाल झेंडा यामध्ये. त्या काळात घनघोर संघर्ष व चकमकी झाल्या. त्याचे कारण एकच होते की त्या वेळी स्तालिनवादाने आक्रमक लढ्याचे, तडजोडविरोधी संघर्षाचे, सोव्हिएट क्रांतीच्या अभ्युत्थानाचे रणशिंग फुंकले होते.

रॉय यांना हा डावा साहसवाद मंजूर नव्हता. आर्थिक व औद्योगिक दृष्ट्या मागासलेल्या देशात कामकरी क्रांतीचा पुकारा करणे त्यांना सर्वथैव नापसंत होते, नव्हे आत्मघातकीपणाचे वाटत होते. भारताबद्दल त्यांनी जी चिकित्सा केली होती ती ही की या वसाहतीतील स्वातंत्र्यलढा हा वर्गीय पायावर संघटित होऊच शकणार नाही. कारण औद्योगिक दृष्ट्या भारत हा मागासलेला असल्यामुळे येथे कामगार वर्ग अगदीच अल्प प्रमाणात अस्तित्वात आहे आणि तो जितका असंघटित आहे तितकाच शेतीशी तो निगडित असल्यामुळे कामकरी वर्गाची प्रेरणा व सत्त्व यांचाही त्याच्यामधे अभाव आहे. साहजिकच साम्राज्यशाहीचे उच्चाटण कामकरी क्रांतीच्या साहाय्याने घडवून आणू पाहणे हे रॉय यांना डॉन क्विक्झोट याच्या भावुक साहसवादापेक्षा काही निराळे भासले नाही. त्यांनी परोपरीने कम्युनिस्टांना समजावून देण्याचा प्रयत्न केला की काँग्रेसच्या नेतृत्वाखाली जे राष्ट्रीय आंदोलन हळू हळू पण निर्धाराने संघटित होऊ पाहात आहे त्या आंदोलनात सहभागी होऊनच कम्युनिस्टांना भारतात राष्ट्रीय क्रांती घडवून आणता येईल. ही क्रांती राष्ट्रीय आणि लोकशाहीनिष्ठ करावी हेच खऱ्याखुऱ्या स्वातंत्र्यवाद्यांचे उद्दिष्ट असले पाहिजे. म्हणून रॉय यांनी काँग्रेस हेच राष्ट्रीय क्रांती घडवून आणण्याचे एकमेव साधन मानले व त्या संघटनेशी जिव्हाळ्याचे संबंध जुळविण्याचा आपल्या अनुयायांना आदेश दिला. रॉय हे काँग्रेसकडे एक चळवळ म्हणूनच पहात होते हे या वेळी कटाक्षाने लक्षात ठेवले पाहिजे. म्हणजे अनेकविध हितसंबंध, भिन्न वर्ग, भिन्न भिन्न तत्त्वप्रणालींचा पुरस्कार करणारे लोक या संघटनेत सामील झालेले आहेत याकडे रॉय यांनी काणाडोळा केला नाही. त्यांचे म्हणणे असे होते की जसजसा साम्राज्यशाहीविरोधी लढा तीव्रतर होत जाईल तसतसे काही वर्ग, काही हित-संबंधाचे लोक काँग्रेस सोडून निघून जातील व मग खऱ्याखुऱ्या लोकशाहीवादी व्यक्तींच्या व प्रवृत्तीच्या लोकांकडेच काँग्रेसचे नेतृत्व येईल. काँग्रेस ही रॉय यांच्या मताप्रमाणे किंवा कल्पनेप्रमाणे म्हणा, एक लोकशाहीवादी संघटना होती. साम्राज्यशाहीविरोधी लढ्याचे ती हत्यार बनली. साहजिकच काँग्रेसचे उद्दिष्ट, म्हणजेच राष्ट्रीय लोकशाहीवादी क्रांती, सफल करू शकणाऱ्या वर्गांच्या व त्यांच्या

प्रतिनिधींच्या हातीच काँग्रेसची सूत्रे रहावी अशीच रॉय यांची धारणा होती. त्या दृष्टीने त्यांनी आपले सारे राजकीय कार्य काँग्रेसमधूनच केले आणि काँग्रेस ही अधिकाधिक जनताभिमुख व्हावी व जनताही राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक दृष्टीने अधिकाधिक जागृत व्हावी यासाठीच रॉय यांनी आपली वाणी व लेखणी अव्याहतपणे उपयोगात आणली.

भारतामधे घडून येणाऱ्या क्रांतीबद्दलची रॉय यांची कल्पना ध्यानी घेतल्यानंतरच १९३७ साली कारावासातून सुटल्यानंतर त्यांनी ज्या भूमिका घेतल्या, परिस्थितीचे जे विश्लेषण केले, राजकीय कार्यामधे जे नवीन पायंडे पाडले, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही खंबीर व निश्चल राहून जे पवित्रे टाकले त्यांचे मूल्यमापन करता येईल. रॉय यांना हे स्पष्ट दिसत होते की ब्रिटिश साम्राज्यशाहीला भारतातून पाय काढून घ्यावा लागेल. त्या दृष्टीने भारतात सत्तांतर होणार हे त्यांनी गृहीतच धरले होते. पण हे सत्तांतर म्हणजे गोऱ्या लोकांच्या जागी काळे लोक अधिकारारूढ व्हावे आणि त्यांनी तीच राजकीय व्यवस्था, तीच समाजरचना चालू ठेवावी अशा प्रकारचे असावे असे रॉय यांना वाटत नव्हते. त्यांना सत्ता ही जनतेच्या हाती जावी, सरदार, दरकदार, भांडवलदार, वरिष्ठ हितसंबंधी लोक यांच्या हाती जाऊ नये असे वाटत होते. राष्ट्रीय लोकशाही क्रांती हे जे उद्दिष्ट त्यांनी आपल्या डोळ्यांसमोर ठेवले होते ते याचसाठी. पण हे नुसते कल्पनाजाल नव्हते. रॉय हे ध्येयवादी विचारवंत होते त्याचप्रमाणे क्रांतीचे प्रणेते व शिल्पकारही होते. त्यांनी उद्दिष्ट जाहीर केले व ते उद्दिष्ट साध्य करून घेण्यासाठी व्यवहार्य कार्यक्रमही आखला. हा कार्यक्रम रक्तमय क्रांतीचा नव्हता, तसाच अहिंसामय असहकारितेचाही नव्हता. हा कार्यक्रम जनतेच्या संघटनेचा होता. जागृत जनतेने प्रत्यक्ष व्यवहारात संघर्षाची साधने ही सत्तेची प्रतीके कशी बनवावी याची दिशा दाखवून देणारा तो कार्यक्रम होता. एम. एन. रॉय यांनी तत्त्वचिंतनातून क्रांतीच्या स्वरूपाचे चित्र रेखाटले, क्रांतिकारक आंदोलनाच्या अनुभवातून त्यांनी कार्यक्रमाची आखणी केली आणि तो कार्यक्रम अमलात आणण्यासाठी जनतेच्या दैनंदिन मागण्या आणि गरजा यासाठी होणारे संघर्ष यांची राजकीय सत्तासंपादनासाठी होणाऱ्या आंदोलनाशी कशी सांगड घालता येईल याचे दिग्दर्शन तसेच मार्गदर्शन केले. तर्कशुद्ध राजकीय कार्य व कार्यक्रमाचा जो आदर्श एम. एन. रॉय यांनी घालून दिला होता त्याचे निःपक्षपातीपणे आणि पूर्वग्रहविरहित दृष्टिकोणातून जर चिंतन व निरीक्षण केले तर स्वातंत्र्योत्तर काळात ज्या भीषण समस्या निर्माण झाल्या व ज्यांना तोंड देता देता आज राष्ट्र अधिकाधिक खोल कर्दमात रुतत चालले आहे त्या समस्या निर्माणही झाल्या नसत्या असा निर्वाळा देता आल्याशिवाय राहणार नाही.

# घटना परिषदेच्या कल्पनेचे जनक

स्वातंत्र्यपूर्व काळात ज्या क्रांतीची रॉय यांनी अपेक्षा व घोषणा केली होती ती राष्ट्रीय लोकशाही क्रांती होय; समाजवादी क्रांती नव्हे. एम्. एन्. रॉय यांचे वैशिष्टय असे होते की त्यांच्या तर्कशुद्ध विचारसरणीत शब्दाला अर्थ होता. त्यातून स्पष्ट, निःसंदिग्ध आशय प्रगट होत असे. म्हणून ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुद्ध लढा करताना त्यांनी कधीही त्या लढयाचे उद्दिष्ट समाजवादाची प्रस्थापना हे मानले नाही, तशी घोषणा करून त्यांनी लोकप्रियतेच्या वाहत्या गंगेत हात धुऊन घेण्याचाही प्रयत्न केला नाही. समाजवाद, साम्यवाद ही त्या वेळची आणि आजचीही रम्य, आकर्षक घोषणावाक्ये राहिली आहेत. त्या घोषवाक्यांचा वारंवार उच्चार करून नेहरूंनी तरुण मने पुलकित केली. त्या घोषवाक्यांचा आश्रय घेऊन कॉंग्रेस सोशलिस्ट पक्ष कॉंग्रेसमधे उदयाला आला. तेच स्वप्नजाल कम्युनिस्ट पक्षाने कामकरी क्रांतीच्या नावाखाली विणले. हा समाजवाद व्यक्तीगणिक, पंथागणिक वेगळा असे—लालभडक, नुसता लाल, फिक्का लाल, लालमिश्रित. कोणी फेबियन सोशलिस्ट असत, कोणी ब्रिटिश मजूर पक्षाचे उपासक, कोणी दुसऱ्या इंटरनॅशनलचे भक्त, कोणी तिसऱ्या इंटरनॅशनलचे अनुयायी, कोणी स्तालिनवादी तर कोणी ट्रॉट्स्कीवादी सुद्धा. सारे कॉंग्रेसमधे उघड वा छुपेपणाने वावरत असत, आपापल्या परीने कॉंग्रेसची व तत्त्वांची ओढाताण करीत असत, प्रत्येक राष्ट्रीय लढयाला वर्ग-युद्धाची म्हणा किंवा समाजवादी सत्याग्रहाची म्हणा धार चढविण्याचा प्रयत्न करीत असत.

एम्. एन्. रॉय हे क्रांतीचे उपासक व पुरस्कर्ते खरे. मार्क्सवादाचेही ते त्या वेळी अनन्यभक्त होते, लेनिनबद्दल त्यांना आदर असे, स्तालिनच्या कर्तृत्वावरही त्यांची श्रद्धा असे. पण मार्क्सवादी म्हणूनच त्यांनी जो कार्यक्रम देशापुढे व कॉंग्रेसपुढे ठेवला तो समाजवादाच्या स्थापनेचा कार्यक्रम नव्हे; तो राष्ट्रीय लोकशाही क्रांतीचा कार्यक्रम होता. पहिला हा त्यांच्या दृष्टीने कमाल कार्यक्रम होता; दुसरा किमान कार्यक्रम. रॉय यांच्या प्रज्ञेचा जो प्रत्यय येतो तो त्यांनी या दोन कार्यक्रमांत जी तफावत केली, आणि त्यानुसार स्वातंत्र्यपूर्व क्रांतिकारी संघर्षाची जी आखणी करू पाहिली त्यात येतो. कॉंग्रेस समाजवादी पक्षाला विरोध करताना त्यांनी आपल्या भूमिकेचे फार चांगल्या रीतीने स्पष्टीकरण केले होते. त्यांचे म्हणणे असे

होते की काँग्रेस हा काही राजकीय पक्ष नव्हे; ती एक चळवळ आहे. विशिष्ट उद्दिष्ट साध्य करण्यासाठी तिची उभारणी झाली आहे. या उद्दिष्टाच्या कक्षेत समाजवाद बसतो कसा? म्हणून समाजवादी पक्ष हे नामाभिधान त्यांना अप्रस्तुत वाटले, धोक्याचेही वाटले. हा धोका दोघांनाही. काँग्रेसला तसाच काँग्रेस समाजवादी पक्षाला. कारण काँग्रेस समाजवादाचे उद्दिष्ट ठेवून लढू लागली तर समाजवादाला विरोधी, पण राष्ट्रीय क्रांतीचे निष्ठावंत पुरस्कर्ते असलेले पक्ष व व्यक्ती यांना काँग्रेसमधे स्थानच उरणार नाही आणि त्यांना काँग्रेसमधून बाहेर पडावे लागणार. ते बाहेर पडताच काँग्रेसतर्फे संघटित होणारी राष्ट्रीय आघाडी ही कोसळून पडते. म्हणून समाजवाद्यांना किंवा मार्क्सवाद्यांना सुद्धा काँग्रेसपुढे समाजवादाचा कार्यक्रम ठेवता येणे शक्य नाही असे रॉय यांनी ठासून सांगितले.

काँग्रेस समाजवादी पक्षाच्या दृष्टीने धोका होता तो हा की हा पक्ष काँग्रेसमधे संघटित होऊ लागला व तो पक्ष समाजवादाचा कार्यक्रम पुढे मांडू लागला की समाजवादालाच नव्हे तर लढ्यालाही विरोधी असे प्रतिगामी नेतृत्व एकच हाकाटी करू लागेल की हा पक्ष राष्ट्रीय आघाडी मोडू पहात आहे, म्हणून या पक्षाच्या नत्यांची व अनुयायांची काँग्रेसमधून हकालपट्टी झाली पाहिजे. सरदार पटेल यांनी त्या काळात काँग्रेस समाजवादी पक्षाची कधी हेटाळणी केलेली तर कधी त्या पक्षाला कडवा विरोध केलेलाच आढळून येईल. ते हेटाळणी करीत ते या शब्दांत की हे समाजवादी कसले? हे बोलघेवडे आहेत. या पक्षाने खरे पाहिले तर काँग्रेसमध्ये कधीच मूळ धरले नाही. त्या पक्षाचे जे काही नाव झाले ते यामुळे की या पक्षातील बहुतेक लोक या राष्ट्रीय आंदोलनात अग्रभागी होते व त्यांच्या या कामगिरीबद्दल म्हणा किंवा त्यांच्याबद्दल व्यक्तिशः म्हणा, गांधीजी व नेहरू यांना जो आदर वा आपलेपणा वाटत असे त्यामुळे काँग्रेसमधील अधिकाराच्या जागा त्यांनी काही काँग्रेस समाजवाद्यांना बहाल केल्या होत्या. ह्या दृष्टीने गांधीजी व जवाहरलाल यांच्या उदार आश्रयावरच हा पक्ष जगला असे म्हणावयास हरकत नाही. त्या पक्षाने आपल्या कार्यक्रमाचा व कार्याचा ठसा असा जो उमटविला असेल तो एवढाच की गांधीजींनी समाजवादातील कळवळा हा आपल्या तत्त्वज्ञानाशी मिळता जुळता आहे असे मानले व जवाहरलाल नेहरूंनी त्यांची परिभाषा आपल्या भाषणात व ठरावात समाविष्ट केली. काँग्रेस समाजवादी पक्षाने जे काही देणे काँग्रेसला दिले ते एवढेच.

त्यागी, पराक्रमी असे नेते आणि सेवाभावी, निष्ठावंत असे अनुयायी काँग्रेस समाजवादी पक्षाला मिळूनही त्या पक्षाला काँग्रेसमध्ये आपला प्रभाव पाडता आला नाही यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. एम्. एन्. रॉय यांनी त्या पक्षाच्या राजकीय भवितव्याचे भाकीत त्या पक्षाच्या स्थापनेच्या वेळीच केले होते. ते भाकीत

कालांतराने तो पक्ष काँग्रेसमधून बाहेर पडला त्या वेळी पुरेपूर प्रत्ययास आले. वस्तुस्थितीचे ज्ञान आणि राजकीय प्रज्ञा यांच्या आधारेच रॉय यांनी हे भाकीत केले होते. समाजवादी पक्षाची प्रतिष्ठापना सर्वसंग्राहक अशा एका चळवळीत कशी होऊ शकेल हाच रॉय यांचा मूलभूत सवाल होता. समाजवादी, साम्यवादी पक्ष हे काँग्रेसच्या बाहेर संघटित होऊ शकतील. काँग्रेसमध्ये कार्य करताना मात्र त्या पक्षाच्या अनुयायांना आपल्या पक्षाचा झेंडा आणि कार्यक्रम ही दोन्ही बाहेर ठेवावी लागतील. काँग्रेसमध्ये फक्त काँग्रेसजन म्हणूनच ते वावरू शकतील. हे काँग्रेसजन जहाल असतील, मवाळ असतील, हिंसावादी असतील, अहिंसावादी असतील, गांधीवादी असतील, नेहरूवादी, पटेलवादी, रॉयवादी असतील. पण त्यांच्यासमोर उद्दिष्ट एकच; राष्ट्रीय क्रांती घडवून आणणे. ती क्रांती कोणत्या मार्गाने घडवून आणावयाची याबद्दल त्यांच्यामध्ये मतभेद असू शकतील. उदाहरणार्थ, गांधीजींची श्रद्धा अहिंसामय सत्याग्रह व विधायक कार्य यावर होती. जवाहरलाल नेहरू यांना वाटत होते की क्रांतिकारक लढा व आंतरराष्ट्रीय दडपण यांच्या साहाय्याने भारताला स्वातंत्र्य संपादन करता येईल. सरदार पटेल यांचे असे मत होते की ब्रिटनला चळवळीची धग बसवून सत्तांतर करून घेता येईल. नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी उघड बंड व प्रतिस्पर्धी सरकारची स्थापना हा क्रांतीचा मार्ग आखला आणि रॉय यांनी काँग्रेस कमिटया ही संघर्षाची साधने बनविता बनविता ती सत्तेची प्रतीके होतील व अशा रीतीने राज्यसत्तेला शह देणाऱ्या क्रांतिकारक सत्तेचा त्यांच्यामधून उदय होईल अशी राष्ट्रीय क्रांतीची दिशा दाखविली.

एम्. एन्. रॉय यांनी राज्यसत्तेच्या पोटातच प्रतिस्पर्धी राज्यसत्ता ( State Within a State ) कशी निर्माण करता येईल व ती प्रतिस्पर्धी सत्ता यशस्वी क्रांतीची घोषणा करणाऱ्या घटना परिषदेला कसा जन्म देईल याचे दिग्दर्शन १९३७ साली तुरुंगातून मुक्त झाल्यानंतर फैजपूर काँग्रेसच्या अधिवेशनात केले होते. घटना परिषद भरविण्याची कल्पना मुळात रॉय यांची. पण त्यांच्या कल्पनेतील घटना परिषद ही क्रांतीचे बाण हाती घेऊन सार्वभौम प्रजासत्ताक भारताच्या स्थापनेची घोषणा करणार होती. ही घोषणा सत्तांतरानंतर ब्रिटिश सरकारच्या प्रेरणेने व आशीर्वादाने भरणाऱ्या घटना परिषदेत होणार नव्हती. ती घोषणा क्रांतीचे हत्यार बनलेल्या प्राथमिक काँग्रेस कमिटयांनी निवडलेल्या जनतेच्या प्रतिनिधींकडून पुकारली जाणार होती. या पुकारामागे जी प्रतिकाराची ताकद आणि सफल झालेल्या क्रांतीचा जो जोष असणार होता तो खरा महत्त्वाचा. त्यातूनच क्रांतीला एक अर्थ प्राप्त झाला असता, त्या क्रांतीमध्ये लोकशाहीचा आशय प्रतिबिंबित होण्याची ग्वाही मिळाली असती आणि राजकीय क्रांतीला सामाजिक परिवर्तनाचे अधिष्ठानही लाभले असते.

एम्. एन्. रॉय यांनी कॅाँग्रेसपुढे क्रांतीचा कार्यक्रम ठेवला, त्या क्रांतीसाठी जनतेला संघटित कसे करावयाचे याचा मार्गही दाखविला आणि जनतेच्या दैनंदिन मागण्यांसाठी लढे लढविताना वा जनतेची विधायक शक्ती ग्राहकांच्या वा शेतकऱ्यांच्या सहकारी सोसायट्यांतून केंद्रित करताना सुद्धा प्रतिकार करणारी, साम्राज्यशाही सत्तेला शह देणारी प्रतिस्पर्धी सत्ता कशी निर्माण करता येईल याचेही दिग्दर्शन केले. हा साहसवादाचा वा आकर्षक पण दिखाऊ अशा ध्येयवादाचा मार्ग नव्हता. हा हृदयपरिवर्तनाचाही मार्ग नव्हता. एका तत्त्वचिंतकाने क्रांतीच्या आगीतून प्रत्यक्षपणे तावूनसुलाखून निघताना अनुभवातून शिकलेला हा क्रांतिकारी पण विधायक मार्ग होता. रॉय यांनी कॅाँग्रेसचे विश्लेषण केले ते एक तत्त्वचिंतक म्हणून. त्यांनी राष्ट्रीय क्रांती हेच कॅाँग्रेसचे उद्दिष्ट ठरविले ते भारतातील निरनिराळ्या वर्गांच्या मागण्या व भावना यांचा विचार करून. त्या भावनांतून त्यांना जे चित्र दिसले ते असे की या क्रांतीचा कणा म्हणजे शेतकरी व बुद्धिजीवी मध्यमवर्ग होय. म्हणूनच कामकरी क्रांती वा समाजवादी क्रांती घडवून आणण्याचा प्रयत्न करणे हे त्यांना केवळ स्वप्नरंजन वाटले. या स्वप्नरंजनात गुंगून जाण्याइतके रॉय भावुक राहिले नव्हते. त्यांनी व्यवहार्य अशा कार्यक्रमाचीच निवड केली व राष्ट्रीय लोकशाही क्रांती घडवून आणण्यासाठीच त्यांनी कॅाँग्रेसमध्ये प्रतिस्पर्धी असा गट उभा करण्याचा प्रयत्न केला. लीग ऑफ रॅडिकल कॅाँग्रेसमेन या नावाने तो गट संघटित झाला.

# उदारमतवादाचा वारसा

लीग ऑफ रॅडिकल कॉंग्रेसमेन ही संघटना हा एक पक्ष नव्हता. तो एक गट होता— काँग्रेसमधीलच परंतु समान विचारसरणीचा गट. या विचारसरणीचे प्रेरक एम्. एन्. रॉय. आणि त्यांच्या विचारांचे तसेच आचारांचे प्रतिबिंब समाजात उतरवू पाहणाऱ्या काँग्रेसजनांनाच रॉय यांनी एकत्र आणले होते. त्यातील रॅडिकल म्हणजे जहाल या शब्दालाच खरे महत्त्व होते. रॉय यांची विचारसरणी केवळ राजकारणापुरतीच मर्यादित नव्हती. सारे जीवन व्यापून टाकणारी ती विचारसरणी होती. त्या विचारसरणीचे प्रभुत्व प्रस्थापित करण्यासाठी रॉय यांना राजकीय सत्ता हवी होती. पण सत्तासंपादन हे फक्त साधन. ते रॉय यांनी साध्य कधीच मानले नाही. म्हणजे साम्राज्यशाहीकडून सत्ता हिसकावून घ्यावयाची व स्वतंत्र भारताची उभारणी करावयाची हे स्वातंत्र्यपूर्व काळात रॉय यांचे उद्दिष्ट होते. पण हे उद्दिष्ट साध्य कसे करावयाचे ? तर त्यासाठी बुद्धिमान, ध्येयनिष्ठ कार्यकर्त्यांची एक फळी उभारावयाची. बुद्धिमत्ता यासाठी की त्या कार्यकर्त्यांना जनतेची सांस्कृतिक पातळी उंचावता यावी, जी विचारसरणी त्यांनी आत्मसात केली आहे तिचे ज्ञान त्यांना बहुसंख्य जनतेला देता यावे. ध्येयनिष्ठा अशासाठी की सत्तासंपादनानंतर सत्तेच्या मोहात पडून त्यांनी स्वतःला भावी कर्तव्याचा विसर पडू देऊ नये. आता या भावी कर्तव्याचा आपण विचार केला पाहिजे. कारण त्या कर्तव्याचा विचार करण्यात आला तरच रॉय यांची विचारसरणी कशी मूलगामी होती, जीवनाच्या आणि मनाच्या साऱ्या समस्यांचे परिशीलन करून त्यांवर चिकित्सेची किरणे टाकून खुल्या दिलाचा, उमद्या मनाचा, सदैव प्रगतीची आकांक्षा धरणारा, मानवी मूल्यांची जपणूक करणारा एक सुसंस्कृत मानव तयार करू पाहणारी होती याची कल्पना करता येईल.

रॉय यांना जे प्रतिस्पर्धी नेतृत्व निर्माण करावयाचे होते ते फक्त राजकीय आकांक्षा साध्य करण्यासाठीच नव्हे. राजकीय आकांक्षा सफल करणे हे फक्त साधन होते. साध्य होते ते पिळवणुकीपासून मुक्त करणारे, व्यक्तित्वाच्या विकासाला वाव देणारे सामाजिक परिवर्तन घडवून आणणे हे होय. रॉय व इतर स्वातंत्र्यवादी नेते यांच्यामध्ये फरक होता तो हा की राजकीय चळवळीसाठी व्यक्तींचा उपयोग करून घेण्याची जी इतर स्वातंत्र्यवाद्यांची वृत्ती होती ती रॉय यांना मान्य

नव्हती. " मला रक्त द्या; मी तुम्हांला स्वातंत्र्य मिळवून देतो " असे आवाहन करणारेच बहुतेक स्वातंत्र्यवादी होते. आवेश निर्माण करण्यासाठी या घोषणा योग्य होत्या. पण त्यात अभिप्रेत होते ते एवढेच की तुम्ही रक्त द्या, तुम्ही त्याग करा, तुम्ही बलिदान करा; आणि आम्ही सत्ताधिष्ठित होऊ. त्यागाचा हा वडिवार, नव्हे त्यागासाठी त्याग करण्याची ही वृत्ती एम्. एन्. रॉय यांना मान्य नव्हती. त्यांचे असे म्हणणे होते की " करा किंवा मरा " हा संदेश हा विजिगीषू जीवनाचा, भवितव्याची घडण घडवू पाहणाऱ्या तत्त्वज्ञानाचा संदेश नव्हे. ध्येय-पूर्तीसाठी, त्या ध्येयानुसार चाललेल्या आंदोलनात मी मरेनही. पण मी जो लढत आहे तो माझे जीवन जगावे, ते अधिक सुखी, समृद्ध व्हावे यासाठी. त्या जीवनाचा प्रवाह चालू असताना आणि व्यक्ती म्हणून त्या प्रवाहाला वळण लावण्यासाठी मी झटत असताना मरणाचा अभद्र संदेश का दिला जावा ? आणि तो देणारे तुम्ही कोण ?

रॉय यांच्या मूलगामी विचारसरणीची चुणूक या सवालातून भासल्यावाचून रहात नाही. एका बंडखोराची, मूर्तिभंजकाची ही विचारसरणी होती. अर्थातच राजकीय वा सामाजिक जीवनात जो विचार लोकप्रिय, लोकांच्या भावना पुलकित करणारा होता त्याच्याविरुद्ध रॉय यांना दंड थोपटून उभे रहावे लागत असे. एम्. एन्. रॉय यांच्या जीवनाचा तो स्थायीभावच झाला होता असे म्हणाना. रॉय हे राजकीय पुढारी होते यापेक्षा ते राजकीय विचारवंत होते हेच खरे. त्यांनी केलेल्या विचारमंथनातून त्यांना हे कळून आले होते की ब्रिटिश साम्राज्यशाहीची राजवट जरी प्रतिगामी असली तरी ब्रिटिश लोक, त्यांची भाषा, त्यांच्या परंपरा, त्यांची संस्कृती यांपासून भारताला पुष्कळच घेण्यासारखे आहे. त्यातून निर्माण होणारा आदर्श समोर ठेवला तर भारताला भावी काळात आधिभौतिक व सांस्कृतिक प्रगतीच्या दृष्टीने पुष्कळच मोठी वाटचाल करता येईल. एम्. एन्. रॉय यांची केवळ ब्रिटनबद्दलच ही भावना नव्हती. त्याहीपेक्षा अधिक आदर, प्रेम व जिव्हाळा त्यांना युरोपीय संस्कृतीबद्दल वाटत असे. या संस्कृतीने औद्योगिक क्रांतीचा पाया घातला; स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या तत्त्वांवर आधारलेल्या सामाजिक व्यवस्थेची मुहूर्तमेढ उभारण्याचा प्रयत्न केला, विज्ञान व कला या दोन्ही क्षेत्रांत अभूतपूर्व प्रगती घडवून आणली; नव्या, सुसंस्कृत आचारविचारांचे एक सुवर्णयुग अस्तित्वात आणले, आणि विशेषत: व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पनेला सामाजिक व्यवहारात स्थान दिले, नव्हे व्यक्तीला समाजाचे केंद्रबिंदू केले असे रॉय यांचे मत होते व म्हणूनच युरोपीय वा पाश्चिमात्य संस्कृतीकडे भारताने पाठ फिरवू नये असे अव्याहतपणे त्यांनी आवाहन केले.

पाश्चिमात्य संस्कृतीने उदारमतवादाचा जो वारसा दिला तो जतन करणे

हेच रॉय यांनी आपल्या विचारसरणीचे उद्दिष्ट ठेवले होते. उदारमतवाद––ब्रिटिशांनी लोकशाहीची जी बीजे रुजविली, आधुनिकतेचा जो साज चढविला, औद्योगीकरणाची जी प्रथा पाडली, विज्ञानाची जी कवाडे खोलली त्यांविषयी नि:संकोचपणे प्रशस्ती देणारा. रॉय यांनी अप्रिय सत्यकथन करावयाला कधीच मागेपुढे पाहिले नाही. धार्मिक असहिष्णुता, जुन्या इतिहासाचे, संस्कृतीचे पुनरुज्जीवन, पुराणमतवाद, दैववाद, अध्यात्मवाद, रूढिबद्धता, रानटी आचार, मध्ययुगीन विचार यांवर रॉय यांनी जेवढे कोरडे ओढले तेवढे दुसऱ्या कोणत्याही राजकीय नेत्याने ओढले नसतील. येथे तडजोडीला वावच नव्हता. आणि रॉय यांची आधुनिकता व विज्ञाननिष्ठा इतकी आग्रही होती की त्या आग्रहापायी लोकप्रियतेवर पाणी सोडावयालाही ते सदैव तयार असत. हिंदी राष्ट्रवादाच्या नावाखाली जुन्या सरंजामदारी राजवटीची प्राणप्रतिष्ठा करण्याला जसा त्यांचा विरोध होता त्याचप्रमाणे ब्रिटिश राजवटी-विरुद्ध प्रक्षोभ निर्माण करण्यासाठी सनातनी बुरसटलेल्या, प्रतिगामी आचार-विचारांचा पाठपुरावा करणेही त्यांना मान्य नव्हते. जुन्या इतिहासापासून धडे घेणे, स्फूर्ती घेणे वेगळे आणि त्या इतिहासाचे, संस्कृतीचे पुनरुज्जीवन करणे वेगळे असे रॉय यांनी वेळोवेळी ठासून सांगितले. आणि त्यांनी पुन:पुन्हा इशारा दिला की ब्रिटिशांनी भारत जिंकला तो त्यांच्यापाशी नवे साहित्य, नवी साधनसामुग्री आणि नव्या समाजरचनेची प्रेरणा होती म्हणून. आणि भारताला स्वातंत्र्य संपादन करावयाचे असेल तर जुन्यापुराण्या विचारांची, परंपरेची कोळिष्टके झाडून टाकून भारताला औद्योगिक क्रांती व तिच्याबरोबर येणाऱ्या सामाजिक तत्त्वज्ञानाचा, विचारप्रणालीचा नि:संकोचपणे स्वीकार केला पाहिजे.

राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी भारतामध्ये जी काही आंदोलने झाली त्यांचे पुढारी-पण अनेक नामवंत नेत्यांनी भूषविले. त्यागी, विचारी, ध्येयनिष्ठ असे हे नेते होते. यांच्या अंत:करणात फक्त एकच उत्कट भावना होती आणि ती म्हणजे देश गुलामीतून मुक्त करणे. त्यासाठी साधनांची बहुश: कोणी क्षिती बाळगली नाही. देशामध्ये उठाव घडवून आणणे, ब्रिटिश राजकर्त्यांविरुद्ध अप्रीती निर्माण करणे, आणि वाटेल त्या मार्गांनी जनमत संघटित करून ब्रिटिशांची सत्ता खिळखिळी करणे हेच त्यांचे ध्येय होते, हीच त्यांची विचारपद्धती होती. रॉय यांनी स्वत: क्रांतिकारी राजकारणात प्रवेश केला तेव्हा याच विचारपद्धतीचा त्यांच्या मनावर पगडा होता. याच विचारपद्धतीतून, स्वातंत्र्य आधी की समाजसुधारणा आधी, या वादाचा उगम झाला असताना समाजसुधारकांची पीछेहाट घडवून आणली गेली होती. याच विचारपद्धतीचा स्वीकार केला गेल्यामुळे रानडे, गोखले यांच्यासारख्या दूरदर्शी उदारमतवादी पुढाऱ्यांना समाजात स्थान राहिले नाही. याच विचारपद्धतीने सनदशीर, सुधारणावादी, कायद्याच्या कक्षेत राहून लोक-

जागृतीच्या मार्गाने हक्क व अधिकार प्राप्त करून घेऊ पाहणाऱ्या वैचारिक भूमिकेचा पराभव केला. भारताच्या स्वातंत्र्यआंदोलनात जी घोषवाक्ये आणि जे कार्यक्रम प्रामुख्याने पुढे आले, त्यांची नीट चिकित्सा केली तर असे दिसून येईल की या घोषवाक्यांत व कार्यक्रमात विचाराला स्थान नव्हते तर भावनेवर भर होता, दूरदृष्टीपेक्षा संकुचित दृष्टीला त्यात प्राधान्य होते, समाजाची घडण घडवून आणण्यापेक्षा, त्याला वळण लावण्यापेक्षा, त्या समाजाचे अधिष्ठान नष्ट करण्याची, त्याला विध्वंसनाच्या मार्गाकडे नेण्याचीच प्रवृत्ती अधिक प्रभावी होती. म्हणूनच स्वदेशीचा पुरस्कार करण्यात आला तेव्हा येथील उत्पादन वाढविण्यापेक्षा, गुणाने ते सुधारण्यापेक्षा मंचेस्टर व लंकेशायर या गिरण्यांत पैदा होणारे कापड जाळून टाकण्यावरच अधिक भर देण्यात आला. स्वदेशीचे हित त्याने काय साधले गेले असेल हे कपड्यांची होळी करण्याचा आदेश देणाऱ्या पुढाऱ्यांनाच माहीत.

पण त्यांनी तरी हा आदेश द्यावयाचा नाही तर काय करावयाचे ? दुसरा विधायक वा आक्रमक कार्यक्रम त्यांना सुचला नाही म्हणूनच त्यांनी सर्वसाधारण-पणे जनमत ज्यामुळे उत्तेजित होईल, प्रक्षुब्ध होईल असे कार्यक्रम आखले व त्यासाठी जनतेची शक्ती संघटित केली. लोकांना जे पटेल, आवडेल, त्यांच्या भावनेला स्पर्श करून जाईल, त्यांच्या मनःप्रवृत्ती, आवडीनिवडी आणि पूर्वग्रह यांच्याशी सुद्धा जे जुळेल असे काहीतरी बोलण्याचा व करण्याचा राष्ट्रीय पुढाऱ्यांचा कटाक्ष असे. या कामी जात, धर्म, विभागाचा इतिहास, परंपरा, रूढी उपयोगी पडत असल्या तर त्यांचाही आश्रय घ्यावयाला त्यांनी संकोच केला नसता. त्याचे परिणाम इतर जातींवर, धर्मांवर किंबहुना दुसऱ्या विभागांवर-कोणते होतील याची पर्वा करण्याचेही त्यांना कारण काय ? परिणामतः अनेक राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या आचारविचारांतून ब्रिटिशांविरुद्ध भावना चेतवली गेली असेल, पण अनेक वेळा देशामध्ये निरनिराळ्या धर्मांमध्येही दुहीची बीजे पेरली गेली हे विसरून चालणार नाही. एम्. एन्. रॉय हे देशोदेशी हिंडून आले असल्यामुळे, त्या त्या देशातील विचारांचे त्यांनी ग्रहण केले असल्यामुळे, पाश्चिमात्य संस्कृती, पश्चिमेतील देशात घडून येत असलेले सामाजिक स्थित्यंतर यांचे परिशीलन व मनन करून त्यांचा दृष्टिकोण व्यापक झाला असल्यामुळे आणि एकंदरीने जगाचा एक नागरिक या दृष्टीने वावरण्याची त्यांना सवय झाली असल्यामुळे त्यांनी भारतीय राजकारणात विचारांच्या दृष्टीने इतर सर्व राष्ट्रीय नेत्यांपेक्षा एक निराळा पायंडा पाडला आणि एका नव्या तत्त्वज्ञानाचे पाईक होण्याइतपत आपल्या जीवनाच्या अखेरीस मजल गाठली.

# परिपूर्ण मानवी जीवनाचे भोक्ते

एम्. एन्. रॉय यांना नव्या तत्त्वज्ञानाचे पाईक म्हणता येईल ते या दृष्टीने की सर्व राजकीय पुढाऱ्यांत, मानवी व्यक्तित्व, त्या व्यक्तीचे स्वातंत्र्य व विकास आणि त्या विकासाच्या निकषावर साऱ्या भौतिक वा बौद्धिक घटनांचे मूल्यमापन करण्याची जरुरी यांना महत्त्व कोणी दिले असेल तर ते रॉय यांनी. मानवी व्यक्तित्वावर प्रत्येक गोष्टीचा परिणाम काय होतो हे पाहूनच विश्वाच्या प्रगतीचा ठाव घेतला गेला पाहिजे हा रॉय यांचा अखेरच्या काळातील आग्रह होता. एका राजकीय प्रज्ञावंताच्या मनोभूमिकेची प्रगती कसकशी होत गेली याचे सुरम्य चित्र पाहावयाचे असेल तर रॉय यांच्या जीवनाकडेच पहावे लागेल. त्यांच्या मृत्यूनंतर एका हिंदी कवीने त्यांच्याबद्दल काही हृदयस्पर्शी ओळी लिहिल्या होत्या. त्यांत त्या कवीने म्हटले आहे:

> " यह भी नही, कोई देवता,
> भगवान मर गया
> नेता शाहेन्शाह
> न सुलेमान मर गया
> हिंदू कोई मरा,
> न मुसलमान मर गया
> इतनीसी बात हैं,
> एक इन्सान मर गया "

रॉय यांच्या जीवनाचे वैशिष्टचच जणू या कवीने मोजक्या पण हृदयंगम शब्दांत व्यक्त केले आहे. ते एक माणूस म्हणूनच जगले आणि त्यांच्या विचारसरणीतही माणसालाच अग्रस्थान राहिले, केंद्रस्थान राहिले. त्यांनी जो माणूस आपल्या मनश्चक्षूंसमोर उभा केला होता तो फाटका, दरिद्री, दुबळा, मनाने संकुचित, वृत्तीने लाचार आचाराने बावळा असा माणूस नव्हे. गरिबीबद्दल रॉय यांना कळवळा होता. त्या कळवळ्यानेच ते मार्क्सवादी क्रांतीकडे वळले, की जी क्रांती शोषणपद्धतीचाच नाश करून व्यक्तीच्या विकासाला अनिर्बंध वाव मिळवून देईल असे त्यांना वाटले. पण त्यांना जो प्रत्यक्ष अनुभव आला तो असा की या क्रांतीत एका वर्गाकडून शोषण होत होते ते थांबविण्यात आले, पण त्याच्या जागी दुसरा एक राज्यकर्त्यांचा वर्ग निर्माण झाला की ज्याने श्रमजीवी म्हटल्या जाणाऱ्या वर्गालाच पायाखाली तुडविले.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र.
स्थल प्रत

म्हणून अखेरीस एम्. एन्. रॉय हे मार्क्सिझमच्या पलीकडे गेले, मार्क्सवादाची ज्या मानवतावादापासून फारकत झाली होती त्या मानवतावादाचा त्यांनी स्वीकार केला.

हा मानवतावाद सुद्धा जहाल मानवतावाद होता; नुसता कळवळ्याचा मानवतावाद नव्हे. कळवळा ठीक आहे. पण त्याचा अर्थ असा नव्हे की कळवळा वाटावा म्हणून, त्याला अवसर मिळावा म्हणून कपडयांचे वा वृत्तीचे दारिद्र्य कायम राहावे, दरिद्रीनारायणाची आळवणी करण्यातच कृतार्थता मानली जावी. रॉय यांची मनोभूमिका खरोखरच प्रामाणिकपणे समजावून घेतली जाणे आवश्यक आहे. दरिद्री नारायणाला संतुष्ट करण्यासाठी आपण स्वत: दरिद्री वा गबाळे राहावे हे रॉय यांना मान्य नव्हते. ते म्हणत असत की दारिद्र्य हे सामाजिक परिस्थितीतून निर्माण होत असते. म्हणून ते दूर करण्याचा उपाय समाजपद्धती बदलणे हा होय; व्यक्तिश: नेत्यांनी दरिद्री जीवनाचा वा पोशाखाचा स्वीकार करणे हा नव्हे. हा एकतर दंभ तरी होईल किंवा जनमनावर छाप टाकण्याचा हा एक चाणाक्ष पवित्रा तरी म्हणता येईल. रॉय यांनी दरिद्री, मुशाफरी जीवनाचा अनेक वर्षे अनुभव घेतला होता. त्याग, कष्ट, मानहानी, विटंबना, कारावास यांची महती रॉय यांना सांगू पहाणे म्हणजे इंग्रजी म्हणीप्रमाणे न्यूकॅसलला कोळसा वाहून नेणे होय असेच म्हणता यईल. पण रॉय यांनी दरिद्री जीवनात—आपल्या स्वत:च्या वा इतरांच्या—कधी आनंद मानला नाही किंवा दरिद्री लोकांच्या जीवनाशी समरस होण्यासाठी डोळयांत टिपे जमविण्याचाही नाटकीपणा केला नाही. कोठल्याही प्रकारचा नाटकीपणा रॉय यांच्या नैसर्गिक मन:प्रवृत्तीशी विसंगत असे.

जीवन हे कर्तव्यपूर्तीसाठी आहे, तसेच ते मिळेल तो आनंद लुटण्यासाठीही आहे हीच रॉय यांची जीवनाकडे पाहण्याची दृष्टी होती. मला प्रत्यक्ष अनुभवाने माहीत आहे की कारावासातून सुटल्यानंतर मुंबईमध्ये त्यांनी जेव्हा वास्तव्य केले तेव्हा दिवसातून फारतर एक वेळ जेवण घेण्याइतपत त्यांची आर्थिक परिस्थिती होती. चर्नीरोड समोरच्या एंपायर बिल्डिंगमधे सर्वात वरच्या मजल्यावर ' इंडिपेंडंट इंडिया ' या नावाच्या त्या वेळच्या त्यांच्या साप्ताहिकाची कचेरी होती व त्या कचेरीला लागूनच असलेल्या दीड खोल्यात रॉय व एलन रॉय रहात असत. दुपारी एकच्या सुमारास लिहून थकल्यानंतर त्यांना जेवण्याची आठवण होत असे आणि मग त्यांच्याजवळचे आणि कधी कचेरीतील लोकांचे पैसे जमा करून त्यांच्या लंचची व्यवस्था करण्यात येत असे. आज सांगितले तर आश्चर्य वाटेल पण त्या वेळी रॉय आणि एलन रॉय यांना आवडत असलेली ' बीफ स्टिक ' फक्त सव्वा रुपयात मिळत असे आणि पावाच्या दोन तुकडयांसहित या मांसाचा समाचार घेतच रॉय यांचे दुपारचे जेवण पार पडत असे. पण हा समाचार किती आनंदाने व तृप्तीच्या भावनेने रॉय पतिपत्नी घेत असत—आणि किती औपचारिकपणे सुद्धा.

एम्. एन्. रॉय यांना उपचारांचेसुद्धा फार महत्त्व वाटत असे. पाश्चिमात्य देशातच बहुशः सारे जीवन व्यतीत केल्यामुळे त्यांना गबाळेपणाने पोशाख करणे, सदभिरुचीला न रुचणारे वर्तन करणे कधीही आवडत नसे; नव्हे तशा वागण्याचा त्यांना तिटकारा वाटत असे. ते नेहमी म्हणायचे 'पाश्चिमात्य लोक जेवण्यासाठी पोशाख चढवितात ( डे ड्रेस ) ; आपण पोशाख उतरवितो ( वुइ अन्ड्रेस )' ओंगळवाण्या पद्धतीने उघडया अंगाने घरात रहाणेही त्यांना पसंत नसे. मला आठवते, १३ मोहिनी रोडवरील त्यांच्या राहत्या घरी सकाळच्या न्याहरीसाठी (ब्रेक्फास्ट) सुद्धा ते अगदी जामानिमा करून प्रगट होत असत. त्यानंतर लेखनासाठी ते अभ्यासिकेत जात असत तेही जणू आपण कचेरीत जात आहो अशा थाटात. अखेरच्या आजारात अंथरुणाला खिळेपर्यंत त्यांचा दिनक्रम असा नीटनेटक्या रीतीनेच पार पाडला जात असे. जीवनाबद्दलचा त्यांचा दृष्टिकोणच तसा सौंदर्यवादी होता. आणि त्यांना वाटत असे की आपल्या व्यक्तिगत जीवनात दुसऱ्या कोणी हस्तक्षेप करू नये; आपल्या आवडीनिवडीप्रमाणे लोकांनी आपल्याला जगू द्यावे. रॉय यांच्या आवडीनिवडी तशा चोखंदळ होत्या—जशा व्यक्तीबद्दलच्या तशाच रहाणीबद्दलच्या, आचाराबद्दलच्या, खाद्यपेयाबद्दलच्या. ते भोक्ते होते ते परिपूर्ण मानवी जीवनाचे, त्यांनी इच्छा, आकांक्षा धरली ती आपल्या स्वतःच्या समृद्ध जीवनाचीच नव्हे तर बहुजन समाजाच्याही समृद्ध जीवनाची. या समृद्ध जीवनात आपला व्यवसाय, कलेची आवड, खेळाबद्दलची आस्था, फळाफुलांनी भरलेला बगीचा, शृंगारलेले, कलात्मक रीतीने सजविलेले निवासस्थान, खाद्यपेयांचा आनंद लुटण्याइतके स्वास्थ्य आणि अखेरीचे पण तितकेच महत्त्वाचे व्यक्तिगत खाजगी जीवन याची शाश्वती मिळावी हे रॉय यांचे मानवी जीवनाबद्दलचे सुखस्वप्न होते. हे सुखस्वप्न साकार होण्यात त्यांच्या बाबतीत तरी राजकारणाने काही प्रमाणात मोडता घातला. पण तरीही रॉय यांनी आपले व्यक्तिगत जीवन सुखमय करण्याचा कसोशीने प्रयत्न केला. कलेची आवड, काव्यशास्त्रविनोदाला चालना देणारा मित्रांचा सहवास, उत्कृष्ट ग्रंथांचा व सौंदर्यपूर्ण वस्तूंचा संग्रह वगैरे आपले छंद पुरे करण्यातही त्यांनी यश मिळवले यात संशय नाही.

त्यांचे वैशिष्टय जर कोणते असेल तर त्यांनी लोकानुरंजन हे आपले ध्येय कधीच मानले नाही व त्यासाठी खोटया, भोंदूपणाच्या आचारांचा कधीही स्वीकार केला नाही. उक्ती व कृती यांत मेळ नसणे हे राजकारणी पुरुषांचे वा सामाजिक नेत्यांचे लक्षणच आज ठरू पहात आहे. रॉय यांची आपल्या विचारसरणीबद्दल इतकी निष्ठा होती की त्या विचारसरणीशी विसंगत असे वर्तन करणे हे त्यांना अप्रामाणिकपणाचे, अनीतीकारक वाटत असे. फैझपूर काँग्रेसला ते आले तेव्हा ते नुकतेच तुरुंगातून बाहेर पडले होते. क्रांतिकारक, व एक रहस्यमय पुरुष म्हणून

त्यांच्याभोवती त्या वेळी एक वलय निर्माण झालेले होते. साहजिकच खुद्द गांधीजींनीही त्यांना भेटीसाठी बोलविले, त्यांच्या विचाराची दिशा समजावून घेण्यासाठी त्यांच्याशी चर्चा केली. रॉय यांनीही कॉंग्रेसचे व देशाचे थोर नेते म्हणून गांधीजींना अभिवादन केले व आपले ध्येयधोरण व कार्यक्रम यांचे गांधीजींच्या पुढे स्पष्टीकरण, केले. सायंकाळच्या सुमारास बराच वेळ ही चर्चा चालली होती. ती पुरी होण्या-पूर्वीच गांधीजींची प्रार्थनेची वेळ झाली. गांधीजींनी साहजिकच रॉय यांना प्रार्थनेत सामील होण्याची विनंती केली. गांधीजींची ही विनंती झिडकारून देणे हे अत्यंत कठीण काम होते. दुसऱ्या कोणत्याही नेत्याने त्या विनंतीचा कधीही अव्हेर केला नसता. पण रॉय यांनी तो केला. कॉंग्रेसमधे आपण नवोदित, नवखे आहो, आपले राजकीय भवितव्य गांधीजींच्या मोहवतीवर अवलंबून आहे हे माहीत असूनही केला. त्यांनी नम्रपणे पण खंबीरपणे गांधीजींना सांगितले, " महात्माजी, प्राथने-वरील आपल्या श्रद्धेबद्दल मला आदर आहे; पण ईश्वराचे अस्तित्व न मानणाऱ्या माझ्यासारख्या नास्तिकाने स्वत:च्या श्रद्धेविरुद्ध आचरण करणे हे अप्रामाणिकपणाचे होणार नाही का ? तेव्हा माफ करा, मी आपल्या प्रार्थनेत सहभागी होऊ शकणार नाही. " फैजपूर कॉंग्रेसच्या नेतानिवासातून गांधीजींचा निरोप घेऊन त्या दिवशी रॉय बाहेर पडले. रॉय आणि गांधी यांची तत्त्वत: जी फारकत झाली ती कायमची.

त्यानंतर " इंडिपंडंट इंडिया " हे साप्ताहिक सुरू करण्याचा आपला मानस गांधीजींना कळविण्यासाठी रॉय यांनी गांधीजींना एक पत्र लिहिले व आपण कॉंग्रेसमधे राहून देशसेवा कोणत्या प्रकारे करावी याबद्दल गांधीजींचा सल्लाही त्यात त्यांनी विचारला. त्या पत्राला एका कार्डावर गांधीजींनी उत्तर लिहिलेले मला आठवते. त्यात त्यांनी एकाच वाक्यात आपला मानस व्यक्त करताना म्हटले होते की " नि:शब्द सेवाधर्माचाच आपण स्वीकार करावा. "

निशब्द सेवाधर्म ( म्यूट सर्व्हिस ) हा गांधीजींनी रॉय यांना दिलेला संदेश रॉय यांच्यासारख्या क्रांतिकारी प्रवृत्तीच्या नेत्याला कसा मान्य होऊ शकणार ? त्यांनी एवढेच जाणले की गांधीजींचे व आपले मार्ग भिन्न आहेत; यापुढील काळात प्रतिस्पर्धी नेतृत्वाची उभारणी करण्यासाठीच आपल्याला कंबर कसली पाहिजे.

# मूर्तिभंजक आणि विज्ञाननिष्ठ

एम्. एन्. रॉय यांचा दृष्टिकोण व इतर राष्ट्रीय नेत्यांचा दृष्टिकोण यात मूलभूत स्वरूपाचा मतभेद होता. गतायुष्याकडे पाहणारा राष्ट्रवाद आणि भावी काळाकडे आशेने पाहणारा आंतरराष्ट्रवाद यांतील तो मतभेद होता. जुन्यापुराण्या समाजाच्या सुखस्वप्नात मश्गूल होणारी विचारसरणी आणि 'जुने जाउ द्या मरणालागुनि' असे म्हणून औद्योगिक क्रांतीतून निर्माण होणाऱ्या नव्या समाजरचनेला सामोरे जाणारी विचारसरणी यांतील तो मतभेद होता. धर्माच्या नावाखाली श्रुतिस्मृति-पुराणोक्त आचारांची महती गाऊन बहुजनसमाजाचे शोषण करणाऱ्या रूढी व परंपरा यांचे रक्षण करणारी भूमिका आणि धर्म ही व्यक्तीची खाजगी बाब आहे आणि म्हणून सामाजिक व राजकीय व्यवहारात त्याचे प्राबल्य माजविता कामा नये असा खणखणीत इषारा देणारी भूमिका यांतील तो मतभेद होता. रॉय यांनी आपला दृष्टिकोण, आपली विचारसरणी, आपली भूमिका यांच्या बाबतीत कधीच तडजोड केली नाही. धार्मिक वा सामाजिक पुनरुज्जीवनाचे उद्दिष्ट समोर ठेवून अंध, अज्ञानी जनतेची सहानुभूती मिळविण्याचे तर त्यांनी कटाक्षाने टाळले. अध्यात्म वा आध्यात्मिक राजकारण यांच्या ते वाऱ्यालाही उभे राहिले नाहीत. त्यांचे असे स्पष्ट मत होते की भारतात आणि इतर मागासलेल्या देशात अध्यात्म हे फारच सवंग व विपुल झालेले आहे आणि म्हणूनच या देशात भौतिक प्रगती-साठी झटण्यापेक्षा, परलोक आणि मुक्ती यांचे चिंतन करण्यातच लोकांचा अधिक वेळ खर्ची पडत आहे. भारतात दैववाद, ज्योतिष, हस्तसामुद्रिक यांची जी चलती दिसून येत आहे ती अध्यात्मपर अशा प्रवृत्तीमुळेच होय असे रॉय यांनी वेळोवेळी बजाविले होते.

ते म्हणत की आपल्यावर ज्या तत्त्वज्ञानाचा पगडा आहे त्याची भूमिका ही की पूर्वजन्मीच्या पापानुसार या जन्मीची दुःखे आपल्याला भोगावी लागत आहेत; त्यांच्यापासून सुटका करून घ्यावयाची असेल तर अध्यात्मचिंतनात, भगवंताच्या पूजेत आपण मग्न राहिले पाहिजे. म्हणजे दुसऱ्या जन्मी तरी आपले पापक्षालन होईल. म्हणजे या जन्मी आपल्या दुःखनिवारणासाठी कार्यरत होण्याचा संदेश यातून मिळत नाही; तर परलोकीच्या, पुनर्जन्मानंतरच्या अवस्थेकडे डोळे लावून बसणे हेच आपले उद्दिष्ट ठरते. अशा प्रकारच्या दैववादाचा आश्रय घेणारी

माणसे नव्या, समृद्ध समाजजीवनाची उभारणी कशी करू शकतील हाच रॉय यांच्यापुढे प्रश्न असे. भारतात आल्यानंतर ते सभोवार पहात आणि त्यांना काय दिसून येई ? माणसे हताश, निराश होऊन आपल्या दैवाला बोल लावीत बसलेली. प्रत्यक्ष राजकारणाच्या व्यासपीठावर तरी त्यांना काय आढळून येई ? नेते बोलत आहेत, आवाहन करीत आहेत, देवाच्या, धर्माच्या नावाखाली जुन्या इतिहासाला साक्ष ठेवीत आहेत आणि समोरचा जनसंमर्द हजारोंच्या संख्येने, खुल्या मैदानावर उभा राहिलेला नाही. तर बसला आहे, पेंगत आहे, डोळे कसेवसे उघडे ठेवीत माना डोलावीत आहे. या जनसंमर्दात क्रांतिकारी, वर्गजागृत कामकरी वर्गाचाही समावेश होत असे. जमिनीवर बसलेला श्रोतृवृंद ही रॉय यांना लढाऊ चळवळीची विटंबना वाटत असे. नेत्यांचा संदेश ऐकण्यासाठीसुद्धा ज्यांना ताठ उभे राहता येत नाही ते क्रांतीची उठावणी काय करू शकणार ? असा रॉय नेहमी प्रश्न विचारीत असत.

दैववादाने, ईश्वरावरील श्रद्धेने भारलेले लोक त्यांना काय उत्तर देऊ शकणार ? या दैववादाचा पगडा सुशिक्षित लोकांवर, राष्ट्रनेत्यांवर, इतकेच नव्हे तर शास्त्रज्ञ, विज्ञाननिष्ठ व्यवसायातील लोकांवरही बसलेला रॉय यांना दिसत होता. त्यांना आश्चर्य वाटत असे की शास्त्रीय पद्धतीने रोगचिकित्सा करणारे धन्वंतरीच जर ज्योतिष आणि अंगारेधुपारे यांचा आश्रय घेऊ लागले तर विज्ञानवादी दृष्टिकोण तयार तरी कसा होईल ? एकवेळ सुधारलेल्या जगात ही विज्ञाननिष्ठा नसली तरी चालण्यासारखे होते; कारण तेथे समृद्धीबरोबर शास्त्रीय ज्ञानाची कवाडे आपोआपच खोलली जात होती. आणि अशा परिस्थितीत निखालस अज्ञानाने व अपसमजाने समाजाला वा व्यक्तीला धोका तरी निर्माण होऊ शकत नव्हता. पण मागासलेल्या समाजात, समाजाचे नेते व नियंते ठरलेले लोकच वैदूगिरीला व भोंदूपणाला मुक्तद्वार ठेवू लागले तर तो समाज प्रगतिपथावर मार्गक्रमण कसा करू शकेल ? एम्. एन्. रॉय यांनी विज्ञाननिष्ठा हीच मुळी आपली जीवनश्रद्धा बनविली होती. अखेरच्या आजारात प्राणांतिक यातना ते सहन करीत असताना त्यांचे एक बालपणाचे मित्र दिल्लीतील प्रख्यात डॉक्टर सुशान्त सेन हे त्यांची प्रकृती पाहण्यासाठी देहरादूनला आले होते. त्यांनी प्रकृती तपासली आणि मग बराच वेळ ते सुखदुःखाच्या गप्पा करीत रॉय यांच्या बिछान्यापाशी बसले. रॉय यांना वेदना सहन होत नव्हत्या. पण तरी सुद्धा विलक्षण धैर्याने व सोशिकपणाने ते आपले दुःख विसरत हसतमुखाने वार्तालाप करीत राहिले. डॉ. सेन यांना त्यांच्या दुर्धर परिस्थितीची जाणीव होती आणि म्हणूनच त्यांनी रॉय यांना आकस्मिकपणे प्रश्न केला, " मानवेंद्र, या अवस्थेत सुद्धा तुला परमेश्वराची आठवण होत नाही का ?"

"परमेश्वराची, आणि आठवण!" रॉय खळखळून हसत आपल्या खणखणीत आवाजात म्हणाले, "खरे सांगू का सुशान्त, परमेश्वर कोणी असलाच तर तो अगदीच अपूर्ण, अनभिज्ञ आहे एवढे मात्र तुला स्वानुभवाने सांगू शकतो."

"तो का बरे?" डॉ. सेन उद्गारले. "अरे, ज्याला दुःख आणि यातना थांबविता येत नाहीत तो सर्वज्ञ, सर्वशक्तिमान परमेश्वर कसला? मी मृत्यू समजू शकतो. ठीक आहे. मला त्याची भीतीही वाटत नाही. पण शारीरिक यातना कशाकरिता? माझी खात्री आहे, तंत्रज्ञांच्या साहाय्याने आपल्याला परमेश्वरावर निश्चित मात करता येईल, मानवी जीवन पुष्कळच सुधारता येईल."

एम्. एन्. रॉय यांची विज्ञाननिष्ठा अशी कडवी होती. त्यांचा आत्मविश्वास असा दुर्दम्य होता, आणि मनाचा पिंड असा बळकट, आग्रही होता. एम्. एन्. रॉय हे स्वतः निरीश्वरवादी, आणि पक्के नास्तिक होते. पण सामाजिक घडण घडवून आणीत असताना लोकांच्या श्रद्धेचा अनादर करता येत नाही याचीही जाणीव त्यांनी ठेवली होती. म्हणून परमेश्वराच्या अस्तित्वाबद्दल जाहीर रीतीने त्यांनी कधी वाद घातला नाही. आपली विचारसरणी तर्कशुद्ध असावी आणि आपले आचरण त्या विचारसरणीशी विसंगत होऊ नये हा रॉय यांचा कटाक्ष होता. म्हणून ज्यातून अंधश्रद्धेला वाव मिळेल, धार्मिक पुनरुज्जीवनाच्या प्रवृत्तीचा प्रसार होईल, लोकांची मने निकोप राजकीय वा सामाजिक आचारांपासून परावृत्त होतील अशा कोणत्याही गोष्टी रॉय यांनी केल्या नाहीत आणि आपल्या विचारवंत अनुयायांना करू दिल्या नाहीत. त्यांचा आग्रह असे तो एवढाच की देव, धर्म, हा राजकीय व सामाजिक व्यवहारात आणला जाऊ नये; बाकी व्यक्तिशः कोणीही आपल्या श्रद्धेनुसार वर्तन करावे. निधर्मीपणाची रॉय यांची कल्पना हीच होती. ते खरेखुरे निधर्मी होते ते या दृष्टीने की त्यांनी प्रत्येक धर्माचा सांगोपांग अभ्यास केला व प्रत्येक धर्मातील मूलतत्वे व त्यांचा समाजजीवनावर होणारा परिणाम यांची चिकित्सक पद्धतीने छाननी केली. इस्लामचा ऐतिहासिक वारसा कोणता आहे याचे रॉय यांनी जें विवेचन एका पुस्तकात केले आहे. ते मूलग्राही आहे. मुसलमानी समाजातील धर्मवेडेपणा त्यांना कधीही ग्राह्य वाटला नाही. पण तलवारीच्या धारेवर धर्म-प्रसार करताना मूर्तिभंजनाचे जे कार्य या धर्माने केले ते ऐतिहासिक दृष्टीने फार महत्त्वाचे व सामाजिक दृष्टीने फार उपकारक आहे असे मत रॉय यांनी निधडेपणाने या पुस्तकात मांडले आहे.

मूर्तिभंजन—मग ते धार्मिक क्षेत्रात असो की सामाजिक व राजकीय क्षेत्रात असो—हा रॉय यांच्या एकंदर जीवनाचा बाणाच होता असे निःशंकपणे म्हणता येईल. भारतीय तत्त्वज्ञानाची मीमांसा करताना भारतीय तत्त्वज्ञान आधात्मिक प्रवृत्तीचेच केवळ आहे व पाश्चिमात्य तत्त्वज्ञान भौतिक प्रवृत्तीचे आहे या

सिद्धांतावरच त्यांनी मुळी कडाडून हल्ला चढविला. त्यांचे म्हणणे असे होते की पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाला अध्यात्माचे वावडे नव्हते आणि भारतातील काही तत्त्वज्ञांनी तरी भौतिकतेकडे पाठ फिरविली नव्हती. कपिल-कणाद यांच्या परंपरेकडे त्या दृष्टीनेच रॉय यांनी लक्ष वेधविले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या वैदिक संस्कृतीचा इतिहास या ग्रंथाचे कौतुक करताना, एका जाहीर सभेत रॉय यांनी असे उद्‌गार काढल्याचे मला आठवते की कपिल-कणादांची परंपरा चालविणारा एक महापंडित आपल्यामध्ये असावा याचे मला भूषण वाटत आहे; त्यांचा हा ग्रंथ वाचल्यानंतर मला असा मोह झाला की या पंडिताची चरणधूली आपण मस्तकाला लावावी. एम्. एन्. रॉय यांचा हा उत्स्फूर्त उमाळा केवळ प्रेमातून प्रगट झाला असे नव्हे, त्यांना आपल्या सिद्धांताला एका भारतीय पंडिताने साथ दिल्याबद्दलच खरा आनंद झाला होता. रॉय हे पूर्णांशाने भौतिकवादी होते आणि त्यांची अशी मनोमन श्रद्धा होती की भारताचा उद्धार व्हावयाचा असेल, भारतीय लोकांचे जीवन समृद्ध व्हावयाचे असेल तर भारतीय लोकांनी आध्यात्मिक अवडंबरापासून दूर झाले पाहिजे, दैववाद आणि परलोकातील मुक्ती यांबद्दलचा मोह झुगारून दिला पाहिजे आणि फळाची आशा धरणाऱ्या, प्रत्यक्ष जीवनात सुख-समृद्धी आणू पाहणाऱ्या कर्मयोगाचीच कास धरली पाहिजे.

४२०२२ चारेव
१३९६ २०/५५

# वैचारिक बंडखोरीचे प्रवर्तक

राजकीय, सामाजिक आणि धार्मिक प्रश्नांच्या बाबतीत एम्. एन्. रॉय यांचा दृष्टिकोण पूर्णत: भिन्न असल्यामुळे साऱ्या राजकीय जीवनात त्यांना प्रवाहाविरुद्धच झगडावे लागले. हा प्रवाह किती प्रबळ, प्रमत्त होता याची कल्पनाच करावी लागेल. त्यांच्याखेरीज दुसऱ्या व्यक्तीने प्रवाहपतित होण्यातच धन्यता मानून इतर नेत्यांप्रमाणे आपल्या तत्त्वांशी तडजोड केली असती, परिस्थितीशी जुळवून घेतले असते. पण रॉय यांचा पिंडच असा तडजोड करणारा नव्हता. राजकीय जीवनात नुकताच कोठे प्रवेश केला असताना त्यांनी ' इंडिया इन ट्रँन्झिशन ' हे पुस्तक लिहिले. त्या पुस्तकात भारतातील राजकीय, सामाजिक, आर्थिक समस्यांचा त्यांनी ऊहापोह केला आहे आणि निरनिराळ्या प्रवृत्तींच्या राजकीय मतप्रवाहांचे विश्लेषण केले आहे. एम्. एन्. रॉय यांचा व्यासंग किती दांडगा होता व त्यांची चिकित्सापद्धती किती मूलग्राही व मर्मग्राही होती याची कल्पना त्यांच्या या पहिल्यावहिल्या पुस्तकावरूनही करता येईल. वस्तुस्थिती अशी होती की, रशियन क्रांतीनंतर ते जेव्हा मॉस्कोत जाऊन पोहोचले तेव्हा लेनिन, बुखारिन, बोरोटिन वगैरे कम्युनिस्ट नेत्यांच्या सहवासात त्यांना वाचनाची जशी आवड लागली त्याचप्रमाणे वाचनाची संधीही त्यांना मिळाली. या काळांत रॉय हे मॉस्कोतील ग्रंथालयात अहोरात्र वाचन करीत बसलेले असत. कम्युनिस्ट इंटरनॅशनलच्या पूर्वेकडील विभागाचे नेतृत्वही त्यांच्या हाती सोपविण्यात आले होते. साहजिकच ग्रंथ वा वृत्तपत्रे वा संदर्भग्रंथ जमविण्याच्या बाबतीत त्यांना पैशांचीही कधी वाण पडत नसे. रॉय यांच्यापाशी चिटणीस वा संदर्भ काढण्यासाठी नेमण्यात आलेले विद्यार्थी टंकलेखक यांचा एक ताफाच तयार असे. या विद्यार्थ्यांच्या साहाय्याने रॉय हे भारतातील सर्व महत्त्वाच्या वृत्तपत्रांची कात्रणे ठेवीत असत आणि आपल्या लेखनासाठी आवश्यक असलेले व साहाय्यभूत होणारे ग्रंथही ते जमवीत असत. म्हणूनच मॉस्कोसारख्या दूरवरच्या ठिकाणी वास्तव्य असतानाही रॉय यांना भारतातील वा आशिया खंडातील परिस्थितीची खडान खडा माहिती असे व त्या परिस्थितीची चिकित्सा व मूल्यमापन ते काटेकारपणे आणि आत्मविश्वासाने करीत असत.

हा आत्मविश्वास त्यांच्या विचारात व लेखनात प्रगट होत असे याचे कारण

एकच आहे आणि ते हे की रॉय यांना कोठलाही विचार प्रगट करताना जनमताची पर्वा करावीशी कधीही वाटली नाही. आपल्याला जे पटले, तर्काच्या कसोटीवर घासून जे त्यांना विचारप्रवर्तक वाटले ते त्यांनी निर्भीडपणाने मांडले. ते भले लोकमताच्या प्रवाहाविरुद्ध असे ना का ! रॉय यांना या प्रवाहापासून बाजूला होणे, या प्रवाहाविरुद्ध हात मारणे हेच मुळी पुरुषार्थाचे लक्षण वाटले. उदाहरणार्थ, १८५७ सालचे बंड हे त्यांना कधीही स्वातंत्र्यसमर वाटलेच नाही. हे कसले स्वातंत्र्य-समर, ते म्हणत. स्वातंत्र्याची आकांक्षा तरी त्या बंडामागे कोठे होती ? आकांक्षा होती ती आपली मोडकळीस आलेली साम्राज्ये आणि राज्ये किंवा त्यांचे अवशेष शाबूत ठेवण्याची. सरंजामशाहीचे हे अवशेष. त्यांचा भारतीय जीवनाशी संबंध-सुद्धा नव्हता. भारतीयत्वाच्या भावनेने सुद्धा या संघर्षाची उभारणी केलेली नव्हती. कोणाला पेशवाईचे पुनरुज्जीवन करावेसे वाटले, कोणाला दत्तकपुत्र घेण्याचा अधिकार नाकारल्याचे वैषम्य वाटले. मोगल बादशहा तर अशा हेतूने लढला की, यमुना नदीच्या पलीकडील तीरावर सुद्धा जो आपला अधिकार राहिला नव्हता तो या बंडाच्या रूपाने प्रस्थापित करता आला तर पहावा. या बंडात व्यक्तिगत शौर्य गाजविले गेले, त्यागही पुष्कळच झाला, बलिदानही मोठ्या प्रमाणात केले गेले. पण त्यामागील उद्दिष्ट कोणते ? टोपीवाल्यांना उध्वस्त करणे हे खास. पण कोणाकरिता ? तर मूठभर संस्थानिकांना परत अधिकारारूढ करण्या-करिता. त्यामागे राष्ट्रीय भावना आणुमात्रही नव्हती. आणि सामाजिक उद्दिष्ट ? त्याचा तर येथे मागमूसही नव्हता असे त्यांना वाटे.

एम्. एन्. रॉय यांना सामाजिक उद्दिष्ट हे नेहमीच महत्त्वाचे वाटत आले होते. त्या निकषावर घासूनच ते व्यक्तिगत नेते व त्यांनी सुरू केलेले पंथ यांचे मूल्यमापन करीत असत. त्यांना वाटत असे की राष्ट्रवादालाही सामाजिक उद्दिष्ट हवे. या राष्ट्रवादाला सामना द्यावयाचा होता तो प्रगत अशा एका संस्कृतीशी. त्या संस्कृतीने इंग्रजी भाषा या देशात आणली, यंत्रयुगाची मुहूर्तमेढ उभारली, व्यापाराची नवी क्षितिजे उजळून काढली, स्वातंत्र्य, समता व बंधुत्व यांवर उभारलेल्या लोकशाहीवादी मूल्यांची प्रतिष्ठापना केली. त्या संस्कृतीला वरदान म्हणू नका. पण त्या संस्कृतीचे आव्हान प्रतिगामी विचारसरणीने गतानुगतिकत्वाच्या आचारविचारांचा आश्रय घेऊन किंवा केवळ ब्रिटिशांच्या द्वेषाचे गरळ ओकून कसे स्वीकारता येईल ? असा रॉय प्रश्न करीत असत. ब्रिटिशांचा द्वेष म्हणजे गोऱ्या लोकांचा द्वेष, पाश्चिमात्य ज्ञानविज्ञानाचा द्वेष हे ओघाने आलेच. त्याच-बरोबर आपल्यातील उणीवा, आपल्या समाजपद्धतीतील दोष, आपल्या आचार-विचारातील विसंगती यांचेही स्तोम माजविण्याची प्रवृत्ती बळावत जाणे क्रमप्राप्त होते. रॉय यांना हा साराच दृष्टिकोण आक्षेपार्ह वाटत असे, देशाच्या अंतिम

हिताचा होणार नाही असे वाटत असे. म्हणूनच टिळकांच्या जाज्वल्य राष्ट्रवादापेक्षा रानडे आणि गोखले यांच्या नेमस्त उदारमतवादाची क्षिती त्यांना अधिक वाटत असे.

रॉय हे ब्रिटिश साम्राज्यशाहीचे कट्टर शत्रू. त्या साम्राज्यशाहीविरुद्ध लढण्यासाठी त्यांनी देशत्याग केला, अज्ञातवास स्वीकारला आणि अखेरीस सात वर्षांची कारावासाची शिक्षाही भोगली. पण साम्राज्यशाहीला शह देण्यासाठी धार्मिकतेची तळी उचलून धरण्याची कल्पना त्यांना कशी रुचणार ? दुर्दैवाने राष्ट्रीय आंदोलनात धर्माला फार प्राधान्य मिळाले आणि बहुसंख्य राष्ट्रीय नेते हिंदू असल्यामुळे हिंदू धर्माचे आचार, त्याच्या परंपरा, त्यांचे विधी यांना राजकीय सभासंमेलनातही प्राधान्य मिळत गेले. त्याचा परिणाम असा झाला की धर्मातीत राष्ट्रवादाचा तोंडाने आपण पुरस्कार करीत असताना हिंदू पद्धतीच्या पूजाअर्चांचाच सोहळा आपण करीत गेलो आणि त्यामुळे मुसलमान, खिरस्ती व इतर धर्मांच्या लोकांमध्ये अशी भावना निर्माण होत गेली की भारतीय राष्ट्रवाद हा हिंदू राष्ट्रवाद ठरणार की काय ? राष्ट्रवादी आंदोलनाचे नेते म्हणून टिळक, मदनमोहन मालवीय इतकेच नव्हे तर गांधीजी सुद्धा स्वतःला हिंदू म्हणवून घेण्यातच भूषण मानीत नसत तर हिंदू तत्त्वज्ञान, विचारपद्धती आणि आचार आपल्या जीवनात उतरविण्याचाही ते प्रयत्न करीत असत. जाहीर व्यासपीठावरूनच नव्हे तर राजकीय व्यासपीठावरूनही त्यांचा प्रचार करीत असत. एम्. एन्. रॉय यांना हा प्रचार व हे वर्तन खऱ्याखुऱ्या राष्ट्रवादाशी विसंगत वाटत असे.

त्या सुमारास " वंदे मातरम् " हे राष्ट्रगीत ठरले होते व काँग्रेसच्या व इतर राजकीय व्यासपीठांवरून ते मोठ्या भक्तिभावाने म्हटले जात असे. तसे पाहिले तर त्या गीतात आक्षेपार्ह काही नव्हते. पण बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांच्या कादंबरीमध्ये ज्या संदर्भात ते गीत गायिले गेले आहे तो संदर्भ मात्र मुसलमानांच्या भावना दुखवणारा होता. तो संदर्भ राष्ट्रगीताचा विचार करताना कसा दृष्टीआड करता येईल ? मुसलमानातील कडव्या लोकांनी त्या संदर्भाकडे बोट दाखवीत कालांतराने या गीताला विरोध करण्यास सुरुवात केली. त्या विरोधामागे धर्मवेडेपणाची भावना असेल यांत शंका नाही. पण राष्ट्रवादी आंदोलनामध्ये हिंदूंच्या बरोबर मुसलमानांना सामील करून घेताना मुसलमानांच्या भावना व प्रतिक्रिया यांचा विचार न करून कसे चालेल ? एम्. एन्. रॉय हे हिंदूंतील एकच पुढारी असतील की ज्यांनी विवेकावर भावनेला मात करू दिली नाही. त्यांनी स्पष्टपणे आपले मत जाहीर केले की " वंदे मातरम् " हे हिंदी राष्ट्रवादाला मान्य असलेले राष्ट्रगीत होऊ शकत नाही. त्यांनी या गीतामागील इतिहास ध्यानात घेतला नसेल असे नाही. एक क्रांतिकारक म्हणून त्यांना हे माहीत होते की " वंदे मातरम् "च्या

घोषणा करीत आणि हे गीत तोंडाने म्हणतच अनेक शहीद फासावर चढले होते, अनेकांनी लाठ्या व गोळ्या छातीवर झेलल्या होत्या. पण तरीही त्यांनी हे गीत राष्ट्रगीत बनविण्याला विरोध केला. राष्ट्रवादी आंदोलनाच्या ऊर्मीच्या काळातसुद्धा रॉय यांनी लोकमताची वा लोकप्रक्षोभाची पर्वा केली नाही. त्यांनी आपल्या चिकित्सक भूमिकेशी सुसंगत होईल असाच विचार मांडला. कालांतराने त्यांच्या या दृष्टिकोणाची दखल घेतली गेली आणि हळूहळू "वंदेमातरम्" हे गीत माग पडत गेले. स्वतंत्र भारताने आपले राष्ट्रगीत म्हणून "जनगणमन" या रवींद्रनाथ ठाकूर यांच्या श्रुतिमधुर व अर्थवाही गीताचा स्वीकार केला.

रॉय यांनी अनेक वेळा लोकमताच्या विरुद्ध मतप्रतिपादन करण्याचे धाडस दाखविले होते. त्यांच्या जीवनात अनेक प्रसंग असे आले की, ज्या वेळी स्वहित आणि अंतिम राष्ट्रहित हे दोन पेच पडले असताना त्यांनी कधीही स्वहिताचा विचार केला नाही. अशा प्रत्येक प्रसंगी संधिसाधूपणाकडे त्यांनी न चुकता पाठ फिरविली. त्यामुळे त्यांच्या वाटचाला फुलांपेक्षा दगडच अधिक आले. इतके की रॉयवादी गटामध्ये अनेकवेळा विनोदाने बोलले जात असे की लोकप्रियता आली की हमखास समजावे आपले काहीतरी चुकते आहे. एम्. एन्. रॉय हे लोकप्रिय नेते असे फारकाळ टिकलेच नाहीत. कारण माननीय नेत्यांपुढे मान वाकविणे त्यांना कधी जमले नाही, आणि राजकीय, सामाजिक आणि धार्मिक प्रश्नांच्या बाबतीत घालून दिलेल्या चाकोरीतून जाण्याइतकी प्रवाहपतित वृत्ती त्यांना कधीच मानवली नाही. एम्. एन्. रॉय यांची बंडखोरी ही खरीखुरी विचारप्रवर्तक बंडखोरी होती. त्यातून जी विचारसंपदा उधळली गेली तिचे मूल्यमापन आजच नव्याने होऊ लागले आहे, भावी काळ तर अधिकच निष्ठेने ते करील.

# रॉय आणि
# सुभाष–गांधी संघर्ष

लोकप्रियतेच्या शिखरावर उभे असतानाच एखादी तर्कशुद्ध भूमिका घेतल्याबद्दल एम्. एन्. रॉय यांना आकस्मिकपणे जो लोकक्षोभ सहन करावा लागत असे त्याची अनेक उदाहरणे देता येतील. पण त्यापैकी नमुनेदार उदाहरण म्हणजे त्रिपुरी काँग्रेसमध्ये नेताजी सुभाषचंद्र बोस व इतर काँग्रेसच नेते यांच्यामध्ये निर्माण झालेल्या संघर्षाच्या वेळी रॉय व सुभाषबाबू यांनी घेतलेल्या भूमिकांबद्दलच्या वादाचे होय. काँग्रेसच्या इतिहासातील हे एक लक्षात ठेवण्यासारखे प्रकरण आहे. त्रिपुरी कांग्रेसचे अध्यक्ष म्हणून सुभाषबाबू गांधीजींच्या विरोधाला न जुमानता प्रचंड बहुमताने निवडून आले. गांधीजी व त्यांचा गट यांना ही निवड मान्य झाली नाही व त्यांनी असा निर्णय घेतला की सुभाषबाबूंच्या कार्यकारिणीत गांधीवादी गटाने सामील होऊ नये. काँग्रेसच्या प्रतिनिधींनी बहुमताने निवडून दिलेल्या अध्यक्षाला हे आव्हानच देण्यात आले होते. या आव्हानाचा स्वीकार करावा असे रॉय यांचे मत होते. त्यांनी सुभाषबाबूंना असा सल्ला दिला की काँग्रेस कार्यकारिणीचे जे सभासद गांधीजीच्या आदेशाप्रमाणे राजीनामे देतील त्यांच्या राजीनाम्यांचा स्वीकार केला जावा व सुभाषबाबूंनी आपली स्वतःची कार्यकारिणी तयार करावी. गांधीजींनी जे असहकाराचे आव्हान दिले होते त्याला हेच उत्तर साजेसे होते असे रॉय यांना वाटले. प्रतिस्पर्धी नेतृत्वाचा जो पुकारा ते करीत असत त्याच्याशी सुसंगत अशीच ही त्यांची भूमिका होती. या प्रकरणात लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट ही आहे की सुभाषबाबूंच्या निवडीला रॉय यांनी सक्रिय व बिनशर्त पाठिंबा दिला होता. साहजिकच सुभाषबाबूंना असा सल्ला देण्याचा रॉय यांना अधिकारही होता.

हा सल्ला सुभाषबाबूंनी अर्धवट ऐकला. त्यांनी गांधीजींच्या आव्हानाला उत्तर देण्यासाठी डाव्या गटाची एकीकरण समिती निर्माण केली. रॉय यांचाही त्या समितीत समावेश करण्यात आला होता. रॉय यांनीही त्या समितीत सहभागी होण्याला मान्यता दिली होती. पण रॉय यांची मान्यता दोन गोष्टींवर अवलंबून होती. पहिली गोष्ट ही की प्रतिस्पर्धी नेतृत्वाचे प्रतीक म्हणून ही समिती अस्तित्वात येईल आणि दुसरी गोष्ट ही की ही समिती काँग्रेसपुरतीच मर्यादित राहील, काँग्रेसच्या कक्षेत राहून कार्य करील. "लेफ्ट कन्सॉलिडेशन कमिटी" या नावाने सुभाषबाबूंनी निर्माण केलेल्या या समितीचे स्वरूप थोड्याच दिवसांत बदलत

चालल्याचे रॉय यांना आढळून आले. पहिली गोष्ट अशी की सुभाषबाबूंनी गांधीजींच्या आव्हानाला उत्तर देण्याच्या मनसुबाच थोड्या दिवसांत बदलला त्यांनी आपली कार्यकारिणी तर नेमली नाहीच, पण उलट काँग्रेसच्या अध्यक्ष-पदाचाच राजीनामा सादर केला. त्यानंतर त्यांनी जो विचार मांडला तो असा की डाव्या गटाच्या एकीकरण समितीने काँग्रेसमधील व काँग्रेसबाहेरील डाव्या गटांची शक्ती एकत्रित करावी व काँग्रेसलाच आतून व बाहेरून आव्हान द्यावे. म्हणजे रॉय यांच्या मताप्रमाणे प्रतिस्पर्धी नेतृत्वाचा शह गांधीवादी नेत्यांना न देता काँग्रेस संघटनेलाच देण्याची भूमिका सुभाषबाबू घेऊ पहात होते. रॉय यांना ही भूमिका कशी मान्य होऊ शकणार ? त्यांनी तत्काळ सुभाषबाबूंना व डाव्या गटांच्या एकी-करण समितीला कळविले की काँग्रेसविरुद्ध बंडाचा झेंडा उभारणाऱ्या या समितीशी आपण सहकार्य करू शकत नाही. रॉय यांची ही भूमिका तर्कशुद्ध होती ती या दृष्टीने की त्यांचा संघर्ष काँग्रेसच्या गांधीवादी पुढाऱ्यांशी होता; काँग्रेस ज्या राष्ट्रीय चळवळीचे नेतृत्व करीत होती त्या संघटनेशी नव्हता. रॉय यांना सुभाष-बाबूंच्या या डाव्या गटाच्या एकीकरण समितीशी तडकाफडकी संबंध तोडावे लागले याचे आणखी एक कारण असे की त्या समितीतर्फे सुभाषबाबूंना पाठिंबा देण्यासाठी जो एक दिवस मुक्रर करण्यात आला होता, त्या दिवसाच्या कार्यक्रमात भाग घेणे हा काँग्रेसच्या दृष्टीने शिस्तभंग होईल असे एक फर्मान काँग्रेसचे नवीन अध्यक्ष बाबू राजेंद्रप्रसाद यांनी काढले होते. हे फर्मान निघाल्यानंतर तर शिस्तभंग करून काँग्रेसच्या बाहेर पडण्याची रॉय यांची अणुमात्रही तयार नव्हती. म्हणून त्यांनी आपल्या अनुयायांना या दिवसाच्या कार्यक्रमात भाग न घेण्याचा सल्ला दिला.

त्याचा परिणाम असा झाला की गांधी-नेहरू-सरदार पटेल यांच्याविरुद्ध दंड थोपटून उभे राहिलेल्या सुभाषबाबूंबद्दल लोकसमुदायात जो उत्स्फूर्त उत्साह निर्माण झाला होता, त्या उत्साहावर विरजण घालणारे रॉय यांचे धोरण आहे असा लोकांमध्ये समज निर्माण झाला. रॉय यांच्या तर्कशुद्ध भूमिकेकडे या ईर्षेत लक्ष कोण देणार ? त्यांची भूमिका अशी होती की सुभाषबाबूंनी काँग्रेसवर संपूर्ण अधिकार गाजविण्याची ही संधी सोडू नये आणि गांधीवादी गटाला विघटनात्मक पवित्रा घ्यावयाला भाग पाडावे. पण सुभाषबाबूंनी राजीनामा देऊन गांधीवादी गटाचा मार्ग उलट मोकळा करून दिला आणि काँग्रेसच्या विरोधकांशी हातमिळवणी करून शिस्तभंगाचा इलाज आपल्यावर ओढवून घेतला. वस्तुतः ज्या बहुसंख्य प्रतिनिधींनी सुभाषबाबूंना मते दिली होती त्यांनाच सुभाषबाबू या मार्गाने तोंडघशी पाडीत होते. पण त्यांच्यामोवती जमलेल्या डाव्या गटांनी त्यांच्या भूमिकेबद्दल असा काही आवेश निर्माण केला की जणु काही ते गांधीवादी गटाविरुद्ध क्रांतिकारक उपाय-

योजना करीत आहेत. असे जनमताला वाटावे. त्या वेळच्या राजकीय परिस्थितीत सुभाषबाबूंच्या प्राणप्रतिष्ठेसाठी जे आंदोलन सुरू करण्यात आले होते ते जनतेला क्रांतिकारक वाटावे यात आश्चर्य नव्हे. त्या आंदोलनाशी रॉय यांनी संबंध सोडताच ते त्या वेळच्या रूढ परिभाषेनुसार साहजिकच प्रतिक्रांतिकारक ठरले आणि भरतीच्या मार्गावरील त्यांच्या लोकप्रियतेला एकदम ओहोटी लागली.

एम्. एन्. रॉय हे लोकप्रियतेच्या या भरती-ओहोटीबद्दल नेहमीच बेफिकीर असत. राजेंद्रबाबूंचे शिस्तभंगाचे इलाज करण्याबद्दलचे फर्मान वृत्तपत्रातून प्रसिद्ध झाले तेव्हा रॉय हे पुण्यात होते. त्याच्या आदल्या दिवशीच लीग ऑफ रॅडिकल काँग्रेसमेन या त्यांनी संघटित केलेल्या संघटनेची वार्षिक बैठक प्रचंड उत्साहाने पुण्याला भरली होती. त्या बैठकीचे जाहीर अधिवेशन पुण्याच्या शिवाजी मंदिरात भरले होते. त्या वेळी इतकी तुफान गर्दी झाली की शिवाजी मंदिराचे बंद करण्यात आलेले लोखंडी दरवाजे मोडून पडतील की काय अशी भीती वाटू लागली होती. या बैठकीत सुभाषबाबूंच्या बरोबर रॉय यांचाही गगनभेदी आवाजात जयजयकार करण्यात आला होता. पण दुसऱ्याच दिवशी डाव्या गटांच्या एकीकरण समितीच्या कार्यक्रमात भाग न घेण्याचा रॉय यांनी आदेश दिला आणि एका क्षणात सारे वातावरण बदलले. त्या क्षणी फुलांच्या ऐवजी दगड झेलण्याची वेळ आली. रॉयवादी गटातसुद्धा त्यांच्या या आदेशाविरुद्ध हाकाटी करण्यात आली. तो आदेश काही ठिकाणी झुगारूनही देण्यात आला. राजकारणातील यशापयश किती चंचल असते याचा प्रत्यय त्या दिवशी खऱ्या अर्थाने आला असेही म्हणावयास हरकत नाही. रॉय या बदलत्या वातावरणामुळे स्तिमित झाले पण विचलित मात्र झाले नाहीत. त्या दिवशी सायंकाळी भारत सेवक समाजाच्या आवारातील शांत वसतिगृहात आपल्या संत्रस्त व अशांत अनुयायांपुढे आपल्या विचारसरणीचे व धोरणाचे मार्गदर्शन करताना रॉय म्हणाले, " आपले धोरण लोकप्रिय आहे की अचूक आहे, तत्त्वशून्य आहे की तर्कशुद्ध आहे याचा निवाडा लावणे हे राजकीय विचारवंतांच्या दृष्टीने आवश्यक असते. आज आपल्याला निर्णय घ्यावयाचा आहे तो हा की आपण शिस्तभंग करून काँग्रेस सोडणार आहो काय ? आणि ती सोडणार असलो तर कोणत्या कारणासाठी ? काही तात्त्विक मतभेद झाले म्हणून ती आपण सोडणार असलो तर तसे करावयाला माझी हरकत नाही. पण केवळ एखादी भूमिका जनमनाला पटली म्हणून काँग्रेसचा आपण त्याग करावयाचे ठरविले तर इतिहास एवढाच निर्वाळा देईल की यांना तत्त्वापेक्षा लोकप्रियता अधिक प्रिय आहे. " रॉय हे भावनाविवश क्वचितच होत असत. पण या वेळी भावनावेगाने ते म्हणाले, " काँग्रेसपेक्षा फार मोठ्या संघटनेचा–कम्युनिस्ट इंटर नॅशनलचा मी त्याग केला आहे. पण तो

तत्त्वासाठी. ज्या वेळी माझ्या तत्त्वप्रणालीशी आणि माझ्या सदसद्विवेकबुद्धीशी काँग्रेसमधील अस्तित्वाचा विरोध उत्पन्न होईल त्या वेळी एका क्षणाचाही विलंब न करता आणि भवितव्याची अणुमात्रही क्षिती न बाळगता मी काँग्रेसमधून बाहेर पडेन."

१९३९ सालच्या मार्चमध्ये रॉय यांनी हे उद्‌गार काढले. त्या सालच्या ऑगस्टमध्ये दुसरे जागतिक महायुद्ध सुरू झाले. ते युद्ध फॅसिझम विरुद्ध लोकशाहीचे होते. एम्. एन्. रॉय यांनी त्या युद्धाची जी चिकित्सा केली ती काँग्रेस संघटनेच्या चिकित्सेशी पूर्णपणे विरोधी अशी होती. त्या विरोधाच्या वातावरणात आपली तत्त्वप्रणाली, आपली लोकशाहीवादी निष्ठा, आपण हृदयाशी बाळगलेली जीवन-मूल्ये यांच्याशी प्रतारणा न करता काँग्रेसमध्ये राहणे रॉय यांना शक्य झाले नाही. त्यांनी व्यथित अंतःकरणाने पण निर्धाराने काँग्रेसचा त्याग केला. रॉय यांची मार्च महिन्यातील भविष्यवाणी अशा रीतीने काही महिन्यांच्या आतच खरी ठरली.

# रॉय आणि आझाद हिंद फौज

सुभाषचंद्र बोस व एम्. एन्. रॉय हे दोघेही डाव्या गटाचे नेते मानले जात असले, तरी त्यांच्या तत्त्वज्ञानात, ध्येयदृष्टीत व विचारप्रणालीत इतका भेद होता की राजकीय जीवनात ते दोघे एकत्र रहाणे शक्यच नव्हते. सुभाषबाबू हे साम्राज्यविरोधी आणि ब्रिटिश साम्राज्यशाहीचे तर कट्टर शत्रू. पण त्या शत्रुत्वाचे कारण ब्रिटनने भारतावर लादलेली गुलामगिरी एवढेच नव्हते. त्यापेक्षाही अधिक तीव्रतर असा द्वेष सुभाषबाबूंना ब्रिटनबद्दल वाटत असे तो तो देश भौतिकतेचे माहेरघर बनला आहे असे त्यांना प्रामाणिकपणे वाटत असे म्हणून. सुभाषबाबू हे राजकीय पुढारी असले तरी त्यांची मन:प्रवृत्ती खरीखुरी आध्यात्मिक, गूढवादीच असे. या गूढवादात आत्मचिंतनाला पहिले स्थान असे आणि ते आत्मचिंतन ज्या उद्दिष्टासाठी करावयाचे असे, ते आत्म्याची उन्नती आणि अखेरीस त्याची मुक्ती साधणे यापेक्षा दुसरे काही नसे. भारत परतंत्र नसता तर सुभाषबाबूंनी इतर अध्यात्मवाद्यांप्रमाणे तत्त्वचिंतनात मग्न होण्याचा वैराग्यमार्गच स्वीकारला असता. पण सुभाषबाबूंच्या अंतर्यामींची व्यथा काहीही असली तरी ते राजकारणाकडे आकृष्ट झाले आणि अखेरपर्यंत त्याग, पराक्रम आणि अंतिम बलिदान ह्यांचीच त्यांनी कास धरली. सुभाषबाबूंचा त्याग इतका उज्ज्वल की सर्वोच्च नोकरीवर लाथ मारणे हा त्यातील अगदीच किरकोळ असा भाग मानावा लागेल. त्यांनी त्यागाची परमोच्च सीमा गाठली ती ब्रिटिश सत्तेविरुद्ध उघड उघड बंड पुकारून आझाद हिंद फौजेची उभारणी केली तेव्हा. जेथून परत फिरता येत नाही असा तो बिंदू होता. त्या बिंदूवर सुभाषबाबू स्थिर राहिले ते पराभवांच्या दारुण क्षणी सुद्धा. त्यांचा पराभव झाला, पण त्यांच्या मनाने कच खाल्ली नाही. मृत्यूचे कराल पाश त्यांच्याभोवती विळखा घालीत असतानाही सुभाषबाबू एकच पुकारा करीत राहिले:

"कदम कदम बढाये जा
खुषीसे गीत गायेजा
यह जिन्दगी है कौमकी
तू कौमको लुभाये जा."

आझाद हिंद फौजेचा हा पुकारा होत असताना त्याविरुद्ध बुलंद आवाज या भारतात उठवला तो एम्. एन्. रॉय यांनी. तो आवाज युद्धकाळातील प्रक्षुब्ध

मन:स्थितीच्या वातावरणात उठविणे हे सोपे काम नव्हते. संबंध प्रवाह हा युद्ध-विरोधाने भारलेला होता आणि नेताजी सुभाषचंद्र बोस हे स्वातंत्र्याचे उद्गाते व स्वातंत्र्योत्सुक जनतेच्या भावनांचे प्रतीक झाले होते. गांधीजी पुकारा करीत होते तो ' छोडो भारत ' चा. पण हा पुकारा होता. त्याच्या पाठोपाठ क्रांतीचे बाण हाती घेऊन शत्रूवर तुटून पडणारी फौज गांधीजींनी संघटित केलेली नव्हती. ती सुभाषबाबूंनी आझाद हिंद फौजेच्या नावाने उभी केली. गांधीजींची घोषणा ही जनमन उठविणारी होती. पण ती अकरणात्मक होती, फक्त आत्मक्लेपाचा मार्ग दाखविणारी होती. सुभाषबाबूंनी प्रत्यक्ष चूड पेटविण्याचा आदेश दिला होता. ब्रिटिश साम्राज्यशाहीला हादरा देण्यासाठी प्रत्यक्ष बंडाचा आणि तोही सैनिकांच्या बंडाचा मार्ग अनुसरण्यास त्यांनी राष्ट्राला हाक दिली होती. सुभाषबाबू सुरू करीत होते ती फक्त प्रतिकाराची चळवळ नव्हती. तो सत्ता हस्तगत करू पाहणारा निकाराचा लढा होता.

हा निकाराचा लढा केवळ ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुद्ध असता तर रॉय यांनी त्याला विरोध केला नसता. पण गेल्या महायुद्धाच्या वेळी ब्रिटिश साम्राज्य-शाही हिटलरच्या नात्सीवादाविरुद्ध, मुसोलिनीच्या फासिझमविरुद्ध रणशिंग फुंकून लोकशाहीच्या संरक्षणासाठी उभी ठाकली होती. फॅसिझम ही केवढी बलिष्ट पण घातकी शक्ती होती आणि ती विजयी झाली तर साऱ्या जगाचे स्वातंत्र्य कसे नष्ट होणार होते याची भारतातील नेत्यांना व लोकांना कल्पना नव्हती. एम्. एन्. रॉय यांना त्याची पुरेपूर कल्पना होती. म्हणून पहिल्या महायुद्धाप्रमाणे आपल्या शत्रूचा शत्रू तो आपला मित्र असे त्यांनी मानले नाही. उलट लोक-शाहीवाद्याच्या सात्त्विक भावनेने, आपल्या सदसद्विवेकबुद्धीला साथ देत ते या युद्धात फॅसिझमविरूद्ध खवळून उठले आणि त्याचा पराभव करण्याकरिता आपल्या जन्मजात कट्टर शत्रूशीने—ब्रिटिश सरकारशीही—हातमिळवणी करावयाला त्यांनी अनमान केले नाही. त्या बाबतीत त्यांचे भारतातील बहुतेक सर्व राष्ट्रवादी नेत्यांशी मतभेद झाले. पण सुभाषबाबूंची करणी तर त्यांना लोकशाहीच्या शत्रूची, अंतिम परिणामांच्या दृष्टीने भारताच्या विमोचनाची नव्हे तर भारताला अधिकच जुलुमी व भयानक अशा पारतंत्र्याकडे खेचून नेणारी वाटली.

या दुसऱ्या महायुद्धाचा अंत होऊन वीसपेक्षा अधिक वर्षे लोटली आहेत. हिटलरचे भूत इतिहासाच्या गर्तेत खोलवर गाडले गेलेले आहे. इतिहासाने हिटलरचा, मुसोलिनीचा, जपानी हुकुमशाहीचा पुरेपूर सूड घेतला. त्या सूडातून हिटलरने शिरोधार्य मानलेले वंशश्रेष्ठत्वाचे तत्त्व जळून खाक झाले आहे. ज्यांनी त्या काळी हिटलरची प्रत्यक्षअप्रत्यक्षपणे साथ केली त्यांच्या बाबतीत आज नि:पक्षपाती इतिहासकाराला हाच निर्वाळा द्यावा लागेल की त्यांनी कोणत्याही सद्भावनेने

ही साथ दिलेली असो, पण त्यांनी साथ दिली ती जर्मन व जपानी लोकांच्या वंशश्रेष्ठतेला, या श्रेष्ठवंशीय लोकांचे अधिराज्य या पृथ्वीतलावर स्थापन होण्याला. हा निर्वाळा देताना अनेक लोकांना मनस्ताप, मनस्वी दु:ख होईल यात संशय नाही. सुभाषबाबूंनी देशासाठी भोगलेल्या यातना, केलेला त्याग आणि अंतिम प्राणार्पण यांचा विचार करता तर त्यांच्याविरुद्ध हा निर्वाळा देताना कोणाचेही मन विकल झाल्याशिवाय राहणार नाही. पण तरीसुद्धा आपल्याला हे कबूल करावेच लागेल की फॅसिझमशी सहकार्य करणे हे अविचारीपणाचेच कृत्य होते. आणि त्या अविचारातून उगम पावलेली आझाद हिंद फौज ही भारताच्या विमोचनासाठी लढणारी फौज कदापिही मानता येणार नाही.

एम्. एन्. रॉय यांनी जो सवाल उभा केला होता तो असा की हिटलर, मुसोलिनी व टोजो यांचा विजय होणे हे परतंत्र भारताच्या दृष्टीने विमोचनकारी कसे होऊ शकेल? हिटलरने युरोपखंडातील जे देश जिंकले त्यांच्यावर पाशवी, अमानुष सत्ता तेवढी त्याने प्रस्थापित केली. या आक्रमणाच्या काळात फ्रान्सप्रमाणेच ब्रिटन व रशिया यांचाही हिटलरने पराभव केला असता तर भारत काय स्वतंत्र झाला असता? भारत स्वतंत्र झाला तो हिटलरच्या पाडावानंतरच. लोकशाहीचा तो सर्वात मोठा विजय मानावा लागेल. आज स्वातंत्र्यप्राप्तीनंतर 'छोडो भारत' चळवळ या स्वातंत्र्यप्राप्तीचे श्रेय घेऊ पहात आहेत. कित्येक लोकांची अशी प्रामाणिक समजूत आहे की स्वातंत्र्यप्राप्तीचे श्रेय नेताजी व आझाद हिंद फौजेचे आहे. श्रेयाचा वाटा कोणीही उचलला तरी त्याबद्दल वैषम्य वाटू देण्याचे कारण काय? पण एम्. एन्. रॉय यांची स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी सुद्धा ही श्रद्धा होती की फॅसिझमचा पराभव झाल्यानंतर ब्रिटनला सत्तांतर करण्याशिवाय दुसरे गत्यंतरच राहणार नाही. पण हे सत्तांतर; सत्ता काबीज करणे नव्हे. भारतात सत्तांतर झाले ते ब्रिटिशांच्या संमतीने. त्यांच्यावर कुरघोडी करून आपणापैकी कोणीही सत्ता काबीज केलेली नाही. आत्मसंतुष्टतेच्या भरात आपण स्वत:ची दिशाभूल करून घेण्यात अर्थ नाही हेच रॉय यांनी स्वातंत्र्यप्राप्तीनंतर निर्भीडपणे सांगितले. तसे सांगणे लोकप्रिय नव्हते हे खरे आहे. पण कोणीतरी ते सांगणे अत्यंत आवश्यक होते. रॉय यांच्या दृष्टीने हे सत्यकथन आवश्यक होते. ते यासाठी की त्यामुळे आपल्या कर्तृत्वाबद्दलच्या अवास्तव कल्पना रूढ होणार नाहीत. भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले ते परिस्थितीने हा मूलभूत सिद्धांत आपण लक्षात ठेवला पाहिजे. या परिस्थितीला कलाटणी गांधीजींनी, पंडितजींनी, सुभाषबाबूंनी, अनेक राष्ट्रवाद्यांनी दिली यांत संशय नाही. ब्रिटिशसत्तेविरुद्ध त्यांनी असंतोष निर्माण केला, ब्रिटिश राजवटीचे आसन अस्थिर केले हेही खरे आहे. पण हा असंतोष, ही अस्थिरता इतकी प्रबळ होती काय की जिच्यामुळे ब्रिटिश राज्यसत्ता कोलमडून

पडावयाची वेळ आली होती ? रॉय यांना तसे वाटले नाही. त्यांनी उलट असे प्रतिपादन केले की स्वातंत्र्याचे श्रेय जर कोणाला द्यावयाचे असेल तर ते ब्रिटिश लोकसत्तेच्या सुसंस्कृततेला आणि तिच्या दूरदृष्टीला होय. त्या दूरदृष्टीमुळे भारत जसा स्वतंत्र झाला तसेच ब्रह्मदेश आणि सिलोन हेही स्वतंत्र झाले आणि पुढील दहावीस वर्षांत आशिया-आफ्रिकेतील अनेक देशांना स्वातंत्र्य प्राप्त झाले. हे स्वातंत्र्य रक्तहीन क्रांतीतून प्राप्त झाले. पण त्याचा अर्थ असा नव्हे की आम्ही ही क्रांती घडवून आणली किंवा आम्ही रक्तपिपासू नव्हतो. या दोन्ही गोष्टी फारफार तर अर्धसत्य ठरतील. कारण राष्ट्रीय क्रांतीची आकांक्षा आम्ही धरली होती आणि आमच्या नेत्यांनी तरी अहिंसेच्या व्रताचेच अखेरपर्यंत पालन केले. पण प्रत्यक्ष वस्तुस्थिती मात्र अशी परिणत झाली की आमच्या क्रांतीला ब्रिटिश राजकर्त्यांनी चालना दिली आणि अखेरीस सत्तांतराला मान्यता देऊन ती राष्ट्रीय क्रांती यशस्वी केली. त्याच वेळी हेही मान्य करणे भाग आहे की आमच्या नेत्यांनी अहिंसेचा पुरस्कार केला असला तरी हिंदी जनता--हिंदु व मुसलमान —अहिंसक राहिली नाही. तिने आपला रक्तपिपासूपणा फाळणीच्या काळात अत्यंत विकृत स्वरूपात प्रगट केला.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर घडलेल्या या घडामोडींकडे आजही आपण दुर्लक्ष करून चालणार नाही. उलट आपण ब्रिटिश राजकर्त्यांच्या वर्तनाची आपल्या कर्तृत्वाशी तुलना करणेच अधिक श्रेयस्कर आहे. कारण त्यापासून आपल्याला काही महत्त्वाचे धडे घेता येतील, आणि जो आत्मसंतुष्टपणा आपल्या रोमरोमी खिळल्यासारखा झाला आहे आणि ज्यातून आपल्या अनंत अडचणींचा उगम झाला आहे तो दूर सारून आपल्याला वास्तववादी दृष्टिकोणातून पावले टाकण्याची स्फूर्ती मिळेल. एम्. एन्. रॉय यांनी कोणत्याही अभिनिवेशाने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर नव्या राज्यकर्त्यांवर टीका केली नाही. पण त्यांनी हे मात्र दाखवून दिले की राज्यसत्ता काबीज करून अधिकारारूढ होणे आणि सत्तांतरातून राज्यावर आरूढ होणे यात जमीनअस्मानाचे अंतर आहे. कारण पहिल्या अवस्थेत जुनी राज्ययंत्रणा मोडूनच नव्या घडीची स्थापना होत असल्यामुळे खुलेपणाने आपले सिद्धांत व कल्पना राज्यकर्त्यांना अमलात आणता येणे शक्य होते. आणि दुसऱ्या अवस्थेत जुन्या राज्ययंत्रणेच्या आधीन होण्याचा धोका राज्यकर्त्यांना स्वीकारावा लागतो. आणि तेथे कल्पकता व दूरदृष्टीचा अभाव असेल तर सारे राज्ययंत्र घालून दिलेल्या चाकोरीच्या कर्दमात रुतून बसण्याचीही भीती असते. एम्. एन्. रॉय यांनी म्हणूनच असा सल्ला दिला होता की स्वतंत्र भारताच्या राज्यकर्त्यांनी जुन्या पुण्याईवर जगण्याचा प्रयत्न न करता, विनासायास हाती आलेल्या सत्तेचा जागरूकपणे उपयोग करावा आणि दुसऱ्या महायुद्धाने ज्या शक्ती उदयास आणल्या

आहेत त्यांच्याशी सहकार्य करून आणि ज्या काही उपलब्ध करून दिल्या आहेत त्यांचा उपयोग करून 'भारत हा पुरोगामी व विज्ञाननिष्ठ लोकशाहीचे प्रतीक बनवावे. त्यासाठी पहिली गोष्ट आवश्यक होती ती आपला राष्ट्रीय अहंकार झाडून टाकणे आणि भारताच्या पुरातन संस्कृतीचा दंभ मिरविण्यापासून परावृत्त होणे ही होय. तीच गोष्ट आपण केली नाही. उलट भारताच्या श्रेष्ठत्वाचा डौल माजविण्यात, आपल्या कर्तृत्वाचे पवाडे गाण्यात आणि साऱ्या पराधीन जगाला दिलासा देण्यात व अवनतीच्या मार्गावरील दिवाळखोर साम्राज्यशाहीला आव्हान देण्यातच आपण गर्क राहिलो. स्वकर्तृत्वाची ही अवास्तव जाणीवच आजच्या आपल्या दुरवस्थेला कारणीभूत झाली आहे. कारण या जाणीवेतून जो अहंकार आपल्या अंगी रुजला गेला त्यामुळे आपल्यापुढील प्रश्नांचे आपल्याला योग्य आकलन करता आले नाही आणि दारिद्र्यात खितपत पडलेल्या भारताला आपली समृद्धी कोणत्या मार्गाने व कोणाच्या साहाय्याने त्वरित करून घेता येईल याचे ज्ञानही आपल्याला होऊ शकले नाही.

# रॉय आणि जवाहरलाल नेहरू

भारताची राष्ट्रीय अस्मिता जतन करण्याच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय क्षेत्रात विधायक असे पाऊल टाकले ते जवाहरलाल नेहरू यांनी. पंडितजींना असे वाटत असे की जगाशी सहकार्य करून, निदान जगाशी दळणवळण प्रस्थापित करूनच आधुनिक युगात भारतीय अस्मिता फुलू शकेल. त्या अस्मितेने अहंकाराचे रूप धारण करावे आणि त्यासाठी जे जे काही भारतीय आहे त्याचे देव्हारे माजविले जावे, भारताच्या पुरातन संस्कृतीचा इतका अभिमान धरला जावा की इतर जग भारतापुढे तुच्छ वाटावे, असे पंडिजींना कधीही वाटले नाही. त्यांनी जो दृष्टिकोण ठेवला तो असा की आधुनिक जगाशी समरस होऊन, त्या जगाने विज्ञानाच्या क्षेत्रात पदक्षेप करून जे भौतिक सामर्थ्य संपादन केले आहे त्याचे स्वागत करून भारताने आपला भौतिक व सांस्कृतिक विकास करून घेतला पाहिजे. त्या दृष्टिकोणाचा पंडिजींना लाभ झाला तो ऐन तारुण्यात त्यांनी हॅरो व केंब्रिज येथे पाश्चिमात्य संस्कृतीचा जो प्रत्यक्ष अनुभव घेतला त्यामुळेच होय. तेथेच त्यांना विज्ञानवादी दृष्टी लाभली. तेथेच ध्येयवादी, उदारमतवादी अशा समाज-वाद्यांचा संपर्क त्यांना लाभला. पंडित जवारहलाल नेहरू हे लास्की आणि सिडने वेब यांच्या प्रभावाखाली आले ते याच वेळच्या त्यांच्या ब्रिटनमधील वास्तव्यात.

त्याहीपेक्षा त्यांच्या जीवनावर चिरकाल ठसा उमटविणारी घटना जर कोणती घडली असेल तर १९२७ साली त्यांनी मोतीलाल नेहरू यांच्या बरोबर दिलेली मॉस्कोला भेट. ही भेट घडवून आणण्याचे श्रेय प्रामुख्याने एम्. एन्. रॉय यांच्याकडेच जाते. त्या सुमारास एम्. एन्. रॉय यांनी मॉस्कोमधील सर्वोच्च सत्ताधाऱ्यांत महत्त्वाचे स्थान संपादन केले होते. कम्युनिस्ट इंटरनॅशनलच्या उभारणीत तर त्यांचा वाटा होताच, पण पूर्वेकडील देशांत रशियन क्रांतीबद्दल आस्था व उत्साह निर्माण करण्यात त्यांनी आपल्या लेखनाने व संघटनात्मक कार्यांनें मोठाच हातभार लावला होता. कम्युनिस्ट इंटरनॅशनलने त्यांच्याच प्रेरणेने पूर्वेकडील एक विभाग मुद्दाम स्थापन केला आणि रॉय यांनाच त्या विभागाचे प्रमुख केले. रशियन राज्यक्रांतीच्या अपकर्षाचा काळ लुप्त होऊन उत्कर्षाचा काळ सुरू होण्याचा तो काळ होता. पंडित मोतीलाल नेहरू व जवाहरलाल नेहरू हे सोव्हिएट राज्यकर्त्यांच्या आमंत्रणावरून रशियाला गेले,

त्या वेळी नुकतीच कोठे राज्यक्रांतीची दहा वर्षे पुरी झाली होती. त्या दहा वर्षांच्या काळाचे वर्णन करताना मिखाइल बुखारिन यांनी म्हटले होते: Ten years of uphill struggle against a hostile world : ten years of achievement. ( शत्रुत्व करणाऱ्या साऱ्या जगाविरुद्ध टेकीस आणणाऱ्या संघर्षाची दहा वर्षे; कर्तृत्वाची ग्वाही देणारी दहा वर्षे. ) या शब्दांत रशियन राज्यक्रांतीच्या उत्कर्षापकर्षाची केवढी रोमांचकारी कहाणी केवढ्या थोडक्या शब्दांत पण किती प्रभावीपणाने सांगितली गेली आहे. साहजिकच त्या क्रांति-स्थानाचे पहिलेवहिले दर्शन होताच पंडितजींच्या सारखे संस्कारक्षम मन रोमांचाने पुलकित झाले असले तर त्यात काय नवल ! पंडितजींना आणि मोतीलालजींना तितकाच आनंद झाला या गोष्टीचा की या उज्ज्वल क्रांतीच्या सुरवातीच्या कालातच एक हिंदी तरुण या क्रांतीशी समरस झाला, त्या क्रांतीच्या अग्रदूतांत मानाचे स्थान संपादन करण्याचे कर्तृत्व त्याने दाखविले. एम्. एन्. रॉय यांच्या व्यक्तिमत्त्वाचा पंडितजींच्या मनावर केवढा ठसा उमटला होता हे त्यांच्या आत्मवृत्ताच्या पहिल्या आवृत्तीत त्यांनी रॉय यांच्याबद्दल जे गौरवोद्गार काढले होते त्यावरूनच स्पष्ट झाले आहे. रॉय यांची मॉस्कोमधे आणि नंतर व्हिएन्नामधे त्यांची जी भेटगांठ झाली त्याचा उल्लेख पंडितजींनी या आत्मवृत्तात केला होता व अखेरीस म्हटले होते की " भारताचा एक शूर आणि उदात्त सुपुत्र ( One of the bravest and noblest sons of India ) ब्रिटिशांच्या तुरुंगात खितपत पडावा याबद्दल आपल्याला फार खेद झाला. " एम्. एन्. रॉय हे भारतात परतल्यानंतर त्यांना बारा वर्षांची शिक्षा झाली होती व ती शिक्षा ते भोगत असतानाच प्रसंगोपात्त पंडितजींनी हे उद्गार काढले होते.

पुढील काळात रॉय व पंडितजी यांचे संबंध इतके जिव्हाळ्याचे राहिले नाहीत; नव्हे त्यांच्यामधे ध्येयधोरणाच्या बाबतीत तीव्र मतभेद निर्माण झाले. इतके की दोघेही समाजवादी, दोघेही डावीकडे झुकणारे, आणि दोघेही जनहितासाठी झटणारे असूनही त्यांचे राजकीय क्षेत्रात साहचर्य होऊ शकले नाही. त्याचे कारण रॉय यांच्या बाबतीत तरी असे देता येईल की पंडितजींचा समन्वयवाद रॉय यांना कधीही मान्य होऊ शकला नाही. दुसऱ्या महायुद्धापूर्वीच्या कालखंडात तरी रॉय यांचा दृष्टिकोण मूलतः मार्क्सवादीच होता. फक्त रॉय यांनी मार्क्सवादी लोकांची पोथीनिष्ठता कधीही मान्य केली नाही. त्यांनी परिस्थितीचे जे विश्लेषण केले ते गतानुगतिक तर नव्हतेच, पण मॉस्कोमधे बसलेल्या देवदेवतांचे आदेश श्रद्धेने शिरोधार्य मानून त्यांबरहुकुम ठरले जाणारेही नव्हते. पण रॉय यांना निश्चितपणे असे वाटत होते की भारतातील राष्ट्रीय क्रांतीने साम्राज्यशाहीशी संगनमत करणाऱ्या वर्गाविरुद्धही एकाच वेळी लढा दिला

पाहिजे आणि राष्ट्रीय स्वातंत्र्य संपादन करणे व पिळवणुकीचा अंत करणे ही दोन्ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी एकाच वेळी झटले पाहिजे. रॉय यांच्या या सिद्धान्तातून एक अपरिहार्य निष्कर्ष निघत होता तो असा की या उद्दिष्टांसाठी झटणारे नेतृत्व त्या वेळच्या काँग्रेस नेत्यांना देता आले नसते. आणि म्हणूनच प्रतिस्पर्धी नेतृत्वाची स्थापना करण्याशिवाय हे सामाजिक उद्दिष्ट डोळयांसमोर ठेवणाऱ्या लोकांना दुसरा मार्गच उरलेला नव्हता.

हे प्रतिस्पर्धी नेतृत्व पंडित जवाहरलाल नेहरू यांनी द्यावे हीच रॉय यांची मनापासूनची इच्छा होती. पंडितजींच्या बद्दलची त्यांची ही अपेक्षाही होती पंडितजींच्याबद्दल रॉय यांना काही अपेक्षा होत्या म्हणूनच मॉस्कोमध्ये झालेल्या भेटीपासून ते भारतात गुप्तपणाने प्रवेश करीपर्यंत रॉय यांनी प्रत्येक लेखात, प्रत्येक जाहीरनाम्यात, प्रत्येक भाषणात पंडितजींना या बाबतीत काही ना काही आवाहन केलेले आढळून येते. भारतातील राजकीय क्रांतीचे संभाव्य नेते म्हणूनच रॉय यांनी मॉस्कोमध्ये पंडितजींचे स्वागत केले होते. त्यांना वाटले होते की पंडितजी गांधीवादाच्या असहकारितेच्या अकरणात्मक राजकारणात कायमचे विलीन होणार नाहीत. ते या आंदोलनातून निर्माण होणाऱ्या शक्तीचा क्रांतिकारी सामुदायिक चळवळ उभारण्याच्या दृष्टीने उपयोग करून घेतील. असहकारितेचे आंदोलन हे रॉय यांनी नुसतेच प्रतीकात्मक मानले होते. म्हणजे यातून राज्यकर्त्यांचे मतपरिवर्तन करण्याचेच उद्दिष्ट साध्य होण्यासारखे होते. त्याचा अर्थ असा की ब्रिटिश राज्यकर्त्यांवर नैतिक दडपण आणून काही राजकीय सुधारणा, काही आर्थिक सवलती प्राप्त करून घ्याव्या एवढ्यापुरतेच हे आंदोलन मर्यादित राहणार होते. रॉय यांच्या मते हा अटीतटीचा सामना नव्हे; ही तडजोडीसाठी होणारी चकमक. या चकमकीतून संपूर्ण निर्भेळ स्वातंत्र्य—— जी पंडितजींची आकांक्षा होती ते कसे प्राप्त होणार ? आणि पिळवणुकीवर आधारलेल्या सरंजामशाहीचे, भांडवलशाहीचे तरी कसे उच्चाटन होणार ? म्हणून रॉय यांनी पंडितजींना ठायीठायी आवाहन केले ते तडजोडवादी काँग्रेस नेत्यांपासून अलिप्त होऊन स्वातंत्र्यासाठी, आर्थिक समतेसाठी, सामाजिक क्रांतीसाठी लढणाऱ्या नेतृत्वाची काँग्रेसमध्ये प्रतिष्ठापना करण्यासाठी बद्धपरिकर होण्याचे.

एम्. एन्. रॉय यांना गुप्तपणाने १९३० साली भारतात पाऊल टाकीपर्यंत जवाहरलाल नेहरू याच्या साहचर्याची आस होती. डॉ. महमूद या नावाने ते भारतात रहात असतानाच १९३० सालचा कायदेभंगाचा लढा चाललेला होता. या लढ्याविषयी रॉय यांनी बर्लिनमध्ये जे ऐकले व वाचले त्यामुळे त्यांची अशी प्रामाणिक समजूत झाली होती की आता उभा भारतखंड पेटला आहे, भारतात क्रांतीचे अखेरचे पर्व सुरू झाले आहे. साहजिकच एक क्रांतिकारक म्हणून रॉय

यांना या क्रांतीत सहभागी व्हावेसे वाटले. ते नुकतेच कम्युनिस्ट इंटर नॅशनलमधून बाहेर पडले होते व स्तालिनवादाच्या आत्यंतिक, एकांतिक साहसवादी ध्येय-धोरणाविरुद्ध कम्युनिस्टांचीच एक प्रभावी आघाडी उघडण्याचा, स्तालिनने उन्मत्तपणाने इंटर नॅशनलमधून हाकून दिलेल्या इतर कम्युनिस्ट पुढाऱ्यांच्या सहकार्याने ते प्रयत्न करीत होते. यात जर्मनीतील थलायमर व ब्रँडलर, अमेरिकेतील लव्हस्टन, फ्रान्समधील दोरिओ आणि इतर अनेक युरोपीय दोशांतील पूर्वीच्या कम्युनिस्ट पुढाऱ्यांचा समावेश झालेला होता. ते सर्व कम्युनिस्ट होते. त्या काळी तरी कम्युनिस्ट मताचेच राहिलेले होते, कम्युनिस्ट इंटर नॅशनलवरीलही त्यांची श्रद्धा ढळलेली नव्हती. त्यांना हवा होता तो स्तालिनवादी ध्येयधोरणात बदल. त्यांच्यापैकी रॉय यांची श्रद्धा अशी होती की आज ना उद्या स्तालिनला आपल्या चुका कळून येतील व तो सन्मानाने पुन्हा आपल्याला इंटर नॅशनलमध्ये बोलावून घेईल. भारतातील क्रांतिकारक लढ्याची वार्ता येताच रॉय यांना अशीही ईर्षा आली की आपल्या सिद्धांताचा अचूकपणा दाखविण्याची ही वेळ आली आहे; आता आपण स्तालिनची समजूत करून देऊ शकू की भारतात घडवून आणावयाची आहे ती कामकरी क्रांती नव्हे तर राष्ट्रीय लोकशाहीवादी क्रांती. त्यासाठी भारतात गुप्तपणे प्रवेश करून ब्रिटिश राज्यकर्त्यांना उघडउघड आव्हान देण्याचा धोका पत्करायलाही ते तयार झाले. त्यांचे युरपमधील सहकारी त्यांना हा धोक्याचा मार्ग पत्करण्यापासून परावृत्त करीत होते. त्यांची प्रेयसी व नियोजित वधू एलन गॉटशॉक ( नंतरच्या एलन रॉय ) यांनीही आत्यंतिक प्रेमाच्या भावनेने त्याचप्रमाणे दीर्घ तुरुंगवासाच्या भीतीने रॉय यांना भारताकडे न जाण्यासाठी खूप गळ घातली होती. पण रॉय यांनी आपल्या जन्मजात प्रेरणेने तो धोक्याचा मार्ग पत्करला आणि जर्मनी व फरान्समधील आपल्या सहकाऱ्यांचा आणि आपल्या प्रेयसीचा निरोप घेऊन ते बोटीने भारताकडे यावयास निघाले.

त्यामागील हेतू एवढाच होता की कम्युनिस्ट पक्षाचे साहसवादी धोरण आणि गांधीवादी नेतृत्वाचे तडजोडवादी धोरण या दोन्ही धोरणांपेक्षा वेगळे असे धोरण आखून भारतात राष्ट्रीय लोकशाहीवादी क्रांतीची उभारणी करावयाची. या कार्यात जवाहरलाल नेहरू यांचे सहकार्य आपल्याला मिळेल अशी रॉय यांची अपेक्षा होती. ते सहकार्य त्यांना मिळाले नाही आणि त्या बाबतीत पंडितजींनी त्यांचा पूर्णपणे अपेक्षाभंग केला असे प्रांजलपणे कबूल केलेच पाहिजे. एम्. एन्. रॉय यांच्या दृष्टीने हा अपेक्षाभंग किती दुर्दैवी होता याची आज कल्पनासुद्धा

करता येणार नाही. पण पंडितजींचे सहकार्य न मिळाल्यामुळे रॉय हे एकाकी तर पडलेच, पण एकंदर राष्ट्रीय प्रवाहापासूनही दूर फेकले गेले. रॉय यांच्या राजकीय जीवनातील अपयशाची सुरुवात तेथनच झाली असे म्हणावयास हरकत नाही.

# गुप्तपणे भारतप्रवेश

एम्. एन्. रॉय हे भारतातील राजकीय व सामाजिक क्रांतीच्या परिपूर्ततेसाठी भारतात यावयाला निघाले ते २४ नोव्हेंबर १९३० रोजी. जवळजवळ सोळा वर्षानंतर ते भारताच्या किनाऱ्यावर पाऊल टाकणार होते. पण परदेशी गेलेल्या एखाद्या प्रवाशाप्रमाणे नव्हे. रॉय यांनी परदेशगमन केले होते ते गुप्तपणे. आता गुप्तपणानेच, ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या पोलिसांचा डोळा चुकवीत त्यांना भारतात प्रवेश करावयाचा होता. या सोळा वर्षाच्या काळात ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या राजवटीविरुद्ध जनतेचे आंदोलन संघटित करण्यात त्यांनी इतका पुढाकार घेतला होता की कानपूर कटाच्या खटल्यात तर त्यांना एक आरोपी म्हणूनच गोवण्यात आले होते व मीरत कटाचे तर ते प्रमुख सूत्रधार म्हणूनच मानले गेले होते. साहजिकच भारतात प्रवेश करणे म्हणजे ब्रिटिश राज्यसत्तेच्या पाशवी शक्तीला एक आवाहनच करण्यासारखे होते. म्हणूनच रॉय यांचे युरोपमधील मित्र हा धोका पत्करण्यापासून त्यांचे मन परावृत्त करण्याचा प्रयत्न करीत होते. भारतात जाण्याचा नक्की बेत करण्यापूर्वी रॉय यांनी एकदा बर्लिनला भेट देऊन प्रो. ऑगस्ट थलायमर, हाइनरिच, ब्रँडलर वगैरे सहकाऱ्यांशी विचारविनिमय केला. थलायमर हे एक तत्त्वज्ञ व तत्त्वचिंतक खरे, पण प्रत्यक्ष आंदोलनांचाही त्यांना भरपूर अनुभव होता. भारतासारख्या परतंत्र देशातील घडामोडींचाही ते अभ्यास करीत असत. त्यांनी रॉय यांचा भारताला भेट देण्याचा विचार हा केवळ साहसवाद ठरविला. त्यांचे असे मत पडले की भारतात क्रांतिकारक चळवळ परिपक्व झाली असे म्हणण्या-सारखा पुरावा उपलब्ध नाही. प्रगट होत आहे तो उद्रेक. पण हा क्षणिक ठरण्याचाच संभव आहे. म्हणून त्यांनी रॉय यांना बजाविले की या साहसवादात जीव गमविण्याचा वेडेपणा रॉय यांनी करू नये.

एम्. एन्. रॉय यांनी त्याचा सावधपणाचा सल्ला ऐकला नाही. अखेरीची झेप घेण्यापूर्वी आपल्या सहकाऱ्यांबरोबर काही दिवस शांतपणाने घालविण्यासाठी ते इटलीतील एका थंड हवेच्या ठिकाणी जाऊन राहिले. दक्षिण टायरोलमधील मेरॅनो या पर्वतशिखरावर त्यांचा मुक्काम होता. त्या सहकाऱ्यांत त्यांची प्रेयसी एलन गॉटशॉक हीही होती. एलन यांना पुढे तुरुंगातून पत्र पाठविताना रॉय यांनी मेरॅनोचा भावनापूर्ण शब्दांत उल्लेख केला आहे. एक प्रकारच्या नंदनवनाचाच जणु

तेथे रॉय यांनी उपभोग घेतला. तुरुंगातून सुटून आल्यानंतर आपल्या निवडक सहकाऱ्यांशी बोलताना रॉय हे नेहमी त्या स्थानाचा उल्लेख करून म्हणत असत, " मला ज्या दिवशी राजकारणाचा वीट येईल तेव्हा मी मेरँनोसारख्या एखाद्या शांत, शीतल स्थळी निवृत्तीचे जीवन कंठीन. तेथे पर्वतशिखरांकडे पाहता पाहता कितीक तरी कूटप्रश्नांचा आपल्याला उलगडा करता येईल. सभोवार राजकारणाचे जे वाळवंट पसरले आहे त्यात कधीकाळी अशी एखादी हिरवळ (Oasis) निर्माण करण्याची गरज ही पडणारच आहे. कोणी सांगावे, आपल्याला अशी छोटीछोटी केंद्रे प्रस्थापित करूनच जगामध्ये सुसंस्कृततेचे रक्षण करावे लागेल.' रॉय यांच्या नशीबी मेरँनो ते बरेली, असाच पर्याय उभा होता. फक्त सहासात महिन्यांचा अवधीच नंदनवनातून नरकामध्ये पाऊल टाकण्यासाठी त्यांच्या पुढे उरला होता.

रॉय यांना त्याची फिकीर नव्हती, खंतही नव्हती. क्रांतिकारकाच्या अभिनिवेशानेच एक खोटा पासपोर्ट तयार करून डॉ. महमूद या नावाने ते भारताला जाणाऱ्या पी. अँन्ड ओ. कंपनीच्या बोटीवर चढले. पासपोर्टच्या बाबतीत ते निःशंक होते. कारण जर्मनीमध्ये खोटे पासपोर्ट तयार करणे हा तर तेथील या क्षेत्रातील तज्ज्ञांना पोरखेळच वाटत असे. रॉय हे तर जर्मनीमध्ये अगदी परिचिता-प्रमाणे प्रवास करीत असत. मॉस्कोहून जर्मनीला त्यांच्या अनेक फेऱ्या होत आणि मित्रांचे एक जाळेही त्यांनी तेथे विणले होते. हे मित्र जसे राजकारणाच्या क्षेत्रातील असत तसेच विद्वज्जनांपैकी, विचारवंतांपैकीही असत. कवी, प्राध्यापक, तत्त्वज्ञ, प्रकाशक अशा सर्व थरांत रॉय यांच्या ओळखी असत. त्यांनाही रॉय यांच्या राजकरणाबद्दल जेवढा आदर असे त्यापेक्षाही अधिक त्यांच्या तत्त्वचिंतनाबद्दल असे. रॉय यांनी बर्लिनला अखेरची भेट दिली ती 'फेरलाग' या नावाच्या प्रकाशनसंस्थेला भेट देण्यासाठीही होती. त्या संस्थेनेच रॉय यांच्या ' रेव्होल्यूशन अँन्ड काउंटर रेव्होल्यूशन इन् चायना ' या ग्रंथाची जर्मन आवृत्ती प्रसिद्ध केली होती. रॉय यांना आपल्या या ग्रंथावरून दृष्टी फिरवावीशी वाटली तर त्यात काय नवल. त्या जर्मन प्रकाशनसंस्थेला ही आपली अखेरचीच भेट होईल अशी रॉय वा प्रकाशनसंस्थेच्या चालकांना त्या वेळी कल्पना तरी आली असेल काय ? दुर्दैवाने रॉय हे भारतात येताच तुरुंगात अडकले गेले आणि तिकडे जर्मनीत हिटलरची राजवट अधिष्ठित होताच 'फेरलाग' या प्रकाशनसंस्थेवरही हिटलरची वक्रदृष्टी वळली आणि त्याने तिचा संपूर्ण विध्वंस केला. त्या विध्वंसात रॉय यांचा वरील जर्मन ग्रंथही अग्नीच्या भक्ष्यस्थानी पडला.

भवितव्याची ही आशंका रॉय यांच्या मनात आली नसेल असे नव्हे. पण हे भवितव्य इतके दारुण, इतके कठोर निघेल असे मात्र त्यांना खास वाटले नव्हते.

हे भवितव्य कठोर निघाले ते व्यक्तिगत जीवनात त्यांना ज्या यातना भोगाव्या लागल्या त्यामुळेच नव्हे. पण ज्या क्रांतिकारक उठाव्याच्या अपेक्षेने ते भारतात आले होते, त्या अपेक्षाभंगामुळे तर हे भवितव्य अधिकच दारुण ठरले. एम्. एन्. रॉय यांनी कराची–मार्गे १९३० सालच्या डिसेंबरच्या सुमारास भारतात पाऊल टाकले. ते कराचीला बोटीतून उतरले ते याच हेतूने की तेथे गुप्त पोलीसांकडून फारसे लक्ष दिले जाणार नाही आणि अधिक सुराक्षतपणे किनारा गाठता येईल. तो विचार अधिकच बळावण्याचे आणखी एक कारण होते. रॉय यांच्याबरोबर त्यावेळी व्हाइसरॉयचे एक खाजगी चिटणीस प्रवास करीत होते. रॉय म्हणजेच डॉ. महमूद यांची साहेबमजकूर व त्यांच्या परिवाराशी चांगलीच ओळख झाली व पंधरा दिवसांच्या काळात त्यांचे जिव्हाळ्याचेही संबंध जमले. रॉय यांनी हे तात्काळ जाणले की या बड्या साहेबांच्या स्वागतासाठी कराची येथे अधिकाऱ्यांचा बराच मेळावा जमण्याचा संभव आहे आणि त्यांच्या परिवारापैकी एक म्हणून आपण बाहेर पडलो तर कोणाला संशयही येण्यासारखा नाही. रॉय यांची ही हिकमत त्यांच्या पथ्यावर चांगलीच पडली. कारण लांब शेरवानी, उनी विजार आणि डोक्यावर मुसलमानी फेझ टोपी या थाटात ते जेव्हा रुबाबदारपणे बड्या साहेबांच्या परिवाराबरोबर बाहेर पडले तेव्हा साहेबमजकुरांच्या बरोबरीने डॉ. महमूद यांनी पोलीस व इतर अधिकाऱ्यांकडून सलाम घेतले. त्यांचा पासपोर्ट व कस्टममधील त्यांचे सामान यांकडे त्यानंतर अधिकाऱ्यांनी जवळजवळ दुर्लक्षच केले. एम्. एन्. रॉय यांनी पहिला अडथळा बाजूला करण्यात तरी यावेळी यश मिळविले. पुढे अर्थातच अनिकेत अवस्थेत त्यांना दिवस कंठावे लागले. पोलीसांचा ससेमिरा चुकविण्यासाठी त्यांना हरघडी आपल्या जागाही बदलाव्या लागल्या. आणि कधी त्यांच्या सहवासात आलेल्या गरीब अनुयायांकडे मिळणारे जेवण घेत तर कधी फाके मारीतच त्यांना संकल्पित संघटनेचा पाया घालावा लागला.

एम्. एन्. रॉय यांचे व्यक्तित्व त्यावेळी ज्यांनी पाहिले असेल त्यांनाच त्यांची छाप सर्वांवर कशी पडत असेल याची कल्पना करता येईल. सहा फूटापेक्षा अधिक त्यांची उंची होती. तसाच भव्य त्यांचा अंगवठा होता. युरोपमधून नुकतेच आल्यामुळे त्यांचा चेहरा कसा तजेलदार, टवटवीत दिसत असे. ते चालावयाचेही सरळ, ताठपणे. त्यातच भर पडत असे ती त्यांच्या रुबाबदार पोशाखाची. खानदानीतील मुसलमानाचा तो पोशाख असे. आणि डौलदार गोंड्याची टोपी घालून ते चालू लागले की एखाद्या राजबिंड्या नवाबासारखे ते भासत असत. त्यांनी ती टोपी काढली की त्यांचे काळेभोर केस भुरुभुरु उडत असत. ते सावरण्यासाठी त्यांनी हात वर केला की त्यांच्या मनगटाचा पोलादी कणखरपणा जाणवत असे. त्यांच्या मुद्रेवर सदैव शांत, गंभीर भाव असे. ते हसत असत

अगदी खळखळून. पण त्यावेळी सुद्धा त्यांच्या सतेज, पाणीदार डोळ्यांत का कोण जाणे पण कारुण्याची एक छटा उमटलेली दिसून येत असे. उभ्या आयुष्यात भोगलेल्या कष्ट-आपदांची आठवण त्यांना व्याकुळ करीत असेल काय ? की वैचारिक मंथनाची जन्मजात आवड असलेल्या आपल्यासारख्या तत्त्वचिंतनांत मुरलेल्या व्यक्तीला राजकारणाच्या धकाधकीत सहभागी व्हावे लागल्याबद्दलची खंत क्षणोक्षणी त्याच्या अंतर्मनतनी उमटत असेल ? ते कोणी सांगावे ? पण एम्. एन्. रॉय हे सवंगड्यांच्या सहवासात असले किंवा प्रतिपक्षांच्या आखाड्यात उतरले तरी त्यांच्याबद्दल ही भावना निर्माण झाल्याशिवाय रहात नसे की या व्यक्तीचे मन दूर कोठेतरी घोटाळत आहे, ती आपल्याशी बोलत असली तरी गूढ प्रश्नाचा वेध घेत आहे.

रॉय यांच्यामध्ये सौजन्य व सोशीकपणा इतका पराकाष्ठेचा होता की कितीही उथळ व पोरकट अशा व्यक्तीचे म्हणणेही ते शांतपणाने ऐकून घेत असत. १९३० सालच्या सुमारास मार्क्सवाद ही मध्यमवर्गीय बुद्धिवंतांची एक चूष बनलेली होती. अर्धकच्च्या ज्ञानाच्या या बुद्धिवंतांच्या तोंडून बाहेर पडत असे ती बहुश: पोपटपंची किंवा त्यापेक्षाही अधिक नुसते शब्दांचे अवडंबर. मग थोडीशी चर्चा सुरू झाली की ‘ बूर्ज्वा, ’ ‘ प्रोलेटॅरियट, ’ ‘ पेटीबूर्ज्वा, ’ ‘ सब्जेक्टिव्ह, ’ ‘ ऑब्जेक्टिव्ह, ’ ‘ डायलेक्टिकल, ’ ‘ क्वॉलिटेटिव्ह, ’ ‘ क्वॉन्टिटेटिव्ह, ’ अशा शब्दांच्या जणू फैरी झडू लागत. या शब्दांचा अर्थ किती लोकांना अवगत असेल कोण जाणे. अधूनमधून त्यामुळे विनोदही निर्माण व्हावयाचा. बिचाऱ्या एका पढिक विद्यार्थ्याला ‘ बूर्ज्वा ’ पेक्षा ‘ पेटी बूर्ज्वा ’ हा अधिक मालदार वाटला होता. तो तरी काय करणार ? कम्युनिस्टांच्या मक्केमधून जे वाङ्मय प्रसृत होत असे त्यात अर्थापेक्षा, शब्दालाच अधिक महत्त्व प्राप्त झालेले दिसत असे. पकड घेणाऱ्या शब्दप्रयोगाची त्या साहित्यात खैरात असे, आणि तितक्याच जिव्हारी भिडणाऱ्या शिव्या-शापांची. साम्राज्यशाहीचे हस्तक, भांडवलदारांचे बगलबच्चे, क्रांतीचे मारेकरी, सुधारणावादी, ट्रॉट्स्कीइस्ट, पळपुटे, कामगारांचे खुनी, श्रमजीवी जनतेचे शत्रू अशा शेलक्या शिव्या त्यावेळी मार्क्सवादी वाङ्मयात रूढ झालेल्या होत्या. आपल्याशी किरकोळ मतभेद झालेला दिसताच एक कॉम्रेड दुसऱ्या कॉम्रेडाची अशी संभावना करीत असे. रॉय हे तर त्या वेळच्या आणि आजही रूढ असलेल्या कम्युनिस्ट परिभाषेत बोलावयाचे तर ‘ रेनेगेड ’ ( पळपुटे म्हणा, अवसानघातकी म्हणा ) होते. एम्. एन्. रॉय यांच्या तात्त्विक विचारसरणीचा डॉ. महमूद यांनी पुरस्कार सुरू करताच कम्युनिस्टांच्या केंद्रातून त्यांच्याविरुद्ध आणि रॉय यांच्याविरुद्ध, नुसता अंगार झडू लागला. रॉय यांना ते शिव्याशाप अर्धकच्च्या कम्युनिस्टांकडून किंवा त्यांच्या सहप्रवाशांपासून ऐकावे लागत. पण

तरीही त्यांनी आपल्या मनाची शांती कधी ढळू दिली नाही. ते शांतपणे आपल्यावर हल्ला चढविणाऱ्या व्यक्तींना सांगत असत की " रॉय या व्यक्तीचा आपण सध्या विचार करू नये. त्याची विचारसरणी, त्याची तत्त्वप्रणाली योग्य की अयोग्य हे आपण पाहूया." त्यावर लगेच उत्तर येई " पण अशा तऱ्हेच्या अवसानघातकी व्यक्तीला तत्त्वप्रणाली तरी कशी असू शकेल ? " त्यावर रॉय काय उत्तर देणार ? त्यांना हे माहीत होते की निरनिराळ्या कालखंडांत निरनिराळे क्रांतिकारक असेच अवसानघातकी आणि क्रांतिविरोधक मानले गेले होते आणि त्यांची संभावना मॉस्कोतील बदलत्या देवदेवतांच्या लहरीनुसार अशाच तऱ्हेने केली जात होती. स्तालिनच्या राजवटीत तर क्षणोक्षणी मोठमोठे देव कोसळून पडत होते. आणि इतक्या त्वरेने आणि इतक्या मोठ्या प्रमाणात की प्रामाणिक कार्यकर्त्यांना कोणाला पाठिंबा द्यावा याचेच कोडे पडत असे. त्या कारकीर्दीत तर नुसत्याच राजकीय अधःपातावर सुटका होत नसे. तर एकेकाळच्या मानलेल्या देवमूर्तींचा प्रत्यक्ष विध्वंस घडवून आणण्यासाठी शत्रूला साहाय्य करण्यापर्यंत मार्क्सवाद्यांची मजल जात असे.

डॉ. महमूद हे एम्. एन्. रॉय असावेत असा संशय कम्युनिस्टांच्या गोटात बळावल्यानंतर त्यांचा ठावठिकाणा शोधून काढून त्यांना पोलीसांच्या ताब्यात देण्याचा सुद्धा कम्युनिस्टांकडून प्रयत्न करण्यात आला होता हे एक उघड गपित आहे. त्यात कम्युनिस्टांना नीतीबाह्य असे काहीच वाटले नाही. कारण त्यांचे सूत्रवाक्य असे होते की " रॉय पकडले गेले तर काय होईल ? एक अवसानघातकी तेवढाच नष्ट होईल." आश्चर्य असे की एकीकडे कम्युनिस्टांचा प्रचार चालू होता की ब्रिटिशांचे हस्तक म्हणून, त्यांच्याच संमतीने रॉय हे कम्युनिस्ट चळवळीत फूट पाडण्यासाठी हिंदुस्थानात आले आहेत आणि दुसरीकडे मात्र रॉय यांच्या हालचालींबद्दलची सर्व माहिती पोलिसांना सादर करण्यासाठी काही कम्युनिस्ट कार्यकर्त्यांची अहोरात्र धडपड चालू असे. एम्. एन्. रॉय यांना आपल्या अज्ञातवासाच्या काळात अशा रीतीने ब्रिटिश सरकारचे गुप्त पोलिस व त्यांचा शोध लावू पहाणारे कम्युनिस्ट कार्यकर्ते या दोघांपासून स्वतःचे संरक्षण करून घ्यावे लागत असे. प्रांत, वेष आणि नावनिशाण बदलीत यांनी जवळजवळ सहा सात महिनेपर्यंत या दोघांचाही ससेमिरा चुकवला. पण तो चुकविताना ते कधी स्वस्थ बसले नाहीत. आपल्या अनुयायांच्या संघटनेचे या काळात त्यांनी साऱ्या देशभर लहानसे का होईना पण जाळे पसरले.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९५६६

# अज्ञातवासातील कार्य व अटक

एम्. एन्. रॉय हे डॉ. महमूद या नावाने भारतात वावरत असल्याचा सुगावा प्रथम कम्युनिस्टांना एका थोर कविराजांच्या मार्फतच लागला. ते त्यावेळी कायदेभंगाच्या चळवळीत सहभागी झाले होते आणि त्यांची पत्नी ही काँग्रेसची विख्यात पुढारी असल्यामुळे त्यांना काँग्रेसच्या व्यासपीठावर बराच सन्मानही मिळू लागला होता. रॉय यांच्या सहकाऱ्यांना साहजिकच असे वाटले की या कविराजांना आपल्या बाजूला ओढले तर एका अत्यंत बुद्धिमान आणि प्रतिभावान कलाकाराचे सहकार्य आपल्याला मिळू शकेल. पण त्यांना ही कल्पना नव्हती की कदाचित रॉय व या कविराजांची युरपमध्ये कोठेतरी भेट झाली असेल. प्रत्यक्ष अनुभव आला तो असा की पहिल्याच भेटीत कविराजांनी डॉ. महमूद यांना एम्. एन्. रॉय म्हणून ओळखले आणि त्याच रात्री कविराजांनी प्रसन्नतेच्या आणि दुसऱ्याच कसल्या तरी धुंदीत एका खाजगी मेळाव्यात आपल्या या अपूर्व भाग्याची वाच्यता केली. त्यांना रॉय यांची भेट होणे हे भाग्याचे वाटले. पण खाजगी मेळाव्यातील श्रोतृगणात जे काही कम्युनिस्ट होते त्यांना निराळ्या दृष्टीने हे भाग्याचे वाटले. ते भाग्य म्हणजे एका कम्युनिस्टद्रोह्याला नेस्तनाबूत करण्याचे 'ऐतिहासिक' कार्य पार पाडण्याची चालून आलेली संधी हे होय. त्या दिवसापासून डॉ. महमूद यांचा छडा लावण्याचे कार्य गुप्त पोलिसांपेक्षाही त्यांनी अधिक मनावर घेतले.

डॉ. महमूद यांनी लगेच आपले नावगावही बदलले व वेषही बदलला त्यानंतर खादीचे कपडे घालून ते हिंडू लागले व त्या वेषातच ते कराची काँग्रेसला जाऊन पोचले. त्यावेळी त्यांचे नाव एन्. बॅनर्जी असे होते. एम्. एन्. रॉय यांनी आपल्या आयुष्यात किती नावे धारण केली व बदलली याच छडा लावणेही कठीण आहे. त्यांचे पाळण्यातील नाव नरेंद्र भट्टाचार्य असे होते. ते १९१४ साली भारताचा किनारा सोडून पूर्वेकडे जावयाला निघाले ते जॉन मार्टिन हे नाव घेऊन. सेडिशन कमिटीच्या अहवालात या नावाचा उल्लेख आहे. पुढे अमेरिकेला ते गेले ते मानवेंद्रनाथ रॉय असे नाव घेऊन. त्यातूनच एम्. एन्. रॉय हे नाव उदयास आले. व जगविख्यात झाले. रशिया, चीन, सैबेरिया वगैरे भागांत किंवा बर्लिनमधे त्यांनी वास्तव्य केले तेही निरनिराळी नावे घेऊन. भारतात ते आले ते डॉ. महमूद म्हणून. उत्तर प्रदेशात त्यांनी दौरा केला तेव्हा एस्. के. विद्यार्थी या नावाने

ते ओळखले जात. कराची काँग्रेसमध्ये ते डॉ. बॅनर्जी बनले. पंडित जवाहरलाल नेहरू यांनीच या नावाने नेतानिवासात त्यांची खास व्यवस्था केली होती. पंडितजींना त्यांच्या विषयी इतकी आस्था निर्माण झाली होती की काँग्रेसच्या वा अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या बैठकीचे कामकाज आटोपले की मिळेल तो वेळ ते रॉय यांच्याबरोबर चर्चा व विचारविनिमय करण्यात घालवीत असत. रॉय यांनी त्या काँग्रेससाठी आपला असा एक स्वतंत्र कार्यक्रम तयार केला होता. एका जाहीरनाम्याच्या रूपाने त्यांनी तो प्रसिद्ध केला होता. त्यात भारतीय स्वातंत्र्याचे उद्दिष्ट राष्ट्रीय लोकशाहीवादी क्रांती घडवून आणणे हेच जाहीर करण्यात आले होते. त्या क्रांतीचा संपूर्ण कार्यक्रम देऊन त्यासाठी होणाऱ्या अंतिम लढ्याची व त्या लढ्याच्या पूर्वतयारीसाठी हाती घ्यावयाच्या दैनंदिन जनसंघटनेच्या कार्यक्रमाची त्यांनी यात तपशीलवारपणे दिशा दाखवून दिली होती. हा कार्यक्रम दिखाऊ नव्हता आणि आकर्षकही नव्हता. पण आर्थिक वा सामाजिक मागण्यांसाठी होणाऱ्या जनतेच्या दैनंदिन लढ्यांतून आपली संघटना कशी मजबूत करता येईल व शत्रूची ताकद कशी पोखरून काढता येईल याचे सांगोपांग विवेचन रॉय यांनी त्यांत केले होते.

रॉय यांचा तो कार्यक्रम पंडितजींना अतिशय आवडला आणि कराची काँग्रेसमधे, लाहोर काँग्रेसच्या पुढे एक पाऊल टाकण्याच्या दृष्टीने एक आर्थिक व सामाजिक कार्यक्रम सादर करण्यासाठी त्यांनी एक ठरावही तयार केला. रॉय-यांच्या जाहीरनाम्याच्या पायावरच तो ठराव आखण्यात आला होता. तो ठराव तयार करण्यामागील पंडितजींची भूमिका ही होती की भारताच्या संपूर्ण स्वातंत्र्याचे चित्रच या ठरावातून प्रगट व्हावे. पण रॉय यांच्याप्रमाणे किंवा इतके पंडितजी स्वतंत्र नव्हते. गांधीवादी नेतृत्वाने जी राजकीय तडजोडीची व सामाजिक समन्वयाची मर्यादा घालून दिलेली होती त्या मर्यादेच्या आतच आर्थिक व सामाजिक विकासाचा कार्यक्रम आखण्याचे त्यांच्यावर बंधन होते. कराची काँग्रेसमध्ये पंडितजींनी तेच बंधन पाळले आणि आपण तयार केलेल्या ठरावावर हात फिरविण्याला त्यांनी गांधीजींना मुभा दिली. गांधीजींनी जो सुप्रसिद्ध आर्थिक कार्यक्रमाचा मसुदा तयार केला त्यात रॉय यांच्या क्रांतिकारक समाजरचनेचा तर आशय नव्हताच, पण पंडितजींच्या समाजरचनेबद्दलच्या कल्पनांचाही त्यात ठाव ठिकाणा राहिला नाही. कराची काँग्रेसच्या ठरावात भांडवलशाहीच्या दुय्यम भागीदारीची कल्पनाच अभिप्रेत होती. फक्त श्रमजीवी जनतेचे, विश्वस्ताच्या भावनेने पालन करण्याच्या हेतूने धनिक वर्गाने कोणत्या सुधारणा त्या जनतेच्या जीवनात घडवून आणल्या पाहिजेत याचे भूतदयावादी वृत्तीने त्यात दिग्दर्शन करण्यात आले होते एवढेच. कराची काँग्रेसच्या त्या ठरावाने रॉय यांची संपूर्णपणे निराशा केली. त्यांना त्या क्षणी कळून आले की भारत क्रांतिसन्मुख झाला असला तरी जे नेतृत्व भारताचे

मार्गदर्शन करीत आहे त्याला खरे भय असेल तर ते ब्रिटिश राजवटीचे नव्हे तर क्रांतीचे होय.

रॉय व गांधी यांच्यामध्ये कधीही सुसंवाद निर्माण झाला नाही तो क्रांती-बद्दलच्या दोघांच्या भिन्न कल्पनांमुळेच केवळ नव्हे तर क्रांतीच्या उद्दिष्टाबद्दलच्या मतभेदामुळे सुद्धा. श्रमजीवी जनतेची पिळवणूक नष्ट करण्यासाठी उत्पादन-साधनांची मालकी धनिक वर्गाकडून हिसकावून घेतली पाहिजे असे रॉय यांचे त्या वेळी म्हणणे होते. गांधीजींचा सिद्धांत असा होता की धनिक वर्गाने श्रमजीवी जनतेचे विश्वस्त बनूनच आपल्या संपत्तीचा विनियोग केला पाहिजे. गांधीजींचा दृष्टिकोण भावुक, ध्येयवादी होता. रॉय यांचा मार्क्सवादी होता. १९३० साली रॉय हे भारतात आले त्या वेळी मार्क्सवादी दृष्टिकोणातूनच ते भारतीय क्रांतीची उभारणी करू पहात होते. त्यांना अभिप्रेत होती ती राष्ट्रीय लोकशाहीवादी क्रांती. पण त्या क्रांतीचे नेतृत्व घेण्यासाठी म्हणून ते जो पक्ष-संघटित करू पहात होते तो कम्युनिस्ट पक्षच होय. फक्त वेगळा कम्युनिस्ट पक्ष जो मॉस्कोपुढे लाचार होणार नाही आणि मास्कोप्रणित तंत्र व व्यवहार स्वीकारून आपल्या बुद्धिदारिद्रयाचे व कल्पना शून्यतेचे प्रदर्शन करणार नाही. रॉय हे म्हणूनच स्वत:ला जास्त चांगले कम्युनिस्ट म्हणवून घेत असत आणि त्यांची अपेक्षा हीच होती की भारतातील क्रांतीचे आपले विश्लेषण अधिक व्यवहार्य व फलदायी ठरले तर स्टालिन आज ना उद्या आपल्या ध्येय-धोरणात बदल करील व आपल्याला पुन्हा एकदा कम्युनिस्ट इंटर नॅशनलमध्ये सन्मानाने प्रवेश करता येईल. रॉय यांची कल्पना भारतात फार दिवस किंवा कायमचे रहाण्याची नव्हती. आपल्या क्रांतिकारक पक्षाचा पाया मजबूत रीतीने घातल्यानंतर ते पुन्हा युरपमध्ये परतणार होते—कम्युनिस्ट इंटर नॅशनल-वर दडपण आणण्यासाठी .

पण त्यांची योजना व संकल्प सिद्धीस जावयाचा नव्हता. भारतात येऊन सहा महिने उलटण्यापूर्वीच एका भल्या पहाटे ते मुंबईमध्ये पकडले गले. मुंबई हेच रॉय यांनी आपल्या हालचालीचे मुख्य केंद्र बनवले होते. तेथे तरुण, त्यागी व निष्ठावंत कार्यकर्त्यांचे एक जाळेच त्यांनी विणले होते. हे सारे अनुयायी गरीब, मध्यम स्थितीतील होते आणि बहुतेकांचा संसार कसाबसा चालत असे. त्यांच्या ओळखी-देखी तरी कोणत्याशा मोठ्या असणार ? त्यामुळे रॉय यांना गुप्तपणाने ठेवायचे तरी कोठे व कसे याचीच त्यांना पंचाईत पडत असे. शिवाय हा मुक्काम चार दोन दिवसांतच हलवावा लागे. कारण पोलिसांची पाळत प्रतिदिनी वाढतच चाललेली होती. रॉय हे गुप्तपणाने रहाण्यात व हालचाली करण्यात पटाईत होते. कारण उभ्या जन्मभर त्यांनी हाच जणू आयुष्यक्रम बनविला होता. त्यांचा एक कटाक्ष असे तो दोन जिने असलेल्या घराची निवड करण्याचा. कारण पोलिसांची धाड येताच

दुसऱ्या जिन्याने बाहेर पडण्याची संधी तरी घेता येणे शक्य असे. क्रॉफर्ड मार्केटच्या जवळील शरूफ मॅन्शनमध्ये रहात असताना त्यांच्या सुगाव्यावर एकदा गुप्त पोलिस आलेही होते. रॉय यांना ही बातमी कळताच ते शांतपणे दुसऱ्या जिन्याने खाली गेले. पांढऱ्या शुभ्र खादीच्या कपड्यात गांधी टोपीनिशी ते त्या चार मजली इमारतीतून बाहेर पडले तेव्हा पोलिसांच्या गाड्या जय्यत तयारीनिशी उभ्या असलेल्याही त्यांनी पाहिल्या. पोलिसांना हवी असलेली व्यक्ती त्यांच्यासमोरूनच त्यावेळी निघून गेली. रॉय यांनी त्यानंतर पुन्हा शरूफ मॅन्शनकडे पाऊलही टाकले नाही.

पण ब्रिटिश राज्यसत्तेच्या गुप्तपोलिसांना ते फार काळ थोपवू शकले नाहीत. जूनच्या सुमारास ते असेच एका ठिकाणी मुक्कामास असताना ज्यांच्या घरी त्यांनी आश्रय घेतला होता त्यांनी ऐन मध्यरात्री त्यांना बाहेर जावयास सांगितले. पोलिसांची आज रात्री आपल्या घरावर धाड येईल या भीतीने ते गृहस्थ हादरून गेले होते. एका क्षणाचीही ते गय करावयाला तयार नव्हते. साहजिकच रात्रीच्या रात्री रॉय यांच्या अनुयायांना दुसरीकडे कोठेतरी त्यांची सोय करणे भाग पडले. त्यांनी एका म्युनिसिपल कौन्सिलरकडे रात्रीपुरती व्यवस्था केली अर्थातच तो म्युनिसिपल कौन्सिलर हा ब्रिटिशधार्जिणा आहे हे पहावयाला ते विसरले नव्हते. कारण अशा ठिकाणीच रॉय यांच्यासारख्या क्रांतिकारकाला अधिक निर्धास्तपणे राहता येणे शक्य होते. रॉय हे या बाबतीत जसे निःशंक तसेच निरिच्छ. त्यांना हवा होता तो एका रात्रीपुरता निवारा. कारण दुसऱ्याच दिवशी त्यांचा मुक्काम पुण्याला हलणार होता. त्या दृष्टीने त्यांची सारी व्यवस्थाही झाली होती. पण डॉ. महमूद म्हणून पुण्याला येण्याची रॉय यांना संधी मिळालीच नाही. पुण्यातील ज्या कार्यकर्त्यांनी ओंकारेश्वरावर आणाभाका घेऊन रॉयवादी गटाची प्रतिष्ठापना केली होती त्यांनाही एम्. एन्. रॉय यांच्या दर्शनासाठी पुढे सात वर्षेपर्यंत वाट पहावी लागली. कारण २१ जूनच्या पहाटेला रॉय यांना मुंबई येथे अटक करण्यात आली. त्यांना अटक झाली तेव्हा पहाटेचे चार नुकतेच वाजले असतील.रात्री दोन वाजेपर्यंत रॉय हे आपल्या अनुयायांबरोबर चर्चा व वादविवाद करीत बसले होते. पहाटेला त्या म्युनिसिपल कौन्सिलरच्या घरावर थाप पडली तेव्हा तो डोळे चोळीत गडबडून उठला. त्याच्यासमोर खानबहादुर पेटीगारा व इतर अनेक लहानमोठे पोलिस अधिकारी हजर होते. दार उघडताच पोलिसांनी आत शिरण्याची परवानगी-सुद्धा घेतली नाही. ते धावतच घरात शिरले आणि एका खोलीवर त्यांनी थाप मारली.

"कोण आहे ?" आतून रॉय यांनी विचारले.

"दरवाजा उघडा. तातडीचा एक निरोप आहे." रॉय यांना बाहेरची पावले

ऐकू आली. घरातील गडबड–गोंधळही कळला. त्यांना क्षणार्धात कळून आले, हे आपल्याला बोलावणे आलेले आहे.

त्यानी दार उघडले अगदी शांतपणाने. अविचलित नजरेने त्यांनीं पोलिस अधिकाऱ्याकडे पाहिले. खानबहादुर पेटीगारा पुढे झाले होते. त्यांनीं रॉय यांच्या खांद्यावर हात ठेवून म्हटले, " मि. रॉय , आम्ही तुम्हाला अटक करण्यासाठी आलो आहोत. "

खानबहादुर पेटीगारा यांचा एक हात यावेळी पिस्तुलावर होता. दुसऱ्या पोलिस अधिकाऱ्यांनी तर पिस्तुले सज्जही ठेवली होती.

एम्. एन्. रॉय यांनी तितक्याच शांतपणे म्हटले. " ठीक आहे, " आणि मग हसत हसत खानबहादुर पेटीगारा यांना ते म्हणाले, " मला वाटते या पिस्तुलाची गरज नाही. मी तुमच्याबरोबर येत आहे. "

रॉय हे पोलिसांच्या बरोबर बाहेर पडले तेव्हा त्यांनी अर्धी विजार व शर्ट घातला होता आणि त्यांच्या पायात साध्याच चपला होत्या.

त्या दिवशी त्यांच्या क्रांतिकारक जीवनातील एक नवे पर्व सुरू झाले.

# रॉय आणि
# लाल नेपोलियन

एम्. एन्. रॉय यांच्या अटकेनंतर सुद्धा कम्युनिस्ट गोटातून त्यांच्याविरुद्ध चाललेल्या हीन प्रचाराला आळा पडला नाही. प्रत्यक्षपणे ते बरेलीच्या, अलमोड्याच्या, देहरादूनच्या तुरुंगात खितपत पडलेले दिसत होते. त्यांच्या बचावासाठी अधिकृत रीत्या एक समितीही प्रस्थापित झाली होती. त्या समितीशी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यासह अनेक राष्ट्रवादी नेत्यांनी सहकार्य केले होते. कैलासनाथ काटजू यांच्यासारखा विख्यात वकिलाने रॉय यांच्या अपीलाचे कामसुद्धा पुढे चालविले. पण तरीही कम्युनिस्ट प्रचारक तिरस्काराने म्हणत, "कोण जाणे रॉय हे तुरुंगात आहेत की होनोलुलूला जीवनानंद लुटीत आहेत." हा प्रचार भारतातील कम्युनिस्टच करीत होते असे नाही, ब्रिटनमधील कम्युनिस्ट पक्षाच्या एका अधिकृत वृत्तपत्रातही त्या आशयाचा मजकूर प्रसिद्ध करण्यात आला होता. ब्रिटनमधील कम्युनिस्टांचे अग्रणी रजनी पामदत्त यांचे बंधू क्लेमेन्स दत्त यांनी "इंटर नॅशनल प्रेस कॉरेस्पॉन्डन्स" (इंम्प्रेकॉर) या कम्युनिस्ट इंटर नॅशनलच्या मुखपत्रात एक लेख लिहून रॉय यांना तुरुंगामध्ये अनेक प्रकारच्या सुखसवलती देण्यात येत आहेत असा आरोप केला होता. त्या लेखाबद्दलची हकिकत रॉय यांना युरोपमधील त्यांच्या मित्रांनी त्याचवेळी तुरुंगात कळविली होती. ३१ ऑक्टोबर १९३१ रोजी एलन् रॉय यांना लिहिलेल्या पत्रात रॉय त्यांनी त्या माहितीचा उल्लेख करून एवढेच म्हटले होते, "क्लेमेन्सने केलेल्या गलिच्छ कृतीची माहिती मला मिळाली. खरेच मला आश्चर्य वाटत आहे. मला वाटत होते तो चांगला सदभिरुचीसंपन्न आहे. इतक्या हीन पातळीला हे लोक कसे जाऊ शकतात बरे ? "

रॉय यांची कम्युनिस्ट इंटरनॅशनलवरील निष्ठा मात्र तशीच अभंग राहिली होती. १६ फेब्रुवारी १९३२ च्या पत्रात रॉय हे एलन रॉय यांना विचारीत आहेत, "कम्युनिस्ट इंटर नॅशनलच्या लोकांना माझ्याबद्दलची वार्ता एकून काय वाटले हे जाणून घेण्याची मला केवढी उत्सुकता लागली आहे. येथील त्यांचे भक्तगण ( स्वत:ला कम्युनिस्ट पक्ष म्हणवून घेणारे ) अगदी निर्लज्जपणे वागत असल्याचे कळते. " रॉय यांना असे वाटत होते की युरपमधील फॅसिझमची घोडदौड थांबवायची असेल तर कम्युनिस्ट व सोशलिस्ट यांना संयुक्त आघाडी उभी करावी लागेल, नाहीतर दोघांनाही फॅसिझमच्या टाचेखाली चिरडून मरावे लागेल. ६ मार्च १९३३

रोजी एलन रॉय यांना लिहिलेल्या पत्रात रॉय कळवळून म्हणतात, " तिसऱ्या राइश-मध्ये ( जर्मनी ) राहणाऱ्या तुमच्यासारख्या लोकांच्या भयानक अग्निपरीक्षेची तुलना करता, तुरुंगातील माझ्या हालअपेष्टा या इतक्या क्षुल्लक वाटतात की त्यांच्याविषयी न बोलणेच बरे. या क्षणी कोणाकोणाच्या वाट्याला काय आले असेल याच्या विचारानेसुद्धा माझ्या अंगावर शहारे उभे राहातात. अरेरे, सहज टाळता येण्यासारख्या चुका आहेत या. पण केवढी मनस्वी किंमत त्यासाठी आपल्याला द्यावी लागणार आहे. सर्वोच्च शिखरावर आरूढ झालेल्या आमच्या देवांच्या भावना आज काय आहेत कोण जाणे ! "

तथापि, न पावणाऱ्या या देवांना सोडून जाण्याचा विचार मात्र रॉय यांच्या मनात कधी आला नाही. उलट जर्मनीतील एक समाजवादी नेते कुर्त रोझेनफेल्ड यांनी कम्युनिस्ट पक्षात सामील होण्याचा निर्णय घेतल्याबद्दल रॉय यांनी आनंदच व्यक्त केला होता. १० जून १९३३ च्या पत्रात रॉय एलन यांना लिहितात, " कुर्तने अखेरीस मनाची तयारी केली ही आनंदाची गोष्ट आहे. चला, कधी नव्हे ते उशीराने का होईना निर्णय घेणे हे बरे. माझ्या वतीने त्याचे अभिनंदन कर. हाइन्झ आणि ऑगस्टला माझा निरोप सांग, काही झाले तरी नवीन दुकान थाटू नका." १४ जुलैच्या पत्रात पुन्हा रॉय यांनी कळकळीने म्हटले होते, " नव्या कम्युनिस्ट पक्षाची स्थापना करणे हा मूर्खपणाचा नव्हे तर अक्षम्य गुन्हा ठरेल. सध्याच्या क्षणी हा विचार आपल्या सिंहाचा (लिआँ ट्रॉटस्की) अपरंपार अहंकारच सहन करू शकेल. तसे पाहिले तर कम्युनिस्ट इंटरनॅशनलच्या वृत्तीत खरा फरक दिसून आला असता तर या आणीबाणीच्या परिस्थितीत आपल्या गटाचे विसर्जन करण्याची सूचना मी केली असती." १९३४ सालच्या फेब्रुवारीतसुद्धा रॉय जे सुखस्वप्न पहात होते ते कम्युनिस्ट इंटरनॅशनलमध्ये कम्युनिस्ट व सोशलिस्ट यांच्या होणाऱ्या मीलनाचे. २४ फेब्रुवारीच्या पत्रात रॉय यांनी एलन यांना लिहिले होते, "मला आता घराची ओढ लागली आहे आणि मी अधीरतेने वाट पाहात आहे ती सर्वांच्या एकीकरणाचा भव्य सोहाळा कधी साजरा करता येईल त्याचा. त्या एकीकरणासाठी जे काही करता येईल ते करा. 'विररायझेन' हे गीत उच्च स्वराने हवे तर म्हणा. सध्याच्या आणीबाणीच्या परिस्थितीत मला तर असे वाटते की आपण अर्ध्या रस्त्यापर्यंत पुढे जाऊन हातमिळवणी करावयाचा प्रयत्न करता आला तर करावा. नाहीतर ? कोसळता डोलारा सावरण्याला अवधीच उरणार नाही."

रॉय यांची श्रद्धा कम्युनिस्ट इंटरनॅशनलवर असावी यात काही नवल नव्हते. कारण इंटरनॅशनलच्या जनकांतच त्यांची गणना करता येईल. रशियन राज्यक्रांतीने त्यांच्या भावनेला जो हेलकावा दिला त्यातूनच ही आकांक्षा निर्माण झाली की श्रमजीवी जनतेच्या राज्याचा विस्तार असाच देशोदेशी पसरत जावो. "जगातील

कामगारांनो एक व्हा" हा आदेश मार्क्सने दिला तो याच क्रांतीच्या परिपूर्तीसाठी. रॉय हे मार्क्सवादी झाले ते या निष्ठेने की या तत्त्वज्ञानातून अगणित, अज्ञानी, पिळल्या जाणाऱ्या जनसमुदायाची पिळवणूक नष्ट होण्याचा मार्ग खुला होईल आणि बहुजन-समाजाला स्वतंत्र, समृद्ध जीवनाचा आस्वाद घेण्याला वाव मिळेल. ते जीवन निर्माण करण्याचे एक साधन म्हणून रॉय यांनी रशियन राज्यक्रांतीकडे व कम्युनिस्ट इंटर नॅशनलकडे पाहिले आणि आपल्या तारुण्याचा सारा उज्ज्वल काळ या क्रांतीच्या व या संघटनेच्या पुरस्कारासाठी व्यतीत केला. रॉय यांच्या निष्ठेचे वैशिष्टय असे की कम्युनिस्ट इंटरनॅशनलच्या पुढाऱ्यांनी चुकीच्या आणि घातकी धोरणांनी अनेक देशांतील क्रांतिकारक लढयांचा विध्वंस केला, इतकेच नव्हे तर व्यक्तिशः रॉय यांच्या बाबतीत अक्षरशः अमानुष वर्तन केले तरी रशियन नेतृत्व जोपर्यंत आपले इतिहासदत्त कार्य पार पाडीत आहे असे त्यांना वाटले तोवर त्या नेतृत्वाच्या भल्या तशाच बुऱ्या कृत्यांचेही त्यांनी सहानुभूतीनेच निरीक्षण केले आणि आपला न्याय-नीतीचा ताजवा त्यांनी घट्ट तसेच विशाल मन करून या नेतृत्वाच्या बाजूलाच झुकता ठेवला.

रॉय आणि स्तालिन यांच्यामधील संबंधांचा, त्यांच्यामध्ये प्रस्थापित झालेल्या जवळजवळ अतूट दुव्याचा इतिहास हा एक मती गुंग करणाराच इतिहास म्हणावा लागेल. रॉय हे स्वतःला चांगले कम्युनिस्ट म्हणवत असत आणि कधी कधी विनोदाने चांगले स्तालिनिस्टही म्हणवून घेत असत. यात त्यांचा आंधळा भक्तिभाव नव्हता, पण रशियन क्रांतीवरील डोळस श्रद्धेतून त्यांना ही जाणीव झाली होती की या क्रांतीला स्थिर पायावर उभे करण्यासाठी स्तालिन यांच्यासारखा भक्कम मनाचा, एकमार्गी धोरणाचा आणि प्रसंगविशेषी निष्ठुर होणारा नेताच हवा आहे. रॉय यांच्या मते स्तालिन हा बोलघेवड क्रांतिकारक नव्हता. तो मुत्सद्दीपणाने पावले टाकणारा, व्यवहार्यतेपायी सिद्धांतही गुंडाळून ठेवणारा आणि एकच उद्दिष्ट अविरतपणे डोळ्यांसमोर ठेवून त्या उद्दिष्टाच्या पूर्तीसाठी शत्रुमित्रांना एकाच मापाने मोजणारा नेता होता. स्तालिनमधील हे गुण जाणून त्याचे खरेखुरे मूल्यमापन करणारे रॉय हे साऱ्या जगातील एकच मार्क्सवादी पुढारी असतील. त्यांचे मूल्यमापन निरपेक्ष बुद्धीने, फळाची अणुमात्रही आशा न धरता केलेले असल्या-मुळे त्याला महत्त्व प्राप्त होणे अपरिहार्य आहे. बाकीचे स्तालिनवादी होते ते त्या वेळी लाचार झालेले होते आणि स्तालिनविरोधक होते त्यांची मने कडवटपणाने भरलेली असल्यामुळे पहिल्या लोकांना स्तालिन हा जसा देव वाटत असे त्याप्रमाणे या दुसऱ्या लोकांनी स्तालिनची दैत्य म्हणूनच गणना केलेली आढळून येईल. रॉय यांचा दृष्टिकोण निखालस वास्तविक व इतिहासनिष्ठ असे. म्हणूनच स्तालिन यांनी त्यांच्या स्वतःशी अमानुष वर्तन केलेले असूनही दुसऱ्या महायुद्धातील अत्यंत

आणीवाणीच्या काळी म्हणजे मॉस्कोच्या दारावर हिटलरचे सैन्य धडक देत असतानाही रॉय यांनी आपल्या भीतिग्रस्त व निराश झालेल्या सहकाऱ्यांना दिलासा देताना म्हटले होते की, "चाचा जो (जोसेफ स्तालिन) हा अजूनही जगाचा बचाव करील."

रॉय यांना स्तालिनबद्दल हा जो विश्वास वाटला त्यामागे रशियन राज्यक्रांतीबद्दलची व त्या क्रांतीतून निर्माण होणाऱ्या राज्यपद्धतीबद्दलची भावुकता जशी होती त्याचप्रमाणे स्तालिनच्या हिकमती मुत्सद्देपणाबद्दलची श्रद्धाही होती. या श्रद्धेला स्तालिनच्या हत्याकांडामुळे तडा गेला नाही, फिन्लंडवरील रशियाच्या बेमुर्वतखोर तशाच अपयशी आक्रमणामुळे गेला नाही किंवा जर्मनी व रशिया यांच्यामधील युद्धकाळातील अनाक्रमणाच्या करारामुळेही गेला नाही. रॉय यांच्या दृष्टीने या तिन्ही घटना अपरिहार्यच होत्या आणि म्हणून भावनावश होऊन किंवा भूतदयेच्या भावनेने प्रेरित होऊन, किंवा सात्विक संतापाच्या आधीन होऊन त्यांनी —कम्युनिस्ट इंटरनॅशनलने त्यांच्याशी उभा दावा धरल्यानंतही— केव्हाही रशियाविरोधाचा पवित्रा घेतला नाही. उलट रशियातील परिस्थितीचे, रशियाविरुद्ध फॅसिझमने उभ्या केलेल्या अभेद्य फळीचे, लोकशाहीवादी राष्ट्रांच्या कमकुवत धोरणाचे निःपक्षपाती, पूर्वग्रहविरहित दृष्टीने निरीक्षण करून त्यांनी आपल्या विचक्षण प्रज्ञेने स्तालिनच्या त्या काळातील धोरणाचे व कृतीचे आपल्या परीने समर्थनच केले. त्या पडत्या काळात, सोव्हियट युनियनच्या अस्तित्वाबद्दलच शंका उत्पन्न झाली असताना आणि विजेत्या हिटलरचा उदोउदो करण्याची प्रवृत्ती सर्वत्र रूढ झाली असताना भारतात हा एकच एक मार्क्सवादी होता की ज्याने नात्सी-सोव्हियट करारावरील शाई वाळण्यापूर्वीच भाकित केले की जर्मनीचा रशियावरील हल्ला अटळ आहे, हिटलर आपल्या कट्टर शत्रूविरुद्ध —सोव्हियट युनियनविरुद्ध—अटीतटीने स्वारी केल्याशिवाय रहाणार नाही.

रॉय यांचे भाकित हिटलरवादी देशभक्तांनी तर हास्यास्पद मानलेच, पण परप्रत्ययनेय बुद्धीचे जे भारतातील कम्युनिस्ट या वेळी हिटलरला भाई म्हणून मिठी मारावयाला प्रवृत्त झाले होते त्यांनीही यावेळी रॉय यांना युद्धखोर मानून हिटलरच्या वतीने शांतीची जपमाळ ओढावयास सुरुवात केली. बिचारे भारतीय कम्युनिस्ट! त्यांना आपल्या भोवतालच्या परिस्थितीचा अंदाज बांधता येत नव्हता तर जगड्व्याळ युद्धातील क्षणोक्षणी बदलत्या धोरणांचा, पवित्र्यांचा, हिकमती आघात-प्रत्याघातांचा, दर्शनी आणि अंतरंगी भिन्न असणाऱ्या राजनीतीचा कयास काय करता येणार? रॉय यांच्या लेखनातून सूचना घेऊन ते मॉस्कोतील आपल्या देवदेवतांच्या मनोभूमिकेचा व कृतीचा शोध घेण्याचा प्रयत्न करीत. पण प्रत्यक्षपणे ते आपले विवेचन करीपर्यंत परिस्थिती आणखी बदलत असे. आणि पुन्हा एकदा

नाइलाजाने त्यांना रॉय यांच्यापासून ज्ञान व स्फूर्ती घेणे भाग पडत असे. अखेरीस २१ जून १९४१ रोजी हिटलरने रशियावर हल्ला केला तेव्हा त्यांना कळून आले की, रॉय हे जे भाकित करीत होते तो कल्पनाविलास नव्हता; ते एका प्रज्ञावंत राजकीय चिकित्सकाने दूरदृष्टीने केलेले परिस्थितीचे दिग्दर्शन होते. स्तालिनने हिटलरशी तात्पुरता तह करून आपली बचावफळी मजबूत व विस्तृत करावयाला कसा अवधी व अवसर मिळविला होता याचा साक्षात्कार रॉय यांना कित्येक दिवसांपूर्वी झाला होता. भारतातील कम्युनिस्टांना तो साक्षात्कार तर झाला नाहीच, पण 'लोकयुद्धाची' घोषणा करण्यासाठीसुद्धा पुढे त्यांना रॉय यांच्या लेखनावरून डोळे फिरवावे लागले. स्तालिनचे दुर्भाग्य असे की त्याचे पवित्रे आणि त्याचे यशापयश यांचे मूल्यमापन करण्याचे कार्य त्याने वाळीत टाकलेल्या एका पूर्वाश्रमीच्या सहकाऱ्यालाच करावे लागले. एम्. एन्. रॉय यांनी ते कार्य केले, भारतीय कम्युनिस्टांनी नव्हे. दुसऱ्या महायुद्धाच्या काळातच स्तालिनच्या कर्तृत्वाचे मूल्यमापन करताना रॉय यांनी 'लाल नेपोलियनवादा' शी लाल फौजेंच्या विजयी घोडदौडीची तूलना केली. रॉय यांच्या दुर्दैवाने त्यांनी ज्या लाल नेपोलियनचे स्वप्न आपल्या मनःचक्षूंसमोर रेखाटले होते तोही अखेर आपल्या महत्त्वाकांक्षेचा दास झाला आणि सत्तालोलुप होऊन त्याने सोव्हिएट समाजपद्धतीची सारी सुखस्वप्ने आणि नीतिमूल्ये चिरडून, कुसकरून टाकली. ती जाणीव झाल्यानंतर रॉय यांच्यासारख्या संवेदनाक्षम व्यक्तीला "हे फल काय मम तपाला" असे म्हणावयाची वेळ आली असेल तर त्यात काय नवल ?

# स्तालिनचे हत्याकांड आणि रॉय

'लाल नेपोलियनवादा'ची जी कल्पना रॉय यांनी पुढे मांडली तिच्यामागील भूमिका ही होती की मार्क्सवादी तत्त्वप्रणालीनुसार जी जगक्रांती अपेक्षित होती ती फसल्यानंतर समाजवादाचा जो बालेकिल्ला सोव्हिएट युनियनच्या रूपाने प्रस्थापित झाला होता त्या बालेकिल्ल्यातून बाहेर पडणाऱ्या मुक्तिफौजेलाच त्या क्रांतीचा, विजयी घोडदौड करून, प्रसार करणे अपरिहार्य आहे. ही अपरिहार्यता निर्माण झाली ती औद्योगिक दृष्ट्या पुढारलेल्या देशात ही समाजक्रांती घडून आली नाही म्हणून. स्तालिनने वास्तववादी दृष्टिकोण ठेवून या परिस्थितीचे विश्लेषण केले व जगत्क्रांतीच्या मृगजळामागे न लागता एका देशात समाजवाद प्रस्थापित करण्याचे नवे उद्दिष्ट आपल्या देशबांधवांपुढे व अनुयायांपुढे ठेवले. स्तालिन व ट्रॉट्स्की यांच्यामध्ये खराखुरा मतभेद झाला तो याच मुद्द्यावर. रशियन राज्यक्रांती घडून आल्यानंतर लेनिन आणि ट्रॉटस्की हे दोघेच त्या क्रांतीचे प्रणेते व सोव्हिएटच्या धोरणाचे प्रवक्ते म्हणून पुढे आले होते. पण लेनिन हा व्यवहारवादी आणि दूरवर विचार करून आपल्या धोरणात मुत्सद्दीपणाने बदल घडवून आणणारा नेता होता, ट्रॉट्स्कीचा दृष्टिकोण भावनोत्कट. आणि त्याच्या भावनेला स्पर्श करून जाणारी कल्पना एकच होती आणि ती म्हणजे शक्य तेवढ्या त्वरेने जगत्क्रांती घडवून आणणे. म्हणून चिरंतन क्रांतीचा त्याने पुरस्कार केला व सोव्हिएट राजवटीने तडजोडीचा आश्रय न घेता, अडीअडचणींना न जुमानता क्रांतीचे लोण साऱ्या जगभर पोचवावे हाच त्याने आग्रह धरला. सोव्हिएट युनियनच्या त्या काळच्या परिस्थितीत हे धोरण साहसवादीच नव्हे तर आत्मघातकी ठरले असते असे स्तालिनला वाटले व लेनिनच्या मृत्यूनंतर पक्षाची सूत्रे हाती येताच त्याने प्रथम अंतर्गत परिस्थिती सावरण्यावरच अधिक भर दिला. त्यातून स्तालिन व ट्रॉट्स्की यांच्यामधील संघर्ष निर्माण झाला व अखेरीस ट्रॉट्स्कीला देशोधडी लावूनच स्तालिनने ट्रॉट्स्कीविरुद्ध लढाई जिंकली.

स्तालिनच्या हत्याकांडाला तेव्हापासूनच सुरुवात झाली असे म्हणावयास हरकत नाही. क्रांती आपल्या अर्भकांचा बळी घेते असे म्हणतात. फ्रेंच राज्यक्रांतीत याचा प्रत्यय आला होता. रशियन राज्यक्रांतीत त्याचीच पुनरावृत्ती झाली. रॉय यांच्यासारख्या मानवतावादी व्यक्तीला क्रांतीचे हे उग्र-निष्ठुर स्वरूप पसंत पडणे

शक्य नव्हते. पण त्या वेळी सोव्हिएट राज्यव्यवस्था सुरक्षित रहाणे हे रॉय यांना अधिक महत्त्वाचे वाटत होते. त्या सुरक्षिततेला धोका आणणाऱ्या जर व्यक्तींच्या कृती होऊ लागल्या तर केवळ ते जुने क्रांतिकारक आहेत म्हणून त्यांची गय केली जावी असेही रॉय यांना वाटत नव्हते. स्तालिनचे हत्याकांड चालू असताना म्हणूनच ज्या वेळी संशयाने, मनाला धक्का बसून त्यांना प्रश्न केले जात तेव्हा ते एवढेच म्हणत की या हत्याकांडावरून सोव्हिएट राजवटीचे मूल्यमापन करू नका; जे होत आहे ते भावनेला धक्का देणारे असेल. पण सोव्हिएट राजवटीचे कर्तृत्व, मानवी प्रगतीवर त्यांचे होणारे परिणाम यांच्याकडे लक्ष देऊनच आपल्याला ते मूल्यमापन केले पाहिजे. ऐतिहासिक दृष्टिकोण ठेवूनच, त्या ऐतिहासिक घडामोडींच्या संबंधात स्तालिनच्या बऱ्यावाईट कृतीची पारख करणे बरे. रॉय हे काहीशा निर्लेप भावनेने या हत्याकांडाकडे पाहू शकले याचे खरे कारण असे आहे की त्या वेळी ते सोव्हिएट युनियनचे तसेच स्तालिनचेही अनन्यभक्त होते. मला आठवते एकदा ते म्हणाले होते, " क्रांती आपल्या अर्भकांचा बळी घेते हे खरे आहे. पण या वेळी अशी एक व्यक्ती क्रांतीच्या अग्रस्थानी आहे की अनेकांची डोकी ती धडावेगळी करीत असताना तिने एकटीने तरी आपले डोके अबाधित ठेवले आहे. "

रॉय यांनी रशियन राज्यक्रांतीतील सर्व नेत्यांना अगदी जवळून पाहिले होते. त्यांच्या गुणदोषांची त्यांना पुरेपूर कल्पना होती. यांपैकी काही नेते जसे महत्त्वाकांक्षी होते तसेच पाताळयंत्री, कारस्थानी होते. रॉय यांना हेही ठाऊक होते की झिनोव्हीव्ह, कॅमिनीव्ह यांच्यासारखे नेते संधिसाधुपणापायी रशियन राज्यक्रांतीच्या पाठीत खंजीर खुपसावयालाही मागेपुढे पहाणार नाहीत. सत्तेच्या जागी येणारा उन्माद आणि संकटाच्या वेळी प्रगट होणारी लाचारी यांचा त्यांच्या बाबतीत रॉय यांनी प्रत्यक्ष अनुभवही घेतला होता. म्हणून झिनोव्हीव्ह, कॅमिनीव्ह यांच्यावरील खटल्याच्या वेळी त्यांनी केलेले आत्मनिवेदन, नंतर केलेली क्षमायाचना, अधूनमधून राजकीय जीवनात ते घेत असलेल्या कोलाटचा उडचा यांच्याबद्दल रॉय यांना कधीही आश्चर्य वाटले नाही. अखेरीस सारी क्षमायाचना, पश्चात्तापाच्या भावनेने दिलेला कबुलीजबाब त्यांच्या आणि इतर अनेक पुढाऱ्यांच्या बाबतीत फलप्रद झाला नाही आणि पूर्वाश्रमीच्या कित्येक क्रांतिकारकांना स्तालिनच्या गोळीला बळी पडावे लागले. रॉय हे कधी कधी क्रांतिकारकांची यादी विमनस्क मनाने पहात असत आणि त्यांच्या तोंडून काहीना काही उद्गार बाहेर पडत असत. अशाच एका व्यक्तीच्या देहांताची वार्ता रॉय यांच्या कानी पडली असताना ते उद्गारले होते " गोळी खाण्याच्याही लायकीचा तो नव्हता. " त्यानंतर काही दिवसांनी सोव्हिएट तत्त्वज्ञानाचा एक प्रवक्ता कॉम्रेड बुखारीन याला देहांताची शिक्षा झाल्याचे रॉय यांच्या कानी आले. तेव्हा मात्र हळहळून ते म्हणाले होते, " अरेरे ! या सज्जनासाठी सोव्हिएट युनियन-

मधील एखादा कोपरा स्तालिनला शोधून काढता आला नसता का? हे कविहृदय कोठेही निवांतपणे, आपल्या जीवनाची संध्याकाळ घालवू शकले असते." रॉय यांना आणखी एक धक्का बसला तो त्यांच्या परिचयाच्या एका विलक्षण कर्तबगार आणि युद्धनिपुण सेनानीवर सुद्धा स्तालिनची संक्रांत आली तेव्हा. जनरल गॅलेन या नावाने तो सेनापती प्रख्यात होता. त्याचे खरे रशियन नाव काही वेगळेच होते. सैबेरिया-मधील रशियन सैन्यदल त्याच्या आधिपत्याखाली होते. रॉय यांना त्याच्या कर्तब-गारीबद्दल एवढा विश्वास होता की जनरल गॅलेनच्या आधारावर अतिपूर्वेची सारी आघाडी सुरक्षित ठेवता येईल असेच त्यांना वाटत होते. रॉय हे युद्धाच्या डावपेचात पारंगत होते हे युद्धकाळातील त्यांच्या विश्लेषणात्मक लेखमालेवरून पुढे प्रगट झाले. पण युद्ध सुरू होण्यापूर्वी सोव्हिएट युनियनला जर्मनी व जपान यांच्याशी दोन्ही आघाड्यांवर लढावे लागेल हे रॉय यांनी अचूक हेरले होते. तशी दुर्धर वेळ आली तर जनरल गॅलेन हा जपानी फौजेला सैबेरियामध्ये आतवर घुसू देऊन नंतर चढाईच्या धोरणाने तिचा विध्वंस करील असे रॉय यांनी भाकित केले होते. पण जनरल गॅलेन हा हिटलरची स्वारी होईपर्यंत अधिकारावरही राहिला नाही आणि जिवंतही राहिला नाही. जनरल तुखाचेव्हस्की यांच्यासह साऱ्या प्रमुख रशियन सेनापतींचे जे शिरकाण स्तालिनने केले, त्यात जनरल गॅलेन याचीही आहुती पडली. त्या दिवशी खिन्नपणे रॉय हे म्हणाले, "स्तालिनला झाले आहे तरी काय? त्याचा कोणावरच विश्वास राहिला नाही की काय?"

त्या क्षणी रॉय यांच्या मनात जो संशय आला, त्याने विकल्पाचे स्वरूप धारण केले नाही. कारण स्तालिनने हत्याकांड सुरू केल्यानंतर काही वर्षांनी दुसरे महायुद्ध आले आणि त्यावेळी सुद्धा रॉय यांचे मन पूर्वग्रहापासून पूर्णपणे अलिप्त आणि सोव्हिएट राजवटीच्या साऱ्या अडीअडचणींचा विचार करून त्या राजवटीबद्दल कमालीचा समजूतदार दृष्टिष्कोण ठेवणारेच राहिले होते. सोव्हिएटची आत्यंतिक गरज हीच त्या राजवटीच्या प्रत्येक कृतीचे मूल्यमापन करण्याची रॉय यांच्या मनातील प्रेरणा असे. सोव्हिएटने हिटलरशी करार केला. ठीक आहे. रॉय यांनी असे समर्थन केले की सोव्हिएटला आपल्या संरक्षणाच्या तयारीसाठी आणखी अवधी पाहिजे आणि म्हणून साम्राज्यशाही व फॅसिझम यांच्यामधील लढा तसाच चालू रहावा आणि आपण त्या लढ्यापासून अलिप्त रहावे असा स्तालिन प्रयत्न करीत आहे. त्या करारानुसार पोलंडची फाळणी झाली आणि त्याचा काही भाग सोव्हिएटने गिळंकृत केला. वस्तुतः सोव्हिएटच्या राजनीतीचा विचार करताना ती कृती त्या राज-नीतीशी विसंगत होती. पण रॉय यांनी अशी भूमिका घेतली की सोव्हिएट रशियाची बचावफळी आपल्या सरहद्दीपासून जितकी दूर नेता येईल तितकी न्यावी म्हणून स्तालिनने हा पवित्रा टाकला असावा. हिटलरच्या फौजांची धडक सोव्हिएटने

दुसऱ्याच्या भूमीवर सहन केली व पद्धतशीर माघार घेण्याच्या दृष्टीने हा पवित्रा सोइस्कर ठरला हे एक ऐतिहासिक सत्यच आहे. पण त्या काळात रॉय यांच्याखेरीज कोणत्याही मार्क्सवाद्याने स्तालिनच्या बचावासाठी असा आक्रमक पवित्रा घेतला नाही. रॉय यांची त्यात एवढीच इच्छा होती की हिटलर इतिहासाचे जे काटे मागे फिरवू पहात होता तो त्याचा प्रयत्न सोव्हिएत राजवटीच्या बाबतीत खरा ठरू नये. त्या दृष्टीने युद्धाचे समीक्षण करताना रॉय यांनी सोव्हिएट राजवटीने चुका केल्या तर त्या सावरून घेण्याच्या दृष्टीने विवेचन केले आणि त्या राजवटीने योग्य पाऊल टाकले तेव्हा जिव्हाळ्याच्या भावनेने त्याचा गौरव केला.

मार्क्सवादावरील निष्ठेतूनच रॉय यांच्या या भूमिकेचा उदय झाला होता हे नि:संकोचपणे कबूल केलेच पाहिजे. रॉय यांना त्याबद्दल कधी खंत वाटली नाही आणि पूर्वजीवनातील निरनिराळ्या स्थित्यंतरांचा विचार करताना त्यांनी कधीही निष्फळ बचावाची भूमिका घेतली नाही. आणि अपराधी भावनेने तर त्यांनी आपल्या जीवनाकडे कधीच पाहिले नाही. रॉय यांचे व्यक्तित्व, त्यांचे जीवन सारखे विकसित होत गेले. त्यांच्या मनाची घडणही अशी होती की त्यातील चैतन्य कधीच लुप्त झाले नाही. त्या चैतन्याचा साक्षात्कार त्या त्या वेळी त्या त्या राजकीय, सामाजिक, वैचारिक आंदोलनातून आणि त्या आंदोलनांना प्रेरणा देणाऱ्या विचारमंथनातून प्रगट झाला. ते विचारमंथन कोणाच्या बुद्धीला पटो वा न पटो, रॉय यांनी वेळोवेळी घेतलेल्या भूमिकेची झेप कोणाला सहन होवो वा न होवो, पण जे विचारी आहेत आणि वैचारिक क्रांतीकडे जे कौतुकाच्या भावनेने पाहू शकतात त्यांना रॉय यांच्या बुद्धिवैभवाची, त्यांच्या प्रतिभाशाली प्रज्ञेची आणि नवे, पुरोगामी, क्रांतिकारक विचार मांडण्यासाठी त्यांनी वेळोवेळी जे लोकोत्तर धैर्य दाखविले त्या धैर्याची प्रचीती आल्यावाचून राहणार नाही. एम्. एन्. रॉय हे कधीही स्थितिप्रिय झाले नाहीत, त्यांनी आपल्या मनाची कवाडेही कधी बंद केली नाहीत.

# दहशतवादाकडून मार्क्सवादाकडे

दुसऱ्या महायुद्धामधे अगदी अखेरपर्यंत रॉय यांनी सोव्हिएट नेतृत्वाला साथ दिली. इतक्या निष्ठेने की लाल सेना विजयी मोहीम विस्तारीत वेगाने एकेका पूर्वयुरपमधील देशावर कवजा प्रस्थापित करीत असताना रॉय यांनी 'लाल नेपोलियन' नावाशी त्या मोहिमेची तूलना करून सोव्हिएट युनियनच्या आक्रमक पवित्र्याभोवती उदात्ततेचे एक वलय निर्माण केले. रॉय यांनी या लाल फौजेला मुक्तिफौज असेच नाव दिले. मुक्तिफौज !–पिळवणुकीपासून मुक्त करणारी, नव्या समृद्ध, स्वतंत्र समाजाची प्रतिष्ठापना करणारी. रॉय यांना लाल सेनेच्या या मुक्तिकार्याबद्दल आशा व अपेक्षा वाटली ती यामुळे की आता सोव्हिएट राजवट विजयी झाली होती, निष्कंटक अवस्थेत साऱ्या जगाला दिलासा देण्याइतपत नैतिक अधिष्ठान तिला लाभले होते. आता रॉय हे स्तालिनकडून, इतर सोव्हिएट नेत्यांकडून अशी अपेक्षा करू लागले होते की, पाश्चिमात्य राष्ट्रांनीच नव्हे तर साऱ्या सुसंस्कृत जगाने हिटलरविरुद्ध होणाऱ्या सामन्यात सोव्हिएटला नि:संकोचपणे साथ दिली असल्यामुळे आणि विलक्षण उदारपणाने लष्करी व आर्थिक साहाय्य दिले असल्यामुळे सोव्हिएटच्या नेत्यांनी आता पोलादी पडद्याआडून बाहेर पडावे आणि विमुक्त जगात खुलेपणाने उभे राहून साऱ्या जगाचे नैतिक नेतृत्व आपल्या हाती घ्यावे. रॉय यांच्या मते आता पोलादी पडद्याची आवश्यकता राहिली नव्हती, सारे भांडवलदारी जग आपल्याविरुद्ध आपला नाश करण्यासाठी उभे ठाकले आहे असे मानून सोव्हिएट समाजाला युद्धसदृश परिस्थितीच्या बंधनात डांबून ठेवण्याचीही आवश्यकता राहिली नव्हती. आणि परकीय आक्रमण व अंतर्गत विरोध यांच्या भीतीने दहशतीच्या वातावरणात सारा सोव्हिएट समाज बाहेरच्या जगापासून अलिप्त आणि आचारविचार स्वातंत्र्याच्या दृष्टीने बंदिस्त ठेवण्याची तर मुळीच गरज राहिलेली नव्हती. फॅसिझमच्या पराभवात रॉय यांना लोकशाहीवादी, व्यक्तिस्वातंत्र्यवादी, पुरोगामी, विज्ञाननिष्ठ, सुसंस्कृत शक्तींच्या अनिर्बंध विकासाची क्षितीजे उजळून निघण्याचे पूर्वचिन्ह दिसत होते. लाल नेपोलियन हा आजवर परिस्थितीने लादलेल्या बंधनाचे कवच फोडून या शक्तीचे नेतृत्व स्वीकारण्यासाठी खुल्या जगात प्रसन्न हृदयाने, सहिष्णु भावनेने, आशावादी अंत:करणाने प्रगट होईल असे त्यांच्या मनोमनीचे सुखस्वप्न होते.

——पण त्या सुखस्वप्नांचा भंग झाला आणि स्तालिनबद्दलच्या रॉय यांच्या साऱ्या आकांक्षा धुळीस मिळाल्या. त्याबरोबरच मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचा, मानवी विकास साधण्याच्या बाबतीत आणि विशेषत: मानवी व्यक्तित्व उन्नत करण्याच्या दृष्टीने कितपत उपयोग होऊ शकेल याबद्दल मूलभूत संशयही रॉय यांच्या मनात जागृत झाला. परिस्थितीने, जीवनाच्या अनुभूतीने रॉय यांना पुन्हा एक जबरदस्त धक्का दिला होता——असा जबरदस्त की मानवी मूल्ये, जीवनातील उच्चत्तम मूल्ये यांच्या निकषांवर घासून आपले राजकीय व सामाजिक तत्त्वज्ञान निरखून पहाण्याची ऊर्मी रॉय यांच्या मनोमनी उसळून उठली. रॉय यांच्या बाबतीत एक गोष्ट विसरून चालणार नाही, आणि ती ही की ते कठोर बुद्धिवादी असले, कर्तव्यकठोर विचारवंत असले तरी त्यांचा स्वभावधर्म हा भावनोत्कट राहिला होता. या भावना जशा विचाराच्या तशाच सुसंस्कृततेच्या कोंदणात जडवलेल्या असत एवढेच. म्हणूनच त्यांच्या आचारविचारांत त्या कधी सवंग रीतीने प्रगट झाल्या नाहीत. पण दहशतवादी क्रांतीकडून मार्क्सवादी क्रांतीकडे त्यांनी पाऊल टाकले तेव्हाही विचाराबरोबरच भावनेनेही त्यांना मार्गदर्शन केले यात संशय नाही. त्या वेळची सर्वस्पर्शी भावना अशी की या दहशतवादातून हौतात्म्य प्राप्त होईल, पण क्रांतीचा पाया त्यातून कसा घातला जाईल ? मग रॉय यानी मनालाच प्रश्न केला की निष्फळ हौतात्म्य कशासाठी पत्करावयाचे व मौल्यवान जीवानाचे बळी का द्यावयाचे ? रॉय यांच्या हृदयाला स्पर्श करून जाणारे एक बलिदान जतीन मुकर्जी यांनी चितगावजवळच्या अरण्यात ब्रिटिश पोलिसांशी सरळ सरळ लढाई करून दिलेल्या प्राणार्पणात घडून आले होते. रॉय यांना क्रांतिकारक आंदोलनात ओढले ते जतीन मुकर्जी यांनी. शूर, निधड्या छातीचे पराक्रमी वीर होते जतीन मुकर्जी. त्यांच्या पराक्रमाची जाण ठेवूनच त्यांचे अनुयायी त्यांना "वागा (बंडखोर) मुकर्जी' म्हणत असत. रॉय हे त्यांच्या पराक्रमाच्या, कल्पकतेच्या, बुद्धिमत्तेच्या कहाण्या नेहमीच रसभरितपणे आणि भावनोत्कटतेने सांगत असत. गुरुस्थानी रॉय यांनी प्रथम कोणाला मानले असेल तर जतीन मुकर्जी यांना. पुढील आयुष्यात त्याच प्रकारचा आदरभाव त्यांना फक्त लेनिनच्या बाबतीत वाटला. पण वागा मुकर्जी यांच्यावरील त्यांचे प्रेमही निर्व्याज आणि त्यांच्याविषयीचा आदरभावही असा निष्ठेचा की जतीनबाबूंचा अमोल जीव वाचविण्यासाठी रॉय यांनी आपल्या स्वत:च्या प्राणाचे मोल दिले असते.

जतीन बाबूंच्या बलिदानानेच रॉय यांना दहशतवादी क्रांतीच्या इष्टानिष्टतेबद्दल विचारप्रवण केले. ते विचार करू लागले की या दहशतवादातून व्यक्तींचे बळी घेता येतील, पण सरकारची जी यंत्रणा आहे तिला कसा धक्का पोचेल ? व्यक्तींच्या जागी दुसऱ्या व्यक्ती अधिकारारूढ होतील आणि ती यंत्रणा चालूच राहील. दहशतवादाचा आश्रय घेणारे क्रांतिकारकही क्षणभर तेजाने चमकतील, आसमंत त्यांच्या त्यागाने

दिपून जाईल. पण व्यक्तींवर व्यक्तींनी केलेले हे हल्ले. यंत्रणेवर अधिकार गाजविणाऱ्या व्यक्तींची जागा भरून काढण्याच्या बाबतीत उणीव राहणार नाही. तेव्हा सामुदायिक आंदोलन झाल्याशिवाय यंत्रणेला धक्का कसा बसेल ? रॉय हे म्हणूनच व्यक्तिगत दहशतवादाकडून सामुदायिक आंदोलनाकडे वळले. त्यांच्या मतपरिवर्तनाला चालना मिळाली ती आणखी एका गोष्टीमुळे. दहशतवादी आंदोलनात सहभागी होणारे बहुसंख्य क्रांतिकारक हे धार्मिक प्रवृत्तीचे असत. म्हणजे नुसतेच धर्माबद्दल आस्था असणारे नव्हते. तर धार्मिकतेच्या कर्मकांडावर श्रद्धा असणारे, अघोरी उपायांनी देवदेवतांना प्रसन्न करू पाहणारे, आध्यात्मिकतेत, गूढवादात रस घेणारे भक्तगण असत. रॉय हे राजकीय क्रांतीचे उपासक म्हणून दहशतवादाकडे वळले होते. त्यांना कालीमातेची भक्ती मान्य नव्हती, उपासतापास आणि रक्ताने सह्या करणे आणि अमावास्येच्या मध्यरात्री भुताखेतांशी हितगुज करणे वगैरे आचार प्रथमपासूनच त्यांना निषिद्ध वाटत असत. त्यांचा पिंडच मुळी लहानपणापासून बुद्धिवादी होता. एका सनातनी ब्राह्मण पुजाऱ्याच्या घरात जन्माला येऊनही पाखंडाचे जणु त्यांना बाळकडू पाजले गेले होते म्हणाना. त्यांच्याबद्दलची जी एक दंतकथा रूढ आहे की बालवयातच एकदा त्यांनी देवमूर्ती उचलून फेकून दिली ती खरी की खोटी कोण जाणे, पण रॉय यांच्या क्रांतिकारक जीवनातील सारी बंडखोरी पाहिली तर दहशतवादी आंदोलनातील धार्मिकतेचे अवडंबर पाहून त्यांचे मन खवळून उठले असले तर त्यात नवल वाटण्याचे कारण नाही.

एम्. एन्. रॉय हे दहशतवादाकडून मार्क्सवादाकडे वळले याचे कारण असे की मार्क्सवादामध्ये एक सामाजिक आशय त्यांना आढळला. व्यक्तीची नव्हे तर साऱ्या जनतेची चैतन्यशक्ती एकवटून सामाजिक कल्याण साधण्याचा एक मार्ग त्यांना त्या तत्त्वज्ञानात दिसून आला. त्यांना असे वाटले की आपण स्वातंत्र्यप्राप्तीसाठी दहशतवादाचा मार्ग स्वीकारला. पण त्या दहशतवादात सामाजिक शक्तीला आवाहन नव्हते. येथे मार्क्सवाद मुळी सबंध जनसमूहालाच क्रांतीच्या लढाईत समाविष्ट करून घेत आहे. शिवाय त्यातून नुसती स्वातंत्र्यप्राप्तीच होणार नाही तर जनतेची पिळवणूक करणाऱ्या वर्गाचेही आधिपत्य ते तत्त्वज्ञान नष्ट करणार आहे. कशासाठी ? तर शोषणरहित, वर्गरहित, समानतेवर आधारलेली, समृद्धीचा मार्ग दाखवून देणारी, व्यक्तिजीवनाचा विकास साधणारी समाजरचना अस्तित्वात आणण्यासाठी. रॉय यांना हे उद्दिष्ट आकर्षक वाटले. मार्क्सवादी क्रांती हे मानवी समाजाच्या विकासातील एक पुढचे पाऊल होय हीच त्यांची मनोमन धारणा झाली आणि त्यांनी सोव्हियट राजवटीच्या, मार्क्सवादी तत्त्वज्ञानाच्या आणि कम्युनिस्ट पक्षाच्या पुरस्कारासाठी आपले सर्वस्व पुढील काळात पणास लावले. रॉय यांच्या व्यक्तिजीवनातील हा दुसरा महत्त्वाचा टप्पा होता. जवळ जवळ दोन

तपापेक्षा अधिक काळ त्यांनी मानवी इतिहासातील एका प्रयोगाचे परिशीलन, विवेचन आणि गुणवर्णन करण्यासाठी घालविला. सोव्हिएट क्रांती हीच मुळी केवढी ऊर्जस्वल घटना. झारचे सिंहासन त्या क्रांतीने खाली ओढले. सरंजामशाही नष्ट करून शेतकऱ्यांना विमुक्त केले. पिळवणुकीवर आधारलेल्या भांडवलशाहीला मूठमाती देऊन उत्पादनसाधने कामगारांच्या मालकीची केली. फ्रेंच राज्यक्रांतीने अपुरे ठेवलेले कार्य रशियन क्रांतीने पुरे केले. आता पिळवणूक नाहीशी झाली होती. श्रमजीवी जनतेच्या उद्धाराचा आणि विकासाचा मार्ग मोकळा झाला होता. आता वर्गरहित समाज अस्तित्वात आला होता. समतेचे राज्य सुरू झाले होते. सारे जग या क्रांतीच्या आविष्काराने दिपून मोहून गेले होते. मग रॉय यांच्यासारखे संस्कारक्षम मन त्या क्रांतीने प्रभावित झाल्याशिवाय कसे राहील ?

रॉय हे त्या क्रांतीचे पुरस्कर्ते झाले इतकेच नव्हे तर भाष्यकार झाले. त्यांनी या क्रांतीच्या बाल्यावस्थेतील साऱ्या अनुभवांचा, अडीअडचणींचा, संकटांचा, त्या क्रांतीतून निर्माण झालेल्या सामाजिक समतेचा आणि व्यक्तिगत विषमतेचा, क्रांतीने धारण केलेल्या उदात्त, उग्र तशाच निष्ठुर स्वरूपाचा, नेतृत्वाच्या धीरोदात्ततेचा तसाच त्यामधील हीनतम, पराकाष्ठेच्या तामसी आणि खुनशी प्रवृत्तींचा, भांडवलदारी जगाने केलेल्या क्रांतिविरोधी कारस्थानांचा, तसाच क्रांतीच्या उपासकांनी दाखविलेल्या उन्मत्त अहंकाराचा आपल्या लेखनातून परामर्श घेतला. रॉय यांनी या दृष्टीने केलेली कामगिरी ही दुसऱ्या कोणत्याही इतर मार्क्सवाद्यापेक्षा अधिक मोलाची ठरल्याशिवाय रहाणार नाही. कारण इतर मार्क्सवादी पंडितांना सुद्धा ज्या घटनांचे, व्यवहाराचे स्वरूप आकलन होऊ शकत नसे त्याचे स्पष्टीकरण रॉय हे निर्णायक रीतीने करताना आढळून येत असत. त्या स्पष्टीकरणामागील रॉय यांची सर्वसाधारण भूमिका अशी की मानवी जीवनाच्या प्रगतीवरील आणखी एक टप्पा या क्रांतीने गाठला आहे. त्या टप्प्यावरून क्रांतीचे मूल्यमापन करताना तिच्यातील दोषांचे दिग्दर्शन करणे इष्ट नाही. प्रतिक्रान्ती घडून आली तर इतिहासाचे काटे मागे फिरविले जातील, प्रगतीची वाटचाल उलट दिशेने होऊ लागेल. त्याऐवजी क्रांतीच्या उन्मेषाच्या व उन्मादाच्या काळात घडून येणाऱ्या प्रमादांकडे थोडीशी डोळेझाक करण्यात आली, निदान सहानुभूतीने त्याकडे पाहिले गेले तर समृद्ध समाज व सुबुद्ध, सुसंकृत परिपूर्ण मानव निर्माण करण्याच्या बाबतीत कालांतराने क्रांतीचे प्रवर्तक अनुभवातून काही धडा घेतील आणि क्रांतीच्या बचावासाठी प्रथम अंगिकारलेल्या अनियंत्रित हुकुमशाहीपासून परावृत्त होऊन मानवाच्या, नव्हे व्यक्तीमात्राच्या जीवनाचे पावित्र्य व स्वातंत्र्य अबाधित ठेवणे हेच आपल्या क्रांतीचे ते उद्दिष्ट ठेवू लागतील व त्या दृष्टीने आपल्या आचार-विचारांत, व्यवहारांत फेरबदल घडवून आणतील. शोषणविरहित, वर्गविहीन समाजाचा मध्यबिंदू माणूस

हाच राहिला पाहिजे हीच रॉय यांची धारणा होती. त्या माणसावर समाजाच्या हितासाठी बंधने लादली गेली तरी ती तात्पुरती असावयाला पाहिजेत असेच रॉय यांचे मत होते. धोरण म्हणून त्यांनी काही काळ त्या बंधनांचा स्वीकार केला. पण दुसऱ्या महायुद्धानंतर जेव्हा सोव्हिएट युनियन सर्व गंडातरापासून मुक्त झाले आणि जगाचे नैतिक नेतृत्व सोव्हिएटच्या पायाशी चालत आले तेव्हा मात्र रॉय यांना मनोमनी असे वाटू लागले की आता ही बंधने सैल व्हावी, आता पोलादी पडदा इतिहासजमा व्हावा, आता सभोवारच्या सुसंस्कृत लोकशाहीवादी जगाशी सोव्हिएट युनियनमधील नव्या जगाचा सुसंवाद निर्माण व्हावा. मार्क्सवादी क्रांतीची परिणती विमुक्त समाजातून व्हावी आणि विमुक्त मानवाच्या आधिभौतिक, बौद्धिक व भावनात्मक आशा–आकांक्षांचे, आवडीचे ती प्रतीक बनावी हीच रॉय यांची युद्धोत्तर काळातील सर्वोच्च इच्छा व आकांक्षा होती.

ती आकांक्षा धुळीस मिळाली म्हणूनच मार्क्सवादी रॉय यांना मार्क्स-वादाच्या पलीकडे जाऊन एका नव्या तत्त्वप्रणालीचा पुरस्कार करणे भाग पडले.

# मार्क्सवादाच्या पलिकडे

मार्क्सवादी रॉय हे मार्क्सवादाच्या पलिकडे गेले पण अलिकडे आले नाहीत हे त्यांचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य मानावे लागेल. अनेक कम्युनिस्ट त्यापूर्वी आणि नंतर फुटले ते व्यक्तिगत कडवटपणा मनात धारण करून. त्यांच्यापैकी कित्येक जणांनी सोव्हिएट राजवटीच्या अत्याचाराची, अमानुषतेची सारी जबाबदारी स्तालिनवर टाकली आणि स्तालिनला खाली ओढण्याकडेच आपले सारे लक्ष केंद्रित केले. मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचा हा अंगभूत दोष असू शकतो हे त्यांनी कधी मान्य केले नाही. लिऑं ट्रॉटस्की आणि त्यांचा गट हे याचे सर्वोत्कृष्ट उदाहरण आहे. त्यांचा दावा हा की स्तालिनने मार्क्सवादाचे विडंबन केले; मार्क्सवाद हे तसे निर्दोष तत्त्वज्ञान आहे. जे कम्युनिस्ट अधिकृत गटातून बाहेर पडूनही त्याच पंथाचे उपासक राहिले त्यांचा एक स्वतंत्र पंथच तयार झाला आहे. पण जो मार्क्सवादीच राहिला आहे. दुसरे काही कम्युनिस्ट फुटून बाहेर पडले ते इतके कडवट झाले की त्यांना मार्क्सवादाचे नुसते वावडे वाटले नाही तर भांडवलशाही व तिचा विकृत स्वरूपात प्रगट होणारा आविष्कार म्हणजे फॅसिझम हासुद्धा कम्युनिझमपेक्षा त्यांना ग्राह्य वाटला. फ्रान्समधील जॅकस दोरियो व त्याच्यासारखे असंख्य लोक यांचा समावेश त्या गटात करता येईल. एकेकाळचे हे कडवे कम्युनिस्ट मार्क्सवादाच्या अलीकडे आले, प्रतिगामित्वाचे ते पुरस्कर्ते बनले.

एम्. एन्. रॉय यांचा पंथच वेगळा. त्यांनी मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचे सोव्हिएट युनियनमधील पार्श्वभूमीवर परिशीलन केले आणि त्यांना आढळून आले की स्तालिनने जे अत्याचार केले, जी अमानुषता दाखविली ती काही प्रमाणात टाळता आली असती हे खरे आहे. पण मार्क्सवादी तत्त्वज्ञानात व्यक्तिजीवाला, मानवी मन व भावना यांना वावच कोठे आहे तर स्तालिनने त्याची जाण राखावी ? समाज, समुदाय, सामुदायिक जीवन, सामुदायिक प्रेरणा, सामुदायिक हित यांचाच त्या तत्त्वज्ञानाने उदोउदो केला आहे. त्या तत्त्वज्ञानाच्या प्रेरणेनुसार व्यक्तिजीवन नष्ट झाले तर त्याचा दोष एकटचा स्तालिनला वा त्याच्या राजवटीला कसा देता येईल ? स्तालिनच्या जागी दुसरे मार्क्सवादी आले असते तर त्यांनी मार्क्सच्या नावाने स्तालिन व त्याचे भक्तगण यांचे शिरकाण केले असते एवढेच. म्हणूनच रॉय यांनी अशी भूमिका घेतली की मार्क्सवादी तत्त्वज्ञानातील मूलभूत उणीवा

दूर करून त्यांच्या पायावर एक नवी तत्त्वप्रणाली विशद करणे हाच उध्वस्त होणाऱ्या मानवी जीवनाला दिलासा देण्याचा मार्ग होय. हा दिलासा हवा होता तो समुदायाला नव्हे तर मानवाला—व्यक्तिमात्राला. माणूस हाच जर तत्त्वज्ञानाच्या अभिनिवेशात विसरला गेला, परागंदा होऊ लागला तर व्यक्तीची, तशीच समाजाची उन्नती साधली जाणार कशी ? मार्क्सवाद्यांना असा उन्माद आला होता की अधिकारारूढ झाल्यानंतर आपल्याला माणुसकीने वागले पाहिजे, मानवी जीवनात परंपरेने जी मूल्ये चालत आलेली आहेत ती जतन केली पाहिजेत, नीती, चारित्र्य, संस्कार यांचे अस्तित्व मान्य केले पाहिजे याची मुळी त्यांना आठवणच राहिली नव्हती. माणस हा त्यांच्या दृष्टीने एक यंत्राचा घटकावयवच बनला होता. मग त्याला मन कोठले असणार ? भावना कोठल्या असणार ? त्यातून जी वृत्ती, जी समाजपद्धती निर्माण झाली ती फक्त सत्तेला मान देणारी, निरंकुश सत्तेचा आग्रह धरणारी. ही निरंकुश सत्ता स्तालिन आणि कम्युनिस्ट पक्षाने गाजविली ती समाजाचे हित साधण्याच्या नावाने, बहुजनहित, बहुजनसुख साधण्याच्या अभिनिवेषाने. पण अखेरीस ते हित व सुख साधणे बाजूलाच राहिले. फक्त हित साधले गेले ते अधिराज्य गाजविणाऱ्या मूठभर नेत्यांचे. बाकी बळी पडली ती व्यक्ती, तिचे समाधान आणि स्वातंत्र्य.

एम्. एन्. रॉय हे म्हणूनच मार्क्सवादापासून दूर गेले. सत्तेच्या राजकारणापासून दूर गेले. त्यातच रॉय यांनी इतर मार्क्सवाद्यांपेक्षा निराळा पायंडा घातला. मार्क्सवादाचा अपुरेपणा जाणवल्याबरोबर ते भांडवलशाहीचे किंवा जुन्या जमान्याचे पुरस्कर्ते बनले नाहीत. त्यांनी उलट ठासून सांगितले की रशियन क्रांतीच्या कर्तृत्वाची जाण ठेवूनच, त्या क्रांतीच्या मुशीतूनच नवा विज्ञाननिष्ठ आणि मानवतावादी असा समाज आपण निर्माण करावयाला पाहिजे की ज्या समाजात मनुष्य हा केंद्रस्थानी आरूढ होईल आणि मनुष्याचे जीवन इतके उन्नत आणि स्वतंत्र होईल की निसर्ग काबूत आणण्यासाठीच त्याची श्रमशक्ती खर्ची पडेल. रॉय यांच्या डोळ्यांसमोर ज्या मानवी व्यक्तित्वाचे चित्र उभे राहिले ते काव्यशास्त्रविनोदात रममाण होणाऱ्या, गतानुगतिक होऊन बाबावाक्य प्रमाण न मानता संशोधनाची व चिकित्सेची दृष्टी ठेवणाऱ्या, भावनेवर विवेकाचे नियंत्रण असले पाहिजे असे मानणाऱ्या, आणि लोकानुराधनाऐवजी सत्याचा शोध घेण्यासाठी प्रसंगी लोकक्षोभही ओढवून घेणाऱ्या व्यक्तित्वाचे. रॉय यांना कळेना की नेतृत्वाने लोकांना आवडेल, त्यांच्या भावनांशी समरसता साधेल अशीच भूमिका का घ्यावी? यातून लोकांचे मार्गदर्शन होणार नाही तर लोकप्रवाहाबरोबर नेतृत्व वाहवत जाईल. युद्धकाळात हिटलर आणि फॅसिझम हे याच मार्गाने लोकप्रिय झाले. कारण ( Lebensraum ) राहण्यासाठी जागा हवी या घोषणेनुसार आक्रमणाचा

जो मार्ग हिटलरने दाखविला तो जर्मन समाजाच्या भावनेला स्पर्श करून गेला. पुढे हिटलरचे अनुयायित्व जगभर असंख्य लोकांनी स्वीकारले ते त्याच्या सामर्थ्याने दिपून जाऊन. मग हिटलरच्या तत्त्वप्रणालीमुळे लोकशाहीवादी व सुसंस्कृत जगावर केवढे संकट कोसळणार आहे याचा विचारही कोणाला करावासा वाटला नाही. ही नुसती भावनोत्कटता होती. त्यात विवेकाला स्थान नव्हते. एम्. एन्. रॉय हे भारतात तरी एकटेच असे द्रष्टे निघाले की ज्यांनी विवेकाची कास सोडली नाही आणि फॅसिझमविरुद्ध व लोकशाहीच्या संरक्षणासाठी ते लोकक्षोभाची पर्वा न करता दंड थोपटून उभे राहिले.

रॉय हे मार्क्सवादाच्या पलिकडे गेले तेही सोव्हिएट राजवटीने प्रगतिशील स्वातंत्र्याचा मार्ग सोडून पाशवी सत्तेच्या साहाय्याने मानवी स्वातंत्र्याचे अपहरण करण्याचे पद्धतशीर धोरण स्वीकारले तेव्हा त्यांना हे कळेना की सत्ता टिकविणे, तिची व्याप्ती वाढविणे, हेच सोव्हिएट राजवटीने आपले उद्दिष्ट का मानावे ? आणि त्यासाठी मतस्वातंत्र्य, प्रचारस्वातंत्र्य, मुद्रणस्वातंत्र्य, नव्हे आपल्या सदसद्विवेकबुद्धीला पटेल ते मत पुकारण्याचे स्वातंत्र्यही हिरावून का घेतले जावे ? फॅसिझमने अशीच स्वातंत्र्याची गळचेपी केली. आता कम्युनिझमने फॅसिझमला खाली मान घालायला लावणारी दडपशाही व हुकुमशाही गाजवावी काय ? मग ज्या लोकशाहीसाठी आपण लढलो, तो लढा व्यर्थच गेला की काय ? लोकशाही ही रॉय यांना समाजरचनेतील सर्वश्रेष्ठ पद्धती वाटत असे. कारण त्या पद्धतीत लोकांचे, लोकांनी चालविलेले, लोकांसाठी झटणारे राज्य प्रस्थापित होते. रॉय यांना अभिप्रेत होती ती औपचारिक लोकशाही नव्हे. त्यांना अशी लोकशाही हवी होती की जीत बहुजनसमाज हा जाणीवपूर्वक आपल्या राज्यकारभाराला हातभार लावू शकेल व स्वतःच्या उद्धाराबरोबर समाजाची भौतिक, आध्यात्मिक व नैतिक पातळी उंचावू शकेल. औपचारिक लोकशाहीत केवळ मतदानाचा अधिकार जनतेला ठराविक मुदतीने अंमलात आणता येतो आणि बाकीच्या वेळी आपल्या प्रतिनिधीवर या लोकनियुक्त सरकारवर जनतेला परिणामकारक अधिकार गाजविता येत नाही याची रॉय यांना जाणीव होती. म्हणून सोव्हिएट राजवटीने जनतेची लोकशाही ( Peoples' Democracy ) प्रस्थापित करण्यासाठी चंग बांधला तेव्हा रॉय यांनी अशी प्रामाणिक समजूत करून घेतली की समाजरचनेच्या बाबतीत हे पुढले पाऊल मानावयाला हरकत नाही. पण जनतेच्या लोकशाहीत जनता ही राज्यकर्त्या कम्युनिस्ट गटाची फक्त वटीक तेवढी बनते हे रॉय यांना अनुभवाने दिसून आल्यानंतर या लोकशाहीचा पुरस्कार करणाऱ्या तत्त्वप्रणालीचा त्याग करावयाला ते प्रवृत्त झाले.

त्या तत्त्वप्रणालीचा, म्हणजे मार्क्सवादाचा रॉय यांनी त्याग केला तो कडवट-

पणाच्या भावनेने नव्हे, आणि आकसाने तर त्याहीपेक्षा नव्हे. रॉय यांची मनोरचनाच अशी होती की तीत आकसाला, विद्वेषाला जागाच नसे. त्यांनी टीका केली, कठोर टीका केली अनेक लोकांवर. पण त्यात प्रतिबिंबित होत असत ते तात्त्विक मतभेद. व्यक्तिनिंदेचा त्यांनी कधीही आश्रय घेतला नाही. आणि टीकेचा भडिमार करतानाही ऐतिहासिक, शास्त्रशुद्ध दृष्टिकोण त्यांनी कधी सोडला नाही. रशियन राज्यक्रांती ही मानवी इतिहासाच्या प्रगतिपथावरील एक टप्पा होय असेच रॉय यांनी मानले आणि म्हणूनच त्या राज्यक्रांतीची परिणती बेदरकार हुकुमशाहीत झालेली आढळून आली तेव्हा त्यांचे मन खिन्न झाले खरे, पण त्या क्रांतीचा विध्वंस करणे हे आपल्या जीवनाचे इतिकर्तव्य मानण्याकडे त्यांची प्रवृत्ती झाली नाही. स्तालिनवादाच्या उन्मादाच्या काळात त्यांना एकदा कोणी म्हटले की यापेक्षा फॅसिझमचा विजय झाला असता तरी काय बिघडले असते ? स्तालिनवाद व फॅसिझम यात फरक तरी कोणता राहिला आहे ? त्यावर रॉय यांनी लगेच उत्तर दिले होते, " मार्क्सवादाचा हा प्रयोग परिणामाच्या दृष्टीने आपल्या मनासारखा परिणत झाला नसला तरी त्याचा अर्थ असा नव्हे की आपण जाणीवपूर्वक घड्याळाचे काटे मागे सरकावण्याचा प्रयत्न करावा. फॅसिझमची तुम्हांला कल्पना नाही म्हणून तुम्ही असे बोलता. पण फॅसिझमचा विजय झाला असता तर मानवी स्वातंत्र्य आणि व्यक्तित्व जळून खाक झाले असते. त्याच्या उलट रशियन राज्यक्रांतीने आर्थिक पिळवणुकीचा अंत करण्याचे बीज पेरून मानवाच्या प्रगतीचा जो मार्ग खुला केला आहे त्यातून आज ना उद्या उदार मतवादित्वाचे पीक उगवल्यावाचून रहाणार नाही." आणि मग रॉय किंचित हसून म्हणाले होते, " काही का असेना, पण लोकशाहीवादी राष्ट्रे आणि सोव्हिएट युनियन यांच्या सहकार्याने फॅसिझमचे संकट टळले आणि हे निदान निम्मे जग तरी लोकशाहीसाठी मोकळे राहिले आहे ना ? बस्स. तेवढ्या कर्तृत्वासाठी तरी आपण सोव्हिएट युनियनचे ऋणी का राहू नये ? "

सोव्हियट युनियनच्या ऋणात जगाला याहीपेक्षा अधिक प्रमाणात रहावे लागावे अशी रॉय यांची मनोमन इच्छा होती. त्यांना असे वाटले होते की आता परचक्र निवारण झाल्यानंतर सोव्हिएट युनियन विमुक्तीचा संदेश देत बाहेरच्या जगाशी सहजीवन प्रस्थापित करील. आणि मानवी प्रगतीचे अत्युच्च शिखर गाठण्याच्या बाबतीत या दोन समाजपद्धतींत निरोगी स्पर्धा निर्माण होईल व त्यातून सुखी, समृद्ध, सुसंस्कृत असे विश्व निर्माण होईल. पण रॉय यांची ही आकांक्षा फोल ठरली. त्यांचे सुखस्वप्न वाऱ्यावर विरून गेले. कारण स्तालिनवादाने सहजीवनाकडे आणि शांतीकडे पाठ फिरविली आणि साऱ्या जगाला विमुक्त करण्याऐवजी बंदिस्त करण्याचीच महत्त्वाकांक्षा धारण केली.

एम्. एन्. रॉय हे मार्क्सवादाच्या पलिकडे गेले त्याचे कारण एकच होय.

आणि ते हे की मार्क्सवादी तत्त्वज्ञान हे आता प्रगतिकारक राहिले नव्हते; मार्क्स-वाद्यांनी त्या तत्त्वज्ञानातून धार्मिक कर्मकांड निर्माण केले होते आणि मानवी मनाचा सारा संकुचितपणा, असहिष्णुता आणि उन्माद हाच त्या तत्त्वज्ञानातून मूर्तरूप घेताना दिसू लागला होता. मानवी मनाची ही विटंबना रॉय यांच्यासारख्या मानवतावाद्याला सहन होणे शक्य नव्हते. त्यांनी मार्क्सवादाचा निरोप घेतला व विज्ञाननिष्ठ मानवतावादासाठीच आपले जीवन खर्ची घालण्याकरिता कंबर कसली.

# माणुसकीचा शोध

रॉय यांनी ज्या विज्ञाननिष्ठ मानवतावादाचा पुरस्कार केला ती एक नवी तत्त्व-प्रणाली मानण्याचे कारण नाही. रॉय यांचे सबंध जीवन सुखाचा, स्वातंत्र्याचा, समृद्धीचा शोध घेण्यासाठीच खर्ची पडले होते. हा शोध ते व्यक्तिगत सुखासाठी घेत नव्हते. मानवी सृष्टीमध्ये प्रगती व्हावी, मानवी जीवन सुखी व्हावे, आधि-भौतिक प्रगतीबरोबरच मानवाला आत्मिक समाधानही लाभावे यासाठीच एकेका तत्त्वप्रणालीचा ते अनुभव घेत होते. हे अनुभव जसे सुखाचे तसेच दुःखाचे, आशेचे, तसेच निराशेचे होते. रॉय यांनी त्या अनुभवांतूनच आपली एक जीवन-नष्टा तयार केली. आणि त्या जीवननिष्ठेला साथ देऊ पाहणारी एक समाज-रचना, निदान एक विचारपंथ, निदान सहानुभूतीचे बंध असलेला सहकाऱ्यांचा एक गट निर्माण करण्याची त्यांनी आकांक्षा ठेवली. रॉय हे समुदायाचे नेते होऊच शकत नव्हते. विचारवंतांचे ते अग्रणी झाले हेच त्यांच्या जीवनाचे यश होय. अर्थात राजकीय आंदोलनाचे, सामुदायिक चळवळीचे पुढारीपण त्यांनी घेतले, नाही असे नाही. पण वैचारिक निष्ठेला अग्रस्थान देणाऱ्या आणि मानवी प्रगतीसाठी प्रसंगी अप्रिय असे सत्य कथन करणाऱ्या नेत्यांना सवंग राजकारणाच्या धकाधकीत आपले आसन टिकवून धरणे कठीणच जाते. रॉय यांना याची खंत नव्हती. म्हणून सामाजिक बंडखोरीचा आश्रय घेताना लोकमतापासून आपण दूर जात आहो, शिष्टसंमत मार्गापासून विचलित झाल्यामुळे आपण एकाकी पडत आहोत हे स्पष्ट दिसत असताना त्यांनी कधी आपल्या तत्त्वाशी द्रोह केला नाही.

रॉय हे त्या वेळच्या म्हणा किंवा आजच्याही म्हणा, सामाजिक वा राजकीय आचारविचारांच्या मानाने बरेच पुढारलेले दिसून येतील. इतके की त्यांच्या व एकंदर रूढ विचारांत कित्येक योजनांचे अंतर असलेले आढळून येईल. रॉय यांचे वैशिष्ट्य असे की आपले विचार त्यांनी नेहमीच निधडेपणाने पुढे मांडले आणि आपले आचरणही त्या विचारांना अनुरूप असेच त्यांनी ठेवले. राजकीय क्षेत्रात तात्त्विक दृष्टीने तडजोड करण्याची जी प्रथा पडलेली आहे ती रॉय यांना कधीही मान्य नव्हती. ते त्याला राजकीय संधिसाधूपणाच म्हणत असत. राजकारणात निष्ठा एक, तिच्याबद्दलची घोषणा वेगळी आणि आचरण तिसऱ्याच प्रकारचे असा प्रकार दिसून येतो. तेथे शब्दांना मनामध्ये एक अर्थ असतो व आचारात दुसरा दिसतो.

एम्. एन्. रॉय यांनी शास्त्रशुद्ध दृष्टिकोण ठेवण्यासाठी जो आग्रह धरला त्याचा साधा अर्थ असा की राजकीय व सामाजिक नेत्यांनी आपल्या विचारांशी निष्ठा ठेवावी; राजकीय हितासाठी, किंवा प्रतिष्ठेसाठी, म्हणजेच सवंग लोकप्रियतेसाठी, तत्त्वाशी तडजोड करू नये. रॉय यांची सामाजिक प्रगतीकडे पाहाण्याची एक स्पष्ट अशी दृष्टी होती, समाज उन्नत व्हावा म्हणून कोणत्या रूढी व कोणती बंधने नष्ट करणे आवश्यक आहे याची स्पष्ट कल्पना त्यांनी मनासमोर आखलेली होती. त्या दृष्टीने आणि त्या कल्पनेनुसार रॉय यांनी ज्या मूलभूत गोष्टीवर भर दिला ती ही की माणसाचे हित हे केंद्रस्थानी धरूनच सामाजिक व्यवहारांची दिशा आखली गेली पाहिजे व राजकीय उद्दिष्टांचा विचार केला गेला पाहिजे. त्यांच्या दृष्टीने राज-कारणाचा हेतू काय ? तर मानवी जीवन सुधारणे. स्वातंत्र्य म्हणा, समतेचे राज्य म्हणा हे व्यक्तिजीवनात तशीच सामाजिक परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्या-साठीच नाही काय ? मग ते स्वातंत्र्य मर्यादित राहिले, सामाजिक प्रगतींच्या आड धार्मिक वा सामाजिक रूढी, जुन्या कल्पना, कर्मठ आचार-विचार आले तर ते स्वातंत्र्य व्यक्तिमात्राच्या कल्याणाचे कसे मानता येईल ? एम्. एन्. रॉय यांनी स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जो मूलभूत प्रश्न विचारला की स्वातंत्र्य आले पण स्वतंत्रता आली काय तो याच अर्थाने होय.

एम्. एन्. रॉय यांनी असे प्रश्न स्वतःला विचारले. आणि लोकांच्या शिक्षणासाठी त्यांनी त्यांची जाहीर चर्चाही केली. भारतातील राजकीय पक्षांत रॉय यांचा रॅडिकल डेमोक्रॅटिक पक्षच असा एक पक्ष होता की ज्याने रॉय यांच्या नेतृत्वाखाली व त्यांच्या प्रेरणेने नेहमीच तात्त्विक तशाच राजकीय, राजनैतिक, घटनात्मक, संघटनात्मक, राजनीतीबद्दलच्या आणि धोरणाबद्दलच्या अनेकविध प्रश्नांवर खुल्या दिलाने चर्चा केली व त्यानंतरच आपल्या भूमिकेची रूपरेखा आखली. अर्थात "राजा बोले, दळ हाले" अशीच रॉयवाद्यांच्या गोटातील परिस्थिती असे. पण त्याबद्दल रॉय यांना जसा कधी गर्व वाटला नाही तशीच रॉयवाद्यांना खंत वाटली नाही. रॉय यांना भेटून आल्यानंतर त्यांचे बुद्धिवैभव पाहून दिपून गेलेल्या कम्युनिस्ट पक्षातील एका सर्वश्रेष्ठ विचारवंताने जेथे उद्‌गार काढले होते की "आपली लायकी त्यांच्या पायाशीही बसण्याची नाही" तेथे रॉय यांच्या अनुयायांनी अगदी भक्तीभावाने त्यांच्या विचारांचे ग्रहण करावे यात कमीपणा तो कोठला ? रॉय यांच्या विचारांची झेपच तशी मती कुंठित करणारी होती. ते विचार भारताच्या भूमीत लगेच रुजले नसतील. पण प्रति-स्पर्धी तत्त्वज्ञान व विचारसरणी देण्याइतका कणखरपणा आणि आत्मविश्वास या देशात दाखविला तो रॉय यांनीच. राजकीय पटावर त्यांनी गांधीवादी व मार्क्सवादी या दोघांशीही सामना दिला. गांधीवादी हे त्यांना मध्ययुगीन कल्पना व धार्मिक पूर्वग्रह यांवर आधारलेले सामाजिक तत्त्वज्ञान वाटले. निधर्मीपणा, लोकशाही व आधुनिकता

यांच्यापासून त्या तत्त्वज्ञानाची फारकत झालेली आहे आणि म्हणून भारताच्या प्रगतीला ते पोषक होणार नाही असेच रॉय यांचे दृढ मत होते. तसे पाहिले तर हिंदी राष्ट्रवादाच्या परंपरेतच गांधीवाद विकसित झाला. या राष्ट्रवादाला आधुनिकतेचे वावडे होते, औद्योगिक क्रांतीतून जो नवा समाज युरपखंडात उदयाला येत होता त्याच्याबद्दल तिरस्कार होता, आणि भारतीय संस्कृतीचे पुनरुज्जीवन करण्याचीच त्याच्यामध्ये ईर्षा होती.

या तथाकथित भारतीय संस्कृतीवर रॉय यांनी आपल्या भाषणांतून सदैव कोरडे ओढले. समाजातील एका वर्गाला अस्पृश्य मानणारी, स्त्रियांना स्वयंपाकघरात म्हणजेच गोषात डांबून ठेवणारी, आत्म्याच्या शोधासाठी मानवी शरीराकडे दुर्लक्ष करणारी, आत्म्याच्या मुक्तीसाठी जीवनानंद लुटण्याकडे पाठ फिरविणारी, पशुधनाकडे दुर्लक्ष करून गोमातेची पूजा करणारी, सामाजिक व्यवहारात धर्माचे प्राबल्य माजवणारी, पाश्चिमात्य राज्यकर्त्यांचा द्वेष करण्याच्या अभिनिवेशात यंत्रयुगाचा अव्हेर करणारी, जुनाट रूढी, घातकी चालीरीती, मागासलेले आचार यांचा पुरस्कार करणारी हीच का भारतीय संस्कृती असा रॉय उघडपणे सवाल टाकीत असत. त्यांनी जी विचारसरणी पुढे मांडली तिच्यामध्ये प्रथमपासून अखेरपर्यंत एक सुसूत्रपणा दिसून येतो आणि तो हा की ही विचारसरणी बंडखोरीची होती. राजकीय जीवनात अनेक लोकांनी बंडखोरी केली. पण सामाजिक व्यवहारात ते अतिरेकी धर्मवादी आणि वैचारिक दृष्टीने प्रतिगामी आढळून येत असत. परंपरागत राष्ट्रवादाचे हेच तर वैशिष्ट्य होते. म्हणून कोणी धार्मिक उत्सव सुरू केले तर कोणी धर्माच्या नावाने शिक्षणसंस्था काढल्या तर कोणी स्त्रीशिक्षणाचेही कट्टे विरोधक राहिले. रॉय यांनी वैचारिक दृष्टीने राजकारण आणि समाजकारण धार्मिकतेपासून अलिप्त ठेवले आणि आपले सामाजिक उद्दिष्ट जाहीर करताना म्हटले की या समाजात धर्म ही खाजगी बाब मानली गेली पाहिजे, स्त्री ही पुरुषाच्या बरोबरीने अधिकारी व स्वतंत्र झाली पाहिजे, आणि वैज्ञानिक प्रगती, चिकित्सक मानवसमाज आणि परिपूर्ण मानवी जीवन यातूनच समाजाच्या उन्नतीचा ठाव घेतला गेला पाहिजे.

रॉय यांचा विज्ञाननिष्ठ मानवतावाद ही त्यांच्या विचारसरणीची परिणतीच होय. परंपरागत राष्ट्रवादापासून अलग झाल्यानंतर आंतरराष्ट्रीय मार्क्सवादाचा त्यांनी स्वीकार केला खरा, पण तेथेही त्यांचे विमुक्त मन रमू शकले नाही. कारण या तत्त्वज्ञानात मानवी व्यक्तिमत्त्वाचा लोप झालेला त्यांना आढळून आला. रॉय यांच्या भावनांना धक्का देणाऱ्या घटना सोव्हिएट राजवटीत खूपच घडल्या. पण राजकीय निकडीचा विचार करून त्या घडल्या गेल्या असतील असे मानून रॉय यांनी त्यांच्याकडे दुर्लक्ष केले. पण त्यांच्या मनाला यातना झाल्या त्या थोर वा लहान कम्युनिस्टांच्या अमानुष वर्तनामुळे. या वर्तनात नीतीचा, चारित्र्याचा, माणुसकीचा

लवलेश नसे. रॉय यांना कळेना की आपल्यापासून मतभेदामुळे कोणी फुटून निघाला तर कम्युनिस्टांनी त्याला शत्रू का मानावे, माणसांमधून त्याला उठविण्याचा प्रयत्न का करावा ? माणुसकीला पारखे होणारे हे दोष सर्रास कम्युनिस्ट विश्वात प्रगट होऊ लागल्यानंतरच रॉय यांच्या विचारांना नवीन कलाटणी मिळाली आणि मग साध्य व साधन यांच्या बाबतीत विवेक करण्याची त्यांच्यामध्ये प्रवृत्ती जागृत झाली. राजकारणाचे उदात्तीकरण केले गेले पाहिजे असा आग्रह रॉय हे धरू लागले ते तेव्हापासून. व्यक्तिजीवनाची पातळी उंचाविल्याशिवाय, मानावतावादाची कास धरल्याशिवाय, हे उदात्तीकरण होऊ शकणार नाही याचीही खूणगाठ रॉय यांनी याच काळात बांधली. एम्. एन्. रॉय यांच्या राजकीय जीवनाचा हा तिसरा खंड अशा रीतीने सुरू झाला. एक प्रकारच्या आत्मिक समाधानाच्या वातावरणात ते त्यानंतर राहू लागले—राजकारणाच्या धकाधकीपासून दूर, सत्तेच्या स्पर्धेपासून दूर, आपल्या आवडत्या सहकाऱ्यांच्या विदग्ध सहवासात, काव्यशास्त्रविनोदात मग्न होऊन आपल्या उर्वरित जीवनाचा कालखंड १३ मोहिनी रोडच्या शांत एकातांत नितांत आनंदात घालवीत. त्या जीवनाचे सुकाणू बौद्धिक दृष्टीने त्यांच्या हाती होते. पण त्यांच्या कौटुंबिक जीवनाचे सूत्र मात्र त्यांच्या पत्नी एलन रॉय यांच्याच हाती असे. रॉय पतिपत्नींचा हा संसार म्हणजे मानवी जीवनाचा एक अविस्मरणीय आविष्कार होता. शांत, निरामय जीवनाचा तो आदर्शही मानावयाला हरकत नाही. पण जीवनाची ही पातळी आणि मनाचे ते तादात्म्य गाठीपर्यंत त्या दोघांना ज्या हालअपेष्टा सोसाव्या लागल्या त्यांची कल्पनासुद्धा करणे कठीण आहे. स्वतः एलन रॉय या तर सात वर्षांचा दारुण विरह सहन करूनच रॉय यांच्या सुटके-नंतर त्यांच्या सेवेसाठी सातासमुद्रापलीकडून भारतात आल्या होत्या. त्या ज्या दिवशी बॅलार्ड पियरवर बोटीतून उतरल्या त्या दिवसापासून त्यांच्या समर्पित जीवनाला सुरुवात झाली आणि ते जीवन संपले ते रॉय यांच्या मृत्यूनंतरच नव्हे तर एलन रॉय यांच्या निष्ठुर वधानंतर. त्या दरम्यानचा २४ वर्षांचा कालखंड अनेक सुखदुःखांच्या स्मृतींनी भारावलेला आहे. त्या कालखंडाची अखेर एलन रॉय यांच्या वधातून निर्माण झालेल्या शोकान्तिकेने व्हावी हा एक करुणतम दैव-दुर्विलास आहे.

# रॉय आणि एलन

एलन रॉय १९३८ सालच्या सुरवातीला बोटीने बॅलार्ड पियरला उतरल्या त्या दिवसाची आठवण माझ्या हृदयात अगदी ताजी आहे. पहाटेच्या सुमारास बोट बॅलार्ड पियरच्या धक्क्याला लागली. पण एलन रॉय बोटीवरून बाहेर पडेपर्यंत सकाळचे सात वाजले असतील. आम्ही उत्सुकतेने त्यांची वाट पहात होतो आणि रॉय यांच्या जीवनावर प्रभाव टाकणाऱ्या व्यक्तीबद्दल आमच्या मनात साशंक कुतूहल देखील होते. साशंकता यासाठी की परदेशीय व परदेशात वास्तव्य केलेली ही बाई आमच्या जीवनाशी समरस होईल काय ? कुतूहल यासाठी की कम्युनिस्ट इंटर नॅशनलच्या मुख्य कचेरीत एकेकाळी एलन रॉय जे कार्य करीत होत्या त्याचे गुणवर्णन आम्ही रॉय यांच्या तोंडून अनेकवेळा ऐकले होते. ते कुतूहल एलन रॉय यांना दुरून आम्ही पाहिले तेव्हा अधिकच जागृत झाले. रॉय यांच्याबरोबर त्या जिन्यावरून खाली येत होत्या. रॉय हे उंच, धिप्पाड. एलन रॉय या त्या मानाने किरकोळ तशाच दुबळ्या वाटल्या. प्रवासामुळे त्यांचा चेहरा थोडासा काळवंडलेलाही होता. पण आपले कापलेले आखूड केस सावरत त्या येत होत्या त्या कितीतरी चपळ गतीने, आणि त्या कितीतरी खेळकरपणे हसत. दोन पायऱ्या त्यांनी ओलांडल्या आणि त्यांना कळून आले की रॉय मागे पडले आहेत. त्या क्षणभर थबकल्या आणि लडिवाळपणे रॉय यांच्या हातात हात घालीत त्या काहीतरी पुटपुटल्या. त्याच वेळी रॉय यांनी त्यांना सांगितले असावे, ' ते पहा आपले सहकारी तुझ्या स्वागतासाठी उभे आहेत. ' एलन रॉय यांनी आमच्याकडे पाहिले आणि त्या प्रसन्नपणे हसल्या. त्या हास्यातूनच त्यांनी आमची मने प्रथमदर्शनी जिंकली. त्या क्षणी त्यांच्यामध्ये व आमच्यामध्ये जे नाते जुळले त्याचे ' भावस्थिराणि जननान्तर–सौहृदानि ' या शब्दांतच वर्णन करता येईल.

एलन रॉय व एम्. एन्. रॉय यांचे सहजीवन म्हणजे एका अतुट नात्याचाच बंध म्हणता येईल. या सहजीवनात जितके बौद्धिक साहचर्य होते तितकीच भावनात्मक एकात्मताही होती. रॉय यांच्या क्रांतिकारी जीवनाची सारी झळ सोशीत असतानाही एलन रॉय यांची त्यांच्याबद्दलची भक्ती व श्रद्धा कधी ढळली नाही. रॉय हे सात वर्षांची शिक्षा भोगीत असतानाही एलन रॉय यांनी जणू त्यांची पूजा बांधूनच आपल्या विरहाचे दुःख कमी केले. रॉय हे कधी कधी एलन रॉय

यांची यावद्दल चेष्टा करीत असत. तुरुंगातून एकदा त्यांनी लिहिले होते की, " पेनेलोपचा आदर्श तू आपल्या डोळ्यांसमोर का ठेवावास ? " त्यातून रॉय यांना एवढेच सूचित करावयाचे होते की आर्य पतिव्रतेचा आदर्श ठेवून आपले अंत:करण जाळण्यात काय अर्थ आहे ? एलन रॉय यांनी प्रसंगोपात्त या चेष्टेला उत्तर देताना रॉय यांना म्हटले होते की " कधीकाळी तुमचे दुसऱ्या कोणा व्यक्तीवर प्रेम जडले तरी मी तुमच्या भेटीसाठी भारतात येऊन जाईन. अनेक आगबोटी भारताच्या किनाऱ्याला जशा लागतात तशाच तेथून त्या परतही जातात. आपली मने एकमेकांपासून विलग झाली तर त्यापैकी एका आगबोटीतून मी परत जाईन." एलन रॉय यांच्यावर अशा तऱ्हेच्या वियोगाचा प्रसंग कधीच आला नाही याचे कारण एम्. एन्. रॉय यांचेही त्यांच्यावर नितांत प्रेम होते व विरह तसाच आपत्ती यामुळेही त्या प्रेमात कधी कमतरता आली नाही.

एलन रॉय या जशा सुगृहिणी होत्या तशाच बौद्धिक सहचरी म्हणूनही त्या अखेरपर्यंत रॉय यांच्या जीवनसाथी राहिल्या. कम्युनिस्ट इंटरनॅशनलच्या अध्यक्षांच्या खाजगी चिटणीस म्हणून एलन रॉय यांनी बरीच वर्षे काम केले होते. ते काम स्टेनो टायपिस्टाचे जसे असे तसेच आंतरराष्ट्रीय प्रबंधावरून चिकित्सक हात फिरविण्याचेही असे. त्या दृष्टीने रॉय यांच्या वैचारिक आंदोलनासाठी एलन रॉय यांची बौद्धिक दृष्टीनेही पूर्वतयारी झालेली होती. १९३८ सालानंतर रॉय यांनी जे जे लेखन केले त्याची पहिली प्रत स्टेनो टायपिस्ट या नात्याने एलन रॉय यांनीच तयार केलेली आहे. रॉय यांनी बोलावे आणि एलन रॉय यांनी लघुलिपीत ते उतरावे अशीच त्यांच्यामध्ये श्रमविभागणी असे. त्यानंतर तेच लेखन टंकलिखित करीत असताना एलन रॉय यांचा पहिला सफाईचा हात त्यावर फिरे. त्यानंतर रॉय हे त्यावरून दृष्टी फिरवीत. आणि त्या वेळी त्या लेखनातील मुद्द्यांवर त्या दोघांमध्ये चर्चा होत असे. कधीमधी शब्दप्रयोगांचीही फिरवाफिरव होत असे. एलन रॉय यांना जर्मन व फ्रेंच भाषा अवगत होत्या. इंग्रजीत बोलताना त्या कधी अडखळल्या तर एखादा जर्मन शब्द-प्रयोग त्या करीत आणि मग लडिवाळपणे रॉय यांना, त्याला योग्य प्रतिशब्द इंग्रजीत कोणता ते विचारीत. मग त्या दोघांमध्ये जर्मन भाषेंतच चर्चा होई. कधी चेष्टा-विनोदही होई. रॉय शांतपणे " हूं, हूं ", म्हणत विचारमग्न होत किंवा खळखळून हसत. एलन रॉय यांना दोन्ही भाषेंतील शब्दप्रयोगात असलेल्या फरकामुळे अभावित-पणे विनोद कसा निर्माण होतो ते समजावून सांगत. रॉय व एलन रॉय यांचे एक-मेकांवाचून पान हालत नसे. आणि म्हणून त्यांचा सारा वेळ एकमेकांच्या सह-वासातच जात असे.

पण त्यांच्या कार्यव्यापृत जीवनाचा प्रत्येक क्षणही आपल्या विचारप्रणालीच्या प्रसारासाठी खर्च होत असे. एलन रॉय भारतात आल्या आणि एम्. एन्. रॉय

यांच्या पत्नी म्हणून सर्व रॉयवाद्यांचा भक्तिभाव त्यांना तात्काळ मिळाला. भक्तिभाव मिळाला तरी तो टिकवून धरणे कठीण असते. एलन रॉय यांनी तो टिकविला इतकेच नव्हे तर रॉय यांच्याबद्दल अनुयायांमध्ये जो दरारा असे तो लक्षात घेऊन त्यांनी अनेक दृष्टींनी रॉय व त्यांचे अनुयायी यांच्यामधील दुवा होण्याची जबाबदारी शिरावर घेतली. त्यानंतरच्या काळात आर्थिक प्रश्न असोत, रॉय यांचे वा पक्षाचे कार्यक्रम ठरवावयाचे असोत, पैशाची आणि बहुश: कर्जाची वाटणी करावयाची असो, स्नेहसंमेलने भरवावयाची असोत, प्रत्येक बाबतीत पक्षाच्या नेत्यांचा व कार्यकर्त्यांचा सारा व्यवहार रॉय यांच्याशी नव्हे तर एलन रॉय यांच्याशीच होत असे. रॉय यांच्याकडे कसलीही कोणाविरुद्ध गाऱ्हाणी न्यावयाची असली तरी ती एलन रॉय यांच्यामार्फत केली जावयाची. एम्. एन्. रॉय यांना या लहानसहान गोष्टीत रस नसे आणि त्यांचे लक्षही सहसा त्या गोष्टीकडे जात नसे. एलन रॉय यांना त्यांच्या सबंध जीवनाचाच भार खांद्यावर घ्यावा लागत असे. पण त्यांचा स्वभावधर्मही त्याला साजेसाच होता—अतिशय प्रांजळ आणि व्यवहारी, अगदी काटेकोर होण्याइतका व्यवहारी. एलन रॉय यांची कामाची पद्धतीसुद्धा अशीच काटेकोर होती. रॉय यांच्या प्रत्येक लेखाच्या प्रती त्या करून ठेवीत असत. रॉय यांचे प्रत्येक भाषण त्यांनी टंकलिखित करून ठेवलेले असे. ‘इंडिपेंडंट इंडिया’ या रॉय यांनी १९३७ साली काढलेल्या पत्रातील सारे लेखन, त्या पत्राच्या फायली, त्याच्याशी संबंधित असलेला पत्रव्यवहार, त्याचा जमा आणि खर्च याबद्दलचे सारे सारे कागदपत्र एलन रॉय यांच्याकडे पद्धतशीरपणे गोळा करून ठेवलेले आढळून येत असत. एलन रॉय या रॉय यांच्या पत्नी म्हणून आणि स्वत:च्याही हक्काने पुढारी झाल्या. पण खाजगी चिटणिसाचा व्याप त्यांनी आमरण सांभाळला. चिटणीस म्हणून रॉय यांचे तर त्यांनी काम कसोशीने केलेच, पण साऱ्या पक्षाचे, त्याच्या शाखाउपशाखांचे, त्या पक्षाने सुरू केलेल्या वृत्तपत्रांचे, प्रकाशित केलेल्या ग्रंथांचे, सारे बरेवाईट जोखमीचे, जबाबदारीचे, कष्टप्रद तसेच मानहानिकारक काम एलन रॉय यांनीच प्रामुख्याने पार पाडले. ते करीत असताना त्यांनी रात्रीचा दिवस केला आणि दिवसाकाठी विलक्षण चपळतेने, उत्साहाने त्या भिरीभिरी फिरतच राहिल्या.

एलन रॉय यांची आठवण झाली म्हणजे त्यांची गोरीपान, सडसडीत मूर्ती डोळ्यांसमोर उभी रहाते. पहिल्याप्रथम त्या मुंबईत उतरल्या तेव्हा हवामान, खाणेपिणे, आचार हे सारेच त्यांना नवीन होते. येथील अन्न तर त्यांना न मानवण्याइतके तिखट वाटत असे. जेवण्यासाठी सतरंजीवर व पाटावर त्या बसल्या तर त्यांना नीट बसतासुद्धा येत नसे. त्या वेळी ज्या सहकाऱ्यांमध्ये त्यांना रहावे लागत असे त्यांच्या घरी अठराविश्वे दारिद्र्यच असे. कोणत्याही सुखसवलती

ते रॉय पतिपत्नींना मनात असूनही देऊ शकत नसत. पण एलन रॉय यांनी चार-सहा दिवसांतच परिस्थितीशी जुळते घेतले आणि सार्वजनिक कार्य असो की खाजगी कार्यक्रम असो, सर्वांशी समरस होऊनच त्यांनी वागावयास सुरवात केली. ' इंडिपेंडंट इंडिया ' च्या पहिल्या काळात ठाकुरद्वारमधील एका लहानशा गल्लीतील लहानशा छापखान्यात ते साप्ताहिक छापले जात असे. दुसऱ्या चांगल्या छापखान्याचा त्या वेळी अगदीच किरकोळ असलेला दरही ' इंडिपेंडंट इंडिया 'ला मानवण्यासारखा नव्हता. रॉय आणि एलन साप्ताहिकासाठी लिहिण्याचे काम करीत. त्यांचा मजकूर वेळेवर जात असे. पण तो कंपोज होऊन योग्य वेळी प्रसिद्ध होण्याच्या मार्गात अनंत अडचणी येत असत. एलन रॉय अशा वेळी अस्वस्थ आणि अधिर होऊन पायीच छापखान्याकडे धाव घेत असत. कधीकधी पानांची जुळणी करण्यासाठी किंवा एकत्र केलेल्या फर्म्यांचे स्टिचिंग करण्यासाठी त्याही पुढे धावून जात. त्यांना महत्त्व वाटत असे ते वक्तशीरपणाचे आणि इंडिपेंडंट इंडिया हा वेळेवर बाहेर यावा, तो योग्यवेळी बाजारात विक्रीला जावा, त्याच्या प्रती भराभर एजंटांकडे पाठविल्या जाव्या, हीच त्यांच्या मनीची आस असे. एंपायर ऑटोमोबाईल बिल्डिंगमधील पक्षाच्या कचेरीत इंडिपेंडंट इंडियाच्या प्रती आल्या की त्यांची पार्सले बांधावयालाही एलन रॉय नेहमी मदत करीत असत. कोणतेही काम त्यांना कधी हलके तर वाटले नाहीच, पण कमी महत्त्वाचेही वाटले नाही. परिश्रम घेणे हा त्यांचा धर्म होता. त्या परिश्रमातूनच कार्यसिद्धी होईल ही त्यांची मनोमन श्रद्धा असे. त्या श्रद्धेने काम करताना त्यांना कधी अपयशाची खंत वाटली नाही किंवा आर्थिक आपत्तीतून जाताना त्या कधी निराश झाल्या नाहीत. प्रत्येक क्षण हा त्यांनी मोलाचा मानला आणि दुःखाचा विसर पाडून व सुखाचा आसुसलेल्या भावनेने आस्वाद घेऊन त्यांनी आपले स्वतःचे व एम्. एन्. रॉय यांचे जीवन अत्यंत दुःसह परिस्थितीतही समाधानी ठेवले. त्या समाधानासाठी फार मोठ्या अपेक्षांची पूर्ती त्या दोघांनाही कधी लागली नाही. एकच क्षण हुडकून काढावा आणि त्याक्षणी जे काही असेल ते खर्च करून आनंद लुटावा हाच रॉय पतिपत्नींचा बाणा होता. इंडिपेंडंट इंडियाच्या पहिल्या अडचणीच्या काळातच रॉय यांचे भारतात प्रसिद्ध होणारे पहिलेवहिले " हिस्टॉरिकल रोल ऑफ इस्लाम " हे पुस्तक एका मुंबईच्या प्रकाशकाने प्रसिद्ध केले. त्याबद्दलचा पाचशे रुपयांचा चेक ज्या दिवशी रॉय यांच्या हाती आला त्या दिवशी रॉय आणि एलन रॉय या दोघांनाही आकाश ठेंगणे झाल्याचा आनंद झाला. त्या संध्याकाळी आपले सारे काम संपवून टाकल्यानंतर रॉय यांनी आपल्या सर्व सहकाऱ्यांना जमविले आणि जाहीर केले " आज आपल्या हाती कुबेराचे धन आले आहे. चला आजचा दिवस साजरा करू या. "

सुवर्णकांतीचे पेय आणि रॉय यांनी स्वतः आपल्या हाताने शिजवून तयार

केलेले सुग्रास अन्न यांची जी माधुरी त्या दिवशी प्रगट झाली तिची अवीट गोडी विसरता विसरणे शक्य नाही. रॉय यांच्या सहवासातील अविस्मरणीय दिवसांपैकी एक दिवस म्हणूनच त्या प्रसंगाची आठवण कायमची हृदयात जतन करून ठेवावी लागेल.

४२०२२
१३९६
चरित्र
२०५५८

# बावनकशी मानवतावाद

सुवर्णकांतीच्या पेयावरून मला आठवण झाली. एम्. एन्. रॉय यांनी उभा जन्म भारताच्या बाहेर, बहुश: युरप खंडात म्हणजेच थंड प्रदेशात घालविलेला. ज्या संस्कृतीत ते वावरले आणि वाढले तीत मद्यपान हे निषिद्ध तर मानले गेलेले नाहीच, पण ते सुसंस्कृतीचे चिन्ह व प्रतीक मानले जाते. पण रॉय हे आपल्या अनुयायांना व सहकाऱ्यांना नेहमी सांगत असत की, मद्यपान हे मितपान असेल तरच ते सुसंस्कृतपणाचे मानले जाते. रॉय आणि एलन रॉय या दोघांनीही या सुसंस्कृतपणाच्या मर्यादांचे कधी उल्लंघन केले नाही. पण त्यांनी जसा मद्याचा कधी बडिवार माजविला नाही त्याचप्रमाणे मद्यपानाच्या बाबतीत कधी भोंदूपणा तर केला नाहीच, पण कधी लपंडावाचाही आश्रय घेतला नाही. आपले व्यक्तिगत जीवन जसे स्वच्छ, प्रामाणिक तसेच ते लोकांच्या डोळ्यांसमोर खुलेपणाने प्रगट व्हावे हीच रॉय यांची मनोधारणा होती. तुरुंगातून सुटल्यानंतर आपली राजकीय संघटना म्हणून त्यांनी काँग्रेसचा स्वीकार केला. पण ती राजकीय संघटना म्हणून. तिचे वैशिष्ट्य प्रतीत व्हावयाला पाहिजे ते राजकीय कार्यक्रमातून असाच रॉय यांचा कटाक्ष असे. त्या कार्यक्रमाला ते बांधलेले होते. त्या कार्यक्रमाचा अव्यभिचारी निष्ठेने पुरस्कार करणे हेच ते आपले कर्तव्य समजत होते. त्या कर्तव्यपूर्तीसाठी तुरुंगातून सुटल्यानंतर आपल्या खंगलेल्या शरीरप्रकृतीकडे न पहाता ते निवडणुकीच्या दौऱ्यावर निघाले. त्यांच्यामागे नाव होते, प्रतिष्ठा होती, ध्येयवादी क्रांतिकारक जीवनाचे वलय त्यांच्याभोवती उमटलेले होते. साहजिकच त्यांचे दर्शन घेण्यासाठी, त्यांचा बहुमोल संदेश ऐकण्यासाठी लक्षावधी स्त्री-पुरुषरात्री. बेरात्री गावोगावी जमत असत. अपरंपार. अपूर्व, असा जनसागर अशा वेळी उचंबळून प्रगट होई. तो इतका कल्पनातीत असे की पूर्वी कधीही न जमलेल्या समुदायामुळेच त्या मैदानांना "रॉय मैदान" असे उत्स्फूर्तपणे नाव पडे. एम्. एन्. रॉय यांच्या लोकप्रियतेला आलेले हे उधाण होते.

पण त्यातूनच विरोधकांच्या असूयेलाही उधाण आले. अशी असूया करणाऱ्या लोकात डावे असत तसेच उजवे असत. डाव्यांना काँग्रेसबद्दलची त्यांची चिकित्सा मान्य नसे. त्यांना वाटे की रॉय यांनी काँग्रेसला समाजवादी पक्ष बनविण्याचा प्रयत्न करावा किंवा काँग्रेसपुढे समाजवादी पक्षाचा कार्यक्रम ठेवावा. रॉय यांना

समाजवादाचा हा आग्रह बालिशपणाचा वाटत असे. त्याचप्रमाणे काँग्रेसला ब्रिटन-मधील मजूर पक्षाचे स्वरूप देण्याची जी कल्पना डाव्या गोटात मधून मधून उचल खाई ती कल्पनाही हास्यास्पद वाटत असे. अर्धकच्च्या सिद्धान्तवाद्यांचा हा कल्पना-विलास. पण भारतासारख्या परतंत्र तशाच मागासलेल्या देशात आणि काँग्रेस-सारख्या सर्वसंग्राहक चळवळीच्या मार्फत त्या कल्पना प्रत्यक्षात कशा आणता येणार ? रॉय यांनी आपल्या तर्कशुद्ध विचारसरणीने या स्वप्नजालाचा बुडबुडा फोडल्यामुळे डावे गट त्यांच्यावर रुष्ट झाले होते. उजव्यांना रॉय यांचा जहाल-मतवाद मान्य नसे. शिवाय पुराणमतवादी राष्ट्रवादातून परंपरेची जी मूल्ये पूजली जात असत त्यांच्यावर रॉय यांनी सडेतोड प्रहार केल्यामुळे तर ते रॉय यांना पाण्यात पाहू लागले होते. या दोन्ही गटांना रॉय यांची विचारसरणी खोडून काढता येत नसे. म्हणून त्यांनी जो मार्ग शोधून काढला तो खोडसाळ प्रचाराच्या साहाय्याने त्यांचे अवमूल्यन करण्याचा. या कामी रॉय यांच्या विचारांपेक्षा आचारावरच त्यांनी कटाक्षाने हल्ला चढविला. रॉय हे निवडणुकीच्या दौऱ्यावर असताना महाराष्ट्रातील काही काँग्रेसजनांनी या वेळी काँग्रेसचे अध्यक्ष बाबू राजेंद्रप्रसाद यांच्याकडे खाजगी पत्रे पाठवून अशी तक्रार केली की रॉय यांचा मद्यपानबंदीवर विश्वास नाही आणि त्या दृष्टीने ते सच्चे काँग्रेसजन नाहीत. रॉय यांच्या कानी तक्रारीची ही वार्ता येताच त्यांनी प्रांजळपणे राजेंद्रबाबूंनाच सरळ पत्र पाठविले आणि या तक्रारीचा इन्कार तर केला नाहीच, पण उलट असे सांगितले की " मद्यपान हे पाप आहे असे आपण समजत नाही; ते योग्य प्रमाणात केले तर शरीरस्वास्थ्याला ते पोषक आहे व मानसिक ताणही त्यामुळे नाहीसा होऊ शकतो. अधूनमधून मितपान करण्याल आपण संकोच करीत नाही. यातून काँग्रेसच्या शिस्तीचा भंग होतो असे आपल्याला वाटत नाही. कारण काँग्रेस ही एक राजकीय संघटना असल्यामुळे तिचा राजकीय कार्यक्रम पार पाडण्यासाठी बद्धपरिकर होणे हेच काँग्रेसच्या शिस्तीचे प्रमुख अंग आहे व आपण ते निष्ठेने पार पाडीत आहोत. काँग्रेसच्या काही पुढाऱ्यांच्या नीतिकल्पना व त्यांनी उराशी बाळगलेली धार्मिक ध्येये ही आपल्या दृष्टीने काँग्रेसच्या राजकीय तत्त्वप्रणालीचे अविभाज्य घटक आहेत असे आपण मानीत नाही. मद्यपानबंदी ही त्यातीलच एक नीतिकल्पना. त्या कल्पनेच्या अंमल-बजावणीची, शिस्तीच्या नावाखाली कोणालाही सक्ती करण्याचा अधिकार नाही."

रॉय यांचा सडेतोडपणा व भोंदूपणाबद्दलचा त्याचा तिरस्कार या उत्कट उद्गारांतून प्रगट होतो. राजकारणात जो धोरणीपणा आवश्यक असतो त्याचा विचार केला तर रॉय यांचे हे उद्गार कोणालाही बिनहिशेबीपणाचे वाटतील यात संशय नाही. पण त्यांचे असे स्पष्ट मत होते की व्यक्तीचे खाजगी जीवन ही त्याची एकट्याची जबाबदारी मानली जावी व समाजाने त्या जीवनात चोच खुपसण्याचा

प्रयत्न करू नये. रॉय यांनी आपल्या राजकीय जीवनात अनेक पुढाऱ्यांवर टीका केली. पण कोठेही व्यक्तिनिंदेचा त्यांनी आश्रय घेतला नाही. केव्हाही ज्याला कमरेखाली वार करणे म्हणता येईल प्रकारची निरर्गल टीका त्यांनी केली नाही. रॉय हे म्हणूनच सदैव द्वेषरहित असेच समतोल राहिले. याच समतोलपणाची त्यांनी प्रतिपक्षांपासून अपेक्षा केली होती. पण अनेक वेळी ती फोल ठरली. अर्थात हा अनुभव त्यांना सर्वच पुढाऱ्यांच्या बाबतीत आला असे नाही. जवाहरलाल नेहरू यांनी त्यांच्या अज्ञातवासातील काळात त्यांना शक्य ती मदत केली होती. त्यांना शिक्षा झाल्यानंतर व हायकोर्टातील त्यांच्या अपीलाचा निकाल लागल्यानंतरही प्रिव्ही कौन्सिलपुढे त्यांचे अपील नेण्यासाठी पाश्चिमात्य देशातील नामवंत व्यक्तींशीही जवाहरलाल नेहरू यांनी विचार विनिमय केला होता. कै. कमला नेहरू ह्या अत्यवस्थ स्थितीत असताना जेव्हा पंडित नेहरू त्यांना भेटण्यासाठी विलायतेला गेले होते तेव्हा वेळात वेळ काढून पंडितजींनी एलन रॉय व फ्रान्स आणि जर्मनीतील रॉय यांचे सहकारी यांच्या भेटीगाठी घेतल्या होत्या. रॉय यांचे भाग्य असे की पाश्चिमात्य देशांतील विचारवंतांमध्ये आइन्स्टाईन यांच्यासारख्या जगप्रसिद्ध शास्त्रज्ञाची सुद्धा सहानुभूती त्यांना लाभली होती. रॉय यांची सुटका करण्यात यावी म्हणून युरपमधील काही विचारवंतांनी त्या वेळी जे एक पत्रक काढले होते त्यावर आइन्स्टाईन यांनीही सही केली होती. भारतीय पुढाऱ्यांत जवाहरलाल नेहरू हे एकच असे पुढारी होते की ज्यांचा जगाशी संबंध असे व जगातील विचारवंतांच्या प्रतिक्रिया त्यांना समजू शकत असत. रॉय व आइन्स्टाईन यांच्यामधील संबंधा-बद्दल नेहरूंना यथार्थ कल्पना आली होती ती यामुळे की आइन्स्टाईन यांच्या सापेक्षतावादाच्या प्रबंधावर अलाहाबाद हायकोर्टाचे तत्कालिन मुख्य न्यायाधीश शाह महमद सुलेमान या गणितज्ञाने जो चिकित्सात्मक प्रबंध लिहिला होता, त्याला रॉय यांनी तितक्याच समर्थपणे उत्तर दिलेले पंडितजींना ठाऊक होते. शास्त्रीय विषयांना वाहिलेल्या काही प्रतिष्ठित युरोपीय मासिकांत ही उच्च पातळीवरील चर्चा प्रसिद्ध केली गेली होती. भारतातील फारच थोड्या लोकांना या चर्चात्मक प्रबंधाची कल्पना असेल. शास्त्रीय विषयांमध्ये रॉय यांना केवढी गती होती याचे प्रत्यंतर त्यांच्या या लेखनावरून प्रगट होऊ शकेल.

दुर्दैवाने रॉय यांच्या बुद्धिमत्तेची, विद्वत्तेची व व्यासंगाची नीटशी कल्पना कोणाला झाली नाही व राजकारणाच्या धकाधकीत सामाजिक बंडखोरीच्या त्यांच्या कल्पना ज्या लोकांना पटल्या नाहीत त्यांनी रॉय यांच्या कर्तृत्वाची बूज राखण्या-ऐवजी त्यांना राजकीय व सामाजिक दृष्टीने बहिष्कृत करण्यातच आनंद मानला. वस्तुत रॉय हे रसिक होते, आतिथ्यशील होते आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे माणुसकी हाच खरा धर्म असे मानणाऱ्यांपैकी ते एक होते. म्हणून आपल्या राजकीय

जीवनात त्यांनी व्यक्तिगत वैर असे कोणाशी धरले नाही, राजकीय व्यवहारात मनाचा क्षुद्रपणा असा कधीच दाखविला नाही. त्याचे एक उदाहरण मला ठळकपणे आठवते. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यावरील बंधने काढून घेण्यात आल्यानंतर ते जेव्हा मुंबईत प्रथम आले तेव्हा पुण्यातील काँग्रेसजनांनी त्यांच्या सत्कार-समारंभावर बहिष्कार घालण्याचे जे क्षुद्र धोरण अवलंबिले होते, त्याची मुंबईत पुनरावृत्ती होईल की काय अशी भीती निर्माण झाली होती. पण त्या वेळी रॉय यांनी पुढे होऊन मुंबईत प्रथमच झालेल्या त्यांच्या सार्वजनिक सत्कारसमारंभात भाग घेण्याची तयारी दाखविली. रॉय हे त्या वेळी एक प्रख्यात व लोकप्रिय काँग्रेसजन म्हणून ओळखले जात होते. एका क्रांतिकारकाने दुसऱ्या क्रांतिकारकाला अभिवादन करावे यातही एक अपूर्व असे औचित्य होते. गिरगावातील श्रीकृष्ण सिनेमात साजऱ्या झालेल्या या सत्कारसमारंभात रॉय यांनी सावरकर यांचे अभीष्ट चिंतन करताना एकेकाळचे आपले स्फूर्तिदाते म्हणून त्यांचा निःसंकोचपणे गौरव केला होता. सावरकर यांची मतप्रणाली व विचारसरणी यांच्याशी रॉय यांचे तीव्र मतभेद होते. पण पूर्वजीवनातील त्यांच्या पराक्रमाची महती गाण्यात व देशभक्तीच्या भावनेने प्रेरित होऊन त्यांनी केलेल्या स्वार्थत्यागाबद्दल त्यांचा गौरव करण्यात कमीपणा तो कोणता असा सरळ सवाल करून रॉय यांनी आपला माणुसकीचा दृष्टिकोण प्रगट केला होता.

या माणुसकीच्या दृष्टिकोणातूनच रॉय यांनी आपल्या आचारांची घडण घडविली. मानवी जीवनाचा आपण आदर्श आहो असे समजण्याइतका अहंकार रॉय यांच्यामध्ये नव्हता. उलट त्यांची स्वतःकडे पहाण्याची दृष्टी अशी होती की आपले जीवन हे गुण तशाच दोषांनी परिपूर्ण असे भरलेले आहे; इतरेजनांपासून आपण अलग असू ते आपल्याला बुद्धीची अनुपम देणगी लाभलेली आहे म्हणून. बाकी मोह, पराभवातून येणारा अगतिकपणा, सत्तेबद्दलची आकांक्षा, सुखलोलुपतेतून पडणारे वाकडे पाऊल, स्वार्थातून प्रगट होणारी बेफिकीरी वगैरे दोष मानवी जीवनाचेच जे स्थायीभाव झालेले आहेत त्यांचा आपल्याला स्पर्शच झालेला नाही असे कसे म्हणावे ! पण रॉय हे अभिमान मानीत असत ते या गोष्टीचा की या दोषांनी आपण संपूर्णपणे ग्रासले जाऊ नये म्हणून आपण अखंडपणे प्रयत्न करीत राहिलो; इतर नेत्यांमधील व आपल्यामधील हा भेद हेच आपले वैशिष्ट्य असे रॉय हे आपल्या सहकाऱ्यांना प्रांजळपणे सांगत असत. रॅडिकल डेमोक्रॅटिक पक्षाचे विसर्जन झाल्यानंतर त्यांच्याशी बोलण्याचा एकदा प्रसंग आल्यानंतर ते मला म्हणाले होते, " मला माहीत आहे आपले अनेक लोक त्याबद्दल मला दोष देतात; त्यांना वाटते यात आपला विश्वासघात झाला. पण मी त्यांना एवढेच म्हणतो, की आजवर तुमच्या जीवनाशी मी जुगार खेळलो. आता तो जुगार खेळण्याची माझी इच्छा नाही. ती जबाबदारी

भावी पिढीच्या बाबतीत तरी मी घ्यायला तयार नाही. बस्स. जे झाले ते झाले. ज्यांचे नुकसान माझ्या हातून झाले, त्याचा दोष माझ्याकडे आहे. पण यापुढे तरी त्या दोषाचे धनी होण्याची माझी इच्छा नाही. " रॉय यांचा मानवतावादी दृष्टिकोण कसा बावनकशी होता याची कल्पना या उद्गारांवरून येऊ शकते. आपल्या विमुक्त जीवनाचा जणु आदर्श त्यांनी आपल्या सहकाऱ्यांपुढे व अनुयायांपुढे ठेवला. रॉय यांच्या मनाची ही उदात्तता आगळी तशीच लोकविलक्षण आहे, असे कोण म्हणणार नाही ?

# परिपूर्ण जीवनाची सांगता

एम्. एन्. रॉय यांच्यावर जी विषारी टीका चौफेर होत असे तिने कळस गाठला तो युद्धकाळात. त्या वेळी रॉय यांनी युद्धसहकार्याची भूमिका घेतली. ही भूमिका त्यांनी युद्धाची सुरुवात झाल्यानंतर लगेच घेतली. आपल्या शत्रूचा शत्रू तो आपला मित्र हे तत्त्व रॉय यांच्यासारख्या दूरदृष्टीच्या विचारवंताला पटणे शक्य नव्हते. या वेळी तर ब्रिटनचा शत्रू हा फॅसिझम असल्यामुळे रॉय यांना त्याच्या भयानक स्वरूपाची जाणीव ठेवून या दोन शत्रूंमध्ये निवड करावी लागली. त्यांनी ही निवड लोकशाहीच्या बाजूने केली आणि त्या वेळी साऱ्या जगाला उच्चरवाने सांगितले की लोकशाहीमध्ये कितीही दोष व अपूर्णता असो, पण तिचा पराभव करून फॅसिझमने जगाचा ग्रास घेतला तर जगामध्ये स्वातंत्र्याचा संपूर्ण लोप होऊन अंधार युग पृथ्वी तळावर अवतरेल. म्हणून त्यांनी लोक-शाहीच्या रक्षणासाठी बिनशर्त युद्धसहकार्याचा आदेश दिला. हे सहकार्यच केवळ नव्हते तर ते बिनशर्त होते हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. म्हणजे जेथे संशयाला जागा नव्हती, दुटप्पीपणाला वाव नव्हता, करू न करू अशा तऱ्हेच्या हॅम्लेट पद्धतीच्या अनिश्चिततेला तेथे स्थान नव्हते. भारतातील इतर कोणत्याही राजकीय पक्षाने अशी नि:संदिग्ध भूमिका घेतली नव्हती. कम्युनिस्टांना हा साम्राज्यशाही युद्धाचाच एक प्रकार वाटत होता. काँग्रेसमधील गांधीवादी पुढाऱ्यांनी अधिष्ठित सरकारला पेचात धरण्यासाठी असा दृष्टिकोण मांडला की 'आम्हांला फॅसिझम नको; पण त्याच्याविरुद्ध लढण्यापूर्वी आम्हांला स्वातंत्र्य दिले गेले पाहिजे'. पंडितजींचे मन द्विधा झाले होते. एकीकडे त्यांना स्वातंत्र्याची ओढ खेचत होती, दुसरीकडे फॅसिझमचा विजय हे जगावरील संकट आहे याची त्यांना प्रकर्षाने जाणीव होत होती. अशा अगतिक अवस्थेत अखेरीस नेहमीप्रमाणे पंडितजींनी गांधीजींचा आदेश प्रमाण मानला, व आपल्या सदसद्विवेकबुद्धीशी प्रतारणा करून ते युद्धविरोधक म्हणून उभे ठाकले. सुभाषचंद्र बोस हे तर फॅसिस्ट शक्तीशी हातमिळवणी करून अति-पूर्वेकडे फॅसिस्ट आक्रमकांसाठी अनुकूल भूमी तयार करू लागले.

साहजिकच रॉय यांची युद्धसहकार्याची भूमिका ही राष्ट्रवादी गोटात त्याज्य तशीच देशद्रोहाची ठरली. रॉय हे मात्र या भूमिकेबद्दल इतके ठाम होते की युद्ध-सहकार्यासाठी ब्रिटिश सरकारशी सहकार्य करावयालाही त्यांनी संकोच केला नाही.

या सहकार्यातून ज्याला तेरा हजारांचे प्रकरण म्हणता येईल त्याचा उगम झाला. तसे पाहिले तर हे प्रकरण नव्हते, रहस्यमय प्रकरण तर मुळीच नव्हते आणि गुप्त वा पड्याआड शिजलेल्या प्रकरणातही त्याचा समावेश करता येणार नाही. वस्तुस्थिती अशी होती की त्या वेळच्या भारत सरकारने युद्धप्रचार करण्यासाठी, युद्धप्रयत्नांना हातभार लावला जावा म्हणून निरनिराळ्या केंद्रीय कामगार संघटनांना काही आर्थिक साहाय्य करण्याची तयारी दाखविली. हे सरळ सरळ कामकरी संघटनांना आवाहन होते. त्या आवाहनाचा रॉय यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या इंडियन फेडरेशन ऑफ लेबर या संस्थेने स्वीकार केला. या स्वीकारानंतर रीतसर योजना, प्रचाराचे स्वरूप, त्याची व्याप्ती, त्याचा खर्च, तो खर्च कोणकोणत्या पोटी केला जाईल, कसा केला जाईल, याबद्दलची स्पष्ट रूपरेषा वगैरे गोष्टींचा एक आराखडा केंद्राच्या मजूरखात्याला सादर करावयाचा होता. इंडियन फेडरेशन ऑफ लेबरने तो आराखडा सादर केला व त्या संस्थेच्या कार्यकर्त्यांनी पुढे वाटाघाटींची सूत्रे हाती घेतली. केंद्रीय सरकारच्या मजूरखात्याने त्या योजनेची काटेकोरपणे पहाणी केली व दर महिन्याला तेरा हजार रुपये या कार्यासाठी मंजूर केले. फक्त तेरा हजार रुपये. एका अखिल भारतीय संघटनेला दिले जाणारे. त्या संघटनेत रॉय यांच्या रॅडिकल डेमोक्रॅटिक पक्षाचा गट हा फक्त एक घटक. बाकीच्या घटकांत गुरुस्वामी यांचे रेल्वेमेन्स फेडरेशन होते, जमनादास मेहता यांच्या नेतृत्वाखालील काही कामगार संघ आणि असेही काही इतर कामगार संघ होते की ज्यांना रॉय यांची युद्धसहकार्याची भूमिका मनापासून मान्य नसे. ही सगळी आवळ्यांची मोट ज्या संघटनेत बांधली गेली होती त्या संघटनेला युद्धप्रचारासाठी हे तेरा हजार रुपये देण्यात आले होते. एम्. एन्. रॉय यांना नव्हे आणि त्यांच्या रॅडिकल डेमोक्रॅटिक पक्षालाही नव्हे. पण रॉय यांच्या भूमिकेशी शत्रुत्व असलेल्या अनेक लोकांनी या तेरा हजार रुपयांचे एक प्रकरण बनविले. रॉय यांनी ब्रिटिश राज्यकर्त्यांशी कट-कारस्थान करून एक गुप्त करार केल्याचा देखावा उत्पन्न केला आणि जणु आपण एका रहस्याचा स्फोट करीत आहोत असा आविर्भाव आणून रॉय व त्यांचा रॅडिकल डेमोक्रॅटिक पक्ष यांच्या निंदेची एक मोहीम सुरू केली.

तेरा हजारांबद्दलच्या रहस्यभेदाची ही मोहीम अति प्रबळ ठरली. रॉय व त्यांचा पक्ष यांना नामोहरण करण्याइतकी प्रभावी ठरली यात तिळमात्रही संशय नाही. आधीच युद्धसाहाय्याची भूमिका लोकक्षोभ निर्माण करणारी, तशात 'चलेजाव' चळवळीचा सर्वत्र आगडोंब उसळलेला, ४२ चे क्रांतिकुंड नुसते धगधगून पेटलेले, आणि त्यात ब्रिटिश सत्तेशी गुप्त करार करून प्रत्यक्षपणे त्यांच्याकडून लाच घेतल्याचा आरोप करणारा जहरी, विषारी प्रचार. मग त्या वडवानलात रॉय व

त्यांचे अनुयायी यांची आहुती पडावयाची वेळ आली तर त्यात काय नवल ? एम्. एन्. रॉय यांचे म्हणणे कोण ऐकून घेणार ? ते पुन्हा पुन्हा जाहीर करीत होते की यात गुप्तता काही नाही, करार नाही, कट नाही, रीतसर अंदाजपत्रकात समाविष्ट केलेली ही ग्रांट आहे. पण त्यांच्या या कळवळून केलेल्या स्पष्टीकरणाला उत्तर मिळत असे " हे तेरा हजारांचे प्रेत येथे पडले आहे " या धर्तीचे. ही प्रेते आणि मुडदे ज्यांना त्या काळी दिसले त्यांच्यावरच काही वर्षांच्या आत अमेरिकन वा रशियन वा चिनी हस्तक झाल्याचे आरोप सहन करावयाची वेळ आली हा राजकीय जीवनाचा एक दैवदुर्विलासच म्हणावा लागेल. रॉय यांनी आपल्यावर हा हल्ला होत असताना त्याचा प्रतिकार करण्यासाठी इतरांवर चिखलफेक केली नाही. ते त्यांना करावयाचे असते तर थोडयाच दिवसांत युद्धसहकारासाठी हिंदुस्थानातील कम्युनिस्ट पक्षाला याच ब्रिटिश सरकारकडून जी घवघवीत मदत मिळू लागली होती त्याचा दभस्फोट त्यांनी सहज केला असता. पण रॉय यांना तत्त्वासाठी लढावयाचे होते, आपला दृष्टिकोण व आपली भूमिका तर्काच्या निकषावर घासून चकचकीत पुसून निघालेली पाहण्याचे सुख अनुभवावयाचे होते.

ते सुख प्रामुख्याने हिंदी कम्युनिस्ट पक्षाच्या युद्धविषयक धोरणाची थोडयाच दिवसांच्या आत जी कुतरओढ झाली, त्यातून त्यांना अनुभवावयास मिळाले. युद्ध सुरू होताच कम्युनिस्ट पक्षाने हे साम्राज्यशाही युद्ध आहे अशी भूमिका घेतली. लागलीच त्यांना आठवण झाली ती लेनिनच्या सिद्धांताची : साम्राज्यशाही युद्धात श्रमजीवी जनतेने आपल्याच देशातील राज्यकर्त्यांविरुद्ध आघाडी उघडून शत्रुपक्षातील श्रमजीवी जनतेशी संगनमत करावे आणि साम्राज्यशाही युद्धाचे यादवी युद्धात रूपांतर करावे. भारतातील कम्युनिस्ट पक्षाने जुनाट पोथीपुस्तकातून हा जो प्रबंध हुडकून काढला तो नात्सीवादी व ब्रिटिश अमेरिकन लोकशाही यांच्यामधील संघर्षात अप्रस्तुतच नव्हे तर घातकी ठरतो याची कम्युनिस्ट पक्षाच्या प्रज्ञावंत (!) प्रवक्त्यांना कल्पनासुद्धा होऊ शकली नाही. आपल्या धन्याचा आवाज उठविण्याच्या प्रवृत्तीतूनच ही बुद्धिदरिद्री भूमिका घेण्याची स्फूर्ती त्यांनी मिळाली यात अणुमात्रही संशय नाही. त्यांच्या डोळयांसमोर त्यावेळी नात्सी-सोव्हिएट करार होता आणि तो करार झाल्याबरोबर तर भारतातील कम्युनिस्टांना असा साक्षात्कार झाला की ॲडॉल्फ हिटलर हा ब्रिटिश व अमेरिकन राज्यकर्त्यांपेक्षा आपल्याला अधिक जवळचा आहे, नाही म्हटले तरी कराराप्रमाणे तो सहप्रवासी झाला आहे. या सहप्रवासाचे पर्यवसान जेव्हा सोव्हिएटविरुद्ध नात्सी जर्मनीने आक्रमण करण्यात झाले तेव्हा कम्युनिस्ट भांबावून गेले, त्यांची मती कुंठित झाल्यामुळे बौद्धिक आसऱ्यासाठी ते रॉय यांच्या युद्धविषयक लेखनाची पारायणे करू लागले. पण रॉय यांचे तर्कशुद्ध विवेचन आत्मसात करण्याची कुवत त्यांच्यामध्ये नसल्यामुळे त्यांनी असा एक अभिनव

सिद्धान्त शोधून काढला की ज्याचे वर्णन आचरटपणाचा नमुना यापेक्षा अधिक सुसंस्कृत शब्दांत करता येणार नाही. हा सिद्धान्त असा की पश्चिमेच्या आघाडीवर जे युद्ध चालू आहे ते साम्राज्यशाही युद्ध आणि रशियाच्या पूर्व आघाडीवर जे युद्ध चालू आहे लोकयुद्ध. भारतातील कम्युनिस्ट पक्षाच्या बुद्धिदारिद्र्याचे हे प्रदर्शन भेसूर होते असे कोण म्हणणार नाही ?

कम्युनिस्टांचा हा सिद्धांत उकिरड्यावर फेकला गेला तो मॉस्कोहून प्रत्यक्ष आदेश आल्यानंतर. या आदेशानुसार हिटलरविरुद्ध दोन्ही आघाड्यावरील युद्ध हे लगेच लोकयुद्ध ठरले. त्या दिवशी रॉय यांनी खळखळून हसत म्हटले, " बिचारा स्तालिन तरी काय करणार ? साऱ्या अप्रबुद्धांचा घोळका त्याच्या भोवती जमला आहे. त्याच्यापर्यंत संदेश पोचवीपर्यंत रशियाच्या दोस्तांविरुद्ध पश्चिम आघाडीवर कम्युनिस्टांनी गोळ्या झाडून हिटलरला मदत करणे अपरिहार्य होते. मार्क्सवादी पोथीपुस्तकात हरक्षणी बदलणाऱ्या परिस्थितीबद्दलचे आखाडे कसे सापडणार ? त्यासाठी कल्पनाशक्ती लागते. चिकित्सक बुद्धी लागते. त्याचेच तर कम्युनिस्ट विश्वात आता वावडे झाले आहे. "

रॉय यांच्यावर विखारी टीका करणारे अनेक लोकही कम्युनिस्टांप्रमाणेच कालांतराने हतबल झाले. तेरा हजारांबद्दलचा रहस्यस्फोट एम्. एन्. रॉय यांच्या विचारशक्ती बधिर करू शकला नाही. उलट ते व त्यांचे अनुयायी तेरा हा आकडा दुश्चिन्हाचा न मानता आपल्या जीवनाला नवी कलाटणी देणारा एक शुभदायी आकडा आहे असे मानून आपल्या वैचारिक व सांस्कृतिक कार्याची मुहूर्तमेढ उभारण्यात गर्क राहिले. रॉय यांनी " याचि देही याची डोळा " स्वातंत्र्याचे आगमन झालेले पाहिले. या देशात लोकशाहीची प्रतिष्ठापना झालेली पाहिली. स्वातंत्र्याचे अमूर्त स्वरूप मूर्तरूपाला येण्यासाठी त्यांची शक्तीही कारणी लागली होती. लोकशाहीच्या रक्षणा-साठी तर प्रत्यक्ष अग्निकाष्ठे भक्षण करण्यासारख्या यातना त्यांनी सोसल्या होत्या. आता उभ्या जन्मभर केलेल्या कष्टांचे ओझे बाजूला सारून, पैलतीराला लागू पाहणाऱ्या नौकेमध्ये स्वस्थपणे आपल्या हातीच्या वल्ह्यांवर डोके टेकून विश्रांती घेण्याची त्यांची वेळ आली होती. १३ मोहिनी रोडवरील निसर्गसौंदर्याने नटलेल्या आणि शोभिवंत बागबगीच्याने सजलेल्या आपल्या निवासस्थानी उर्वरित आयुष्याचे अखेरचे दिवस रॉय यांनी नितांत समाधानात आणि ते समाधान पराकोटीला नेणाऱ्या विचारमंथनात व स्नेहीजनांच्या सहवासातील काव्यशास्त्रविनोदात घालविले. एका परिपूर्ण जीवनाची ही खरीखुरी सांगता होती.

# सौंदर्यदृष्टी तशीच संसारदक्षता

१३ मोहिनी रोड हे रॉय यांचे निवासस्थान. त्यांनी या घरातून इतिहास घडविला व त्यांनी आणि एलन रॉय या दोघांनी मिळून या इतिहासाला कलाटणी देताना तेथे आनंदाचा बगीचाही फुलविला. बगीचा मात्र केवळ लाक्षणिक अर्थाने नव्हे. खराखुरा फळाफुलांचा, वृक्षलतांचा तो बगीचा होता. एलन रॉय या त्या बगीच्याच्या अन्नदात्या आणि स्फूर्तीदात्या. प्रत्येक वृक्षावर त्यांची मायेची नजर पडे, प्रत्येक लतापल्लवावर त्यांचा प्रेमाचा हात फिरे. प्रवृत्तीने नाही म्हटले तरी त्या गंभीर आणि उभा जन्म राजकीय आंदोलनात खर्च झाल्यामुळे बहुशः त्या विचामग्नही असत. पण आपण जोपासलेल्या वेलीला फुलांचा बहर आला तर त्यांचा आनंद गगनात मावेनासा होई. अशा वेळी वात्सल्याने उचंबळून येऊन त्या फुलांवर हळुवार हात फिरविताना त्या म्हणत, " लुक, हाउ ब्यूटिफुल. इजन्ट इट लव्हली. "

एलन रॉय यांना सभोवतालच्या वातावरणाचा विसर पडत असे तो अशाच एखाद्या क्षणी. पण दुसऱ्याच क्षणी त्या रॉय यांच्याकडे धावून जात आणि त्यांना हाताने धरून आणीत म्हणत, "लुक हाउ ब्युटिफुल." रॉय मंदस्मित करीत आणि कौतुकाने एलन आणि फुलांकडे पाहात म्हणत, " हूं. हूं." रॉय यांनाही फुलांची फार आवड असे. त्यांच्या निवासस्थानासमोरच्या विस्तीर्ण लॉनवर हिरवळ असे. भोवताली वृक्षलताही हिरव्यागार आणि फुललेल्या असत. इतक्या विविधरंगी फुलांनी फुललेल्या की जणु मानवी हातांनी कुणी साडीची किनारच गुंफली आहे. तसे पाहिले तर रॉय यांच्यासारखा क्रांतिकारकाचे खडबडीत आयुष्य जगलेला नेता सौदर्यदृष्टीचा असल्याची पहिली कल्पना मला त्यांच्या विवाहप्रसंगी आली. एलन रॉय यांच्याशी त्यांनी विवाह केला तेव्हा त्यांच्यापाशी स्वतःचे असे घरही नव्हते. मुंबईतील त्यावेळचे एक धनिक खोजा पुढारी श्री. अब्दुल रहमान मिठा यांच्या वाळकेश्वराच्या रस्त्यावरील भव्य फ्लॅटमधील एका खोलीतच ते रहात असत. तो फ्लॅट म्हणजे एक अजबघरच होते. इतक्या जुन्या, तऱ्हेतऱ्हेच्या कलाकृती, इतकी सुंदर तैलचित्रे, इतके पुतळे—संगमरवरी व ब्राँझचे—इतक्या साऱ्या अजब चिजा तेथे एका दिवाणखान्यात गोळा करून ठेवण्यात आलेल्या होत्या की काही वेळा तेथे पाय फिरकविण्यासाठी सुद्धा वाव नसे. पण विवाहाच्या दिवशी त्या घराचे सारे रूपच बदललेले दिसून आले. आता तेथे अव्यवस्था नव्हती, उलट सुबकपणा आलेला होता. आणि रंगीबेरंगी फुलांच्या गुच्छांनी फुलदाण्या

सजविण्यात आलेल्या होत्या. रॉय व एलन रॉय यांच्या प्रेरणेनेच त्या दिवशी घरावर हा साजशृंगार चढला होता हे नंतर आम्हाला कळून आले.

हा विवाह म्हणजे दोघा क्रांतिकारकांचा संगम होता. रॉय यांची लोकप्रियता व या विवाहाची अपूर्वता लक्षात घेता हा विवाह म्हणजे एक भव्य सोहळा सुद्धा झाला असता. पण रॉय यांना देखावा असा कधीच पसंत पडला नाही. त्यांनी आपला विवाह तर आपल्या नजीकच्या स्नेह्यासोबत्यांपुरताच मर्यादित ठेवला. अगदी निवडक असे त्यांचे स्नेही त्या दिवशी ओल्ड कस्टम हाऊसवरील रजिस्ट्रॉरच्या कचेरीत जमले. नोंदणी बुकावर साक्षीदार म्हणून सह्या केल्या त्या वीर नरीमन, बॅरिस्टर जमनादास मेहता व अब्दुल रहमान मिठा या तिघांनी. साधा समारंभ. प्रसिद्धीच्या झोतापासून पूर्णपणे अलिप्त . एवढी थोर माणसे तेथे जमलेली. बिचाऱ्या रजिस्ट्रारला जीवनाचे साफल्य झाल्यासारखे वाटले. पण रॉय आणि एलन यांनी डामडौल तर केला नव्हताच, पण औपचारिकपणाही त्यांनी या समारंभात आणू दिला नाही. आम्ही आणलेल्या गुलाबांच्या पुष्पमाला त्यांनी परस्परांना घातल्या आणि प्रसन्न मुखाने त्यांनी रजिस्ट्रॉरशी हस्तांदोलन केले व बाहेरच उभ्या असलेल्या मोटारीतून ते 'मॉंजिनी'कडे जाण्यासाठी निघाले.

'मॉंजिनी' हे त्या वेळचे फोर्ट विभागातील एक आलिशान रेस्टॉरंट होते. चर्चगेट स्ट्रीटवरील त्या उपहारगृहात फार मोठे धनिक—म्हणजे लक्षाधीशच—जेवणासाठी आणि त्यापेक्षाही मद्यपानासाठी जमत असत. पंजाबच्या संस्कृतीचा त्यावेळी मुंबईमध्ये मागमूसही नव्हता. धनिकवर्गात त्यावेळी रूढ असे ती अँग्लोइंडियन संस्कृती. तिचा आविष्कार भव्य दिवाणखान्यातील ती टेबले, त्यावरील चकचकणारे ते काटे-चमचे, स्वच्छ परीटघडीच्या कपड्यातील ते रुबाबदार वेटर्स, कोपऱ्यात सज्ज होऊन बसलेला बँडवादकांचा तो संच आणि त्याच्या पलिकडे हारीने मांडून ठेवलेल्या मद्याच्या बाटल्यांचे प्रदर्शन करणारा तो बार यांतून प्रगट होत असे. ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या वैभवाचा काळ अजून शिल्लक असल्याची खूण या संस्कृतीच्या अविष्कारातूनच पटत असे आणि म्हणून लठ्ठ पगाराचे नोकरदार, राजकीय आणि सामाजिक क्षेत्रांतील पुढारी आणि धनिक वणिक बाळे आपल्या प्रतिष्ठेची बूज राखण्यासाठीच या उपहारगृहाकडे वळत असत. त्या काळी कोणत्याही समारंभाला शान प्राप्त होत असे ती 'मॉंजिनी'ला उदार आश्रय देऊनच. म्हणूनच रॉय यांच्या विवाहाचे आंतरराष्ट्रीय महत्त्व जाणून, अब्दुल रहमान मिठा यांनी त्या विवाहानिमित्त येथे भोजन-समारंभ आयोजित केला होता. रॉय आणि एलन रॉय यांना अर्थातच युरपमधील आपल्या जीवनाचा पुनःप्रत्यय येणारे एक स्थान म्हणून ते उपहारगृह आवडले. आपल्या सहजीवनाच्या पहिल्या दिवशी होणारा समारंभ अशा या वातावरणात व्हावा याचा आनंद त्यांना का होऊ नये? तो आनंद त्यांच्या चकाक-

णाऱ्या डोळ्यांतून ओसंडून बाहेर पडत होता. त्या डोळ्यांत अधिकच चमक प्रगट झाली ती टेबलावरील नाजूक पेल्यांत ओतलेल्या इटालियन मद्याच्या आस्वादामुळे. बर्फाच्या वेष्टनात गुरफटलेल्या लाल आणि पांढऱ्या मद्याच्या बाटल्या पाहताच रॉय आणि एलन यांना कारावासापूर्वीच्या इटलीतील पर्वतशिखरावरील मेरॅनो-मधील वास्तव्याची आठवण झाली असल्यास नवल काय ? रॉय यांनी नरीमन व, जमनादार मेहता यांना त्या आठवणी सांगताना म्हटले, "हा दिवस दिसेल असे त्यावेळी मला वाटले नव्हते." एलन रॉय यांनी त्यालाच दुजोरा देताना लगेच उद्‌गार काढले, "आणि तो भारतात उगवेल असे तरी कोणाला वाटले होते." त्यावर नरीमन हसत हसत म्हणाले, "तुमच्या भाग्योदयाबरोबर भारताचाही भाग्योदय होऊ दे." जमनादास मेहता येवढेच म्हणाले "तथास्तु." आणि मग सर्वांनी हसत हसत प्याले (अर्थात नरीमन व जमनादास मेहता यांनी फक्त शुद्ध पाण्याचे) उचलले आणि रॉय व एलन रॉय यांचे अभिष्ट चिंतन केले.

रॉय आणि एलन हे संसारदक्ष असल्याचीही प्रचीती आम्हाला त्यानंतर थोड्याच दिवसांत आली. त्या दोघांचे वैशिष्ट्य असे होते की राजकीय कार्य असो, घराची सजावट असो की खाद्यपदार्थ व पेय यांची मिलावट असो, ते काटेकोरपणे व सफाईने प्रत्येक गोष्टीकडे लक्ष पुरवीत. रॉय स्वत. तर उत्कृष्ट स्वयंपाक करीत असत. त्याबद्दल कोणी आश्चर्य व्यक्त केले तर ते म्हणत "स्वयंपाक म्हणजे काय ?— थोडेसे रसायनशास्त्र, थोडीशी अक्कलहुशारी अधिक थोडीशी कल्पनाशक्ती. बस्स." एलन रॉय या त्यात आणखी एका गोष्टीची भर टाकीत असत. ती म्हणजे घड्याळाची गती. त्या गतीकडे लक्ष देता देता त्या हजार कामे उरकीत असत. क्षणात लता-पल्लवांवरील पिकलेली पाने कापून टाक, क्षणात रबरी नळ्यांतून येणारा पाण्याचा प्रवाह बदल, क्षणात झारीने गुलाबांच्या ताटव्यांवर पाणी शिंपड, आणि दुसऱ्याच क्षणी धावत स्वयंपाकघरात जात चुलीवर ठेवलेल्या प्रेशर कुकरचे झाकण काढ असे अष्टावधानी लक्ष त्या सहज रीतीने पुरवीत असत. तेथे अक्कलहुशारीपेक्षा शास्त्रीय दृष्टीलाच अधिक वाव मिळत असे. आणि कौशल्याइतकीच उपयुक्ततेची बूज राखली जात असे.

रॉय व एलन रॉय यांचा १३ मोहिनी रोडमध्ये सहवास असताना तेथील सौंदर्यदृष्टीने ज्याचे मन आकर्षित झाले नसेल असा माणूस विरळाच. प्रचंड वृक्षांनी त्या टुमदार बंगलीवर जणु मायेची सावली धरलेली होती. त्या सावलीतूनच आपण बंगलीत पाऊल टाकतो न टाकतो तोच व्हरांड्यात हारीने ठेवलेल्या खुर्च्या आपल्याला दिसून येत. तेच रॉय यांचे सार्वजनिक स्वागतगृह. तेथे बसल्यानंतर आपण वाटेल तर आराम करावा किंवा टेबलावर पडलेल्या राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय वृत्तपत्रांचे वा मासिकांचे वाचन करावे. ते वाचन चालू असतानाच रॉय पति-पत्नींनी आवडीने

व नितांत प्रेमाने पाळलेल्या मांजरांची पिल्ले आपल्या गोजिरवाण्या शेपट्या पिंजारीत आपल्याजवळ यावयाची. त्यांतील काही इजिप्शियन मांजरे होती आणि बहुतेक सर्व मऊ, उबदार आणि दिसावयाला अति देखणी. रॉय आणि एलन यांना आत्मीयतेने आवडणारा प्राणी कोण असे जर कोणी विचारले तर मी म्हणेन " मांजर "——अगदी माणसापेक्षाही अधिक प्रिय. तुरुंगातील आपल्या वास्तव्यात एका मांजराच्या सहवासात रॉय यांनी दिवस काढले आणि त्या अनुषंगाने केलेल्या विचार-मंथनातूनच त्यांच्या " मांजराच्या आठवणीं"चा संग्रह प्रगट झाला. पुढे ते मुक्त झाले आणि त्यांची अनिकेत अवस्थाही जेव्हा दूर झाली तेव्हा आपले कायमचे दैनंदिन सोबती म्हणून रॉय यांनी मांजरांचीच निवड केली. हे गोजिरवाणे सोबती त्या घरात अगदी मालकाच्या आविर्भावात स्वैर संचार करीत. त्यांना प्रतिबंध तरी कोण करणार ? पण घड्याळाच्या काट्यानुसार न्याहारीला वा जेवणाला हजर रहावयाला ते चुकत नसत. रॉय यांची एक प्रथा असे. एलन वा त्यांनी स्वत: स्वयंपाक तयार केला व साग्रसंगीतपणे सजवून तो टेबलावर ठेवला की तेथेच टांगून ठेवलेली घंटा ते वाजवीत आणि म्हणत, " मॅनकाइंड अण्ड ॲनिमल काइंड, लंच इज रेडी. "

घंटेच्या आवाजाने मानवजात जागृत व्हावयाला थोडावेळ लागत असेल. पण पाच, सात, दहा मांजरे मात्र नाना दिशांहून उड्या मारीत क्षणार्धात भोजन-गृहात येऊन पोचत असत. मग एलन रॉय यांची एकच धडपड उडे. मग पोटाशी आलेल्या "ममा" ला सूप, आडदांड "टॉटसी"ला मटण, चिमुकल्या 'दिवाली'ला नुसतेच दूध अशी अन्नपदार्थांची वाटणी होत असे. पाहुण्यापेक्षांही अधिक अगत्याने एलन या प्राण्यांची देखभाल करीत असत आणि एम्. एन्. रॉय आपल्या सहकाऱ्यांना अगत्याने आग्रह करण्यात मग्न असले तरी त्यांची तीक्ष्ण नजर प्रत्येक मांजराच्या खाण्यापिण्यावर अधूनमधून तरी वळल्याशिवाय रहात नसे.

रॉय व एलन या मांजरांची किती जिवाभावाने देखभाल करीत असत ते एका मांजरीच्या प्रसूतीच्या दिवशी त्यांची जी घालमेल होत होती ती पाहून मला अधिकच प्रकर्षाने कळले. त्या दिवशी "ममा" म्हणून म्हटल्या जाणाऱ्या मांजरीकडे त्या दोघांचे सारखे लक्ष लागलेले होते. तीही रॉय व एलन यांच्या आसऱ्यातच जणु दिलासा घेत होती. रॉय व एलन यांनी तिला दिलासा देण्यासाठी मध्यरात्रीपर्यंत जागरणसुद्धा केले. दुसऱ्या दिवशी सकाळी रॉय यांनी त्या मांजरीची प्रसुतीची बातमी जाहीर केली. त्यांचे डोळे त्यावेळी आम्हाला जड दिसले. पण त्यांच्या मुद्रेवर केवढा प्रसन्नतेचा भाव होता.

रॉय यांच्या प्रेमाचा अनेक सहकाऱ्यांना व अनुयायांना लाभ झाला. त्यांचे वात्सल्य मात्र त्यांच्या आवडत्या मांजरासाठीच जणु राखून ठेवलेले होते.

# तत्त्वज्ञ तसेच अभिजात रसिक

कितीक आठवणी—पूर्व सुखदु:खांच्या—१३ मोहिनी रोडशी निगडित आहेत. देहरादूनच्या निबिड वृक्षराजीनी आणि सुशोभित बागबगीच्यांनी नटलेल्या एका रम्य आणि शांत वस्तीत रॉय यांचे हे निवासस्थान होते. म्हणजे अजूनही ते तसेच आहे. पण रॉय आणि एलन यांच्या पार्थिव अवशेषांवर उभारलेली समाधी हेच त्या घराचे आज आकर्षण झाले आहे. त्या वेळी रॉय यांच्या चैतन्यपूर्ण व्यक्तित्वाने ते फुलून गेलेले असे. रॉय यांना देहरादूनबद्दल आकर्षण वाटले ते त्यांच्या तुरुंगवासातील बराचसा काळ तेथे गेल्यामुळे. त्याशिवाय हिमालयाच्या अगदी पायथ्याशी असलेले हे निसर्गरम्य स्थान रॉय यांना आपल्या चिंतनशील जीवनासाठी फार प्रिय वाटले. १३ मोहिनी रोडच्या विस्तीर्ण हिरवळीवर बसले की समोर मसुरीचा उंच डोंगर दिसतो. आकाश निरभ्र असले की मसुरीच्या डोंगरकपारीत उभारलेल्या घरातील दिवे मंदपणे लुकलुकतानाही दिसतात. फक्त बारा मैलांची चढण चढून गेले की देहरादूनहून मसुरीला पोचता येते. रॉय आणि एलन यांना उंच हवेच्या ठिकाणाचे हे सान्निध्य विशेष आवडत असे याचे कारण त्यांना टायरोल किंवा स्वित्झर्लंडमधील आपल्या जीवनाचा पुन्हा प्रत्यय घेतल्याचा आनंद त्यातून मिळत असे. देहरादूनजवळच्या घाटात आल्याबरोबर हवा कशी थंड भासू लागते. आणि तेथील वातावरण इतके रानवट आहे की रानटी जनावरांचेसुद्धा तेथे वास्तव्य कायम राहिलेले आहे. त्या वातावरणात फरक पडू नये म्हणूनच की काय वन्य पशुपक्ष्यांना तेथे अभय देण्यात आलेले आहे.

रॉय यांचे सारे जीवन नि:संग भटक्याचे गेलेले असल्यामुळे निसर्गाच्या रौद्र स्वरूपाबद्दल नेहमीच त्याना आकर्षण वाटत आले होते. म्हणूनच धुवाधार पाऊस पडू लागला, विजा आकाशात चमकू लागल्या, वादळी वाऱ्याने थैमान घातले की त्यांना खराखुरा जीवनानंद वाटू लागत असे. तशाच वाऱ्यावादळात एकाकीपणे त्यांनी विविध देशांच्या सरहद्दी ओलांडल्या होत्या. असे म्हणतात की शरच्चंद्र चट्टोपाध्याय यांच्या "पथेर दाबी" या कादंबरीत जे एका क्रांतिकारकाचे जीवनचित्र रंगविण्यात आले आहे त्याची प्रेरणा शरद्‌बाबूंना रॉय यांच्या जीवनापासूनच मिळाली होती. ते म्हणणे खरे की खोटे कोण जाणे. पण रॉय यांनी तुरुंगातून लिहिलेल्या एक दोन पत्रांत शरद्‌बाबूंच्या एका कलाकृतीचा जो गौरव

केला आहे त्यावरून रॉय यांच्या साहित्यविषयक रसग्रहणाची मात्र कल्पना आल्यावाचून राहणार नाही. रॉय यांनी तुरुंगात गेल्यानंतर प्रथमच भारतीय साहित्यात अलीकडील काळात जे प्रवाह वाहत आहेत त्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी शरद्बाबूंची " शेषप्रश्न " ही कादंबरी अनपेक्षितपणे त्यांच्या हाती पडली. ती वाचून झाल्यानंतर रॉय एलन रॉय यांना लिहितात, : " आधुनिक साहित्यात कोणती भर पडली आहे हे पाहण्याचा जेव्हा मी प्रयत्न केला तेव्हा माझ्या पदरी बरीचशी निराशाच आली. अगदीच सामान्य असे हे साहित्य मला आढळून आले. पण एका बंगाली कादंबरीने मात्र मला आश्चर्याचा धक्का दिला. 'शेष प्रश्न' नावाची ही शरद्चंद्र चट्टोपाध्याय यांची कादंबरी होय. फार फार सुरेख कादंबरी आहे ती. निश्चितपणे आधुनिक भारतीय साहित्यकृतींतील सर्वश्रेष्ठ. जगातील सर्वोत्कृष्ठ कादंबऱ्यांतही तिची गणना करता येईल. अर्थात या देशाला जगातील साहित्याबरोबर स्थान पटकाविण्यासाठी बरेच परिश्रम करावे लागतील. म्हणूनच या सर्वोत्कृष्ट कादंबरीची सुद्धा सध्याच्या सिंक्लेअर लुईच्या युगातील साहित्यकृतीशी तुलना करता येणार नाही. पण अनातोल फ्रान्स, इब्सेन किंवा झोला यांच्या साहित्याच्या तोडीची ही खास आहे. या कादंबरीची मुख्य नायिका ही एक मुलगी आहे. भौतिकवादी डायोनिसची जणु प्रतिकृतीच म्हणाना. साऱ्या देवादिकांना ती खाली ओढते. शतकानुशतकांच्या पवित्र रूढी आणि परंपरा यांच्या कशा चिंध्या-चिंध्या करून टाकते. "

एलन रॉय यांनी ते पत्र वाचताच आपल्या स्वभावसिद्ध उत्साहानुरूप त्या कादंबरीचे भाषांतर करण्याचा आपला मानस प्रगट केला. त्याला उद्देशून रॉय आपल्या दुसऱ्या पत्रात लिहितात, " भौतिकवादी नायिकेचे चित्रण करणाऱ्या त्या कादंबरीचे भाषांतर करण्याचा विचार माझ्याही मनात उमटून गेला होता. पण ते आता जमणार नाही. तुझी महत्त्वाकांक्षा मात्र अपूर्व आहे. तुला अवगत असणाऱ्या इतक्या थोरल्या भाषांत टागोरांच्या 'देवस्वरूप' भाषेचाही समावेश करण्याचा तुझा विचार आहे की काय ? पण जप बरे बाई, तू बंगाली शिकलीस आणि टागोरांच्या-शिवाय इतर कोणाच्या पुस्तकाचे प्रथम भाषांतर करू लागलीस तर शांतिनिकेतनला भेट देण्याचे तुझे सारे संकल्प वाया जातील बरे. पण या भाषांतराच्या बाबतीतील परिस्थिती इतकी अस्वस्थ करणारी नाही म्हणा. टागोरांची बहुतेक पुस्तके भाषांतरित आहेत——मात्र सर्वोत्कृष्ट पुस्तकांशिवाय इतर. ती सर्वोत्कृष्ट पुस्तके , प्रसिद्धीचा झोत त्यांच्यावर पडण्यापूर्वी आणि कोणालाही आकलन न होणाऱ्या गूढवादी, भविष्यवेत्याच्या भाषेत लोकाना ते संदेश देऊ लागण्यापूर्वी त्यांनी लिहिली होती. पण म्हणूनच त्यांची भक्तिभावाने पूजा केली जात आहे.

" तथापि, शरत् चतर्जी यांच्या भौतिकवादी नायिकेची पाश्चिमात्य जगाला

जो कोणी ओळख करून देईल तो मात्र पुन्हा दुसऱ्या वेळी एका भारतीयाला साहित्यातील नोबेल प्राईझ मिळवून द्यावयाचे श्रेय घेईल यात संशय नाही. आणि खरं सांगतो, दुसऱ्याही वेळी पहिल्या इतक्याच पात्रता असलेल्या व्यक्तीला ते बक्षिस दिल्यासारखे होईल. व्यक्तिशः मात्र मी ' शेष प्रश्ना'ला ' गीतांजली'च्या वरचे स्थान देईन. चांगल्या साहित्याचे रसग्रहण करण्याची माझी पात्रता निर्विवाद नाही हे खरे आहे. पण हा व्यक्तीच्या आवडीनिवडीचा प्रश्न आहे, नाही का ! ' शेषप्रश्न ' हा भारतातील वैचारिक क्रांतीच्या आंदोलनातील एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे अशीच माझी ठाम समजूत आहे. बंगाली भावुकवाद आणि गूढवाद यांनी जे शिसारी आणणारे वातावरण निर्माण केले आहे त्यात या कादंबरीने केवढी तरी खळवळ उडवून दिली आहे. चटर्जी यांनी निर्माण केलेल्या या भौतिकवादी नायिकेची त्यांच्या पूर्वीच्या नायिकांशी तुलना करा म्हणजे केवढी बंडखोरी , केवढा तेजस्वीपणा तिच्यामध्ये प्रतीत होईल. त्या पूर्वीच्या नायिका अन्यायाखाली दडपून गेलेल्या असत. कधीमधी त्या कुरकुर करीत. कधी बंडाचा झेंडाही उभारीत. पण अखेरीस मान वाकविण्यासाठी. अर्थात स्वेच्छेने. पण शरत् चतर्जी हे पायरीपायरीने चढत गेले, वैचारिक दृष्टीने प्रगत होत गेले. आणि अखेरीस त्यांनी ही भौतिकवादी नायिका निर्माण केली— नुसताच बंडाचा झेंडा फडकविणारी नव्हे तर क्रांतीची अग्रदूत होऊ पहाणारी."

वादळी वातावरणाचा उल्लेख करता करता मला रॉय यांच्या सामाजिक बंडखोरीची आठवण झाली आणि त्या संदर्भात शरद्बाबूंच्या कादंबरीचा आणि त्या कादंबरीवरील रॉय याच्या मतांचा व विचारांचा उल्लेख करण्याचा मोह टाळता आला नाही. वैचारिक क्रांतीचा हा अग्रदूत जीवनाची सर्वांगीण अनुभूती घेण्यापासून कधी परावृत्त झाला नाही हेच यातून मला सूचित करावयाचे आहे. रॉय यांच्या अभ्यासिकेत कधी जावे तर ते एखादे किचकट भूमितीचे प्रमेय सोडवित बसलेले दिसून येत. असत. आइन्स्टीनच्या सापेक्षतावादाच्या सिद्धान्ताचा जो सखोल अभ्यास ते करू शकले ते गणिताबद्दलच्या या आस्थेमुळेच होय. पण दुसऱ्या एखाद्या क्षणी ते रहस्यकथेच्या वाचनात मग्न असलेले आढळून येत. " व्हॅन डाईन " हा त्यांचा आवडता रहस्यकथालेखक. तुरुंगात असताना एलन रॉय यांना लिहिलेल्या पत्रात ते वारंवार व्हॅन डाईनचा उल्लेख करीत असत. एका पत्रात ते लिहितात: " बऱ्याच दिवसांपूर्वी माझ्याकडे बारा पुस्तके आली. त्यांपैकी बहुतेक माझी वाचून झाली आहेत. —विशेषत: कादंबऱ्या. रहस्यकथेतील 'व्हॅन डाइन'चा गुन्हेगार मला फार आवडला. त्याचे पहिले पुस्तक मी आधीच वाचले होते. त्याच्या रहस्यकथा म्हणे अधिकृत पोलिसी अहवालावर आधारलेल्या असतात. मला शंका वाटते त्याच्या सत्यतेची. फिलो व्हान्स हा इतकी गूढरम्यता आणतो की त्यातून सत्याचा

अपलाप झाल्यासारखेच वाटते."

दुसऱ्या एका पत्रात रॉय लिहितात, "तुझ्याकडून येणाऱ्या कादंबऱ्यांची मी किती उत्सुकतेने वाट पहात आहे. पूर्वी तू पाठविलेल्या कादंबऱ्या फार सुरेख होत्या. आणखी एक व्हॅन डाइन शोधून तू पाठविलास हे फार चांगले केलेस. प्रिय व्हान्सच्या मी अगदी प्रेमात पडलो आहे. खरोखर मी निरुद्योगी धनिक असतो आणि दुसरे काही झालो नसतो तर खचित त्यांच्यासारखाच काही तरी झालो असतो." रॉय यांची साहित्याबद्दलची आस्था तुरुंगातून लिहिलेल्या पत्रातील पानापानांतून प्रगट झालेली दिसून येईल. त्यांनी विनयशीलपणे आपल्या रसग्रहणाविषयी शंका व्यक्त केली आहे खरी. पण ते रसग्रहण प्रसंगी किती बोचक आणि भेदक होत असे ते रवींद्रनाथांच्या काही पुस्तकांवर त्यांनी केलेल्या उपरोधिक टीकेवरूनसुद्धा कळून आल्यावाचून रहाणार नाही. रॉय हे बंडखोर होते आणि श्रेष्ठांतील श्रेष्ठ व्यक्तीवर सुद्धा आपल्या टीकेचा प्रहार करावयाला ते कधी कचरले नाहीत. अर्नेस्ट हेमिंग्वे यांच्या " फेअरवेल टू आर्म्स " या कादंबरीबद्दल ते म्हणतात: " तू म्हणालीस ते 'सुंदर पुस्तक' म्हणजे एक अगदी अर्धकच्ची साहित्यकृती होय. अर्थात काही, चांगले आणि सुंदर भाग तिच्यामध्ये आहेतच. पण त्यांची गुंफण किती विस्कळितपणे करण्यात आली आहे यातील युद्धस्य कथा रम्या, स्त्रीपुरूष संबंधांच्या आवर्तातच गुरफटून गेल्यासारखी झाली आहे. "

एम्. एन्. रॉय यांनी तुरुंगातून जी पत्रे एलन रॉय यांना लिहिली ती पुस्तकरूपाने प्रकाशित झाली आहेत. ती पत्रे सहज चाळली तरी रॉय यांच्या आवडीनिवडीचे अनेकविध पैलू त्यांच्यामधून किती हृदयंगम रीतीने प्रगट झालेले दिसून येतील. रॉय यांचा व्यवसाय राजकारणाचा–मूलत: क्रांतिवादी राजकारणाचा. पण राजकारणात मग्न असतानाही त्यांनी साहित्य, कला यांच्याकडे दुर्लक्ष केले नाही. त्या साहित्याचा आस्वाद घेता घेताच त्यांनी अनेक मार्गांनी विचारधन गोळा केले. पण त्यांनी विचारधन आपल्या संग्रहीच तेवढे ठेवले नाही. ते विचारधन त्यांनी लोकजागृतीसाठी आणि विशेषत: लोकाग्रणींच्या वैचारिक समृद्धीसाठी इतस्तत: उधळले. भारतातील राजकीय पुढाऱ्यांत, ज्यांनी मूलभूत तात्त्विक विचारांची बैठक उभी करण्याचा प्रयत्न केला असे, हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच नेते आढळून येतील. रॉय यांची त्या पुढाऱ्यांत प्रामुख्याने गणना करावी लागेल. राजकारण हे फक्त व्यासपीठावरून बोलले जात नाही; खऱ्या राजकारणाचा पाया बुद्धिवंतांच्या विचारविनिमयातून घातला जातो याचे मर्म कोणी जाणले असेल तर ते रॉय यांनी. म्हणूनच रॉय हे पार्थिव रूपाने नष्ट झाले असले तरी चिरकाल टिकणाऱ्या पुस्तकांच्या रूपाने ते रसरशीतपणे जिवंत राहिले आहेत. जसजसे दिवस उलटत आहेत तसतसे रॉय यांच्या विचारांचे परिशीलन अधिकाधिक आत्मीयतेने व उत्साहाने होऊ लागले

१०१
९५८८४

आहे. ते परिशीलन करण्याशिवाय त्यांच्या विरोधकांनाही गत्यंतर उरलेले नाही. कारण पौर्वात्य व पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाची बैठक असलेला आणि जगातील क्रांति-कारक चळवळीशी प्रत्यक्ष संबंध ठेवल्यामुळे विचारांची पकड पक्की झालेला आणि त्या विचारांना शब्दरूप देण्यासाठी प्रतिभाशाली शैलीची देणगी असलेला रॉय यांच्याखेरीज दुसरा कोणताही पुढारी विसाव्या शतकाच्या सुरवातीपासून आज-तागायत या भारतात तरी आढळून येणार नाही. बरेलीच्या तुरुंगात यातना भोगीत असतानाही रॉय यांनी कोणते संकल्प जाहीर केले होते त्यांच्याकडे नुसता दृष्टिक्षेप टाकला तरी रॉय यांच्या लोकविलक्षण ज्ञानपिपासेची कल्पना करता येईल. १६ फेब्रुवारी १९३२ च्या पत्रात रॉय एलन रॉय यांना लिहितात: " मला जर आवश्यक सवलती मिळाल्या तर दोन पुस्तके लिहिण्याची माझी योजना आहे. एक हिंदुधर्म—त्याचे तत्त्वज्ञान व संस्कृती यावर. दुसरे गांधीवादाची समीक्षा करणारे—तात्त्विक तशीच तत्त्वज्ञानात्मक. गांधीवाद ही भारतातीलच एक विचारधारा आहे असे नव्हे तर जगात धार्मिक पुनरुज्जीवनाचे जे प्रयोग होत आहेत त्यांचाच हाही एक भाग आहे हे मला या पुस्तकात दाखवावयाचे आहे. त्यानंतर तिसरे पुस्तक लिहिलेच पाहिजे. ते म्हणजे भौतिकवादाची सर्वांगीण चर्चा करणारे; निसर्ग, जीवन आणि इतिहास यांची शास्त्रीय दृष्टिकोणातून चिकित्सा करणारे पुस्तक भारताच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे असे मला वाटते."

त्यापुढे रॉय लिहितात, "या पुस्तकांसाठी मला ग्रंथसामुग्री हवी आहे. भारताशी संबंधित असलेले सारे साहित्य मला येथे मिळेल. पण वैशिष्ट्यपूर्ण साहित्य मला परदेशातूनच आणावे लागेल. कारण ते येथे उपलब्ध नाही. ऑगस्ट थलायमारची मला या कामी मदत लागेल. निदान मूलभूत साधनसामुग्रीचे दिग्दर्शन करण्यासाठी. हे सारे साहित्य शक्यतोवर इंग्रजीत असलेले बरे. परकीय भाषेतील पुस्तके मिळण्याच्या बाबतीत फार अडचणी येतात. त्यानंतर सुसूत्रपणे निवडून आलेले साहित्य मला मिळेल तर फार बरे. जुने पुराणे सारे साहित्य डोळ्यांखालून घालणे अत्यंत कंटाळवाणे आहे. माझा आत्मा काही प्राध्यापकाचा नव्हे. सध्या मी पुन्हा एकदा फ्यूअरबाकचे " वेसेन देसक्रिस्टेन्टम्स " हे पुस्तक वाचीत आहे. पन्नास वर्षांपूर्वी एंगल्सने लिहिले की त्यातील काही भाग त्यावेळीसुद्धा वाचनीय नव्हता. आता तर त्याहीपेक्षा कितीक तरी भाग अनाकलनीय झाला आहे. "

" लेटर्स फ्रॉम जेल " या रॉय यांच्या पुस्तकातून रॉय यांच्या जीवनाचे, विचारांचे, तत्त्वज्ञानाचे, जीवनपद्धतीचे जे दर्शन घडते ते जसे चमत्कृतिपूर्ण तसेच हृदयंगम आहे.

# पंडितजींशी अखेरचा सुखसंवाद

म्. एन्. रॉय यांचे मला नेहमी कौतुक वाटत आले ते त्यांच्या अनेकविध आवडी-निवडींबद्दल. भिन्नभिन्न अशा विषयांत ते जो रस घेत असत त्याबद्दल. साहित्य, चित्रकला, स्थापत्यकला, संगीत या प्रत्येक कलेमध्ये त्यांना आस्था असे. आणि त्यांची रसिकता अशी अभिजात की संगीताचे ते रसग्रहण करू लागले की ऐकणाऱ्याने चकित होऊन ते ऐकत रहावे. पाश्चिमात्य जगात अनेक वर्षे काढल्यामुळे पाश्चिमात्य संगीतामध्ये त्यांना फार मोठा रस वाटत असे. इतका की पॉल रोबसनची एखादी ध्वनिमुद्रिका ऐकू लागले की ते स्वत: तल्लीन होऊन ते गीत गुणगुणू लागावयाचे, पॉल रोबसन हा त्यांचा आवडता गायक. गीत गावे ते अशा भरदार आवाजात. असे रॉय मोठ्या अभिमानाने म्हणत असत. पॉल रोबसन हा जगप्रसिद्ध गायक होण्यापूर्वीची एक हृदयस्पर्शी आठवण रॉय यांनी एकदा सांगितली होती. हिटलरच्या उदयापूर्वीच्या बर्लिनमधील ती आठवण. संगीत, नृत्य या कलांच्या उत्कर्षाचा तो काळ. आंडदांड, उन्मत्त संचलनातील टापांचा आवाज आणि लष्करी संगीताच्या कर्कश तुताऱ्यांचे निनाद "हाइल हिटलर"च्या घोषणेत विराम पावण्याला अजून अवधी होता. वायमर रिपब्लिकच्या लोकसत्तावादी संस्कृतीचा आविष्कार अद्यापही साहित्यसंगीताला मिळणाऱ्या लोकाश्रयातून प्रगट होत असे. त्या जर्मन संस्कृतीच्या वैभवाच्या काळात पॉल रोबसन बर्लिनमधील ऑपेरा हाऊसमध्ये एक कार्यक्रम सादर करण्यासाठी आला होता. जर्मन चान्सेलर फॉन हिन्डेन्बुर्ग आपल्या साऱ्या सरदार दरकदारांसहित, राजनैतिक प्रतिनिधींसहित पॉल रोबसनचे गायन ऐकण्यासाठी आले होते. पॉल रोबसन हा त्या वेळी अगदीच तरुण होता—पोरसवदा होता. फक्त आपल्या कलेमध्ये तो प्रवीण होता. पण या कलेचे गुण अशा विश्वविख्यात चान्सेलरपुढे प्रगट करताना त्याच्या चित्ताचा थरकाप झाल्यास नवल काय ?

रॉय हे आपल्या काही निवडक सहकाऱ्यांसहित त्या कार्यक्रमाला हजर होते. त्यांच्या डोळ्यांतून पॉल रोबसनची भयभीत अवस्था निसटली नाही. त्या आवाजातील थरथरता कंपही त्यांना जाणवला. त्यांना वाटले की यावेळी या नीग्रो गायकाला सहानभूतीचा विश्वास देणे आवश्यक आहे. त्यांनी पहिले गीत संपताच अस्पष्ट अशा टाळ्या निघालेल्या पाहताच 'ब्राव्हो' म्हणून असा काही गगनभेदी आवाज उठविला आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी असा काही टाळ्यांचा कडकडाट केला की

क्षणार्धात सारे थिएटर उत्साहाने निनादून गेले आणि पॉल रोबसन याने लवून वंदन करीत दुसरे गाणे सुरू केले तेव्हा त्याचा आवाज साऱ्या सभागृहात निनादत असलेला आढळून आला. त्यानंतर रॉय म्हणाले, "पॉल रोबसन यांनी बर्लिनचे हृदय जिंकले." फॉन हिन्डेनबुर्ग हे गायन संपल्यानंतर जेव्हा पॉल रोबसनचे अभिनंदन करण्यासाठी रंगभूमीवर गेले तेव्हा सबंध थिएटरने उभे राहून पॉल रोबसनचा गौरव केला. पॉल रोबसनच्या जीवनाच्या सुरवातीला रॉय यांनी त्याच्या गायनाचे जे कौतुक केले ते त्यांच्यामध्ये राजकीय मतभेदांची दरी निर्माण झाल्यानंतरही कधी कमी झाले नाही. गुणांची पूजा करण्याच्या बाबतीत रॉय यांनी मतभेदांना आपल्या भावनेवर कधीही मात करू दिली नाही.

अनंत आठवणी त्यांच्या अंतःकरणात कशा सुप्त असत याचे एक हृदयस्पर्शी उदाहरण त्यांच्या अखेरच्या आजारात माझ्या प्रत्ययाला आले. १९५३ च्या डिसेंबरात रॉय हे अंथरुणाला खिळूनच होते. २५ डिसेंबरचा ख्रिस्त-जन्माचा दिवस हा ते मोठ्या उत्साहाने आणि समारंभपूर्वक साजरा करीत असत. या दिवशी-सुद्धा त्यांनी एलन रॉय यांना सांगून ख्रिसमसचा वृक्ष आपल्या दिवाणखान्यात उभा करावयाला सांगितला होता. दिवाळीच्या दिवशी त्यांच्या घरी जी रोषणाई होत असे तिच्यासारखीच रोषणाई विशेषतः त्यावृक्षावर त्या दिवशी करण्यात आली होती. १३ मोहिनी रोडचा तो प्रघातच होता आणि अशा समारंभाच्या दिवशी ते घर स्नेहीसोबत्यांनी फुलून गेलेले असे. रॉय यांची प्रकृती त्या दिवशी अस्वस्थ असूनही ते अंथरुणावर पडल्या पडल्या त्या आनंदोत्सवात भाग घेत होते. तेथे आनंदाला तोटा नव्हता आणि खाद्यपेयांचा आस्वाद घेता घेता मध्यरात्र केव्हा जवळ आली ते कोणाला कळलेच नाही. मध्यरात्रीचे टोले पडले आणि जणू एखाद्या स्वप्नातून जागृत व्हावे त्याप्रमाणे एकदम खडबडून उठत रॉय म्हणाले, "एलन, तुला हा घंटानाद ऐकू येत नाही का ? ऐक ऐक, क्रेमलिनच्या घंटांचा कसा नादमधुर आवाज होत आहे. होय, होय. क्रेमलिनच्याच या घंटा. असे संगीत दुसरीकडे कोठेच ऐकावयाला मिळणार नाही." रॉय हे आठवणीच्या स्वप्नसृष्टीत गुंगून गेले होते की काय कोण जाणे. पण एलन रॉय यांनी तात्काळ जाऊन आपला प्रभावी ट्रान्झिस्टर दिवाणखान्यात आणला आणि मॉस्कोचे स्टेशन लावले. क्षणार्धात खरोखरच घंटानाद ऐकू येऊ लागला. जलतरंगावर मंद सूर निघावे तशा क्रेमलिनच्या घंटा निनाद करीत होत्या. किती संथ, भावमधुर सुरात. रॉय ते सूर ऐकत बिछान्यावर कलंडले. त्यांची तंद्री लागली होती. एकात्मतेने ते ऐकत होते. त्यांच्या डोळ्यात पाणी तरारले होते.

तसेच त्यांच्या डोळ्यात पाणी तरारले ते पंडित जवाहरलाल नेहरू त्यांच्या अखेरच्या आजारीपणात त्यांच्या रुग्णशय्येजवळ येऊन बसले तेव्हा. पंडितजीही

त्या भेटीत तसेच गहिवरून आले होते. अनेक वर्षांची ओळख असलेले हे दोन राजकीय पुढारी. कधी प्रतिस्पर्धी म्हणून एकमेकांविरुद्ध उभे ठाकलेले. एकमेकांच्या धोरणाचे कठोर टीकाकार. ध्येयाच्या बाबतीत त्यांचे बहुश: एकमत. पण धोरणाच्या बाबतीत त्यांचे डोळे एकमेकांशी कधीच जुळले नाहीत. पण व्यक्तिश: एकमेकांबद्दल जो आदर व काही प्रमाणात जिव्हाळा त्यांना वाटत असे तो प्रसंगविशेषी प्रगट झाल्यावाचून रहात नसे. रॉय यांच्या आजारी-पणात त्यांचे लेखन थांबले आणि त्याबरोबर उपजीविकेचे साधनही नाहीसे झाले. पक्षघाताचा हा आजार जितका गंभीर तितकाच आर्थिक दृष्टीने अधिकच गंभीर बनविणारा होता. हा आर्थिक ताण रॉय आणि एलन यांनी आपल्या तुटपुंज्या उत्पन्नाच्या आधारे आणि सबंध देशभर पसरलेल्या आपल्या अनुयायांकडून येणाऱ्या अगणित लहान लहान मनिऑर्डरींच्या जिवावर सहन केला. त्या मनिऑर्डरी जवळ जवळ अज्ञात अशा लोकांकडून अक्षरश, अपरिचित अशा ठिकाणांहून येत. मग रॉय आणि एलन विचार करीत हा आंध्रमधील, हा केरळमधील, हा बार्शीचा, हा करमाळ्याचा आणि हा ढाक्याचा 'कॉम्रेड' कोणत्या ठिकाणी, कोणत्या कारणाने आपल्याला भेटला असेल ! त्यांना अनेकवेळा ते ठिकाण, तो प्रसंग आठवत असे आणि रॉय यांची आठवण तर इतकी ताजी असे की ते या कॉम्रेडचा व आपला झालेला संवादही एलन यांना सांगत असत. रॉय यांच्या विचाराचा व व्यक्तित्वाचा प्रभाव असंख्य लोकांवर कसा पडला होता याची साक्ष या व्यक्तींनी भक्तिभावाने पाठविलेल्या फूल ना फुलाच्या या पाकळीवरूनच पटून येत असे.

पण देणग्यांचा हा प्रवाहसुद्धा त्या आजारीपणाच्या वाढत्या खर्चासाठी अपुरा पडत असे. रॉय हे स्थितप्रज्ञ होते. पण एलन रॉय यांना प्रसंग साजरा करावयाचा असे. त्यांनी केवळ नाइलाजाने 'रॅडिकल ह्यूमॅनिस्ट' या आपल्या वृत्तपत्रातून मदतीचे आवाहन केले होते. त्याला प्रतिसाद भरपूर आला तो या लहान लहान देणग्यांच्या रूपाने. त्या आवाहनामुळेच जयप्रकाश नारायण यांचे लक्ष रॉय यांच्या दु:स्थितीकडे वेधले गेले. त्यांनी दिल्लीच्या आपल्या भेटीत पंडितजीच्या कानी ही गोष्ट घातली. राजेंद्रप्रसाद यांच्याशीही त्यांचे बोलणे झाले. दोघाही पुढाऱ्यांनी लगेच कृती केली. राजेंद्रबाबूंनी आपल्या पगारातून दर महिन्याला दोनशे रुपये पाठवावयाला सुरुवात केली. सहा महिने अव्याहतपणे त्यांनी हा क्रम चालू ठेवला. पंडितजींनी कलेक्टर मार्फत तात्कालिक अडचणी समजावून घेऊन रॉय यांचे थकलेले औषधांचे बिल मोकळे केले व वैद्यकीय उपचारांसाठी जी जी काही मदत लागेल ती उपलब्ध करून दिली. त्यानंतर थोड्याच दिवसांत पंडितजी रॉय यांच्या भेटीसाठी देहरादूनला गेले. रॉय हे जणू शरपंजरीच पडलेले होते. पण त्यांच्या मुद्रेवर प्रसन्न भाव होता, डोळ्यांत निर्भयतेचे तेज विलसत होते.

वृत्तीमध्ये क्रांतिकारकाची बेफिकिरी होती. पंडितजींनी त्यांच्याकडे पाहिले. बराच वेळ ते पहातच राहिले. दोघांचे डोळे भिडले. दोघांचेही डोळे पाण्याने भरून आले. पण त्यानंतर दोघांनीही स्मित केले. आणि मग हास्यविनोदाने तो दिवाणखाना पुढील अर्धा तास भरून गेला. पंडितजींनी रॉय यांना विचारले, " मी तुमच्यासाठी काही करू शकतो का ? "

रॉय यांनी लगेच उत्तर दिले, " तुम्ही देशासाठी एवढे करीत आहात त्यातच सारे काही आले. "

"पण तुम्हाला पसंत आहे का ते ? " पंडितजींनी खोचकपणे विचारले.

"सर्वच काही नाही. " रॉय शांतपणे म्हणाले, " पण आधुनिक दृष्टिकोण ठेवून विज्ञानाची जी तुम्ही कास धरली आहे त्यातूनच या देशाच्या भाग्याचा पाया घातला जाईल याबद्दल मला संशय नाही."

पंडितजींची मुद्रा हे शब्द ऐकून उजळून निघाली आणि ते गंभीरपणे म्हणाले, " तुमचे सहकार्य याकामी मला हवे आहे. नियोजनाच्या बाबतीत तुमच्या 'पीपल्स प्लॅन' मध्ये जी आखणी करण्यात आली आहे ती आम्हांला अतिशय मार्गदर्शक होणार आहे. तुम्ही बरे झाला की यावर आपण जरा कसोशीने विचार करू. माझे मन मी खुले ठेवले आहे. प्रत्येक नव्या विचाराचे ग्रहण करण्याला माझी नेहमीच तयारी असते. "

" ते मी पहात आहे, पंडितजी. " रॉय तितक्याच गंभीरपणे म्हणाले, " क्रांतीचे प्रचारक आणि क्रांतीचे संघटक यांच्या भूमिका नेहमीच भिन्न राहतात, ज्यांना जीवन प्रत्यक्षपणे घडवावयाचे आहे, त्याला कलाटणी द्यावयाची आहे, त्यांना आपल्या मनाची कवाडे खुली ठेवावीच लागतात. "

" होय, तुमच्यासारख्या विचारवंतांच्या विचारमंथनातून आपल्या कार्याची दिशा आखण्यासाठी, बदलण्यासाठी. " पंडितजी रॉय यांचा हात हातात घेत म्हणाले. पंडितजींनी तो हात आपल्या हातात बराच काळ ठेवला आणि मग आपल्या खुर्चीवरून उठत ते म्हणाले, "रॉय, तुम्ही लवकर बरे व्हावयाला पाहिजे. बरे झाल्याबरोबर दिल्लीत या. मला तुमची फार फार गरज आहे. तुमचे सहकार्य मला हवे आहे. "

एम्. एन्. रॉय यांनी पंडितजींकडे स्थिर मुद्रेने पाहिले आणि मग क्षीणपणे हसत ते म्हणाले, " मी जरूर दिल्लीला येईन--शक्य झाले तर. "

# अखेरचे
# क्षण

१३ मोहिनी रोडचे हिरवे फाटक ओलांडून मी आत गेलो तेव्हा माझ्या छातीत विलक्षण धडधड होत होती. तोच चिरपरिचित रस्ता, फुलांच्या सुगंधाने दरवळलेली ती बाग, विजेच्या प्रकाशात चमकणारी तेथील ती विस्तीर्ण हिरवळ, टुमदार बंगलीवर जणू छायेची पाखर घालणारे ते तीन वृक्ष–सारे काही मला दिसत होते. पण माझ्या बधिर झालेल्या मनाला ते वेडावून टाकणारे सौंदर्य आज सुखवू मात्र शकत नव्हते. माझे डोळे विजेच्या प्रकाशाने उजळून निघालेल्या त्या बंगलीकडे लागले होते. 'मन चिंती ते वैरी न चिंती' असे म्हणतात. मी मनोमन प्रार्थना करीत होतो, की माझ्या मनात ज्या भीतीने घर केले होते ती भीती फोल ठरो.

व्हरांड्यात कितीकजण बसले होते. पण किती निस्तब्धपणे; कोणी बोलले तरी आतल्या आवाजाने, कोणी चालले तरी हलक्या पावलांनी. होय, आपल्याकडून नकळत थोडा जरी आवाज झाला, तरी कृत्रिम उपायांनी चालू ठेवण्यात आलेला एम्. एन्. रॉय यांचा श्वासोच्छ्वास न जाणो एकदम थांबेल, अशीच प्रत्येकाला भीती वाटत होती. तो श्वासोच्छ्वास, ते हृदयाचे स्पंदन हीच रॉय साहेबांच्या चैतन्यमय जीवनाची आज एकमेव खूण राहिली होती.

धडधडत्या हृदयाने मी खोलीत पाऊल टाकले. बाहेर हिवाळ्याचा कडाका पडला होता. झोंबणारे वारे वहात होते. आत शेकाटी धडधडत होती, विजेच्या शेगड्याही पेटलेल्या होत्या. पण मला वाटले, आपले हातपाय गारठून जात आहेत, आपल्या अंगाला कापरे भरत आहे. शेकोटीच्या सोनेरी तांबडसर प्रकाशात उजळून निघालेली एलन रॉय यांची मुद्रा मला दिसते. माझ्याकडे पाहून त्या हसतात. पण त्यांचे डोळे काही निराळीच भाषा बोलत आहेत. ते पाहात आहेत, पण त्यांना जणू काही दिसत नाही, असाच भाव त्या डोळ्यांतून प्रगट होत आहे. आम्ही सर्वच एकमेकांकडे पहात आहोत. पण आमचे डोळे एकाच ठिकाणी केंद्रित झाले आहेत. आमच्या मनश्चक्षूंसमोर एकच दृश्य आहे, आणि ते म्हणजे रॉय यांची रुग्णशय्या.

मी त्या शय्येकडे पाहातो. विद्युत् प्रकाशाने सारी शय्या उजळून निघाली आहे. विजेच्या तीन शेगड्या लाल लाल होऊन तिच्यावर तुटून पडल्या आहेत. पण डोळे दिपविणारा तो प्रकाश, अंग भाजून टाकणारी उष्णता, यांचे आज त्या रुग्णशय्येला

भान राहिलेले नाही. कारण त्या शय्येला शोभविणारी काया आज जणू अचेतन पडली आहे. ती आज बधिर, विकलांग झाली आहे. अधीर डोळ्यांनी मी आज पहातो. रॉयसाहेबांचे ते विशाल पाणीदार डोळे आज घट्ट मिटलेले आहेत. आम्हाकडे सस्मित पहाणारे त्यांचे ओठही आज मिटलेले आहेत. त्यांच्या शरीराची सारी हालचाल थांबलेली आहे; हृदयाची धडधड व्यक्त करणारी नाडीही इतकी मंद चालली आहे, की हळूवार हातालाही तिचे स्पंदन कळेनासे झाले आहे. फक्त चालला आहे तो प्राणवायूच्या साहाय्याने कृत्रिमपणे चालू ठेवण्यात आलेला श्वासोच्छ्वास. तेवढी एकच एक चैतन्याची खूण आम्हाला आज धीर देत आहे.

बाकी सर्व निस्तब्ध आहे. घड्याळाचे काटे फिरत आहेत. त्या नीरव शांततेत घड्याळाची टक्टक् सुद्धा किती मोठ्याने ऐकू येत आहे. तशीच आमच्या हृदयाची धडधड. रात्र मोठी होत चालली आहे. दूरवरून कोल्हयांचे भेसूर रडगाणे ऐकू येत आहे. रातकिड्यांचा किर्रर्र आवाज चालला आहे. मी रॉयसाहेबांच्या बिछान्यापाशी जाऊन बसतो. एलनने त्यांचा हात हातात घेतला आहे. नाडीचे स्पंदन ऐकण्यासाठी ती प्राण एकवटून बसली आहे. थंडीने गोठून जाणाऱ्या वातावरणातही रॉयसाहेबांचे अंग घामाने डबडबलेले पाहून ती वेगाने उठते. " Oh ! It is so cold. " ती रॉयसाहेबांच्या कपाळावरून हात फिरवीत म्हणते. आपले दोन्ही हात त्यांच्या कपाळावरून, तोंडावरून फिरवीत ती पुटपुटते, " माझे हात उष्ण आहेत. होय माझे हात उबदार आहेत. "

पण रॉयसाहेबांचे हात थंड पडत चालले आहेत. आम्ही ते उबदार पांघरुणात झाकून घेतो. पण जेथे रक्तप्रवाहच मंदावत चालला आहे, तेथे उबदार पांघरुणे आणि गरम पाण्याच्या पिशव्या कोठली उष्णता निर्माण करणार ? आम्हाला ते कळते. पण भावड्या आशेने आम्ही जीवन टिकवून धरण्याचा प्रयत्न करीत आहोत. त्यांचीसुद्धा तीच धडपड चाललेली नाही का ? मृत्यूचे पाश त्यांच्यावर पडलेले आहेत. आज कित्येक महिने त्यांचा जीवनमरणाचा लढा चालला आहे. कधीकधी आत्यंतिक यातनांनी ते विकल झाले नाहीत असे नाही. अशाच एका हताश मनस्थितीत त्यांनी आम्हाला विचारले होते, " Why is the process of death so painful ?" पण अशी विकल अवस्था एखाद्याच क्षणी प्रगट व्हायची. बाकी जन्मभर ज्या तत्त्वज्ञान्याच्या शांत आणि निर्भय वृत्तीने ते जगले त्याच वृत्तीने त्यांनी गेल्या दोन वर्षांत मृत्यूशी सामना दिला. दुर्धर रोगाशी झगडताना आणि त्यातून निर्माण झालेल्या असह्य वेदनांना तोंड देतानाही त्यांच्या वृत्तीची शांतता कधी ढळली नाही. त्यांच्या विचारी मनाचा कणखरपणा कधी कमी झाला नाही. त्यांच्या यातना पाहून आमची मने कळवळून जात आणि कधीमधी आमच्या तोंडून नकळत उद्गार बाहेर पडत, " परमेश्वरा, या थोर मनाच्या आणि विचाराच्या माणसाने असा काय तुझा अपराध केला आहे,

की जिवंतपणीच इतक्या मरणप्राय यातना तू त्यांना सहन करावयास लावीत आहेस." पण रॉयसाहेबांचे वंडखोर मन थोडेसे सावध होताच उलट उद्गारले होते, " Technologically you can improve upon God."

मध्यंतरी त्यांच्या प्रकृतीत जेव्हा थोडी सुधारणा झाली तेव्हा अमेरिकेला जावयाची त्यांच्या मनाने जी उचल खाल्ली ती आपल्या रोगांवर अधिक शास्त्रशुद्ध उपाय करता यावेत म्हणूनच होय. खरोखर मृत्यूचे त्यांना कधीच भय वाटले नाही. पण जीवन हे जगण्यासाठी आहे हीच त्यांच्या मनाची श्रद्धा होती. ते जीवन जगलेही परिपूर्णपणे — सुखाबद्दलच्या आसक्तीने, दु:खाबद्दलच्या बेफिकीरीने, यशाबद्दलच्या आकांक्षेने आणि पराभवाबद्दलच्या विरक्तीने. त्याच विरक्त भावनेने त्यांनी लोकनिंदा सहन केली, लोकांच्या उपेक्षेतही समाधान मानले. आणि गेल्या दोन वर्षांत ते जेव्हा हतबल होऊन अंथरुणावर पडले, तेव्हा दुर्धर परिस्थितीशीही त्यांनी सामना दिला. त्या परिस्थितीवर त्यांनी दोनदा मात केली. पण आज मात्र काळाने त्यांना पुरता विळखा घातला आहे. त्यातून स्वत:ला सोडवून घेण्याची त्यांची शिकस्तीची धडपड चालली आहे. मृत्यूची वेळ ते क्षणाक्षणाने पुढे टाकीत आहेत. रॉयसाहेबांच्या जीवनातील हा अंतिम लढा. आम्ही सर्वजण डोळयांत प्राण एकवटून त्या लढ्याकडे आतुरतेने पहात आहोत. आज मात्र आम्हाला आशेचे पाठबळ नाही. कारण प्रबळ मृत्यू आणि क्षीणबल मानव यांतील हा सामना आहे हे आम्हाला स्पष्ट माहीत आहे.

पण कोणी सांगावे ? अजूनही जीवनशक्ती प्रबळ होऊन मृत्यूचा हल्ला परतवून लावील ! होय. ही पहा नाडी हाताला लागू लागली. खरोखर रॉय-साहेबांच्या नाडीचे हे स्पंदन का ? की आमच्या बोटाचे स्पंदनच तो आभास निर्माण करीत आहे ? एलनचा चेहरा नव्या आशेने उजळून निघाला आहे. " डॉक्टर हे ऐका नाडीचे ठोके." ती डॉ. दुर्गाप्रसादांना म्हणते. " एक दोन तीन चार. . ." डॉ. दुर्गाप्रसादांच्या गंभीर मुद्रेवर तोच भाव कायम आहे. त्यांच्या डोळयांत निराशा तरळताना दिसत आहे. पण ते हताश मात्र झालेले नाहीत. काही क्षणांपूर्वी ते म्हणाले होते, " चमत्कार घडून आला तरच रॉय यातून निभावतील." पण नंतर हसतमुखाने ते म्हणाले होते, "पण रॉय यांच्या बाबतीत चमत्कार होणार नाही असे कोणी सांगावे ? "

आमचे भाबडे मन म्हणत होते, " आणखी एकदा चमत्कारही घडून येईल आणि रॉयसाहेबांना पुनरुज्जीवन प्राप्त होईल. " एलनचे स्त्रीमन तर तिला ग्वाही देत होते, की आजची रात्र उलटली तर मृत्यूचे वेळापत्रक मोडेल. आणि मग ? त्याचा विचार करावयाला तिचे मन तयार नव्हते. आजची रात्र कशी टाळावयाची एवढीच तिची चिंता होती. रॉय साहेबांचे हात थंड आहेत ; गरम पाण्याच्या पिशव्या ठेवा.

श्वासोच्छ्वास अडखळताना दिसत आहे; प्राणवायूचा उपचार करा. औषधांचा आता उपयोग नाही. पण इंजेक्शने तर आहेत ! काय म्हणता ? कपाळ थंड पडत चालले ? "होय माझे हात उष्ण आहेत. माझे हात उबदार आहेत." ती म्हणत आहे. आणि रॉय साहेबांच्या कपाळाला, तोंडाला त्या हातांचा विळखा घालीत आहे.

आम्ही सर्वजण ते पहात आहो. आमच्या सदिच्छा तिच्या अंतर्यामीच्या आकांक्षेला साथ देत आहेत. पण डॉक्टर दुर्गाप्रसादांच्या चर्येवरील भाव आम्हांला काय सांगत आहे ? ते आता आमच्याजवळ येऊन बसले आहेत. सिस्टर त्यांच्याकडे पाहाते. ते प्राणवायूच्या नळीकडे टक लावून पहातात. रॉयसाहेबांचा श्वासोच्छ्वास चालला आहे; पण आता तो पूर्वीच्या संथपणाने नव्हे. सिस्टर घड्याळाकडे पहाते. डॉक्टर घड्याळाकडे टक लावून बसले आहेत. "पंधरा मिनिटे झाली". सिस्टर डॉक्टरांना म्हणते, "प्राणवायूची नळी काढू का ?"

"नको. असेच चालू ठेवा." डॉक्टर गंभीरपणे म्हणतात.

एलन डॉक्टरांकडे पहाते. त्या दृष्टीत कधी दिसला नसेल असा हताशपणाचा भाव होता. हृदय पिळवटून टाकणारी करुणता त्या दृष्टीत होती.

मी रॉयसाहेबांचा हात हाती धरतो. पण आता घर्मबिंदू पुसण्यासाठी नव्हे. तो हात आता बर्फासारखा थंड झाला आहे. रॉय साहेबांचा श्वासोच्छ्वास चालला आहे. पण किती कष्टाने ! सिस्टर डॉक्टरांकडे पहाते. तिचा हात प्राणवायूच्या नळीवर असतो. डॉक्टर दुर्गाप्रसाद तिच्याकडे पहातात. आणि आपल्या जागेवरून उठून म्हणतात, "आता नळी काढून टाका."

श्वासोच्छ्वास चालू आहे; पण अधिकच कष्टाने. सिस्टर खुर्चीवरून उठली आहे. डॉक्टर दुर्गाप्रसाद म्हणत आहेत, "मिसेस रॉय यांची काळजी घ्या. त्यांना तेथे खुर्चीवर बसू द्या."

एलन रॉय यांना सर्व काही समजले आहे. करुणताच जणू त्यांच्या चर्येचे रूप घेऊन अवतरली आहे. त्या चर्येवर निर्धारही आहे. रॉयसाहेबांच्या चर्येकडे त्या टक लावून पहात आहेत. मधून मधून तोंडाने त्या पुटपुटत आहेत, "Peaceful ? yes ? हूं ?" जणू काही रॉय आपल्याला उत्तरच देणार या भाबड्या भावनेने त्या त्यांच्याकडे आत्मीयतेने पहात आहेत. रॉयसाहेबांची मुद्राही तितकीच करुण आहे. आपल्यासाठी सातासमुद्रापलीकडून जीव टाकून आलेल्या आणि गेली सतरा वर्षे

"गृहिणी सचिवः सखी मिथः
प्रियशिष्या ललिते कलाविधौ"

अशा विविध नात्याने आणि गेली दोन वर्षे तर परिचारिकेच्याही नात्याने

आपली अहोरात्र सेवा करणाऱ्या आपल्या प्रिय पत्नीचा मूक विलाप तर त्यांच्या अंतर्यामीच्या मनाला ऐकू जात नसेल ना ? त्यांना शक्य असते तर खरोखर एकदा-तरी त्यांनी डोळ उघडून पाहिले असते. एखादा तरी सांत्वनाचा उद्गार काढला असता. एलन रॉय त्यांना म्हणत आहेत, " So you are going " ?

कोण त्यांना उत्तर देणार ? आम्ही श्वास धरून उभे आहो. आमच्या हृदयाची धडधड परस्परांना ऐकू जाईल इतक्या मोठ्याने होत आहे. डोळ्यात दाटलेले अश्रू आम्ही कसेतरी आवरून धरीत आहोत. माझे मन म्हणत आहे, " अश्रूंनो, जरा थांबा. पुढे उरलेल्या साऱ्या हयातीत आता तुमचाच सहवास लाभावयाचा आहे. पण आता मात्र घाई करू नका. कारण न जाणो, अखेरच्या क्षणी रॉयसाहेब क्षणार्धासाठी डोळे उघडतील आणि तुम्ही दाटी केलीत तर मी ज्या सौभाग्याकडे डोळे लावून वसलो आहे ते सौभाग्य मला पारखे होईल. "

एलन रॉय यांचेही भाबडे मन त्यांना म्हणत आहे, अखेरचा क्षण आला आहे. रॉय एकदा तरी डोळे उघडतील. एकदाच आपल्याशी बोलतील. त्या कळवळून रॉय यांना म्हणत आहेत, " एकदाच पहा. तुमच्यावर प्राणापेक्षाही प्रेम करणारे इतके लोक इथे उभे आहेत. "

रॉयसाहेबांनी डोळे उघडले नाहीत. एकच क्षण त्यांच्या ओठांची हालचाल झाली. ते काही बोलत आहेत काय ? त्यांना काही बोलावयाचे आहे काय ? होय. पण त्यांची जीवनशक्ती इतकी क्षीण झाली आहे, की मनात असूनही त्यांच्या ओठातून शब्दच काय, पण उच्छ्वासही बाहेर पडू शकत नाही. अरेरे ! तेवढ्यासाठीही त्यांना केवढे महाप्रयास करावे लागत आहेत ! एलन रॉय अश्रू भरल्या नयनांनी त्या अखेरच्या धडपडीकडे पाहात आहेत. पण त्याही परिस्थितीत त्यांनी आपल्या मुखावर स्मितहास्य ठेवले आहे. न जाणो, रॉय यांनी डोळे उघडले तर ? अखेरच्याही क्षणी त्यांना आपले हसतमुख दिसावयाला नको काय ?

पण रॉयसाहेबांनी डोळे उघडले नाहीत. एकदाच त्यांनी दीर्घश्वास घेतला. त्यांचे ओठ एकदाच विलग झाले. आणि . . . .

अश्रूंनी माझी दृष्टी अंध केली आहे. समोर काय होत आहे हे मला दिसत नाही. एलन रॉय यांचे शब्द जणू कोठून तरी दूर अंतरावरून मला ऐकू येत आहेत, " What shall I do now ? "

ते शब्द तापलेल्या सळीप्रमाणे माझ्या कर्णरंध्रांत शिरत आहेत. खरेच, " What shall I do now ? " माझे अंतर्मनही कळवळून म्हणत आहे. तोच हताशपणाचा भाव तेथे हजर असलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या मुद्रेवर मला दिसत आहे.

रॉयसाहेबांच्या अचेतन मूर्तीकडे पाहून सर्वजण जणू प्रश्न करीत आहेत, " What shall we do now ? "

# चैतन्य लुप्त झाले

'१३ मोहिनी रोड' आज सारी रात्र जागत आहे. रात्रीचे बारा वाजायला दहा मिनिटे असताना या घराचे चैतन्य लुप्त झाले. रात्रीच्या नीरव शांततेचा भंग करीत तेथून जगाला वार्ता गेली, "एम्. एन्. रॉय हे रात्री १२ वाजायला १० मिनिटे असताना देहरादून येथील आपल्या निवासस्थानी निधन पावले."

एम् एन्. रॉय निधन पावले. माझा स्वत:चा विश्वासच बसत नाही. गेले तीन तास मी त्यांच्या बिछान्यापाशी बसलो आहे. त्या तीन तासांतील प्रत्येकक्षणी मी त्यांच्या क्षीण देहातील अखेरची शक्ती कणाकणाने निघून जात असलेली पाहिली आहे. कृत्रिम उपायांनी चालू ठेवण्यात आलेला त्यांचा श्वासोछ्वास कधी संथपणाने तर कधी कष्टाने होत असलेलाही मी पाहिला आहे. तो श्वासोच्छ्वास अखेरचा थांबलेला मी ऐकला आणि यावेळी जणू छातीत कळ उठावी त्याप्रमाणे माझ्या मनात संवेदना निर्माण झाली की, एम् एन्. रॉय यांचे ऐहिक जीवन संपले. त्यांच्या चैतन्यमय जीवनाचा अंत झाला.

मी त्यांच्याकडे पहातो. किती शांतपणे ते झोपलेले आहेत. गेली दोन वर्षे ज्या दारुण शारीरिक यातनांना त्यांनी तोंड दिले त्या यातनांची अस्पष्ट छायाही त्यांच्या मुद्रेवर दिसत नाही. या दोन वर्षांत त्यांच्या खेरीज दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीने कच खाल्ली असती अशा तऱ्हेच्या शारीरिक यातना त्यांना सहन कराव्या लागल्या. त्यापूर्वी कोणाही तेजस्वी राजकीय पुढाऱ्याला दु:सह वाटेल असा राजकीय अज्ञातवास त्यांनी भोगला होता. त्यापूर्वीचे सारे जीवन म्हणजे तर एक प्रखर, कठोर संग्राम. बिनीचे सैनिक म्हणून, एका बलिष्ट साम्राज्यशाहीविरुद्ध केलेला; एका नव्या तत्त्वज्ञानाचा पाईक म्हणून जगातील प्रतिगामी शक्तींविरुद्ध पुकारलेला; जगातील एकपष्ठांश भागावर अधिराज्य गाजविणाऱ्या एका महाप्रतापी नेत्याशी नव्या जगाच्या उभारणीबद्दल मतभेद होऊन त्यातून निर्माण झालेला; यशाच्या मार्गावरील राष्ट्रवाद व त्याचा प्रणेता यांच्या मध्ययुगीन कल्पनापासून हिंदी राष्ट्राला वाचविण्यासाठी करण्यात आलेला, प्रखर कठोर संग्राम. राजकीय, सामाजिक, तात्त्विक, वैचारिक प्रत्येक आघाडीवरील संग्राम. या साऱ्या संग्रामाची जिवंतपणी त्यांना क्षिती वाटली नाही. आज मृत्यूनंतर त्याची अस्पष्ट छायाही

त्यांच्या मुद्रेवर दिसत नाही. शांतपणे, निरागसपणे ते झोपलेले आहेत. तत्त्वज्ञानाची निरामय शांति त्यांच्या मुद्रेवर पसरलेली आहे. म्हणूनच माझे भावडे मन विचारीत आहे, "खरोखरच एम्. एन्. रॉय निधन पावले ?"

'१३ मोहिनी रोड' मधील टेलिफोन खणखणत आहे आणि कोणीतरी भरल्या आवाजात सांगत आहे, 'एम्. एन्. रॉय यांचे देहावसान झाले.' बधिर मनाने ते मी ऐकतो आणि रॉय यांचा हात मी हातात घेतो. थंड आणि चेतनाहीन झालेला आहे तो. त्या स्पर्शाने मात्र पुरेपूर जाणीव करून दिली की, एम्. एन्. रॉय हे आपल्यामधून कायमचे निघून गेले. यापुढे त्यांचा धीरगंभीर आवाज आपल्याला कधीही ऐकू येणार नाही. 'हॅलो' असे किंचित घोगऱ्या आवाजात म्हणून सस्मित हस्तांदोलन करणाऱ्या त्यांच्या हाताची घट्ट ; प्रबळ पण सौहार्दपूर्ण पकड यापुढे आपल्या हाताला कायमची पारखी होणार आहे. कौतुक व प्रेम यांचा वर्षाव करणारे त्यांचे डोळे यापुढे आपल्या डोळ्यांना कधीही भिडणार नाहीत.

या जाणिवेने माझे हृदय कसे गोठल्यासारखे झाले आहे. माझेच काय, येथे हजर असलेल्या प्रत्येक व्यक्तीचे. रॉय यांच्या अचेतन देहाकडे आम्ही पाहतो, पण आमची मने मात्र अशा काळात घोटाळत आहेत की, ज्यावेळी हाच अचेतन देह चैतन्याने भरलेला होता, चैतन्यपूर्ण इतिहासाला तो चालना देत होता.

त्या खोलीतील शेकोटीजवळ मी बसलो आहे. लाल लाल अंगार त्या शेकोटीत धगधगत आहेत. माझ्यासमोर एम. एन्. रॉय यांचा बिछाना आहे. त्या बिछान्यात ते चिरनिद्रा घेत आहेत. समोरच्या खोलीत टांगलेले एक छायाचित्रही मला दिसत आहे. लेनिनच्या मृत देहाचे ते छायाचित्र आहे. त्या चित्रात लेनिनही अशाच तऱ्हेने चिरनिद्रेत विसावलेला दिसत आहे.

काळ कसा झपाट्याने पावले टाकीत आहे. आपल्याला कलाटणी देऊ पहाणाऱ्या महापुरुषांचाही ग्रास घेत तो उन्मत्तपणे पुढे चालला आहे. माझ्या डोळ्यांसमोर चाळीस वर्षापूर्वीचे चित्र उभे राहते. बंगालमधील सुंदरबनात मूठभर क्रांतिकारक जमले आहेत. जर्मनांच्या साहाय्याने हिंदुस्थानात क्रांती घडवून आणून ब्रिटिशांचे उच्चाटन करण्याचे कारस्थान ते रचीत आहेत. हे साहाय्य कोण मिळविणार ? जर्मन अधिकाऱ्यांना गाठून त्यांच्याकडून शस्त्रास्त्रे कोण पैदा करणार ? नरेंद्र भट्टाचार्य हा विशीतला कोवळा तरुण हे साहस करावयाला तयार होतो. तो आता नरेंद्र रहात नाही. जॉन मार्टिन हे नाव घेऊन तो गुप्तपणाने हाँगकाँगला जातो. जर्मन अधिकाऱ्यांबरोबर या तरुणाने संगनमत कसे जुळविले असेल, शस्त्रास्त्रांनी भरलेली बोट बंगालच्या उपसागरात पाठविण्यासाठी त्याने त्यांचे मन कसे वळविले असेल ? ही बोट किनाऱ्याला पोचते. जॉन मार्टिन शस्त्रास्त्रे घेऊन येतो. पण त्या शस्त्रास्त्रांचा ताबा घ्यावयाला येथे कितीसे हात तयार आहेत ?

माझ्या डोळ्यांसमोर जतीन मुखर्जी हे क्रांतिकारकांचे त्यावेळचे अध्वर्यू उभे रहातात. चितगावच्या जंगल विभागात पोलिसांबरोबर त्यांचा सामना होत आहे. पोलिसांच्या गोळ्यांना ते आपल्या बंदुकीतील गोळ्यांनी प्रत्युत्तर देत आहेत. या उघडउघड चकमकीत जतीन मुखर्जी मारले जातात आणि बंगालमधील क्रांति-कारकांच्या युगातील एक पर्व संपते. जतीन मुखर्जी यांच्या विषयी बोलताना रॉय यांचे डोळे भक्तिभावाने कसे भरून येत असत, अभिमानाने कसे चमकत असत तेही मला आठवते. आज रॉय हेही जतीन मुखर्जी यांच्याप्रमाणेच भूतकाळात समाविष्ट झाले आहेत.

किती रोमांचकारी त्यांचे जीवन. क्रांतीचे साहस अपयशी ठरले तरी त्यांनी माघार घेतली नाही. भर दर्यात फुटणाऱ्या नावेतून बाहेर पडणारा दर्यावर्दी जसा सागराच्या लाटांबरोबर सामना देत पण त्यांच्या धडकेवर वाहत जात कोठेतरी पोहोचतो त्याप्रमाणे रॉय चीन, जपान, फिलिपाइन्स या मार्गाने अमेरिकेला पोचले. तेथेच त्यांचा पुनर्जन्म झाला. कारण नरेंद्र भट्टाचार्य हा मानवेंद्रनाथ रॉय म्हणून तेथेच जन्माला आला.

मानवेंद्रनाथ रॉय म्हणूनच आम्ही त्यांना ओळखतो. आज ते अचेतन होऊन पडले आहेत. पण एकेकाळी आंतरराष्ट्रीय क्षेत्रात कोणाही हिंदवासियाने मिळविली नसेल अशी कीर्ती त्यांनी मिळविली होती. मॉस्कोतील एका सभेत बोलत असताना त्यांचे घेण्यात आलेले छायाचित्र माझ्या डोळ्यांसमोर उभे आहे. लेनिनशी झालेली त्यांची पहिली मुलाखत माझ्या मनःश्चक्षूसमोर दिसत आहे. ट्रॉटस्की आणि स्तालिन, बोरोदिन आणि वांग चिंग वाई, टिटो आणि तोग्लियात्ती, झिनोव्हीव्ह आणि दोरियो, ब्रँड्लर आणि थलायमार, लव्हस्टन आणि कोरे, अनेक देशांतील थोर थोर व्यक्ती आज माझ्या डोळ्यांसमोर तरळत आहेत, एकामागून एक निघून जात आहेत. त्यांपैकी काही यशाच्या शिखरावर चढल्या. काही पराभूत होऊन पायाखाली तुडवल्या गेल्या. इतिहासातून नामशेष झाल्या. रॉय यांचे केवढे भाग्य की या व्यक्तींच्या जीवनाशी त्यांचा प्रत्यक्ष संबंध आला, इतिहासाची ही घडण घडत असताना त्यांना प्रत्यक्षपणे त्यात भाग घेता आला. पण आमचे केवढे भाग्य की विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात जगामध्ये ज्या ज्या महान घडामोडी घडून आल्या त्यापैकी बऱ्याच घडामोडींशी प्रत्यक्ष संबंध आल्यामुळे त्यांचे यथार्थ मूल्यमापन करू शकणारी एक थोर व्यक्ती आम्हाला गुरू म्हणून लाभली.

माझ्या मनात विचार येतो, आज आपले ते भाग्य नष्ट झाले. आता थोर विचारांचे लेणे आपल्याला कोण देणार ? वर्तमान घडामोडींचे व विचारप्रवाहांचे पृथक्करण करून भविष्याचा भेद आता आपल्यासाठी कोण घेणार ? शास्त्रीय दृष्टिकोणाची बहुमोल देणगी देत असतानाही जीवनानंद लुटण्याला प्रवृत्त करून

आपल्या जीवनात निरतिशय समाधान निर्माण करण्याचा मार्ग आता आपल्याला कोण दाखविणार ?

'१३ मोहिनी रोड' मधील शांत पण तितकेच कार्यमग्न जीवन मला आठवते. तेथे विचारांचे भांडारच खुले असे. पण तेथे आनंदाचीही वाण नसे. फुलझाडांनी फुललेली बाग, बागडणारी मांजरे, चहा पिता पिता होणाऱ्या गप्पागोष्टी आणि शेकोटीजवळ बसले असताना होणारा काव्यशास्त्रविनोद—जीवनातील आनंद लुटण्यासाठी आणखी कशाची आवश्यकता असणार ?—पण तो आनंद आता आम्हाला कायमचा पारखा झाला नाही का ?

माझ्या मनाला याची जाणीव होत असतानाच '१३ मोहिनी रोड' वर सूर्याचे पहिले किरण पडले. मी शेकोटीजवळून उठून बाहेर आलो. बागेत एलन रॉय फुलांची परडी घेऊन सूर्यकिरणांनी उजळून निघालेली गुलाबाची फुले खुडीत होत्या. त्यांची परडी नाना प्रकारच्या फुलांनी भरून गेली होती. रोज ही फुले उमलत आणि दिवसभर डोळ्यांना शोभा देत कोमेजून जात. काही रमणीय गुलाबाच्या वा सोनचाफ्याच्याच फुलांना रॉय यांच्या हाती जाण्याचे भाग्य लाभत असे. एखाद्या कृपणाप्रमाणे झाडावरच फुलांचे जतन करण्याचा एलन रॉय यांचा नेहमीचा परिपाठ असे. आज मात्र हाती येतील ती फुले त्या ओरबाडून काढीत आहेत, कारण रॉय यांना आज त्या फुलांची ओंजळच त्यांना वहावयाची आहे. प्रभूच्या पूजेला लागून आपले जीवित सफल करून घ्यावयाची या फुलांची ही अखेरचीच संधी नव्हे काय ? उद्या ही फुले उमलतील पण त्यांच्या सौंदर्याचे कौतुक करणारे रसिक डोळे त्यांच्याकडे पहावयाला असणार नाहीत. प्रभूच्या चरणी न लागताच निर्माल्यवत होणाऱ्या फुलांप्रमाणे ती यापुढे उगवतील आणि कोमेजून जातील.

एलन रॉय आपल्या परडीतील फुले आता रॉय यांच्या बिच्छान्यावर ठेवीत आहेत. गुलाबाची टवटवीत फुले किती डौलाने त्यांच्या छातीवर विराजमान झाली आहेत. अर्धोन्मीलित फूल एलन रॉय त्यांच्या हातावर ठेवतात. रॉय यांच्या हातांचा त्यांना स्पर्श होतो आणि आतापर्यंत दाबून ठेवलेला सारा आवेग अश्रुरूपाने त्यांच्या डोळ्यांतून बाहेर पडतो. आवेगाने रॉय यांचे हात हाती घेऊन त्या करुणपणाने म्हणतात, "तुमचे हात थंड आहेत. पण माझ्यापेक्षा थंड खास नाहीत. एकदाच ही फुले हाती धरा. रोज मी तुम्हाला ती अर्पण करीत असे. आता ते कौतुक कोण करील ?"

रॉय यांच्या कौतुकाला पारखे झालेले '१३ मोहिनी रोड' आज शांत, निस्तब्ध आहे. त्या घराचे चैतन्यच आज लुप्त झालेले आहे.

# समारोप

बारा वर्षांचा काळ किती झपाट्याने निघून गेला. पण एम्. एन्. रॉय यांचे निधन काल परवा झाले की काय असा संभ्रम मनात निर्माण झाल्यावाचून राहात नाही. त्यांचे निधनही त्यांच्या विचारांप्रमाणे चटका लावणारे तसेच टवटवीत राहिलेले आहे. त्यांनी चिरनिद्रा घेतली त्यावेळी मी त्या दिवाणखान्यात हजर होतो. त्यांच्या निधनाची जाणीव झाल्यानंतर भग्न अंतःकरणाने एलन रॉय यांनी आवेगाने जे उद्‌गार काढले " आता मी काय करू ? " तेही मी ऐकले आहेत. पण ती काळरात्र उलटून गेल्यानंतर जी पहाट उजाडली, त्या ऐन पहाटे, २६ जानेवारीच्या कुड-कुडावयास लावणाऱ्या थंडीत, १३ मोहिनी रोडवरील बगीच्यातून रॉयसाहेबांच्या आवडीची फुले खुडून आणून ती त्यांच्या पार्थिव देहावर नाजुक हाताने पसरतानाही मी एलन रॉय यांना पाहिले होते. तो शांत, सुशोभित दिवाणखाना, त्या दिवाण-खान्यातील मऊ मखमली गादीवर चिरनिद्रा घेत असलेला रॉय यांचा पार्थिव देह, त्या देहावर विखुरलेली ती ताजी, टवटवीत फुले—ही का मृत्यूची चाहूल ? असेल. चिरनिद्रेला मृत्यू म्हणावयाचे असेल तर खुशाल म्हणा. पण मृत्यूची ही संगत सोबत मला अभद्र, अमंगळ वाटली नाही. जीवनाच्या, सौंदर्याच्या सहवासाचाच मला तरी तो साक्षात्कार वाटला. पण त्यामुळेच एम्. एन्. रॉय यांचे निधन जितके चटका लावणारे तितकेच माझ्या मनात ताजे, टवटवीत राहिले आहे — त्यांच्या विचारांप्रमाणेच.

त्यांच्या विचारांतील हा ताजेपणा अशामुळे राहिला आहे की त्यांचे विचार हे एका दूरदर्शी विचारवंताचे, एका द्रष्ट्याचे विचार होते. म्हणून जसजसा काळ उलटत चालला आहे तसतसे इतर राजकारणी पुरुष व त्यांचे विचार शिळे होत चालले आहेत. पण रॉय यांच्या मूलग्राही विचारसरणीने दाखवून दिलेल्या वाटा मात्र अधिकाधिक उजळून निघाल्यासारख्या भासत आहेत, त्यांनी केलेल्या भाकितांचा प्रत्यय अधिक तीव्रतेने येऊ लागला आहे. एम्. एन्. रॉय यांच्या विचारसरणीचे वैशिष्टचच असे आहे की ती चाकोरीतून वाटचाल करूच शकत नाही. रॉय यांच्या जीवनाचे क्षितिज जसे विशाल, उभे विश्व व्यापून राहिलेले असे झाले, तशीच त्यांच्या विचारांची झेप परिस्थितीच्या मर्यादा न जुमानणारी, तत्त्वांच्या बंधनात न गुरफटणारी अशीच आढळून आली. मनुष्यप्राणी म्हणे परिस्थितीचा गुलाम

असतो. रॉय यांनी वयाच्या चौदाव्या वर्षापासूनच ते मानले नाही. त्यांनी भोवतालच्या परिस्थितीला कलाटणी देण्याचीच महत्त्वाकांक्षा धरली आणि क्रांतिकारकाचे सतीचे वाण हाती घेतले. पण हा क्रांतिकारक नुसताच पिस्तुलधारी राहिला नाही. पिस्तुलाच्या सहाय्याने पारतंत्र्याच्या शृंखला तोडण्याचा प्रयत्न करीत असतानाच क्रांतीच्या उद्दिष्टाची त्याने पाहणी सुरू केली. तो शोध घेत असतानाच रॉय यांच्या मनाचे तारू मार्क्सवादाच्या बंदराला लागले. परिस्थितीच्या मर्यादा जशा त्यांनी त्यावेळी जुमानल्या नाहीत तसेच तत्त्वाच्या बंधनात ते अडकून राहिले नाहीत. त्यांनी भारताचा किनारा सोडला आणि राजकीय क्रांतीकडून ते मूलगामी अशा सामाजिक क्रांतीकडे वळले.

रशियन क्रांतीकडे आकर्षित होऊन त्या क्रांतीचे महत्त्व जाणणारे एम्. एन्. रॉय हे पहिले भारतीय नागरिक होत. त्या क्रांतीच्या विकासाला आणि मार्क्सवादी तत्त्वप्रणालीच्या प्रचाराला भारतीय क्रांतिकारकांमध्ये त्यांनीच प्रथम हातभार लावला. रॉय यांचे जीवन अपयशी ठरले असे जे मानतात त्यांना जीवनाचा अर्थच कळला नाही असे म्हणणे भाग आहे. मेक्सिकोतून लेनिनच्या आमंत्रणावरून रशियाला जाणे, लेनिन-ट्रॉटस्की-स्तालिन यांच्या खांद्याला खांदा लावून कम्युनिस्ट इंटरनॅशनलची उभारणी करणे, पूर्वेकडील देशांत कम्युनिस्ट क्रांतीची ध्वजा फडकविण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या केंद्राचे आधिपत्य स्वीकारणे हे का अपयशी जीवनाचे लक्षण ? रॉय हे ते सारे रोमांचकारी जीवन जगले आणि त्यांचा श्रेष्ठपणा असा की ते केवळ नेत्यांचे एकनिष्ठ अनुयायी म्हणून, त्यांच्या कृपेवर जगले नाहीत; ते स्वयंप्रज्ञेमुळे नेतृत्वाचे वाटेकरी झाले आणि रशियन क्रांतीच्या जगन्मान्य नेत्यांना तुल्यबळ मानून त्यांनी त्यांच्याशी बौद्धिक वाद घातला व आपल्या धोरणाची तरफदारी करताना त्यांच्याशी दोन हात करावयाचेही त्यांनी धाडस दाखविले. ते दोन हात करताना त्यांची ताकद दुबळी पडली असेल व ते नेतेपदावरून ढळलेही असतील. पण बौद्धिक भूमिकेबद्दल आग्रह धरल्यामुळे ते सर्वोच्च कम्युनिस्ट नेत्यांच्या इतराजीला पात्र झाले हे सत्य विसरून कसे चालेल ? आपल्या निष्ठेशी जागरूक रहाणे, आपल्या सदसद्विवेकबुद्धीशी प्रतारणा न करणे हेच धैर्यशाली नेतृत्वाचे गमक मानले जाऊ नये काय ? ते गमक मानले तर, रॉय यांच्या कम्युनिस्ट विश्वातील उत्कर्षाइतकाच तत्त्वशोधनाच्या ईर्षेमुळे त्यांचा झालेला तेथील अस्तही उज्ज्वलच ठरतो.

विचारवंतांच्या जीवनात विचारधन हीच खरी संपत्ती असते. रॉय यांनी ते विचारधन दोन्ही हातांनी गोळा केले आणि आपल्या सहकाऱ्यांच्या व अनुयायांच्या हितासाठी त्यांच्यामध्ये ते उधळून टाकले. एखाद्या कृपणाप्रमाणे त्यांनी त्या विचारधनाभोवती प्रतिष्ठेचे कुंपण घातले नाही, किंवा ते उधळताना आपल्या स्वार्थाची

पर्वा केली नाही. रॉय हे विचार करीत राहिले आणि ते विचार प्रगट करताना नेत्यांना त्याविषयी काय वाटेल, जनतेला ते रुचतील किंवा नाही याची कधीही त्यांनी पर्वा केली नाही. एका विचारवंताचे आणि तेही द्रष्टया विचारवंताचे ते विचार होते. साहजिकच परंपरागत विचारसरणीशी ते जुळले नाहीत, बाबावाक्य प्रमाण मानणाऱ्या लोकांच्याही ते डोक्यावरून गेले. त्याचा परिणामही साहजिकच असा झाला की रॉय हे नेत्यांच्या मर्जीतून उतरले. लोकांचेही ते रंजन करू शकले नाहीत. कोणी म्हणतात की रॉय यांचे जीवन त्यामुळेच अपयशी ठरले.

पण पुन्हा एकदा मला विचारावेसे वाटते की रॉय यांनी जो सिद्धांत मांडला की साम्राज्यशाही ही परिस्थितीच्या दडपणामुळे वसाहतीतील लोकांच्या हातीच प्रथम आर्थिक व्यवहार आणि कालांतराने राजकीय सत्ता सोपवील तो सिद्धांत प्रत्यक्षपणे मूर्तरूपाला आला हे त्यांच्या अपयशी जीवनाचे चिन्ह काय ? राजकारणात मुरलेल्या त्या विचारवंताने घटनासमितीचे ध्येय भारतीय क्रांतीपुढे ठेवले. त्यांची घटना समितीची कल्पना क्रांतिकारक स्वरूपाची होती. म्हणजे घटना समिती ही अधिष्ठित सरकारला आव्हान देऊन स्वतंत्र सार्वभौम भारताची घटना पुकारील असे ध्येयस्वप्न रॉय यांनी आपल्या डोळयांसमोर चितारले होते. त्या ध्येयस्वप्नाला मूर्तरूप देण्यासाठी देशविदेशात प्रचार करणे, या देशात संघटनेची उभारणी करणे हे अपयशाचे चिन्ह मानता येईल काय ? सत्तासंक्रमणानंतर जे अधिकारारूढ झाले ते यशस्वी आणि त्यांच्या कृतींना वैचारिक प्रेरणा देणारे अपयशी अशी का श्रेय-अपश्रेयाची वाटणी करावयाची असते ? नाही बरे, जगाच्या इतिहासात जगज्जेते होऊ पहाणाऱ्या लोकांची नावेही पुसली गेली आहेत तर कालक्रमाने सत्ताधिष्ठित होणाऱ्या नेत्यांची मातबरी काय ! पण रशिया-जर्मनीचा करार झाल्यानंतरही नात्सी जर्मनी सोव्हिएट रशियावर हल्ला चढवील अशी भविष्यवाणी करणारा विचारवंत हा द्रष्टा म्हणून इतिहासात अढळ रहातो हे मात्र लक्षात ठेवण्यासारखे आहे. रॉय यांनी द्रष्टेपणाच्या अभिनिवेषाने २२ जून १९४१ पूर्वी कित्येक दिवस आधी हे भाकित केले होते. हे आकाशातील ग्रहगोलांच्या भ्रमणावरून वर्तविले गेलेले भविष्य नव्हते. राजकीय प्रज्ञावंताने सामाजिक तत्त्वज्ञान व त्याची तर्कशुद्ध परिणती यांची चिकित्सा करून राजकीय घडामोडीचा आखलेला हा आडाखा होता. हिटलर आणि मुसोलिनी रसातळाला गेले, फॅसिस्ट, नात्सी राजवटी कोसळून पडल्या. नात्सीवाद व त्याचे पायाभूत असलेले वंशश्रेष्ठत्वाचे तत्त्वज्ञान श्रेष्ठतर सामाजिक शक्तींच्या प्रभावाखाली चिरडले गेले. पण नात्सी तत्त्वज्ञानाचे स्वरूप लक्षात घेऊन, हुकुमशाहीविरुद्ध लोकशाही शक्तींची एकजूट करण्याची प्रेरणा देणारा रॉय यांचा संदेश अद्यापही ताजा , चैतन्यपूर्ण राहिला आहे.

रॉय यांच्या वैचारिक प्रेरणेचे महत्त्व होते ते असे की ती प्रेरणा वंशश्रेष्ठत्वावर

आधारलेल्या नात्सी हुकुमशाहीविरुद्ध जितकी खवळून उठली तितकीच ती वर्ग-युद्धाच्या ठोकळेबाज सिद्धांताबद्दलच्या कडव्या अभिनिवेषाने, जगाला गुलाम-गिरीच्या बंधनात जखडू पहाणाऱ्या कम्युनिस्ट हुकुमशाहीविरुद्धही तितक्याच बंडखोरपणाने आघात करावयाला प्रवृत्त झाली. रॉय यांनी मार्क्सवादी म्हणून ऐन तारुण्यात जगाच्या व्यासपीठावर पदार्पण केले. पण मार्क्सवादाचे व्यासपीठ क्रांतीच्या बालेकिल्यात जेव्हा एक धर्मपीठ म्हणून पुढे आले तेव्हा मार्क्सवादाच्या पलीकडे जाण्याचेही धाडस दाखवावयाला त्यांनी संकोच केला नाही. त्यांच्या मानसिक विकासाची गती आणि त्यांच्या प्रज्ञेची झेप वेळोवेळी त्यांनी प्रगट केलेल्या मूलगामी विचारांतूनच दिसून येते. हा विचार प्रगत होता म्हणूनच देश, काल आणि परिस्थिती यांच्यावर मात करून बुद्धिवाद्यांना तो विचारप्रवर्तक व कार्यकर्त्यांना तो प्रेरक ठरला. रॉय यांचे कार्यक्षेत्र विश्वव्यापी होते. पण त्या विश्वात जन्मभूमीला एक आगळेच स्थान राहिल्यामुळे रॉय यांनी पतंगाने ज्योतीवर झेप टाकावी त्याप्रमाणे अखेरीस भारताकडेच धाव घेतली. स्वातंत्र्यपूर्व काळात भारताच्या क्रांतिकारी आंदोलनात त्यांनी हिरीरीने भाग घेतला, त्या आंदोलनात ते आपले नेतृत्व टिकवू शकले नाहीत असे सत्कृतदर्शनी कोणालाही निदान काढता येईल. पण शांतपणे, विकाररहित दृष्टीने जे या आंदोलनाकडे दृष्टिक्षेप करतील त्यांना हे निश्चितपणे कबूल करावे लागेल की रॉय यांनी आपल्या विचारसरणीचा ठसा तर भारतातील राजकीय चळवळीवर उमटविलाच, पण काँग्रेस, काँग्रेस समाजवादी व कम्युनिस्ट पक्षातील असंख्य कार्यकर्त्यांच्या विचाराला कलाटणी देण्याचे, सत्ताधिष्ठित नेतृत्वा-विरुद्ध प्रतिनेतृत्व उभारण्याचे कार्यही त्यांनी आपल्या विचारांकरवी पार पाडले. आज त्यामुळे अशी वेळ आली आहे की , गांधी, जवाहरलाल नेहरू व सुभाषचंद्र बोस या राष्ट्रवादाच्या शिल्पकारांचे मूल्यमापन करताना रॉय यांच्या शिक-वणुकीचा, त्यांच्या मूलगामी विचारसरणीचा उल्लेख करणे अपरिहार्य होते. एम्. एन्. रॉय यांचे यश असे की राजकीय चळवळीमध्ये गांधीवादाला रॉयवादाची वैचारिक बैठक खोडून काढल्याशिवाय दुसरे गत्यंतर राहिले नाही आणि सामाजिक चळवळीत परंपरागत , गतानुगतिक असा जो विचारप्रवाह आपले आसन टिकवू पहात होता व आहे त्याला प्रतिस्पर्धी असा आधुनिक, भौतिकवादी आणि विचार-प्रधानदृष्टिकोण जर कोणी दिला असेल तर तो रॉय यांनीच अशी ग्वाही देणे भाग पडू लागले आहे. रॉय आणि नेहरू, रॉय आणि गांधी यांची तुलना करावयाची ही वेळ नव्हे. पण जसजसा काळ उलटत जाईल, पूर्वग्रह लुप्त होत जातील आणि विचार-वंतांच्या नव्या नव्या पिढ्या केवळ विचारांच्या सौंदर्याने लुब्ध होऊन भारतातील नेत्यांचे पुनर्मूल्यमापन करू लागतील तेव्हा एक गोष्ट स्पष्ट होईल की एम्. एन्. रॉय यांचे कर्तृत्व, क्रांतिकालातील त्यांचे कार्य, त्या काळात त्यांनी केलेले मार्गदर्शन,

त्यांनी दिलेला राजकीय व सामाजिक दृष्टिकोण आणि या सर्वांपेक्षाही अधिक महत्त्वाची अशी त्यांची जीवनदृष्टी यांचा विचार केल्याशिवाय स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय क्रांतीचे दिग्दर्शन पूर्ण होणार नाही. एम्. एन्. रॉय यांचे यश त्या सत्यात सामावलेले आहे. एम्. एन्. रॉय हे त्यामुळेच भारताच्या इतिहासात अजरामर होणार आहेत.

REFBK-0015994